**<u>सभापतीस्थानी - माननीय सभापती</u>**

**<u>औचित्याच्या मुद्याबाबत</u>**

श्री.जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. आमदारांना विधान भवनामध्ये येत असताना प्रवेशव्दाराजवळ अडविले जाते. आज सुध्दा मी सदनामध्ये येत असताना सन्माननीय सदस्यांनी ओळखपत्र जवळ ठेवले पाहिजे, गळयात घातले पाहिजे अशा प्रकारच्या सूचना देण्यात आल्या. तसेच तेथील पोलीस इन्स्पेक्टर, पोलीस हे अतिशय उर्मटपणे बोलतात. सभागृहामध्ये या विषयाच्या संदर्भात पहिल्याच दिवशी चर्चा झाली आहे. त्यामुळे हे प्रकार थांबले पाहिजेत. मला याची जाणीव आहे की, आता प्रश्नोत्तराचा तास आहे. मात्र या विषयाच्या संदर्भात आपण सन्माननीय सदस्यांना संरक्षण द्यावे अशी आमची आपल्याकडून अपेक्षा आहे. विधीमंडळातील सन्माननीय सदस्य, अधिकारी कोण आहेत हे पोलीस अधिकाऱ्यांना माहिती नाही. परंतु प्रवेशव्दारा जवळ जो अवमान केला जातो, तो देखील आम्हाला सहन होत नाही.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, जेव्हा पहिल्या दिवशी हा मुद्दा उपस्थित झाला होता, त्यावेळी या विषयाच्या संबंधात एक बैठक बोलविण्यात येईल असे सांगण्यात आले होते.

**सभापती** : त्यादिवशी सांगितल्याप्रमाणे विधानसभेचे माननीय अध्यक्ष आणि मी या विषयाच्या अनुषंगाने बैठक घेतली. पहिल्या दिवशी टॅक्सी अडविण्याच्या संदर्भात मुद्दा उपस्थित झाला होता आणि त्याबाबतीत असा निर्णयही घेण्यात आला आहे की, जर सन्माननीय सदस्य टॅक्सीतून आले तर त्यांना फाटकाच्याबाहेर उतरण्यास सांगावयाचे आणि मग त्यांना पोलिसांच्या गाडीने नाही तर दुसऱ्या शासकीय गाडीने विधान भवनामध्ये आणण्याची व्यवस्था करावयाची. अशा प्रकारचा निर्णय त्याच दिवशी घेण्यात आला असून त्याचे एक्झ्युक्युशनही सुरु झाले आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, आमच्या गाडयांना पास दिलेला असतानाही गेटजवळ गाडया अडविल्या जातात, तीन-तीन वेळा चेक केल्या जातात.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मला असे सांगावयाचे आहे की, सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे गाडयांना पास दिलेला आहे. त्याशिवाय विधान भवनच्या गेटजवळ सन्माननीय सदस्यांना ओळखण्यासाठी विधीमंडळाचे कर्मचारी ठेवलेले आहेत. अशा वेळी या कर्मचाऱ्यांनी पोलिसांना सांगितले की, ठीक आहे, हे सन्माननीय सदस्य आहेत आणि आम्ही त्यांना ओळखतो. मग पुन्हा तो विषय उपस्थित होता कामा नये.याबाबतीत सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते साहेबांना वेगळाच अनुभव आलेला आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : याठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील आणि सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी जी अडचण सांगितली किंवा ज्या भावना व्यक्त केल्या आहेत. त्याबाबतीत मी सांगू इच्छितो की, संबंधित अधिकाऱ्यांना या अनुषंगाने जरुर सूचना देण्यात येतील की, विधीमंडळातील एखादा जबाबदार सुरक्षा अधिकारी किंवा अन्य अधिकारी गेटजवळ ठेवण्यात येईल. जेणेकरुन ते सन्माननीय सदस्यांना सहज ओळखू शकतील. फक्त सुरक्षेच्या दृष्टीकोनातून जी काळजी घ्यावी लागते, ती घेण्यात यावी. त्याचबरोबर आपण सन्माननीय सदस्य सहजरित्या कसे आतमध्ये प्रवेश करु शकतील यादृष्टीने जरुर प्रयत्न करु. आता प्रश्नोत्तराचा तास सुरु होईल.

-----

. . . .अे-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा अभ्यास करण्यासाठी अर्थतज्ज्ञ डॉ. नरेंद्र जाधव यांची एक सदस्यीय समितीच्या अहवालाबाबत**

**(1) * 37543 श्री. दिवाकर रावते , श्री. मधुकर सरपोतदार , डॉ. दिपक सावंत , डॉ. निलम गोऱ्हे , श्री. नितीन गडकरी , श्री. पांडुरंग फुंडकर , श्री.सागर मेघे , श्री.केशवराव मानकर : दिनांक 23 नोव्हेंबर, 2007 रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या दिनांक 21 नोव्हेंबर, 2007 रोजीच्या यादी मधील तारांकित प्रश्न क्रमांक 33810 ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यातील आत्महत्याग्रस्त व कर्जबाजारी शेतकऱ्यांना सुमारे कोट्यावधी रुपयांची पॅकेज जाहिर होऊनही शेतकऱ्यांच्या आत्महत्या कमी न होता त्या वाढतच असल्यामुळे राज्यातील शेतकऱ्यांच्या होत असलेल्या आत्महत्यांचा अभ्यास करण्यासाठी व त्यावर उपाययोजना संबंधी शिफारशी करण्यासाठी अर्थतज्ज्ञ डॉ.नरेंद्र जाधव, कुलगुरू, पुणे विद्यापीठ यांच्या नेमलेल्या एक सदस्यीय समितीने आपला अहवाल शासनास सादर केला आहे काय,

(2) असल्यास, या अहवालातील शिफारशी कोणत्या व त्यावर कोणता निर्णय घेण्यात आला आहे,

(3) अद्याप निर्णय घेतला नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**डॉ.राजेंद्र शिंगणे, श्री.नारायण राणे यांच्याकरिता** : (1) नाही.

(2) व (3) प्रश्न उद्भवत नाही.

अध्यक्ष महाराज, या प्रश्नाच्या उत्तरात मला आपल्या परवानगीने पुढील सुधारणा करावयाची आहे.

याठिकाणी पहिल्या प्रश्नाच्या उत्तरामध्ये "नाही" या शब्दानंतर "समितीस अहवाल सादर करण्यासाठी दि.13-2-2000 च्या शासन निर्णयाव्दारे 1 महिन्याची मुदतवाढ देण्यात आलेली आहे. तसेच शासनाने आणखी 3 महिन्याची मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतलेला आहे."

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, याठिकाणी माननीय राज्यमंत्र्यांनी उत्तरामध्ये सुधारणा केल्याप्रमाणे डॉ.नरेंद्र जाधव यांनी तीन महिन्यामध्ये अहवाल सादर करावयाचा आहे. मागच्या अधिवेशनामध्ये माननीय मुख्यमंत्र्यांनी असे सांगितले होते की, आम्ही कर्जमाफीचा निर्णय मार्च महिन्यामध्ये घेऊ. याबाबतीत केंद्र शासन काय निर्णय घेत आहे याची आम्ही वाट पहात आहोत. याबाबतीत राज्याला काय योगदान देता येईल यादृष्टीने विचार करण्यासाठी डॉ.नरेंद्र जाधव यांना सांगण्यात आलेले आहे. त्यानंतर डॉ.नरेंद्र जाधव हे सर्व पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना भेटले. त्यावेळी त्यांना असे विचारण्यात आले होते की, यासंबंधातील अहवाल वेळेमध्ये

. . . .अे-4



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

देणार आहात काय ? तर त्यावेळी त्यांनी असे सांगितले की, यासंबंधातील अहवाल वेळेमध्ये नाही तर दोन आठवडयामध्ये देणार आहे.

यानंतर श्री.बरवड . . . .

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

वेळेच्या अगोदर देणार आहे. वेळेच्या अगोदर अहवाल देण्याची तयारी असलेल्या डॉ. नरेंद्र जाधव समितीला आता पुन्हा वेळ लागावा असे काय घडले आहे ? अशा अशा पध्दतीने अहवाला पाहिजे याबाबत त्यांना रेफरंसेस दिलेले असतील त्यामध्ये आणखी काही समाविष्ट केले आहे काय ? यामध्ये उशीर का होत आहे ?

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी हा प्रश्न उपस्थित केलेला आहे. या प्रश्नाच्या उत्तरामध्ये दुरुस्ती करताना सन्माननीय राज्यमंत्र्यांनी अशी अधिकची माहिती दिली की, डॉ. नरेंद्र जाधव यांना 3 महिन्यांची मुदतवाढ दिलेली आहे. ती मुदतवाढ देण्याचे कारण काय असा उपप्रश्न सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी विचारलेला आहे. डॉ. नरेंद्र जाधव यांना तज्ज्ञ म्हणून या आत्महत्यांसंधी अभ्यास करुन आत्महत्या थांबविण्याच्या दृष्टीने काय उपाययोजना असावी याचा अहवाल सादर करण्याचे काम दिले आहे. परंतु त्यांच्याकडून अद्याप शासनाकडे अहवाल आलेला नाही. त्यामुळे शासनाला ही मुदतवाढ द्यावी लागत आहे. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते म्हणाले त्याप्रमाणे मागील अधिवेशनामध्ये माननीय मुख्यमंत्र्यांनी शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसंबंधी जी माहिती दिलेली होती ती कर्जमाफी झालेली आहे. राज्य सरकार यासंबंधी काय निर्णय घेईल याबाबत सांगू इच्छितो की, आता अधिवेशन सुरु आहे आणि अधिवेशन संपेपर्यंत त्याचा निर्णय लागेल. डॉ. नरेंद्र जाधव यांच्याकडून अहवाल न आल्यामुळे राज्य सरकारला तीन महिन्यांची मुदतवाढ त्यांना द्यावी लागत आहे. त्याची कारणे त्यांच्याकडून आम्हाला मिळालेली नाहीत.

श्री. दिवाकर रावते : आता 5 एकर पर्यंतच्याच शेतकऱ्यांची कर्जमाफी झाली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढत आहेत. आतापर्यंत 29 आत्महत्या झालेल्या आहेत. माननीय मंत्रिमहोदय श्री. नारायण राणे यांनी जे मत व्यक्त केले ते आम्ही वाचलले आहे. त्यांनी त्याबाबत सांगावे. त्यांनी असे म्हटले होते की, अल्पभूधारकांना आम्ही कर्जमाफी दिलेली आहे, व्हिस्की पिणाऱ्या शेतकऱ्यांना कर्जमाफी द्यावयाची काय ? अशा कुटुंबांची छाननी करावी आणि त्यामध्ये व्हिस्की पिणारे कोण आणि इतर कोण याचा अहवाल द्यावा असा रेफरंस डॉ. नरेंद्र जाधव यांना देण्यात आला आहे काय ?

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ KGS/

ता. प्र. क्र. 37543 ......

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेला प्रश्न वेगळा आहे. परंतु त्यांनी सभागृहात प्रश्न विचारलेला असल्यामुळे उत्तर दिले पाहिजे. पत्रकार परिषदेमध्ये पत्रकांरानी प्रश्न विचारला की, 100 टक्के शेतकऱ्यांना कर्जमाफी करणार काय ? त्यावेळी मी सांगितले की, आता सरकारने 5 एकरपर्यंतच्या शेतकऱ्यांना 60 हजार कोटी रुपयांची कर्जमाफी दिलेली आहे. 4 कोटी शेतकऱ्यांना त्याचा लाभ झालेला आहे. कोणत्या कॅटेगरीमधील शेतकऱ्यांना कर्जमाफी द्यावी याबाबतीत आपले काही मार्गदर्शन असेल तर द्यावे. श्रीमंत, धनाड्य शेतकरी सुध्दा आहेत. बरेच उद्योगपती सुध्दा शेती करतात. त्यांना कर्जमाफी द्यावी काय असे माझे उत्तर होते. सन्माननीय सदस्यांनी त्याचा वेगळा अर्थ लावून शब्दच्छल करु नये असे मला वाटते.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, हा प्रश्न नोव्हेंबरमध्ये विचारल्या गेलेल्या तारांकित प्रश्नाच्या अनुषंगाने विचारलेला आहे. नोव्हेंबर, डिसेंबर, जानेवारी आणि फेब्रुवारी महिने गेल्यानंतर आता आपण मार्चच्या अधिवेशनात उभे आहोत. डॉ. नरेंद्र जाधव यांची नियुक्ती करुन आत्महत्येची कारणमीमांसा शोधण्याची जबाबदारी त्यांच्यावर टाकलेली आहे. त्यांच्यावर ही जबाबदारी कोणत्या तारखेला टाकलेली होती ? त्यावेळी त्यांना जे टर्म्स ऑफ रेफरंसेस दिलेले होते, कोणकोणत्या गोष्टींबद्दल अहवाल द्यावा याचे जे मुद्दे दिलेले होते त्याची माहिती शासन सदनाला देणार काय ? परत त्यांना मुदतवाढ देत असताना कोणत्या कारणासाठी मुदतवाढ पाहिजे याची विचारणा त्यांच्याकडे केली होती काय ? त्यांनी कोणती कारणे सांगितली होती याची माहिती सदनाला द्यावी.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.3743....

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, विदर्भातील विशेषत: सहा जिल्हयातील शेतक-यांच्या आत्महत्या होत होत्या त्यासंबंधी महाराष्ट्र शासनाने डिसेंबर, 2005 मध्ये 1075 कोटी रुपयांचे पॅकेज दिले होते. त्यानंतर माननीय पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग यांनी विदर्भाच्या दौ-याच्या वेळी 3750 कोटी रुपयांचे पॅकेज या सहा जिल्हयांसाठी दिले होते. त्याचे मूल्यमापन करण्याच्या दृष्टीने.....

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, मी पॉईन्टेड प्रश्न विचारला आहेत त्याला मंत्रिमहोदयांकडून पॉईन्टेड उत्तर आले पाहिजे.

**सभापती** : माननीय मंत्रिमहोदयांनी शक्यतो पॉईन्टेड प्रश्नाला पॉईन्टेड उत्तर द्यावे.

डॉ.राजेंद्र शिंगणे : त्या पॅकेजचे मूल्यमापन करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने डॉ.नरेंद्र जाधव यांची नियुक्ती केली होती. त्यासंबंधीचा अहवाल सादर व्हावयास पाहिजे होता तो न झाल्यामुळे त्यांना मुदतवाढ दिलेली आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, डॉ.नरेंद्र जाधव यांनी प्रेस कॉन्फरन्समध्ये असे सांगितले की, तातडीच्या उपाययोजना आणि दीर्घकालीन उपाययोजना असे दोन अहवाल मी देणार आहे. त्यानुसार तातडीच्या उपाययोजना कोणत्या असतील आणि आत्महत्या थांबाव्यात यासाठी दीर्घकालीन उपाययोजना कोणत्या असतील याबाबतचा अहवाल या अधिवेशनापूर्वी सादर होणे अपेक्षित होते. त्यांनी दीर्घकालीन उपाययोजना सुचविल्या असत्या तर त्यांचा समावेश या वर्षाच्या अर्थसंकल्पात झाला असता. परंतु या दीर्घकालीन उपाययोजना सुचविण्याला विलंब होत आहे. डॉ.नरेंद्र जाधव हे दुर्गम भागात फिरत आहेत ही चांगली गोष्ट आहे. पॅकेजमधील उणिवा दूर होतील अशी अपेक्षा होती. परंतु त्यांनी सुचविलेल्या दीर्घकालीन उपाययोजनांचा या अर्थसंकल्पात समावेश होणार नसेल तर या उणिवा दूर कशा करणार ?

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार आणि सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी शेतक-यांच्या आत्महत्यासंबंधी सन्माननीय डॉ.नरेंद्र जाधव यांची नियुक्ती केल्यानंतर त्यांनी अहवाल द्यावयास पाहिजे होता असे म्हटले आहे. त्या





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ MMP/

ता.प्र.क्र.37543....                                        श्री.नारायण राणे....

अहवालामध्ये काय असेल त्याबाबतची चर्चा करणे योग्य होणार नाही. त्यांनी शासनाला अहवालच दिलेला नसल्यामुळे कायम स्वरुपी आत्महत्या थांबाव्यात यादृष्टीने त्या अहवाल कोणत्या उपाययोजना असतील हे आता सांगता येणार नाही. दीर्घकालीन सूचना व अल्पकालीन सूचना असतील त्या आलेल्या नाहीत. तथापि, माननीय सदस्यांचे म्हणणे बरोबर आहे. माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी त्यांच्या नियुक्तीची तारीख विचारली होती. डॉ.नरेंद्र जाधव यांची दिनांक 13.11.2007 रोजी नियुक्ती करण्यात आली होती. त्यानंतर त्यांना दिनांक 13.2.2008 रोजीपर्यंत मुदतवाढ दिलेली आहे. आता त्यांना 3 महिन्यांची मुदतवाढ दिलेली आहे. विदर्भातील सहा जिल्हयात शेतक-यांच्या आत्महत्या होत आहेत त्या थांबण्यासाठी राज्य सरकारने 1075 कोटी रुपयांचे आणि केंद्र सरकारने 3750 कोटी रुपयांचे पॅकेज दिलेले आहे. या पॅकेज अंतर्गत खर्च सुरु असताना आत्महत्या थांबत नव्हत्या किंवा आत्महत्यांचे प्रमाण कमी होत नव्हते असे निदर्शनास आल्यानंतर डॉ.नरेंद्र जाधव यांची नियुक्ती केलेली आहे. या आत्महत्या थांबविण्यासाठी सरकारला तज्ज्ञ म्हणून त्यांच्याकडून मार्गदर्शन मिळावे अशी अपेक्षा आहे. परंतु त्यांचा अहवाल प्रलंबित आहे. हा अहवाल 3 महिन्यानंतर आल्यावर त्यामध्ये ज्या सूचना असतील, त्यामध्ये ही रक्कम सुचविली असेल ती रक्कम शासन कशी देणार असा प्रश्न माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी विचारला आहे. राज्य सरकारने पॅकेज जाहीर केले त्यावेळी कोणताही अर्थसंकल्प सरकारसमोर नव्हता. तरी सुध्दा सरकारने 1075 कोटी रुपयांचे पॅकेज दिलेले आहे. राज्यातील शेतकरी आत्महत्या करीत आहेत त्या थांबल्या पाहिजेत ही सरकारची भावना आहे. त्यामुळे या वर्षाचे बजेट मंजूर झाल्यानंतरही उपाययोजनांसाठी लागणारा पैसा उपलब्ध करुन दिला जाईल. सन्माननीय डॉ.नरेंद्र जाधव यांनी जी रक्कम सुचविली असेल ती तंतोतंत देण्यासाठी पैशाची अडचण येणार नाही, त्यासाठी पैसा कमी पडू दिला जाणार नाही.

नंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

MSS/ KGS/ MMP/ पूर्वी श्री. खंदारे 12:15

(ता.प्र.क्र. 37543...

डॉ.दीपक सावंत : आजपर्यन्त राज्य शासनाला टाटा इन्स्टिटयूट ऑफ सोशल सायन्स, श्रीजित मिश्रा अॅण्ड आदर्स, सर्व्हिंग फार्मस् अॅण्ड सेव्हिंग फार्मस् यांचे शेतक-यांच्या आत्महत्येच्या संदर्भात 4 ते 5 अहवाल प्राप्त झालेले आहेत. तसेच इंदिरा गांधी इन्स्टिटयूट, पुणे या संस्थेचा अहवाल देखील प्राप्त झालेला आहे. तेव्हा या अहवालाच्या संदर्भातील तसेच जेव्हा डॉ. नरेंद्र जाधव यांची समिती नियुक्त केली त्यावेळचे टर्म्स ऑफ रेफरन्स काय होते ? 5 अहवाल प्राप्त झाल्यानंतर सहाव्या अहवालासाठी डॉ.नरेंद्र जाधव यांची समिती नियुक्त करण्यात आलेली. म्हणून त्यासाठी वेगळे टर्म्स ऑफ रेफरन्स होते काय ?

श्री. नारायण राणे : डॉ. नरेंद्र जाधव यांच्या एक सदस्यीय समितीचा अहवाल प्राप्त झ ालेला आहे काय, असा मूळ प्रश्न विचारण्यात आलेला आहे. तेव्हा सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी विचारलेला प्रश्न हा मूळ प्रश्नाशी संबंधित नाही. शेतक-यांच्या आत्महत्येच्या संदर्भात वेगवेगळया संस्थांनी अहवाल दिलेले आहेत. शेतक-यांच्या आत्महत्येची कारणे काय आहेत याचा अभ्यास करण्यासाठी त्या संस्थांना नेमले होते. कर्जाच्या बोजामुळे, कौटुंबिक तसेच सामाजिक समस्यांमुळे, व्यसनाधीनतेमुळे किती आत्महत्या झाल्या यासंबंधीचे अहवाल त्या संस्थांनी दिलेले आहेत. शेतक-यांच्या आत्महत्या होऊ नयेत यासाठी राज्य सरकारने पॅकेज जाहीर केले. तरी सुध्दा शेतक-यांच्या आत्महत्या कमी होत नाहीत हे लक्षात आल्यानंतर या संबंधी अभ्यास करण्यासाठी आणि आत्महत्या होऊ नयेत यासाठी कोणते उपाय योजले पाहिजेत यासंबंधी अभ्यास करण्यासाठी सन्माननीय अर्थतज्ज्ञ डॉ. नरेंद्र जाधव यांची एक सदस्यीय समिती नियुक्त करण्यात आली. त्या समितीचा अहवाल प्राप्त झालेला नाही. अहवाल सादर करण्यासाठी त्यांना आणखी तीन महिने मुदतवाढ दिलेली आहे.

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## राज्यातील विदर्भ व मराठवाडा विभागात तसेच उर्वरित महाराष्ट्रातील विविध भागात नापिकी व कर्जबाजारीपणामुळे शेतकऱ्यांनी केलेली आत्महत्या

**(२) * ३८३२१ श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील , श्री.अरुण गुजराथी , श्री.केशवराव मानकर , श्री. जगदीश गुप्ता , श्री.सागर मेघे , श्री. नितीन गडकरी , श्री. सुरेश जेथलिया , डॉ. निलम गोऱ्हे , श्री. किसनचंद तनवाणी :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विदर्भ व मराठवाडा विभागात तसेच उर्वरित महाराष्ट्रातील विविध भागात नापिकी व कर्जबाजारीपणामुळे माहे नोव्हेंबर, २००७ ते १५ फेब्रुवारी, २००८ या कालावधीत शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याच्या अनेक घटना घडल्या हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त कालावधीत आत्महत्या केल्याच्या घटनांचा जिल्हानिहाय तपशील काय आहे,

(३) राज्यात होणाऱ्या आत्महत्या रोकण्यासाठी राज्य शासनाकडून करण्यात आलेल्या उपाययोजनांचे स्वरूप काय आहे,

(४) तसचे शेतकऱ्यांना केंद्र शासनाने व राज्य शासनाने जाहिर केलेल्या विशेष आर्थिक सहाय्य केंद्राच्या अंमलबजावणीबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**डॉ. राजेंद्र शिंगणे, श्री. नारायण राणे यांच्याकरिता :** (१) होय, अशा काही आत्महत्येच्या घटना घडल्या आहेत.

(२) माहे नोव्हेंबर, २००७ ते १५ फेब्रुवारी, २००८ या कालावधीत नापिकी व कर्जबाजारीपणा या कारणास्तव केलेल्या आत्महत्त्याबाबतचा जिल्हानिहाय तपशील सोबत जोडला आहे.

(३) राज्यात होणाऱ्या आत्महत्या रोखण्यासाठी राज्य शासनाने दिनांक १९ डिसेंबर, २००५ च्या शासन निर्णयान्वये विविध उपाययोजनांचा समावेश असलेले एक विशेष पॅकेज घोषित केलेले आहे.

(४) केंद्र शासनाने व राज्य शासनाने जाहीर केलेल्या विशेष आर्थिक पॅकेजची अंमलबजावणी राज्यात प्रभावीपणे सुरू आहे.

विधानपरिषद तारांकित प्रश्न क्रमांक ३८३२१ चे विवरणपत्र

**राज्यात माहे नोव्हेंबर, २००७ ते १५ फेब्रुवारी, २००८**
**या कालावधीत झालेल्या शेतकरी आत्महत्यांचा तपशील**

| जिल्हा | एकूण प्रकरणे | पात्र प्रकरणे |
|---|---|---|
| पुणे | ८ | ३ |
| सातारा | ८ | -- |
| सांगली | १६ | ५ |
| सोलापूर | ५ | -- |
| कोल्हापूर | ३ | -- |





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

| | | |
|---|---|---|
| ठाणे | १ | १ |
| नाशिक | ११ | ९ |
| | | |
| धुळे | २० | -- |
| नंदूरबार | १ | -- |
| जळगाव | १८ | ७ |
| अहमदनगर | ८ | २ |
| औरंगाबाद | ८ | ५ |
| जालना | २ | -- |
| परभणी | ६ | -- |
| हिंगोली | ४ | २ |
| नांदेड | ११ | ६ |
| बीड | १३ | ९ |
| लातूर | १ | -- |
| उस्मानाबाद | २१ | ९ |
| नागपूर | २० | ४ |
| वर्धा | ३८ | ५ |
| भंडारा | ११ | १ |
| गोंदिया | ८ | ५ |
| चंद्रपूर | १८ | ९ |
| गडचिरोली | ३ | १ |
| अमरावती | ८७ | २२ |
| अकोला | ३४ | १२ |
| यवतमाळ | ९१ | २६ |
| बुलढाणा | ६५ | १३ |
| वाशिम | ४४ | ६ |
| **एकूण** | **५८४** | **१६२** |

श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील : नोव्हेंबर 2007 ते फेब्रुवारी 2008 पर्यन्त राज्यामध्ये 584 शेतक-यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. त्यापैकी 162 प्रकरणे पात्र झालेली आहेत व 422 प्रकरणे अपात्र झालेली आहेत. तेव्हा अपात्रतेचे निकष काय आहेत ? अपात्र ठरलेल्या 422 प्रकरणांमध्ये शासन मदत करणार आहे काय ?

==4==



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र. 38321.....)

डॉ. राजेंद्र शिंगणे : नोव्हेंबर 2007 ते 15 फेब्रुवारी 2008 पर्यन्त 584 शेतक-यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. त्या पैकी 162 प्रकरणातील संबंधित शेतक-यांच्या वारसांना मदत करण्यात आलेली आहे. प्रकरणे अपात्र ठरविण्याचे निकष काय आहेत ? असा सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारलेला आहे. यासंदर्भात जिल्हाधिका-यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आलेली आहे. त्या समितीमध्ये अशासकीय सदस्य शेतक-यांचे प्रतिनिधी असतात. शेतक-यांची आत्महत्या झाल्यानंतर त्यासंदर्भात मदत करण्याचा निर्णय त्या समितीमध्ये घेतला जातो. शेतकरी कर्जबाजारी आहे काय, कर्जाच्या वसुलीचा तगादा होता काय, कुटुंबावर तसेच वैयक्तिक कर्ज होते काय अशा प्रकारचे निकष ठरविण्यात आलेले आहेत. या निकषात बसत असेल तर त्या कुटुंबाला 1 लाख रु.ची आर्थिक मदत दिली जाते. 162 पात्र प्रकरणे आहेत. बरीचशी प्रकरणे अपात्र ठरलेली आहेत. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे जी प्रकरणे अपात्र ठरलेली आहेत त्यांची पुन्हा एकदा माहिती घेतली जाईल आणि त्यांना मदत देण्याच्या संदर्भात योग्य तो निर्णय घेतला जाईल.

श्री. अरुण गुजराथी : केन्द्र शासनाचे 3750 कोटी आणि राज्य शासनाचे 1075 कोटी असे पॅकेज देण्यात आलेले आहे. त्या पैकी किती खर्च झाला ? नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ? शेतक-यांना ज्या वस्तू आणि सामान देण्यात आलेले होते ते योग्य पतीचे यनव्हते अशा प्रकारच्या तक्रारी शासनास प्राप्त झालेल्या आहेत काय ? त्या संदर्भात शासनाने काय कारवाई केली आहे ?

===नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 38321....

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, शेतक-यांच्या होत असलेल्या आत्महत्याच्या संदर्भात केंद्र आणि राज्य शासनाने पॅकेज जाहीर केले होते, त्या पॅकेजची रक्कम कशा पध्दतीने खर्च झ ाली आहे यासबंधीचा आढावा सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी यांनी प्रश्न रुपाने विचारलेला आहे. शेतक-यांनी आत्महत्या करु नयेत म्हणून केंद्र शासनाने 3750 कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले होते. केंद्र सरकारच्या पॅकेजमधील 31 जानेवारी, 2008 पर्यंत 57.71 टक्के
झालेला आहे. व्याज माफी, आश्वासित सिंचन योजना, सुक्ष्म सिंचन, पाणलोट क्षेत्र विकास, वॉटर हर्व्हेस्टींग, विस्तार सेवेमध्ये बियाणे वाटप, राष्ट्रीय फलोत्पादन मिशन कार्यक्रम, शेतीपूरक व्यवसाय इत्यादी गोष्टींसाठी पॅकेजमधील तरतूद खर्च करण्यात आली आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी म्हणजे राज्य शासनाने 1075 कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले होते. या पॅकेज अंतर्गत जानेवारी, 2008 अखेर 93.95 टक्के खर्च झालेला आहे. या दोन्ही पॅकेजचा खर्च समाधानकारक झालेला आहे. वेगवेवगळया माध्यमातून शेतक-यांसाठी हा खर्च झालेला आहे. या पॅकेजमधून शेतक-यांना निकृष्ट प्रतीच्या औजारांचे वाटप झालेले आहे अशा प्रकारच्या मोठया प्रमाणात तक्रारी आलेल्या आहेत काय अशा प्रकारचा दुसरा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी विचारलेला आहे. निकृष्ट प्रतीच्या औजारांचे वाटप केले गेले अशा तक्रारी आलेल्या आहेत ही गोष्ट खरी आहृ सहा जिल्हयामध्ये पॅकेजच्या माध्यमातून विशेषत: कृषि विभागाकडून औजारे वाटली गेली आहेत. ती औजारे निकृष्ट प्रतीची होती अशा तक्रारी शासनाकडे प्राप्त झाल्या आहेत. या पॅकेजच्या माध्यतातून शेतक-यांना बैलगाडया दिल्या आहेत, मळणी यंत्रे दिलेली आहेत, लोखंडी नांगर दिलेले आहे. निकृष्ट दर्जाच्या औजारांचे वाटप केले गेले आहे अशा प्रकारच्या तक्रारी आलेल्या आहेत. त्यातील काही तक्रारींच्या बाबतीत संबंधित विभागाकडून चौकशी केली गेली आहे. काही तक्रारींची चौकशींची प्रकरणे प्रलंबीत आहेत. या संदर्भात काही अधिकची माहिती आवश्यक असेल तर ती माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, पहिला प्रश्न विचारण्यात आला आहे की, नापिकी आणि कर्जबाजारीपणामुळे माहे नोव्हेंबर,2007 ते 15 फेब्रुवारी, 2008 या कालावधीत शेतक-यांनी आत्महत्या केल्याच्या अनेक घटना घडल्या हे खरे आहे काय ? या प्रश्नास "होय" असे उत्तर दिले आहे. परंतु उत्तरातील पुढील वाक्य मात्र जखमेवर मीठ चोळण्यासारखे आहे. अशा काही

2...

ता.प्र.क्र. 38321....

श्री. अरविंद सावंत...

आत्महत्येच्या घटना घडल्या आहेत. 584 शेतक-यांच्या आत्मत्येच्या घटना या अशा काही होतात. मग किती आत्महत्या झाल्यानंतर आपण त्यांना अनेक आत्महत्या म्हणणार ? असा माझा पहिला प्रश्न आहे. सन्माननीय सदस्यांनी असाही प्रश्न विचारला होता की, कर्जबाजारीपणामुळे आत्महत्या झाल्या आहेत काय ? त्याही प्रश्नास शासनाकडून समाधानकारक उत्तर दिले गेलेले नाही. म्हणून या संदर्भात झाला प्रश्न असा आहे की, 584 शेतक-यांनी आत्महत्या केल्या आहेत त्यातील किती शेतक-यांवर कर्जाचा बोजा होता ?

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, किती आत्महत्या झाल्यानंतर अनेक आत्महत्या झाल्या असे ग्राह धरण्यात येईल. मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, हा एक वेगळा आणि भावनेचा प्रश्न आहे. या राज्यातीत शेतक-यांच्या आत्महत्येच्या घटना घडू नये अशीच शासनाची धारणा आहे. सन्माननीय सदस्यांनी शेतक-यांवरील बोजाच्या संदर्भातील प्रश्न उपस्थित केला. त्याबाबतीत सांगू इच्छितो की, या सगळया शेतक-यांवर कर्जाचा बोजा होता. परंतु मदत देण्यासाठी पात्र शेतकरी कमी ठरलेले आहेत. पहिल्याच प्रश्नाच्या उत्तरामध्ये सांगितले की, ही बाब पुन्हा तपासली जाईल आणि शेतकरी कर्जबाजारी असेल, तगादा असेल तर अशा शेतक-यांना मदत करण्याची भूमिका राज्य शासनाकडून घेतली जाईल.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, राज्यातील विदर्भ व मराठवाडा विभागात तसेच उर्वरित महाराष्ट्रातील विविध भागात नापिकी व कर्जबाजारीपणामुळे शेतक-यांनी आत्महत्या केल्याच्या घटना घटना घडल्या आहेत. या राज्यात ज्या जिल्हयांमध्ये शेतक-यांनी आत्महत्या केल्याच्या घटना घडल्या आहेत त्या जिल्हयांची नावे आणि आत्महत्येसंबंधीची आकडेवारी उत्तरात नमूद केलेली आहे. या संपूर्ण आकडेवारीच्या तक्त्यामध्ये सिंधुदूर्ग, रत्नागिरी आणि रायगड जिल्हयाचा नावाचा उल्लेख दिसून येत नाही. शेतक-यांच्या आत्महत्येच्या घटना घडू नयेत म्हणून माननीय पंतप्रधान यांनी 3750 कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले. यासाठी 1075 कोटी रुपयांचे पॅकेज राज्य शासनाने जाहीर केले. हे पॅकेज कोणकोणत्या कामासाठी दिले? कोणकोणत्या बाबींवर पॅकेजमधील निधी खर्च केला गेला ? यासंबंधीची सविस्तर माहिती माननीय मंत्री महोदयांनी या ठिकाणी दिली आहे. शेतक-यांच्या जमिनी नापिकी होऊ नयेत, त्यांची शेती

3...



ABG/ KGS/ MMP/ प्रथम श्रीृ शिगम 12:20

ता.प्र.क्र. 38321....

श्री. भास्कर जाधव...

कायम सुपीक रहावी म्हणून त्या शेतक-यांना शेतीसाठी सर्व सुविधा उपलब्ध करुन दिल्या. कोकणातील या तीन जिल्हयामध्ये शेतक-यांच्या आत्महत्येच्या घटना घडत नाहीत. याचा अर्थ कोकणामध्ये दुष्काळ नाही. कोकणामध्ये संपूर्ण जमिनी पिकता आहेत काय ? कोकणात मत्स्यदुष्काळ आहे. 2005,2006 आणि 2007 या वर्षात मोठया प्रमाणात महापूर आले, त्यामुळे तेथील संपूर्ण शेती वाहून गेली आहे कोकणात अतिवृष्टीमुळे आंबा पिकाचे नुकसान झाले, त्याबाबतीत नुकसान भरपाई दिली गेली. कोकणातील शेतकरी आत्महत्या करीत नाहीत म्हणून त्यांना मदत दिली जाणार नाही काय ? कोकणातील शेतकरी प्रतिकूल परिस्थितीशी सामना करीत आहेत. प्रतिकूल परिस्थितीशी तेथील शेतकरी संघर्ष करीत आहे. तो संघर्ष टिकून रहावा म्हणून राज्य शासन आणि केंद्र शासन कोकणातील शेतक-यांना काय मदत करणार आहे ?

यानंतर श्री. कानडे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ KGS/ MMP/ 12:25

ता.प्र.क्र. 38321 पुढे सुरु ....

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव यांनी भावनिक प्रश्न याठिकाणी विचारला आहे. मूळ प्रश्नाशी या उपप्रश्नाचा तसा संबंध येत नाही. उर्वरित महाराष्ट्र जरी असला तरी ज्या जिल्हयांमध्ये आत्महत्या होत नाहीत त्या जिल्हयामध्ये शेतकऱ्यांना मदत देण्याचा किंवा पॅकेज देण्याचा प्रश्न येत नाही. ज्या जिल्हयात शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत त्याठिकाणी पॅकेज दिलेले आहे. आत्महत्या व्हाव्यात आणि पॅकेज द्यावे अशा इच्छेचा मी नाही असे मला वाटतही नाही. कोकणातील जिल्हयात आत्महत्या होऊ नयेत आणि विकास व्हावा असे जर सन्माननीय सदस्यांना वाटत असेल तर सरकार विकासाच्या दृष्टीने आवश्यक तो निधी उपलब्ध करुन देईल.

श्री. जगदीश गुप्ता : सभापती महोदय, उत्तरामध्ये पात्र आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांची यादी दिलेली आहे. 162 पात्र प्रकरणे आहेत. वास्तविक 500 पेक्षा जास्त शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना मदत देण्यासाठी जे निकष ठरविले आहेत त्यामध्ये सर्वात मोठा निकष संबंधित शेतकरी कर्जबाजारी आहे काय हा आहे. मी याबाबतीत अमरावती जिल्हयातील उदाहरण देऊ इच्छितो. अमरावती जिल्हयातील तिवसा तालुक्यातील वऱ्हा गावातील शेतकऱ्याने आत्महत्या केली. या शेतकऱ्याने आत्महत्या का केली याचा शोध घेतला तेव्हा असे लक्षात आले की, तो अमरावती जिल्हयातील तिवसा तालुक्यात वऱ्हा येथे रहात होता, जमीन सिंचनाखाली गेल्यामुळे फक्त 4 एकर जमीन शिल्लक होती. त्यामध्ये 8 वर्षापूर्वी पाणी साचत होते. नातेवाईक अमरावती तालुक्यात असल्यामुळे तो शेतकरी अमरावती येथे मजुरी करु लागला....

**सभापती** : हा प्रश्न जिव्हाळयाचा आणि महत्वाचा आहे. त्यामुळे यावर तातडीने नेमके उपप्रश्न विचारावेत म्हणजे मला आणखी सन्माननीय सदस्यांना उपप्रश्न विचारण्यासाठी संधी देणे शक्य होईल. माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, त्यांनी नेमका उपप्रश्न तातडीने विचारावा.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, 500 पेक्षा जास्त शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत आणि त्यातील 419 तर विदर्भातील आहेत त्यामुळे हा प्रश्न केवळ प्रश्नोत्तराच्या तासामध्ये न ठेवता यावर अन्य मार्गाने सविस्तर चर्चा घ्यावी.

**सभापती** : त्यादृष्टीने गंभीरपणे विचार केला जाईल.

......2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 38321 पुढे सुरु....

श्री. जगदीश गुप्ता : सभापती महोदय, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांना मदत करताना जे निकष लावलेले आहेत ते कसे चुकीचे आहेत हे सांगण्याचा मी प्रयत्न करीत आहे. सभापती महोदय, 8 वर्षापूर्वी तो शेतकरी अमरावती जिल्हयात आला आणि मजुरी करु लागला. मुलगीचे लग्न तो करु शकत नव्हता. उत्पन्नाचे साधन नसल्यामुळे त्याने विहिरीत उडी मारुन आत्महत्या केली. या शेतकऱ्याला समितीने मदतीसाठी अपात्र आहे असे ठरविले. माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, मदत करताना जे प्रमुख निकष लावले आहेत त्यामध्ये शेतकरी कर्जबाजारी असेल तरच मदत मिळू शकेल असा जो प्रमुख निकष आहे त्यामध्ये शासन बदल करणार आहे काय ?

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी केलेल्या सूचनेचा जरुर विचार करण्यात येईल.

श्री. सुधाकर गणगणे : सभापती महोदय, विदर्भामध्ये आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांसाठी मदतीचे विशेष पॅकेज देण्यात आलेले आहे. शेतकऱ्यांकरिता दिलेल्या या पॅकेजमध्ये मोठया प्रमाणावर भ्रष्टाचार झाल्याच्या तक्रारी आलेल्या आहेत. परंतु याबाबतीत संबंधितांवर योग्य ती कारवाई झालेली नाही. माझा प्रश्न असा आहे की, विदर्भासाठी दिलेल्या या मदतीच्या पॅकेजमध्ये किती रकमेचा भ्रष्टाचार झाला आणि यासंबंधात किती तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत ?

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, भ्रष्टाचार कधी झाला ? भ्रष्टाचार कोणी केला याबाबतची माहिती दिलेली नाही. मोघम स्वरुपाचा प्रश्न माननीय सदस्यांनी विचारला आहे. यासंबंधात त्यांनी डिटेल तक्रार दिली तर तक्रार देतील त्याचदिवशी संबंधितांवर त्वरित कारवाई करण्यात येईल.

नंतर श्री.भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KGS/ MMP/ 12:30

ता.प्र.क्र.38321.................

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, विदर्भामध्ये पंतप्रधान पॅकेजमधील अनुदानाचे वाटप करताना जिल्हा बँकांच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी तसेच शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांनी जे गैरप्रकार केले त्याची चौकशी करु असे सन्माननीय सहकारी मंत्री डॉ.पतंगराव कदम यांनी सांगितले. मी स्वत: राज्य मध्यवर्ती बँकेचा संचालक आहे. पॅकेजच्या अनुदान वाटपामध्ये जो भ्रष्टाचार झाला, पॅकेजपूर्वी कर्जवाटप कधी झाले नव्हते अशा अनेक सोसायट्या आणि बँकांकडून वाटपाचे प्रमाण 100 टक्क्यापेक्षा जास्त झालेले आहे. या संदर्भात चौकशी होऊन ज्यांनी वाटपामध्ये घोटाळा केला, भ्रष्टाचार केला, वाहने आणि मोटारसायकली खरेदी केल्या त्याची उच्चस्तरीय चौकशी केली जाईल काय?

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेला प्रश्न या प्रश्नाशी संबंधित नसून सहकार विभागाशी संबंधित असल्यामुळे या प्रश्नाला मी उत्तर देणे योग्य होणार नाही. परंतु सामुदायिक जबाबदारी म्हणून एवढेच सांगू इच्छितो की, शासनाकडून अशा गैरप्रकाराची चौकशी निश्चितपणे केली जाईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, नोव्हेंबर ते फेब्रुवारी या 5 महिन्याच्या काळात 584 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. महिन्याची सरासरी 125 आहे. सन्माननीय सदस्य श्री.गुजराथी यांच्या प्रश्नाला उत्तर देताना महसूल राज्यमंत्र्यांनी सांगितले की, पुरावे द्यावेत, आम्ही चौकशी करु. सभापती महोदय, मी आपल्या निदर्शनास आणू इच्छितो की, मागील अधिवेशनामध्ये आम्ही हा विषय उपस्थित केला होता. पॅकेजमधील कृषि विभागाचा भ्रष्टाचार सभागृहापुढे मांडला होता. त्यावेळी मी सभागृहात बॅनर आणून दाखविले होते. मी स्वत: माझ्या हाताने नांगर वाकवित असल्याचे फोटोमध्ये दिसत असल्याचे हे बॅनर आहेत. शासनाने या संदर्भात काय चौकशी केली? निकृष्ट दर्जाच्या बैलगाड्या दिल्या गेल्या, निकृष्ट दर्जाच्या ताडपत्र्या वाटप करण्यात आल्या. निकृष्ट दर्जाचे साहित्य तुमच्यापुढे आणून ठेवले. आता शासन म्हणते की, आम्ही चौकशी करु. मागील तीन महिने हे शासन झोपले होते का? अर्थतज्ज्ञ डॉ.नरेंद्र जाधव यांची समिती नेमली असून त्यांच्याकडे टर्म्स अँड रेफरन्स दिले याबद्दल आम्हाला आनंद आहे. परंतु कर्जमाफी होऊनही आत्महत्या होत आहेत. काशिनाथ वाघमारे, बुलढाणा. संतोष उबाळे, नागपूर; विठ्ठल वानखेडे, अमरावती; दगडू चौधरी, नागपूर; वासुदेव वानरे, यवतमाळ; किसन रहाटे, यवतमाळ;

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KGS/ MMP/ 12:30

श्री.दिवाकर रावते......... ता.प्र.क्र.38321....

रामनाथ म्हस्के, बुलढाणा या 7 व विदर्भातील इतर 27 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या म्हणूनच डॉ.नरेंद्र जाधव यांची समिती नेमली गेली. कर्जमाफी घोषणा होऊनही आत्महत्या होत आहेत. या संदर्भात देखील समितीकडे टर्म्स अँड रेफरन्स दिला पाहिजे, तो शासन देणार का? समितीकडून या संदर्भातील अहवाल मागविला जाईल का? सभापती महोदय, मी प्रत्येक आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या घरामध्ये जाऊन आलो आहे. समिती ज्यावेळी चौकशी करण्यास जाते त्यावेळी त्या विधवा महिलेला प्रश्न विचारला जातो की, तूझा नवरा दारु पित होता का?

(नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 38321....... श्री. दिवाकर रावते .......

होय, तो दारु पित होता परंतु फक्त तेवढेच रेकॉर्डवर घेतले आणि त्या शेतकऱ्याला मदत नाकारण्यात आली. म्हणून माझी अशी विनंती आहे की, अशा प्रकारची छोटी कारणे लक्षात घेऊन मदत नाकारली जाते तसे न करता 60 हजार कोटी रुपये आपण दिलेलेच आहेत आणखी अशी प्रकरणे यात घेतली तर जास्तीत जास्त 5 कोटी आणखी लागतील आणि त्याने काही फरक पडणार नाही. म्हणून शासन अशा शेतकऱ्यांना मदत देणार काय ?

श्री. नारायण राणे : महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाचे स्वरुप फार व्यापक आहे. त्यांनी पोस्टरच्या स्वरुपात निकृष्ट दर्जाचे साहित्य वाटप केल्याचे सभागृहात दाखविले, त्याबाबतच्या तक्रारी आहेत, शासनाने देखील ते नाकारलेले नाही. माननीय राज्यमंत्र्यांनी त्यासंदर्भात सांगितलेच आहे की, अशा तक्रारींची चौकशी करण्यात येईल आणि भविष्यात अशा निकृष्ट दर्जाचे साहित्य दिले जाणार नाही याची देखील काळजी घेण्यात येईल. सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी यांनी देखील प्रश्न विचारला आहे. मी याबाबत असे स्पष्ट करु इच्छितो की, शासनाने अशा प्रकारे निकृष्ट दर्जाचे सामान पुरविणाऱ्या अधिकाऱ्यांना मोकळे सोडलेले नाही. आता आपण त्याचे पोस्टर्स छापतात आणि नांगर वाकवून दाखविला जातो. वास्तविक हे सर्व कोणी पाहिले नाही, याद्या सुध्दा अधिकृत आहेत आणि आपण लोकप्रतिनिधी म्हणून जी माहिती देत आहात त्यासंबंधीची चौकशी करुन उपाययोजना करणे हे शासनाचे काम आहे. तसेच सन्माननीय सदस्यांनी जो शब्दप्रयोग केला की, आतापर्यंत तीन महिने शासन झोपले होते काय, शासन जागेच आहे म्हणूनच 60 हजार कोटी रुपये मिळाले आहेत. आपण तीच तीच पोस्टर्स छापत आहात, आमच्या कृतीत मात्र जरुर बदल झालेला आहे. त्याचबरोबर कर्जमाफीबाबत चर्चा झाली आणि 2 पॅकेज दिले तरी आत्महत्त्या थांबत नाहीत म्हणून त्यासंबंधी डॉ. नरेंद्र जाधव यांना त्याबाबतचा अहवाल देण्यास सांगणार आहात, असा जो प्रश्न विचारला त्याला उत्तर "होय" असे आहे.

श्री. सय्यद जामा : सभापति महोदय, मंत्री महोदय ने जो जबाब दिया है, वह बहुत गंभीर है. उन्होंने कहा है कि प्रधानमंत्री के स्पेशल पॅकेज का 57.8 प्रतिशत खर्च हुआ है और महाराष्ट्र शासन के 1075 करोड़ रुपए में से 93 प्रतिशत खर्च हुआ है. इस प्रश्न में दी गई



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 38321....... श्री. सय्यद जामा.....

जानकारी के अनुसार नवम्बर 2007 से 15 फरबरी 2008 तक के कुल प्रकरण 584 में से 162 लोगों को अनुदान दिया है. अगर 162 लोगों को अनुदान देने में 93 प्रतिशत राशि खर्च हो गई है तो उसके बारे में . . . .

The Chairman : Jamaji It will be better if you complete it within a minute.

Mr. Sayyad Jama : Sir, I am completing it, I just want to ask that who have been given aid to this 162 farmers? Either the aid is given from the Maharashtra Government package or from Central Government package? या उसमें और कोई सहायता शामिल है ? मेरा दूसरा प्रश्न यह है कि प्रधानमंत्री के स्पेशल पॅकेज में इरीगेशन के स्मॉल और मीडियम प्रोजक्ट के लिए जो पैसा दिया गया है, उसमें से अभी तक कितना पैसा खर्च हुआ है ?

डॉ. राजेंद्र शिंगणे : महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारले आहे की, पंतप्रधान पॅकेज अंतर्गत इरिगेशनसाठी आश्वासित सिंचन योजनेसाठी 2177 कोटीची तरतूद होती त्यामध्ये 1103.4 कोटी म्हणजेच 50.60 टक्के एवढा खर्च झालेला आहे, सुक्ष्म सिंचन योजनांसाठी 78 कोटीची तरतूद होती त्यापैकी 66.36 टक्के एवढा खर्च झालेला आहे, पॅकेज डॅमसाठी 180 कोटीची तरतूद होती त्यापैकी 30.12 टक्के एवढा खर्च झालेला आहे, पाणलोट क्षेत्र विकास योजनेसाठी 54 कोटीच्या तरतूदीपैकी 9.58 कोटी म्हणजे 17.74 टक्के खर्च झाला आहे.

श्री. संजय केळकर : महोदय, नोव्हेंबर, 2007 ते फेब्रुवारी, 2008 या काळातील आत्महत्त्याग्रस्त शेतकऱ्यांची यादी येथे दिलेली आहे. ठाणे जिल्ह्यात आत्महत्त्या झालेल्या आहेत परंतु त्यांची जी आकडेवारी आहे ती मात्र चुकीची दिलेली आहे, असे मला वाटते.....

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. : 38321 .........**

श्री. संजय केळकर....

सभापती महोदय, मला असे वाटते की, ठाणे जिल्हयामध्ये नोव्हेंबर ते फेब्रुवारी या काळात 5 आत्महत्या झालेल्या आहेत. वाडा तालुक्यात तीन आत्महत्या झालेल्या असून पडघ्यामध्ये दोन आत्महत्या झालेल्या आहेत. वाडा तालुक्यात श्री. संतोष तनपुर व पडघ्यामधील देवळी येथे श्री.चंदर पाटोळे यांनी आत्महत्या केलेली आहे. परंतु या ज्या आत्महत्या झालेल्या आहेत त्यांचा पात्र यादीमध्ये समावेश करण्यात आलेला नाही.त्यामुळे या ठिकाणी ज्या पाच आत्महत्या झालेल्या आहेत त्यांचा पात्र यादीमध्ये समावेश केला जाईल काय तसेच या प्रकरणामध्ये ज्या अधिका-यांनी दिरंगाई केलेली आहे त्या अधिका-यांची चौकशी केली जाईल काय?

श्री. नारायण राणे : आदरणीय सभापती महोदय, ठाणे जिल्हयामध्ये गेल्या 3 महिन्यात एकच आत्महत्या पात्र ठरवण्यात आलेली आहे. परंतु सन्माननीय सदस्य सांगतात की, ठाणे जिल्हयामध्ये 5 आत्महत्या झालेल्या आहेत त्यामुळे सन्माननीय सदस्यांजवळ यासंदर्भातील अधिक माहितीचा तपशील सन्माननीय सदस्यांनी दिला तर त्यासंदर्भात चौकशी करुन संबंधितांना अनुदान दिले जाईल.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय महसूल मंत्र्यांनी सांगितले आहे की, सन्माननीय सदस्यांनी अधिक तपशील दिला तर त्याची चौकशी करुन अनुदान दिले जाईल. परंतु सभापती महोदय, तपशील जमा करण्याचे काम सत्ताधारी पक्षाचे आहे. तपशील जमा करण्याचे काम विरोधी पक्षाचे नाही. उलट शेतक-यांच्या आत्महत्येच्या संदर्भात खोटे पंचनामे तयार केले जातात. त्यामुळे या प्रश्नाच्या संदर्भात आम्ही अजून कोणता तपशील द्यावयास पाहिजे. तपशील जमा करण्याची जबाबदारी आमची नसून सरकारची आहे.

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी प्रश्न विचारला होता की, माझ्याकडे अशी माहिती आहे की, ठाणे जिल्हयामध्ये 5 शेतक-यांनी आत्महत्या केलेली आहे परंतु शासनाकडे ठाणे जिल्हयामध्ये एका शेतक-याने आत्महत्या केली असून या शेतक-याचे नाव पात्रता यादीमध्ये आलेले आहे. असे असतांनाही सन्माननीय सदस्यांकडे यासंदर्भातील अधिक माहिती असेल तर ती त्यांनी दिली तर त्याची चौकशी करुन योग्य ती कार्यवाही केली जाईल असे मी सांगितले होते. परंतु सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी साहेब

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. : 38321 .........**

श्री. नारायण राणे ......

हा प्रश्न ज्यावेळेस विचारला गेला त्यावेळेस हजर नव्हते त्यामुळे तपशील गोळा करण्याचे काम शासनाचे आहे असे ते म्हणाले.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, विविध जिल्हयामध्ये शेतक-यांनी आत्महत्या केलेल्या आहेत.

**सभापती** : सन्माननीय मंत्री महोदय, सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांच्या प्रश्नाला उत्तर देत होते. त्यांनी सांगितले की, ठाणे जिल्हयामध्ये एका शेतक-याने आत्महत्या केलेली आहे. तेव्हा सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी प्रश्न विचारला की, ठाणे जिल्हयामध्ये एक आत्महत्या झाली नसून 5 आत्महत्या झालेल्या आहेत. तेव्हा सन्माननीय मंत्रीमहोदयांनी सांगितले की, ठाणे जिल्हयामध्ये एका शेतक-याने आत्महत्या केल्याची माहिती आमच्याकडे आलेली आहे परंतु आपल्याकडे यासंदर्भात अधिक तपशील असेल, आणि तो जर आमच्याकडे दिला तर यासंदर्भात चौकशी करुन कार्यवाही करण्यात येईल असे त्यांनी सांगितलेले आहे. चौकशी करण्यासाठी जोपर्यंत परीपूर्ण माहिती उपलब्ध होत नाही तोपर्यंत चौकशी होत नसेते.

श्री. दिवाकर रावते : सन्माननीय मंत्रीमहोदयांनी सांगितले आहे की, कोकणामध्ये आत्महत्या होत नाहीत.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, जिल्हाधिका-यांच्या अध्यक्षतेखाली आत्महत्येच्या संदर्भात कमिटी गठीत केल्या गेली असून आत्महत्या पात्रतेमध्ये असली तरी त्याची माहिती आपल्याकडे येत असते व आत्महत्या पात्रतेमध्ये नसली तरी सुध्दा त्यासंदर्भातील माहिती आपल्याकडे येत असते. खरे म्हणजे शेतक-यांच्या आत्महत्येचे पंचनामे खोटे तयार केले जातात.

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, गेल्या 3 महिन्याच्या कालावधीत कोकणात आत्महत्या झालेली नाही.

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, जानेवारी मध्ये देवळा गावातील शेतक-याने आत्महत्या केलेली आहे. तसेच मी या ठिकाणी नोव्हेंबर आणि फेब्रुवारीमधील आत्महत्येची माहिती दिलेली आहे.

श्री. नाराण राणे : आपण सांगता त्या प्रमाणे माहिती शासनाकडे नाही.

यानंतर श्री. गायकवाड....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 38321 ..

श्री.संजय केळकर : मला जी माहिती मिळते ती माहिती शासनाला का मिळू शकत नाही ? तेव्हा मी जी माहिती दिलेली आहे त्या संदर्भात चौकशी करण्यात येणार आहे काय ? या ठिकाणी शासनाकडून चुकीची माहिती का दिली जात आहे ?

( उत्तर दिले नाही )

श्री.गोपीकिसन बाजोरिया : सभापती महोदय, उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की, 584 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असून त्यापैकी 162 प्रकरणे पात्र ठरविण्यात आलेली आहेत. या संदर्भात माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, एखाद्या कुटुंबातील मुलाने आत्महत्या केली असेल आणि सात बाराच्या उताऱ्यावर त्याच्या वडिलांचे नाव असेल तर त्या कुटुंबाला मदत करण्याच्या बाबतीत अपात्र ठरविण्यात आलेले आहे. 584 प्रकरणापैकी 162 प्रकरणे पात्र ठरविली असून बाकीची प्रकरणे अपात्र ठरविण्यात आलेली आहे त्यातील काही प्रकरणे अशीही आहेत की कुटुंबातील मुलाने आत्महत्या केली आहे परंतु सात बाराच्या उताऱ्यावर मात्र वडिलांचे नाव आहे त्यामुळे त्याच्या कुटुबियांना मदत देण्यास अपात्र ठरविण्यात आलेले आहे. तेव्हा अशा प्रकरणामध्ये देखील त्यांना पात्र ठरविण्यात येणार आहे काय ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, आत्महत्या केलेल्या व्यक्तीच्या कुटुंबावर कर्ज असेल तर त्यां कुटुंबाला मदतीसाठी पात्र ठरविण्यात येते. मग त्या व्यक्तीचे नाव सात बाराच्या उताऱ्यावर असो वा त्याच्या वडिलांचे असो वा आईचे असो. अशा प्रकारे अपात्र ठरविण्यात आले असल्याचे स्पेसिफिक उदाहरण जर सन्माननीय सदस्यांनी दिले तर त्या बाबत पुन्हा चौकशी करुन त्यांना मदत देण्याचा प्रयत्न करु.

श्री.केशवराव मानकर : सभापती महोदय, 584 आत्महत्याच्या प्रकरणापैकी 162 प्रकरणें पात्र ठरविण्यात आली असून 422 प्रकरणे अपात्र ठरविण्यात आलेली आहेत. तेव्हा ही प्रकरणे अपात्र का ठरविण्यात आलेली आहेत याची कारणे सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येतील काय ज्या 422 शेतकऱ्यांच्या आत्महत्येसंबंधी त्याच्या कुटुंबियांना मदत नाकारली आहेत त्याची कारणें पटलावर ठेवण्यात यावीत. त्याच प्रमाणे एखादी दुर्देवी घटना घडल्यास शासन ज्या प्रमाणे कुटुबियांना मदत करते त्याप्रमाणे आत्महत्या केलेल्या प्रत्येक शेतकऱ्याच्या कुटुंबियांना दोन लाख रुपयांची मदत शासन करणार आहे काय?



VTG/ KGS/ MMP/ प्रथम श्री.जुन्नरे 12.45

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यानी सूचना केल्याप्रमाणे निश्चितपणे ज्यांना अपात्र ठरविण्यात आलेले आहेत त्याची कारणे सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येतील त्याचप्रमाणे आत्महत्या केलेल्या व्यक्तीच्या कुटुंबियांना एक लाख रुपयांची मदत दिली जाते त्या पेक्षा जास्त मदत दिली जात नाही.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मघाशी मी ज्यावेळी पोस्टर दाखविले होते त्यावेळी सन्माननीय मंत्री महोदय असे म्हणाले की, मी कोठुनतरी पोस्टर आणून येथे दाखवतो.त्यामुळे त्यांचा असा भ्रम आहे की , सरकार झोपलेले नाही परंतु मी हे सिध्द करु इच्छितो की हे सरकार झोपलेले आहे आणि त्याचा पुरावा सभागृहात आहे. विदर्भातील शेतकऱ्यांना जे साहित्य पुरविण्यात आले होते त्या साहित्याचे प्रदर्शन नागपूरला भरविण्यात आले होते . माननीय कृषी मंत्र्यांनी या प्रदर्शनाला भेट दिली होती तसेच माननीय मुख्यमंत्र्यांनी अधिकाऱ्यांना तेथे पाठवले होते. त्या ठिकाणी ठेवलेले साहित्य पंचनामा करुन ताब्यात घेतले होते. माननीय मंत्र्यांनी आता असे सांगितले की, मी कोठून तरी पोस्टर आणतो आणि येथे दाखवतो . परंतु हे सरकार झ ाोपलेले आहे हे सिध्द झालेले आहे. सभापती महोदय, या संदर्भात आपल्याकडून शासनाला निदेश दिले गेले पाहिजेत. शेतकऱ्यांना साहित्य वाटप झाल्यानंतर संबंधित
अधिका-याविरुध्द तीन महिने झाल्यावरही कारवाई केली गेली नाही. या प्रकरणात माननीय मुख्यमंत्र्यांनी लक्ष घातले होते तसेच कृषी मंत्र्यांनीसुध्दा त्यात लक्ष घातले होते. सन्माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथी यांनी आज सभागृहात प्रश्न विचारला असतांना त्याला उत्तर देत असतांना कोणी तरी कोठून तरी पोस्टर आणून दाखवितो असे माननीय मंत्री महोदयांनी सांगितले आहे. माननीय मंत्री महोदय जर झोपले असतील तर त्याला आमचा दोष नाही. संबंधित अधिकाऱ्याच्या विरुध्द कोणती कारवाई करण्यात आली आहे या संबंधीची माहिती हे अधिवेशन संपेपर्यत देण्यात येणार आहे काय ?.

**सभापती** : नागपूर अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी या विषयावर सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी चर्चा उपस्थित केली होती. त्यावेळी नागपूर येथे जे साहित्य प्रदर्शन भरविण्यात आले होते त्या मुद्याचा उल्लेख केला गेला होता.. महसूल राज्यमंत्र्यांना मी सांगू

3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

इच्छितो की, या बाबतची चौकशी अधिवेशन संपण्याच्या अगोदर पूर्ण करण्यात यावी आणि त्या चौकशीचा अहवाल सभागृहाला देण्यात यावा.

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, होय

--------

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## नागपूर शहरातील उपनिबंधक कार्यालयातील रजिस्ट्रेशन केंद्रासाठी जागा मिळण्याबाबतची कार्यवाही

**(3) * 37762 श्री.जैनुद्दीन जव्हेरी, श्री. संजय दत्त, श्री.राजन तेली, श्री.सय्यद जामा : दिनांक 23 नोव्हेंबर, 2007 रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या दिनांक 20 नोव्हेंबर, 2007 रोजीच्या यादी मधील प्रश्न क्रमांक 33956 ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) नागपूर शहरातील उपनिबंधक कार्यालयातील रजिस्ट्रेशन केंद्रासाठी जागा उपलब्ध करण्याबाबत नागपूर शहरातील दुय्यम निबंधक कार्यालयासाठी विभागीय आयुक्त कार्यालयाबाबत सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत बांधण्यात येत असलेल्या नवीन प्रशासकीय इमारत क्रमांक 2 या निर्माणाधीन इमारतीत 11076.12 चौ.फुट जागा मिळविण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, सदर कार्यालयास जागा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(3) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ.राजेंद्र शिंगणे, श्री.नारायण राणे यांच्याकरिता** : 1) होय.

2) नवीन प्रशासकीय इमारतीत इमारत क्र.2 मध्ये नोंदणी व मुद्रांक विभागाच्या कार्यालयासाठी जागा घेण्यासाठी प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

3) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. जैनुद्दीन जव्हेरी : सभापती महोदय, या ठिकाणी माझ्या प्रश्नाला चांगले उत्तर मिळाले आहे. तरी केवळ माझा एकच प्रश्न आहे आणि तो म्हणजे यावर होणारा खर्च किती आहे आणि किती कालावधीत ही इमारत पूर्ण होणार आहे ?

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, या ठिकाणी नागपूर शहरात ही जी 70 लाख रूपये खर्च करून प्रशासकीय इमारत क्रमांक 2 मधील ही जागा आपण विकत घेणार आहोत आणि त्यासाठी बजेटमध्ये तरतूद केली जाणार आहे व दोन चार महिन्यातच हे काम पूर्ण करण्यात येईल.

***

...... के 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ठाणे येथील मिठागराची शासकीय जमीन मुंदडा केमिकल्सने जेऊस इंन्फ्रास्ट्रक्चर या अमेरिकन कंपनीला विकल्याबाबत**

**(4) * 37516 श्री. मधुकर चव्हाण, श्री. संजय केळकर, श्री. रामनाथ मोते, श्री. विनोद तावडे, श्री. मधुकर सरपोतदार, श्री. दिवाकर रावते, डॉ. दिपक सावंत, डॉ. निलम गोऱ्हे** : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) ठाणे पूर्वेकडील पत्रकार कॉलनीपासून पुढे असलेल्या मिठागराची जमीन राज्य शासनाची आहे हे खरे आहे काय,
(2) असल्यास, सदर मिठागराची सुमारे 250 एकर जागा राज्य शासनाने मुंदडा केमिकल्स या खाजगी कंपनीला 30 वर्षांच्या भाडेपट्टयाने दिली, हे खरे आहे काय,
(3) असल्यास, मुंदडा केमिकल्सने सदर जमिनीवर स्वत:ची मालकी प्रस्थापित करण्याकरीता सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली असता महसूल खात्याने योग्य कागदपत्रे न्यायालयात सादर न केल्यामुळे न्यायालयाने मुंदडा केमिकल्सच्या बाजूने निकाल दिला हे खरे आहे काय,
(4) असल्यास, आता हिच कोट्यावधी रुपयांची राज्य शासनाची जमीन मुंदडा केमिकल्सने जेऊस इंन्फ्रास्ट्रक्चर या अमेरीकन कंपनीला विकली आहे हे खरे आहे काय,
(5) असल्यास, सदर जमिनीचे योग्य कागदपत्र न्यायालयात सादर न केल्यामुळे राज्य शासनाचे कोट्यावधींचे नुकसान करणाऱ्या महसूल खात्याच्या संबंधीत अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली आहे ?

**डॉ.राजेंद्र शिंगणे, श्री.नारायण राणे यांच्याकरिता** : (1) व (2) नाही.
प्रश्नामध्ये नमूद केलेली संभाव्य जागा मौजे कोपरी, स.नं.43 पै, मौजे मुलुंड, स.नं.39 पै, आणि मौजे मुलुंड, स.नं.386 पै, मधील असून सदर जागा मिठ उत्पादनासाठी श्री.हनुमान बक्ष लालचंद मुंदडा यांनी, तत्कालीन तहसिलदार, ठाणे यांच्याकडून जाहीर लिलावाने विकत घेतली आहे.

(3) सदर जमिनीच्या मालकी संदर्भात सॉल्ट डिपार्टमेंट ऑफ दि युनियन ऑफ इंडिया (मिठागर आयुक्त) यांनी मे.मुदंडा इंडस्ट्रीज ॲण्ड केमिकल्स यांचे विरोधात मा.उच्च न्यायालयात अपिल क्रमांक 257/94 व 258/94 दाखल केले होते. मा. उच्च न्यायालयाने दिनांक 24 जून, 1996 रोजी दिलेल्या निर्णयान्वये सदर अपिल फेटाळून सदर जागेची, मे.मुंदडा सॉल्ट ॲण्ड केमिकल्स लि. यांची मालकी कायम केली. मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाविरुध्द सॉल्ट डिपार्टमेंट ऑफ दि युनियन ऑफ इंडिया (मिठागर आयुक्त) यांनी मा.सर्वोच्च न्यायालयात अपिल क्रमांक 2269/2270/1997 दाखल केले होते. मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक 14/11/2000 रोजीच्या आदेशान्वये सदर अपिल फेटाळले आहे.

(4) उक्त जागेपैकी मौजे मुलुंड येथील स.नं.386 पै, क्षेत्र 85 एकर 13 III गुंठे व स.नं.39 पै, मधील 4 एकर 23 III गुंठे जागा मे.मुदंडा सॉल्ट ॲण्ड केमिकल्स इंडस्ट्रीज यांनी मे.झियुस इंन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यां कंपनीस विकली आहे.

..... के 3 ...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. शिंगणे (पुढे चालू....) ता.प्र.क्र. 37516 ....

(5) सदर जमीन जाहीर लिलावाने खरेदी केली असून मा.सर्वोच्च न्यायालयाने सदर जागेचा मालकी मे.मुंदडा सॉल्ट ॲण्ड केमिकल्स इंडस्ट्रीज यांचा ठरविल्याने विक्रीबाबत नियमानुसार भरपाई घेता येणार नाही, त्यामुळे कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांना या लेखी उत्तरात काही दुरूस्ती करावयाची आहे काय ?

डॉ. राजेंद्र शिंगणे : नाही.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मी हे यासाठी विचारले की, मी या प्रश्नातच विचारले होते की, ही जमीन शासनाची आहे काय ? त्याला मंत्र्यांनी 'नाही' असे उत्तर दिले आहे. परंतु पुढे उत्तरातच म्हटलेले आहे की, '..... सदर जागा मीठ उत्पादनासाठी श्री.हनुमानबक्ष लालचंद मुंदडा यांनी, तत्कालीन तहसिलदार, ठाणे यांच्याकडून जाहीर लिलावाने विकत घेतली आहे. तेव्हा ही जमीन शासनाची नसेल तर मग तहसिलदाराने ती लिलावाने कशी काय विकली ?

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, सध्या ही जमीन शासनाची नाही.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, जर ही जमीन शासनाची नव्हतीच तर मग तहसिलदार ती लिलावात विकतोच कशी ? खाजगी जागा तहसिलदार विकू शकतो काय ? .... सभापती महोदय, माझा प्रश्न असा आहे की, ही जमीन तहसिलदाराने लिलावाने विकत दिलेली आहे असे यात म्हटले आहे. मुळात प्रश्न असा की, ही एवढी महत्त्वाची जमीन लिलावात काढण्याचे अधिकार तहसिलदारांना आहेत का ? कारण मुळातच आपण उत्तरात म्हटले आहे की, ही जमीन शासनाची नाही. तर मग तहसिलदार हा तेथे इंग्रजांच्या राणीचा प्रतिनिधी म्हणून काम करीत होता का ? दुसरे असे की, अशा प्रकारची मिठागराची जमीन ही विकता येत नाही तर लीजवर देता येते. तेव्हा हे उत्तर चुकीचे आहे असे शासनाला वाटते आहे का ? नसेल तर, ही जमीन त्या काळात लिलावात काढण्याचे कारण काय होते ? तसेच सदर जमिनीचे योग्य ते कागदपत्रे न्यायालयात शासनाकडून सादर न केल्यानेच कोर्टाने, उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयाने देखील शासनाचे अपील फेटाळले आहे आणि त्यामुळे कोट्यवधी रूपयांचे शासनाचे नुकसान झालेले आहे. ही जमीन शासनाची नव्हतीच तर मग महाराष्ट्र शासनाला हायकोर्टामध्ये जाण्याची गरज काय होती ? शिवाय पुन्हा सर्वोच्च न्यायालयात अपील करण्याची गरज काय होती ?

...... के 4 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चव्हाण ...

ठाण्याच्या कोपरी गावात असलेली ही जमीन जर खाजगी होती तर मग त्या खाजगी व्यवहाराच्या विरोधात महाराष्ट्र शासन कोर्टामध्ये का गेले ? सुप्रीम कोर्टात का गेले ?

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न विचारला आहे त्याबद्दल मी आपल्यामार्फत त्यांना सांगू इच्छितो की, 12.6.1952 ला केंद्र सरकारची कोपरी आणि मुलुंड या भागात जमीन होती आणि ती केंद्र सरकारच्या आदेशानुसारच तहसिलदारांनी 1952 मध्ये लिलावात विकलेली आहे. ही जमीन काही आज विकलेली नाही तर 1952 मध्येच विकलेली आहे. त्यावेळेस ही जमीन मे. मुंदडा इंडस्ट्रीज ॲण्ड केमिकल्स यांना जाहीर लिलावाने विकली आहे. तेथे वर्ग 1 ची जमीन म्हणून तिला मान्यता मिळाली आहे. मी आपल्याला हेही सांगू इच्छितो की, या जमिनीपैकी काही जमीन विकासकाच्या कामासाठी संपादित करण्यात आली होती त्यावेळेस भूसंपादनाचा मोबदला मे.मुंदडा यांना द्यावा की, केंद्र सरकारला द्यावा यासाठी हे प्रकरण कोर्टामध्ये गेले होते. तेव्हा हायकोर्टाने निकाल दिला की, ही जमीन मुंदडा यांचीच असल्याने त्यांनाच तो मोबदला देण्यात यावा. त्या विरोधात सर्वोच्च न्यायालयात अपील केले असता सर्वोच्च न्यायालयानेदेखील हायकोर्टाचा निर्णय कायम केला व अपील फेटाळले व सांगितले की, ही जमीन मुंदडा यांचीच असल्याने त्या बाबत कोणताही हस्तक्षेप करू नये.

***

( यानंतर श्री. सरफरे ...... एल 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**विदर्भातील शेतकऱ्यांना आत्महत्येस प्रवृत्त करणाऱ्या लोकांमध्ये व शेतकऱ्यांमध्ये लूट करणारी भूविकास बँकेबाबत**

**(५) * ३७९८८ श्री. नितीन गडकरी , श्री. विनोद तावडे , श्री. पांडुरंग फुंडकर , श्री.केशवराव मानकर** : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भातील शेतकऱ्यांना आत्महत्येस प्रवृत्त करणाऱ्या लोकांमध्ये व शेतकऱ्यांमध्ये लूट करणारी भूविकास बँक १७ टक्के व्याजदराने पठाणी पध्दतीने आकारणी करीत असल्याचे ऑक्टोबर, २००७ रोजी उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विशेषत: वर्धा जिल्ह्यातील वायफड नजिकच्या तिगांव येथील पुरुषोत्तम गुजर या शेतकऱ्यांच्या कर्जावरील व्याजात दुप्पट वाढ झाल्याचेही उक्त कालावधीत निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भूविकास बँकांच्याकठोर सावकारी भूमिकेला पायबंद घालण्याबाबत शासनाने कोणती कठोर कारवाई केली वा कार्यान्वित आहे,

(४) तसेच सहकार कायदा कलम ४४-क मध्ये दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(५) नसल्यास, सदर निर्णय तात्काळ घेण्याबाबत शासन कार्यान्वित आहे काय ?

**डॉ.पतंगराव कदम** : (१) नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) ग्रामीण भागातील सहकारी पतपुरवठा संरचनेचे पुनरुज्जीवन करण्यासाठी केंद्र शासनाने गठीत केलेल्या प्रा.वैद्यनाथ समितीने केलेल्या शिफारशींच्या अनुषंगाने, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मधील कलम ४४(क) दिनांक २८.१२.२००७ च्या अध्यादेशाद्वारे वगळण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मागील अधिवेशनामध्ये लक्षवेधी सूचनेला दिलेले उत्तर मंत्रिमहोदयांनी वाचले तर मला असे वाटते की, ही गोष्ट त्यांच्या लक्षात येईल. माननीय मंत्री डॉ. पतंगराव कदम यांच्या मार्गदर्शनाखाली शेतकऱ्यांचे शोषण कसे सुरु आहे याचे हे एक चांगले उदाहरण आहे. मंत्रिमहोदय हे मुख्यमंत्री पदाचे उमेदवार असल्यामुळे त्यांना याठिकाणी बदनाम करण्याचा कट सुरु आहे. श्री. पुरुषोत्तम गुजर या शेतकऱ्याने १९९७ मध्ये भू विकास बँकेकडून



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. ३७९८८...

श्री. नितीन गडकरी....

१७.५ टक्के व्याज दराने ३ लाख ४२ हजाराचे दीर्घ मुदतीचे कर्ज घेतले. बँकेने कर्जाच्या परत फेडीपोटी ६ लाख ९५ हजार ६२६ रुपयांचे थकित व्याज घेतले. आणि ८ हजार ३७४ रुपयांची मुद्दल घेतली. एवढे करुन पुन्हा त्याची १० एकर शेत जमीन जबरदस्तीने विकली. त्याचप्रमाणे त्याचे १ लाख २८ हजार किंमतीचे ट्रॅक्टर विकले. आणि त्या शेतकऱ्याला आत्महत्त्या करण्यास प्रवृत्त केले. एवढया कर्जाची आणि व्याजाची वसूली केल्यानंतर आपण वारंवार सांगता की, जेवढे कर्ज होते तेवढे व्याज घेतले, त्यापलिकडे आम्ही वसूली केली नाही. याठिकाणी आपण कलम ४४(क) हे वगळण्यात आल्याचा उल्लेख केला आहे. शेतकऱ्याचे अशापध्दतीने शोषण सुरु आहे. त्याने घेतलेल्या कर्जावर ६ लाख ९५ हजार ६२६ रुपये दंडणीय व्याज लावले आहे आणि त्याशिवाय मुद्दलही घेण्यात आली आहे. अशाप्रकारे राज्याच्या भूविकास बँकेकडून असंख्य शेतकऱ्यांचे शोषण सुरु आहे. ही शासनाला न शोभणारी आणि लाजिरवाणी बाब आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्त्यांना प्रवृत्त करणारी बाब आहे. भू विकास बँकेने त्याचे ट्रॅक्टर आणि जमीन विकल्यामुळे तो आज रस्त्यावर आला आहे. याकरिता कलम ४४ (क) मध्ये दुरुस्ती करुन त्याचे संपूर्ण कर्ज माफ करणार काय? आणि याचा फायदा भू विकास बँक इतर शेतकऱ्यांना देणार आहे काय?

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, कलम 44 (क) मध्ये असलेली तरतूद ही फक्त 1 लाखाकरिता असून त्यामध्ये दुरुस्ती करण्यात आली आहे. प्रा. वैद्यनाथ समितीच्या शिफारशीनुसार एम.ओ.यू. साईन केल्यानंतर दामदुप्पटीची तरतूद रद्द करण्यात आली आहे. सद्या यासंबंधीचा विषय संयुक्त समितीपुढे विचारार्थ आहे. वन टाईम सेटलमेंटची योजना भू विकास बॅकेला लागू आहे. पूर्वीचे सर्व व्याज माफ केले आहे. व्याज माफ केल्यानंतर भरलेले हप्ते त्यांना परत करण्यात आले आहेत. आपण सांगितलेली वस्तुस्थिती आहे. त्याप्रमाणे कलम 44 (क) मध्ये दुरुस्ती करण्यात आली आहे. प्रा. वैद्यनाथ समितीच्च्या शिफारशीनुसार एम.ओ.यू. साईन केल्यानंतर वन टाईम सेटलमेंटचे कलम रद्द होते. तरीसुध्दा संयुक्त समितीमध्ये याबाबत अंतिम निर्णय घेतला जाईल. तोपर्यत हा विषय विचाराधीन आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय ट्रॅक्टरसाठी कर्ज घेतल्यानंतर त्याचे दुप्पट व्याज आकारण्यात आले. त्या शेतकऱ्याची 10 एकर शेतजमीन विकण्यात आली, त्याचे ट्रॅक्टर विकण्यात आले. यामुळे तो बरबाद झाला असतांना संयुक्त समितीमध्ये याबाबत विचारविनिमय काय करणार?





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 37988...

श्री. नितीन गडकरी....

या शेतकऱ्याचे नाव श्री. पुरुषोत्तम गुजर असून तो या कर्जामध्ये बरबाद झाला आहे.आता तो फाटक्या कपडयानिशी वेडयासारखा फिरत आहे. असे असतांना आपण संयुक्त समितीमध्ये विचारविनिमय करणार आहात. आपण याठिकाणी 1 लाखाची मर्यादा 5 लाख करुन कर्ज माफ केले असे सांगितले पाहिजे. अधिकाऱ्यांनी लिहून दिलेले उत्तर आपल्यासारखे मंत्री वाचून दाखवीत नाहीत. प्रा. वैद्यनाथ समिती कशासाठी पाहिजे? ही भूविकास बँक राज्यसरकारची अंगिकृत बँक आहे. याठिकाणी आपण आणि माननीय मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख, आणि माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर.आर. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली या शासनाने सावकारापेक्षा जास्त शोषण केले आहे. हे लक्षात घेता आता कर्ज माफ करण्यासाठी हे शासन या सभागृहामध्ये निर्णय जाहीर करणार आहे काय? 1 लाखाची मर्यादा 5 लाखापर्यंत वाढवून संपूर्ण कर्ज माफ करण्याचा चांगला निर्णय आपण सांगणार आहात काय?

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, पहिल्यांदा प्रा. वैद्यनाथ समितीचा शॉर्ट टर्मसंबंधी निर्णय झाला. आणि आता लाँग टर्मसंबंधी प्रा. वैद्यनाथ समितीसमोर विषय होता. त्या समितीचा रिपोर्ट आला आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ MMP/ KGS/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 13:00

ता.प्र.क्र.37988 . . . .

डॉ.पतंगराव कदम . . . .

आपण आता राज्यातील भूविकास बँका वेव्ह करीत आहोत. या नव्या निर्णयामुळे आता निश्चितपणे या केसमध्ये संबंधित शेतकऱ्यावर जो अन्याय झालेला आहे . . . .

श्री.नितीन गडकरी : अध्यक्ष महाराज, केवळ एक शेतकरी नाही, तर असे लाखो शेतकरी आहेत.

डॉ.पतंगराव कदम : अध्यक्ष महाराज, आपण भूविकास बँकेच्या बाबतीत निर्णय घेतला आहे. मधल्या काळामध्ये लोकांनी पैसे भरले नाहीत. आपण एक लाखाच्या संदर्भातील कायदा दुरुस्त केला. पण पाच लाखाच्या संदर्भातील कायदा दुरुस्त केलेला नाही. परंतु आता केंद्र शासनाकडे वैद्यनाथ समितीचा लॉंग टर्म लोनच्या बाबतीत रिपोर्ट प्राप्त झालेला आहे. त्या दृष्टीकोनातून भूविकास बँकेच्या कर्जदारांना मोठया प्रमाणात चांगल्या प्रकारचा रिलीफ मिळेल.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, लाभार्थीने 5 टक्के दराने कर्ज घेतले आहे. भूविकास बँकेने 17.5 टक्के दराने कर्ज दिले. त्याच्याकडे 3 लक्ष 42 हजार रुपयांचे दीर्घ मुदतीचे कर्ज आहे. तसेच व्याजापोटी 6 लाख 95 हजार 626 रुपये हे थकित व्याज, व्याज, दंड व्याज वसूल केले आहे आणि फक्त 8 हजार रुपये मुद्दलामध्ये जमा केले. त्याची दहा एकराची शेती लिलावात काढण्यात आली. त्याचा ट्रॅक्टर 1 लाख 24 हजार रुपयांचा विकण्यात आला. सभापती महोदय, आपण मला सांगावे की, शासनाचे हे कोणते कायदे, कोणते नियम आहेत ? मी एका शेतकऱ्याची केस मांडलेली आहे, अशा अनेक केसेस आहेत. सभापती महोदय, हे काय सुरु आहे? खरे म्हणजे तुमचा भूविकास बँकेवर अधिकार आहे.

(काही सन्माननीय सदस्य एकदम बोलत असतात.)

**सभापती** : राज्यातील भूविकास बँकेच्या माध्यमातून किंवा अन्य बँकांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना अल्प, मध्यम आणि दीर्घ मुदतीचे कर्ज पुरवितो किंवा उपलब्ध होते. त्यानुसार त्याने ट्रॅक्टरसाठी 3 लाख 42 हजार रुपयांचे कर्ज घेतले. परंतु त्याच्यावर 8 लाख रुपयांचे व्याज लावण्यात आले. ते 8 लाख रुपये भरुन घेतले आणि त्यातील 8 हजार रुपये मुद्दलामध्ये जमा केले. ते कमी आहे की काय ? म्हणून त्याला 10 एकर जमीन विकावी लागली. तसेच त्याचे ट्रॅक्टर देखील विकला. आपण सातत्याने शेतकऱ्यांना अनेक पध्दतीने मदत करीत असता. त्या अनुषंगाने

. . . .एम-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37988 . . . .

माननीय सभापती . . . .

सदनातील सर्व सन्माननीय सदस्यांची अशी भावना आहे की, हा असंघटित सामान्य शेतकरी आहे. अनेक पध्दतीने व्याजाची आकारणी केली जाते. मग ती दंड व्याज म्हणून आकारणी करण्यात येते, पेनल्टी व्याज म्हणून आकारणी करण्यात येते, तू तेथे का आलास ? म्हणून व्याज आकारणी करण्यात येते. तेव्हा यानिमित्ताने या शेतकऱ्याचे उदाहरण लक्षात घेऊन जर चौकशी केली पाहिजे. कारण आपल्याला अशा गोष्टींच्या बाबतीत काहीतरी निर्णय घ्यावा लागेल आणि त्यादृष्टीने प्रयत्न केला तरच शेतकऱ्यांना काहीसा रिलीफ मिळेल. माननीय मंत्री महोदयांनी या प्रश्नाच्या अनुषंगाने असे सांगितले आहे की, मी जरुर याची छाननी करीन. म्हणून माझे असे मत आहे की, जर अशा पध्दतीने जर शेतकऱ्याच्या बाबतीत होत असेल तर याबाबतीत कोणता ना कोणता एक उपाय काढण्यात यावा.

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय,बँकेने सदर शेतकऱ्याच्या ट्रॅक्टरचा लिलाव केला आहे. पण बँकेने जमीन वगैरे विकलेली नाही.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, माझ्याकडे बँकेने जमीन विकल्याबाबतचा पुरावा आहे. त्याची एक प्रत आपल्याकडे देतो.

(सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी माननीय सभापतींना सदरहू पुराव्याची कागदपत्रे देतात.)

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, आपल्या सूचनेप्रमाणे या सर्व प्रकरणाची चौकशी केली जाईल आणि या चौकशीतून त्या शेतकऱ्याला . . . .

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, बँकेने त्या शेतकऱ्याची 10 एकर जमीन जबरदस्तीने विकलेली आहे.

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, आपल्या सूचनेप्रमाणे या सगळया प्रकरणांची चौकशी केली जाईल आणि चौकशी केल्यानंतर या शेतकऱ्याला कसा रिलीफ देता येईल याचा विचार केला जाईल.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

. . . .एम-3



APR/ MMP/ KGS/ 13:00

ता.प्र.क्र.37988 . . . .

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, या शेतकऱ्याची 10 एकर जमीन विकलेली आहे . .

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी दहा एकर जमीन विकल्याच्या संदर्भात जी कागदपत्रे दिली आहेत. मी ती कागदपत्रे माननीय मंत्री महोदयांकडे पाठवितो. ही जमीन सक्तीने विकलेली असेल तर त्याबाबतीत त्या शेतकऱ्याला नियमाप्रमाणे मदत करता आली तर ती जरुर करावी.

डॉ.पतंगराव कदम : अध्यक्ष महाराज, त्याला निश्चितपणे मदत केली जाईल.

(घोषणा)

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

(घोषणा)

श्री.नितीन गडकरी : अध्यक्ष महाराज, आम्ही शासनाचा निषेध करुन सभात्याग करतो.

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य सभात्याग करतात.)

------

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री. बाबा सिद्दीकी ( कामगार राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अहमदनगर माथाडी व असंरक्षित कामगार मंडळाचा सन 2003-04 चा तेरावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: औचित्याचा मुद्दा

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. गेल्या दोन दिवसांपासून दहावीची परीक्षा सुरु आहे. या राज्यातील लाखो विद्यार्थी दहावीच्या परीक्षेला बसलेले आहेत. या परीक्षेच्या कालावधीमध्ये भारनियमन कमी होऊ शकणार नाही किंवा त्यामध्ये बदल होणार नाही हे शासनाने मान्य केलेले आहे. त्यामुळे ज्या परीक्षा केंद्रावर या परीक्षा सुरु आहेत त्या ठिकाणी विद्युत पुरवठ्याच्या अभावी विद्यार्थ्यांचे हाल होत आहेत. त्या ठिकाणी जनरेटर लावून विद्यार्थ्यांची सोय करावयाची म्हटले तर त्यासाठी होणारा खर्च शाळा करु शकत नाही. त्यामुळे एस.एस.सी. बोर्डाने हा खर्च करण्याचे अपेक्षित आहे. मी आपल्या माध्यमातून विनंती करतो की, ज्या परीक्षा केंद्रावर जनरेटर लावून विद्यार्थ्यांची सोय केली असेल त्यासाठी लागणारा खर्च एस.एस.सी.बोर्डाने तातडीने देण्याच्या संदर्भात आपण निदेश द्यावेत.

**सभापती** : माननीय राज्यमंत्री श्री. राजेश टोपे यांना सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्यांनी एक औचित्याचा मुद्दा उपस्थित केलेला आहे. आता एस.एस.सी. बोर्डाच्या परीक्षा चालू आहेत. काही ठिकाणी अंधार आहे किंवा भार नियमनामुळे वीज पुरवठा होणे शक्य नाही अशा शाळेला जनरेटर लावून ती व्यवस्था करणे अशक्य होईल असे दिसते. हा खर्च एस.एस.सी. बोर्डाने द्यावा अशी सन्माननीय सदस्यांची सूचना आहे. हा मुद्दा योग्य आहे. याबाबत आपण माननीय शिक्षण मंत्र्यांबरोबर जरुर चर्चा करावी.

श्री. राजेश टोपे :सभापती महोदय, ठीक आहे.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचना

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील, प्रा. शरद पाटील सर्वश्री श्रीकांत जोशी व नितीन गडकरी यांनी " महाराष्ट्र राज्य परीट (धोबी) सेवा मंडळाच्या वतीने दि. 12 मार्च, 2008 रोजी प्रलंबित मागण्यांसाठी राज्यभर रास्ता रोको व जेलभरो आंदोलन करणे, औरंगाबाद येथे उक्त समाजाच्या महिला-पुरुषांवर पोलिसांनी लाठीहल्ला करणे, लाठीहल्ल्यात अनेक जण गंभीर जखमी होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र शासनाने या विषयावर निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे, रामनाथ मोते, मधुकर चव्हाण, पाशा पटेल, जगदीश गुप्ता, केशवराव मानकर, सागर मेघे यांनी "राज्यात रोजगार हमी योजनेचा राखीव निधी रद्द करुन तो राज्याच्या इतर कामांसाठी वळविण्यासंबंधातील विधेयक संयुक्त समितीसमोर प्रलंबित असणे, असे असताही शासनाने यासंबंधात अध्यादेश काढणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र शासनाने या विषयावर निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, संजय केळकर, प्रतापराव सोनवणे यांनी "मुंबई विद्यापीठातील तब्बल 15 वर्षापूर्वी बंद पडलेला वाणिज्य शाखेचा एम.फिल अभ्यासक्रम नव्याने सुरु करण्याचा मुंबई विद्यापीठाने घेतलेला निर्णय, या निर्णयास शासनाने गेल्या दीड वर्षापासून मान्यता दिली नसणे, सदर अभ्यासक्रमाची निकड लक्षात घेता शासनाने यास त्वरित मान्यता देणेबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र शासनाने या विषयावर निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री संजय केळकर, रामनाथ मोते यांनी "भारतीय खलाशांसह काळ्या समुद्रात गेल्या 28 फेब्रुवारी, 2008 रोजी बेपत्ता झालेल्या जहाजाचे काही अवशेष सापडणे, या बेपत्ता जहाजात ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ येथील दोघांचा समावेश असणे,

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** .......

मात्र या दोघांचा अद्यापही शोध न लागणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. हा विषय केंद्र शासनाशी संबंधित आहे. यासंबंधी सन्माननीय राज्यमंत्री श्री. राजेश टोपे यांना सांगू इच्छितो की, या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी एक प्रश्न उपस्थित केलेला आहे. एक जहाज बेपत्ता झाल्यामुळे जवळजवळ 28 खलाशी त्यामध्ये बेपत्ता झालेले आहेत. त्यापैकी काही खलाशी ठाणे जिल्ह्यातील आहेत. हा विषय केंद्र शासनाच्या अखत्यारीत आहे. आपण याबाबतीत केंद्र शासनाकडे विचारणा करावी व संबंधित माहिती सभागृहास द्यावी जेणेकरुन आपल्या बेपत्ता खलाशांना शोधण्यासाठी मदत होईल.

श्री राजेश टोपे : सभापती महोदय, ठीक आहे.

**सभापती** : यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री श्रीकांत जोशी, रामनाथ मोते यांनी "शासकीय कर्मचाऱ्यांच्या पगाराबाबत सहावा वेतन आयोग लागू करण्याचे धोरण निश्चित करण्याबाबत राज्य शासनाने शासकीय कर्मचाऱ्यांच्या मागण्यांची माहिती गोळा न करणे, सदर वेतन आयोग लागू करण्यासाठी अर्थसंकल्पात किती रकमेची तरतूद केली याची माहिती नसणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र शासनाने या विषयावर निवेदन करावे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती**....

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी "सिंधुदुर्ग जिल्हयात गेल्या वर्षभरात होणारा अपुरा व अनियमित धान्य पुरवठा याबाबत तेथील नागरिकांनी वारंवार मोर्चे काढून त्यावर कोणतीच कारवाई होत नसल्याने दिनांक 13.3.2008 रोजी तेथील नागरिकांनी जेलभरा आंदोलन करण्याचा दिलेला इशारा" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री व्ही.यू.डायगव्हाणे, प्रा.बी.टी.देशमुख यांनी "राज्यातील इयत्ता 1 ली ते 5 वी पर्यंतच्या सर्व अनुदानातील शाळांमधील विद्यार्थ्यांना "मध्यान्ह भोजन" या योजनेखाली द्यावयाचे आठवडयातून 2 अंडी, 2 केळी किंवा 4 बिस्किटे, तांदुळाची खिचडी, भाजीपाला, तेल-तिखट-मसूरी डाळ, इंधनासाठी या शाळांना द्यावयाचा निधी नागपूर व अमरावती विभागात ऑक्टोबर, 2007 ते फेब्रुवारी, 2008 पर्यंत वितरित केलेला नसल्याने विद्यार्थी या योजनेपासून वंचित असणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य प्रा.शरद पाटील, श्री.जयंत प्र.पाटील यांनी "राज्यातील महापालिका क्षेत्रातील जकात वसुलीमध्ये होणा-या अडवणुकीमुळे व पिळवणुकीमुळे त्रस्त झालेल्या व्यापारांनी राज्यातील नगरपालिकांप्रमाणेच महापालिका क्षेत्रातील जकात रद्द करण्याची वेळोवेळी केलेली मागणी, शासनाने सभागृहात सदर जकात रद्द करण्याबाबत वेळोवेळी आश्वासन देऊनही त्याबाबत कोणताही निर्णय न घेणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य प्रा.शरद पाटील, श्री.जयंत प्र. पाटील यांनी "मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाकडून सांगली जिल्हयातील अनेक बेरोजगार तरुणांनी रोजगार व स्वयंरोजगारांसाठी रुपये 25 हजार ते 2 लाखांपर्यंत आर्थिक सहाय्य घेणे, महामंडळाने

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती....**

प्रत्येक लाभार्थ्यांकडून कागदपत्रासोबत 20 कोरे धनादेश घेतलेले असणे, कर्ज मंजूर करताना लाभार्थी व जामीनदारांच्या मालमत्तेवर बोजा चढविणे, लाभार्थ्यांकडून धनादेश न वटल्याने त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री मधुकर चव्हाण, विनोद तावडे, रामनाथ मोते, संजय केळकर यांनी "महाविद्यालयातील आर्थिकदृष्टया मागास (ईबीसी) असणा-या विद्यार्थ्यांना शैक्षणिक फी, सवलतीचे अर्ज मंजुरीकरिता द्यावे लागणे, हे अर्ज पूर्वी विभागीय संचालक यांचेमार्फत तपासले जाणे, आता हे अर्ज संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांचेकडून तपासून घ्यावे लागणे, त्यामुळे मंजुरीस विलंब होत असल्यामुळे विद्यार्थ्यांचे आर्थिक व शैक्षणिक नुकसान होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी "दिनांक 11 मार्च, 2008 रोजी मुंबईत घातपात करण्याच्या उद्देशाने आलेल्या दोन बांगलादेशीय अतिरेक्यांना पोलिसांनी गोळया घालून ठार करणे, सदर अतिरेक्यांकडे आरडीएक्स, बनावट शस्त्रे तसेच चलनाचा साठा मिळाल्यावरुन मुंबईत आणखी काही अतिरेकी लपून असण्याची शक्यता" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी "मुंबई महानगरपालिकेतील सुमारे 122 सफाई कामगारांचा गेल्या 6 महिन्यात विविध करणांनी मृत्यू होणे, सफाई कामगारांना हातमोजे, मास्क इ.साहित्य न पुरविल्याने त्यांना विविध आजार होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

इतर 93 च्या सूचनांना दालनात अनुमती नाकारण्यात आली आहे. आज नियम 93 च्या सूचनांवरील निवेदने घ्यावयाची होती, ती उद्या घेण्यात येतील.

-------

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : जळगाव जिल्हयात केळी पिकावर करपा रोगाचा प्रादुर्भाव झाल्यामुळे शेतक-यांचे झालेले नुकसान.

**मु. शी.**: जळगाव जिल्हयात केळी पिकावर करपा रोगाचा प्रादुर्भाव झाल्यामुळे शेतक-यांचे झालेले नुकसान यासंबंधी श्री.अरुण गुजराथी, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.अरुण गुजराथी ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे सन्माननीय फलोत्पादन मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"जळगाव जिल्हयात केळी पिकावर नुकताच करपा रोगाचा झालेला प्रादुर्भाव, यामुळे केळीचे पीक सुकून जाणे, अनेक केळींच्या झाडांना केळीचा घड न लागणे किंवा कमी वजनाचा घड लागणे, त्यामुळे शेतकऱ्यांचे झालेले लाखो रुपयांचे नुकसान, केळी उत्पादक शेतकरी आर्थिक संकटात सापडणे, नुकसान भरपाई मिळण्याबाबत तेथील शेतकऱ्यांनी व लोकप्रतिनिधींनी वेळोवेळी शासनाकडे केलेली मागणी, अद्याप शेतकऱ्यांना आर्थिक सहाय्य न मिळणे, परिणामी तेथील शेतकऱ्यांत पसरलेला असंतोष, या शेतकऱ्यांना आर्थिक सहाय्य देण्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना."

श्री.विनय कोरे( फलोत्पादन मंत्री ) : अध्यक्ष महाराज, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

<u>निवेदन</u>

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे. )

....4....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी : सभापती महोदय, या लक्षेवधी सूचनेला देण्यात आलेल्या उत्तरामधून शासन या केळी उत्पादक शेतक-यांना अर्थसहाय्य देणार किंवा नाही याचा उल्लेख नाही. जनजागृती मोहिम शासनाने कशी राबविली याबाबत मंत्रिमहोदयांनी माहिती दिलेली आहे. शेतीशाळांचे आयोजन केले होते असेही नमूद केलेले आहे. 32,122 हेक्टर क्षेत्रावर करप्या रोगाचा प्रादुर्भाव झालेला आहे. त्यामुळे साधारणपणे एकरी 25 ते 30 हजार रुपयांचे नुकसान झालेले आहे.

नंतर श्री.शिगम.....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. अरुण गुजराथी...)

यासंबंधी उत्तर देण्यात आलेले नसले तरी केळीच्या पिकावर जो करपा रोगाचा प्रभाव पडलेला आहे त्यामुळे शेतक-यांचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान झालेले आहे, म्हणून त्या शेतक-यांना शासन आर्थिक मदत देण्याबाबत सहानुभूतीपूर्वक विचार करील काय ?

श्री. विनय कोरे : करपा हा बुरशीजन्य रोग आहे. एकात्मिक रोग निवारण कार्यक्रमाच्या माध्यमातून जळगाव जिल्ह्यासाठी 50 टक्के औषधांचा पुरवठा करण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे. त्यासाठी तातडीने 21 लाख रु.चा निधी उपलब्ध करुन दिलेला आहे.

श्री. अरुण गुजराथी : करपा रोगामुळे ज्या केळी पिकविणा-या शेतक-यांचे आर्थिक नुकसान झालेले आहे त्यासाठी हा निधी दिलेला नाही. याठिकाणी माननीय उप मुख्यमंत्री उपस्थित आहेत. लक्षवेधीच्या निवेदनामध्ये आर्थिक सहाय्यासंबंधी कोणताही उल्लेख केलेला नाही. तरी देखील मी आपल्या माध्यमातून शासनाला विनंती करीन की, केळी पिकविणा-या शेतक-यांचे करोडो रु.चे आर्थिक नुकसान झालेले आहे म्हणून माननीय उपमुख्यमंत्री या संदर्भात सुधारित उत्तर देऊ इच्छित आहेत काय ?

श्री. विनय कोरे : केळीच्या माध्यमातून झालेल्या नुकसानीला भरपाई देण्याची कोणतीही योजना राज्यामध्ये नाही. तरी देखील अशी काही मदत देता येईल काय या दृष्टीने शासन सकारात्मक दृष्टीकोनातून विचार करील.

----

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : लांजा तालुक्यातील (जि.रत्नागिरी) रेल्वे ट्रॅकजवळ जिवंत गावठी बॉम्ब सापडणे

**मु. शी.** : लांजा तालुक्यातील (जि. रत्नागिरी) रेल्वे ट्रॅकजवळ जिवंत गावठी बॉम्ब सापडणे यासंबंधी सर्वश्री संजय केळकर, रामनाथ मोते, विनोद तावडे, मधुकर चव्हाण व गुरुमुख जागवानी, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. संजय केळकर : (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" दिनांक 5 फेब्रुवारी 2008 रोजी वा त्या सुमारास लांजा तालुक्यातील (जि. रत्नागिरी) आंजणारी-शिर-बवली येथे कोकण रेल्वे ट्रॅकजवळ तब्बल 99 जिवंत गावठी बॉम्ब सापडणे, तसेच दिनांक 23.2.2008 रोजी लांजा पोलिसांनी केलेल्या एका धडक कारवाईत राजापूर तालुक्यातील हसोळच्या रेल्वे मार्गाजवळ आणखी 59 जिवंत गावठी बॉम्ब हस्तगत केल्याने प्रचंड खळबळ उडणे, या प्रकरणी 7 महिला व 14 लहान मुलांना लांजा पोलिसांनी अटक करणे, तसेच काही जण फरारी होणे, त्यामुळे या परिसरात गावठी बॉम्ब बनविणारी टोळी कार्यरत असल्याची व्यक्त होत असलेली भती, अशा टोळीला तातडीन अटक करुन त्यांच्यावर कारवाई करण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष व शासनाची प्रतिक्रिया "

श्री. आर.आर.पाटील (उप मुख्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर : रत्नागिरी जिल्हयातील लांजा तालुक्यातील आंजणारी-शिर-बवली येथे कोकण रेल्वे ट्रॅक जवळ 99 जिवंत गावठी बॉम्ब सापडले. मागे मुंबईमध्ये जे बॉम्बस्फोट झाले त्यावेळी कोकण किनारपट्टीवर मोठ्या प्रमाणावर स्फोटके सापडली होती. अजूनही गावठी बॉम्ब त्या भागात सापडत आहेत. 194 गावठी बॉम्ब त्या भागात सापडलेले आहेत. पळून गेलेल्या आरोपींचा शोध चालू आहे असे निवेदनामध्ये म्हटलेले आहे. यामध्ये एकूण किती आरोपी आहेत ? त्यातील किती आरोपिंना पकडलेले आहे व किती फरार आहेत ? कोकण रेल्वे ट्रॅक जवळ हे गावठी बॉम्ब सापडल्यामुळे कोकण रेल्वे व प्रवाशांच्या सुरक्षेच्या दृष्टीने शासन कोणती उपाययोजना करीत आहे ? हे गावठी बॉम्ब निकामी करण्याची परवानगी पोलिसांना आहे काय ? असल्यास, तशी परवानगी त्यांना देण्यात आलेली आहे काय ?

श्री. आर.आर.पाटील : हे बॉम्ब विशेषत: डुकरांच्या शिकारीसाठी वापरले जातात. त्या बॉम्बवर ऑईल लावून ते जंगलामध्ये ठेवले जातात. डुकरांनी ते खाल्ल्यानंतर तोंडात स्फोट होऊन ते मरतात. तेव्हा शिकारीसाठी वापरले जाणारे हे बॉम्ब आहेत. त्यांचा रेल्वे किंवा प्रवाशांना धोका आहे अशी स्थिती नाही. यातील 7 आरोपी पकडलेले आहेत. पोलिसांनी पाठलाग केला त्यावेळी स्त्रिया व मुले पळून जाऊ शकली नाहीत. रात्रीच्या अंधारात झाडाखाली असलेले 7 लोक सापडलेले आहेत. 12-13 लोक फरारी असण्याची शक्यता आहे. ते लोक निश्चितपणे सापडतील.

श्री. भास्कर जाधव : माननीय उप मुख्यमंत्र्यांनी सांगितल्या प्रमाणे हे बॉम्ब छोटे असतात आणि ते खास करुन रानातील डुकरे मारण्याकरिता वापरले जातात. त्या बॉम्बवर विशेष प्रकारची चरबी लावून ते रानात ठेवले जातात. हे चरबी लावलेले बॉम्ब डुकरांनी खाल्ल्यानंतर त्यांचा तोंडात स्फोट होतो व डुकरे मरतात. उन्हाळयाच्या दिवसात रानामध्ये जनावरे देखील फिरत असतात आणि ती जनावरे सुध्दा हे चरबी लावलेले छोटे बॉम्ब खातात आणि जागच्या जागी मरतात.

...नंतर श्री. गिते....





श्री. भास्कर जाधव.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

दुसरी गोष्ट अशी की, कोकणातील शेतकरी शेतात वावरत असताना त्या शेतक-यांचा कळत न कळत त्या बॉम्बला स्पर्श झाला तर त्याचा स्फोट होतो आणि शेतकरी त्यात मुत्यूमुखी पडतो. अशा घटना त्या ठिकाणी घडलेल्या आहेत. भविष्यात अशा प्रकारच्या दुर्घटना होऊ नयेत म्हणून जास्तीत जास्त खबरदारी शासनाकडून घेण्यात येईल काय ?

श्री आर.आर.पाटील : सभापती महोदय, ज्या एरियामध्ये विशेषत: जंगल आहे अशा विभागातील पोलीस स्टेशनला शिकारीसाठी येणा-या लोकांवर सक्त नजर ठेवण्याच्या सूचना देण्यात येतील. या प्रकरणी जे आरोपी सापडलेले आहेत ते अन्य प्रांतातून शिकारीसाठी त्या ठिकाणी आले असल्याचे आढळून आले आहे. शिकार करणारे लोक अशा गोष्टीचा वापर करीत आहेत म्हणून त्या शिकारींवर आणि त्यांच्याकडे असलेल्या स्फोटक पदार्थावर बारकारईने लक्ष ठेवण्यात येईल.

डॉ.दीपक सावंत : सिंधूदुर्ग, रत्नागिरी या जिल्हयांमध्ये राज्य शासनाचे बॉम्बशोधक पथक अस्तित्वात आहे काय ? याप्रकरणी जे आरोपी पकडले गेले ते आरोपी स्थानिक आहेत की परप्रांतीय आहेत ?

श्री. आर.आर.पाटील : हे आरोपी स्थानिक नाहीत. ते परप्रांतीय आहेत. श्रीमती सर्जिना सौरोजी राजपूत, श्रीमती स्वप्नीला अमरोजी राजपूत अशी आरोपींची नावे आहेत. हे राजपूत समाजातील असून फिरत राहणारे ते लोक आहेत. तसेच राज्य शासनाचे सर्वच जिल्हयात बॉम्बशोधक पथके कार्यरत आहेत.

श्री. परशुराम उपरकर : सदर बॉम्ब ज्या ठिकाणी मिळालेले आहेत. हे स्फोटक पदार्थ ज्या व्यापा-यांकडून आणले जातात त्यासंबंधीची चौकशी करण्यात येईल काय ?

श्री. आर.आर.पाटील : स्फोटक पदार्थ खरेदी करणारे लोक पळून गेले आहेत. अंधारात ज्या व्यक्ती पळून जाऊ शकल्या नाहीत त्या व्यक्ती सापडलेल्या आहेत. या संदर्भातील मुख्य सुत्रधार लवकरच पकडले जातील. त्या आरोपींनी जेथून हे साहित्य खरेदी केले आहे ते महाराष्ट्रातून खरेदी केले आहे की बाहेरच्या राज्यातून खरेदी केले आहे या सगळया गोष्टींचा तपास निश्चितपणे करण्यात येईल.

2...



श्री. मधुकर सरपोतदार : लक्षवेधी सूचनेच्या निमित्ताने माननीय मंत्री महोदयांनी जे उत्तर दिले आहे ते दिशाभूल करणारे आहे. आरोपी जंगलात पळून गेले असा उल्लेख केलेला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आंजणारी-शिर-बबली गाव व त्या गावाच्या आजुबाजुच्या परिसरात फार मोठे जंगल नाही. आरोपी जंगलात पळून गेले आणि ते सापडले नाहीत अशा प्रकारचे समर्थन करणे हे उत्तर दिशाभूल करणार आहे. आपण या प्रकरणाची व्यवस्थिपणे चौकशी करा. माननीय मंत्री महोदयांनी किती मोठे जंगल होते, कोणत्या जंगलात पळाले, त्या जंगलाची नावे सांगितली तर आम्ही सांगू शकतो की, त्या जंगलात आरोपी लपून राहू शकतात. आरोपींना लपून राहण्यासारखे त्या ठिकाणी जंगलच नाही. अशा प्रकारचे उत्तर देऊन पोलिसांना/आरोपींना संरक्षण देऊ नये असे माझे स्पष्ट मत आहे. त्या ठिकाणी रेल्वे मार्ग जवळ आहे, तेथे बॉम्बस्फोट झाले तर भयानक परिस्थिती निर्माण होऊ शकते. लांजा, आंजणारी-शिर-बबली,मठ या ठिकाणी रेल्वे स्टेशन जवळ नाहीत. त्या ठिकाणी बॉम्बस्फोट झाले तर त्या ठिकाणी ताबडतोबीने मदत मिळणार नाही. या प्रकरणाची पुन्हा चौकशी करण्यात येईल काय ?

श्री. आर.आर.पाटील : या प्रकरणासंदर्भातील चौकशी पथके अजून कार्यरत आहेत. जंगलात पळून गेले म्हणजे ते आरोपी अजूनही जंगलात लपून राहिले आहेत असे मी म्हटलेले नाही. रात्री त्या ठिकाणी हे लोक असल्याची बातमी कळल्यानंतर तातडीने आरोपींना पोलिसांनी पकडण्याचा प्रयत्न केला. महिला आणि मुले पळून जाऊ शकले नाहीत म्हणून ते पोलिसांच्या ताब्यात आहे. हे रात्रीची वेळ होती म्हणून जंगलात पळून गेले आणि ते तेथून वेगळया ठिकाणी पळून गेले. परंतु हे आरोपी लवकरच सापडून येतील कारण त्यांचे नातेवाईक पोलिसांच्या ताब्यात आहेत.

---------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**सभापतीस्थानी माननीय उपसभापती**

**पृ.शी.**: रायगड जिल्हयातील महाड तालुक्यातील आंबिवली गावानजीक असलेले नागेश्वरी धरणाचे काम पूर्ण न करता कॉन्ट्रॅक्टरला कामाचे पूर्ण बील अदा केल्याबाबत

**मु.शी.**: रायगड जिल्हयातील महाड तालुक्यातील आंबिवली गावानजीक असलेले नागेश्वरी धरणाचे काम पूर्ण न करता कॉन्ट्रॅक्टरला कामाचे पूर्ण बील अदा केल्याबाबत श्री. जयंत प्र.पाटील, प्रा. शरद पाटील,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. जयंत प्र.पाटील ( महाराष्ट्र विधानसभा सदस्याव्दारा ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय जलसंपदा मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" रायगड जिल्हयातील महाड तालुक्यातील आंबिवली या गावानजीक नागेश्वरी नदीवर बांधण्यात आलेल्या नागेश्वरी धरणावर 48 कोटी रुपयांचा खर्च करण्यात येणे, या धरणाचे काम पंचवीस टक्के देखील पूर्ण झालेले नसताना धरणाचे काम करणारा ठेकेदार लघुपाटबंधारे विभागाकडून 48 कोटी रुपयांची रक्कम पदरात पाडून पळून जाणे, सुमारे 80 कोटी रुपये खर्चाच्या या धरण प्रकल्पाला 7 ते 8 वर्षापूर्वी मंजुरी देण्यात येणे, पुणे येथील सातव कन्स्ट्रक्शन कंपनी या ठेकेदार कंपनीला या धरण प्रकल्पाचे काम देण्यात येणे, या कंपनीने रेड्डी कन्स्ट्रक्शन कंपनीला या प्रकल्पाचे पोट ठेकेदार म्हणून काम देणे, जून, 2007 पर्यंत हे काम पूर्ण करणे बंधनकारक असणे, प्रत्यक्षात या धरणाचे 25 टक्क्के काम देखील पूर्ण होऊ शकलेले नाही, कामाची मुदत संपल्यानंतर रेड्डी कन्स्ट्रक्शन कंपनीने सुमारे 48 कोटी रुपयांची रक्कम पदरात पाडून घेत या ठिकाणावरुन आपला गाशा गुंडाळून पळून जाणे, सबब गोरगरीब जनतेच्या पैशावर लुटमार करुन फार झालेला ठेकेदार व त्यांना संरक्षण देणारे अधिकारी यामुळे या परिसरात संतापाचे वातावरण निर्माण झाल्याने शासनाने याबाबत करावयाची उपाययोजना वा कार्यवाही."

डॉ.सुनील देशमुख (जलसंपदा राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावरन ठेवतो.

**उपसभापती :** निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

<u>**निवेदन**</u>

( प्रेस :येथे सोबतचे निवेदन छापावे. )

...4...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, या कामाचे मूळ अंदाजपत्रक किती आहे ? शासनाने सातव कन्स्ट्रक्शन कंपनीला पोट कॉन्ट्रॅक्ट ठेवण्याची परवानगी दिली होती काय ? निवेदनात असे म्हटले आहे की, काम 90 टक्के पूर्ण झालेले आहे. मी त्या कामाचे फोटो सोबत आणलेले आहेत. मी या कामावर प्रत्यक्ष जाऊन आलो आहे. त्या ठिकाणी फक्त 30 टक्के काम
झाले आहे. काम न होता कॉन्ट्रॅक्टरला बील दिले आहे ही गोष्ट खरी आहे काय ?

डॉ सुनील देशमुख : सभापती महोदय, 1999-2000 या वर्षाच्या अंदाजपत्रकाप्रमाणे व त्यावेळच्या डी.एस.आर.प्रमाणे 35 कोटी 53 लाखाचे काम होते. आज ते काम 56 कोटी रुपयांचे झालेले आहे. या कामावर कोणताही पोट कॉन्ट्रॅक्टर ठेवण्यात आलेला नाही. पोट कॉन्ट्रॅक्टर नेमल्याचे रेकॉर्डवर कुठेही उल्लेख नाही. या कॉन्ट्रॅक्टरला जे काम दिले आहे ते काम 90 टक्के झाले आहे. 35 कोटी 53 लाख रुपयांच्या कामामध्ये या कॉन्ट्रॅक्टरचे काम फक्त 14 कोटी रुपयांचे आहे. 14 कोटी पैकी 12 कोटी रुपयांचे त्याने काम केले आहे.

यानंतर श्री. कानडे...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्र. 3 पुढे सुरु....

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, ठेकेदाराची आर्थिक कुवत नसल्यामुळे ठेकेदारकाम करु शकत नाही. माझा प्रश्न असा आहे की आर्थिक कुवत नसताना या ठेकेदाराला काम का देण्यात आले ? ठेकेदार काम करु शकत नसल्यामुळे त्याला ब्लॅक लिस्टेड का करण्यात आले नाही ? असे असतानाही त्याला पुन्हा दीड कोटी रुपयांचे अग्रिम देण्यात आलेले आहे. मुळात कोकणामध्ये पाटबंधाऱ्यांची कामे कमी आहेत आणि जी कामे सुरु आहेत ती पूर्ण करण्यासाठी जाणिवपूर्वक दुर्लक्ष करण्यात येत आहे. शिवाय कोकणामध्ये अनुशेष आहेच.

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, ठेकेदाराने आतापर्यंत 12 कोटी 93 लाख रुपयांचे काम केलेले आहे. त्याच्यापैकी त्याला 11 कोटी 63 लाख रुपये चुकते करण्यात आलेले आहेत. बाकी रक्कम रुपये1 कोटी 30 लाख आता देण्यात आलेली आहे. एकूण 14 कोटी 42 लाख रुपयांचे काम होते. ठेकेदाराला जून 2007 पर्यंत 11 कोटी 63 रुपये लाख दिलेले होते. बाकीची रक्कम 1 कोटी 30 लाख रुपये आता दिलेली आहे.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, दिलेल्या मुदतीत ठेकेदाराने काम केलेले नाही त्यामुळे त्याला काळया यादीत टाकले जाणार आहे काय ? तसेच काम पूर्ण करण्याची मुदत संपली असतानाही त्याला अग्रिम का दिला जात आहे.

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, जून 2007 पर्यंत काम पूर्ण करावयाचे होते. मध्यंतरीच्या काळात पैशाची तरतूद होऊ शकली नाही त्यामुळे काम रेंगाळले. पैशाची व्यवस्था तातडीने झाल्यानंतर जून 07 नंतर ठेकेदार काम पूर्ण करीत आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, या सगळयाच प्रकरणाची चौकशी करण्याची आवश्यकता आहे. मुळात या ठेकेदाराला वर्क ऑर्डर दिल्यानंतर किती अग्रिम देण्यात आले ? त्याने 7/8 वर्षात काम पूर्ण न केल्यामुळे प्रकल्पाची किंमत वाढली त्यामुळे किती रुपयांचा भुर्दंड शासनावर पडला ? यासाठी जबाबदार कोण ? जे जबाबदार आहेत त्यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली आणि कारवाई केली नसल्यास त्याची कारणे काय ?

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सुनील देशमुख : सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांना याची माहिती आहे की, राज्यपालांच्या निदेशानुसार उर्वरित महाराष्ट्राला पैसा मिळतो त्याचे प्रमाण कमी असते. मध्यंतरीच्या काळामध्ये .....

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, शासनाने कोकण सिंचन महामंडळाचे उधार घेतलेले पैसे परत केले नाहीत.

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, 2006-07 मध्ये या प्रकल्पासाठी फक्त 2 कोटी रुपये दिले होते. 2007-08 मध्ये फक्त 1 कोटी 21 लाख रुपये दिले होते आणि 2008-09 साठी 4 कोटी 56 लाख रुपयांची तरतूद केलेली आहे. मध्यंतरीच्या काळात प्रकल्पाला कमी पैसे दिले गेल्यामुळे हे काम रेंगाळले.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, कोकणामध्ये बॅकलॉग असताना कोकणचा पैसा वापस करा. कोकणामध्ये बॅकलॉग असताना पैशाचे नियोजन करताना राज्यपालांचे निदेश धाब्यावर बसविले. कोकणाच्या लोकांची नेहमीच गळचेपी होते. राज्यपालांच्या निदेशांचे व्हायोलेशन केल्यामुळे प्रकल्पाची कॉस्ट वाढली.

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्र.3............ श्री.नितीन गडकरी.....

मी मंत्रीमहोदयांना प्रश्न विचारु इच्छितो की, ज्या काळात शासनाने दीड कोटीची तरतूद केली, दोन कोटीची तरतूद केली त्या काळात माननीय राज्यपालांच्या निदेशानुसार कोकणासाठी किती तरतूद करणे आवश्यक होते? ती तरतूद न केल्यामुळे हा प्रकल्प रेंगाळला हे खरे आहे काय?

डॉ.सुनील देशमुख : कोकणासाठी त्या काळात किती तरतूद करावयास पाहिजे होती याची माहिती घेऊन पटलावर ठेवण्यात येईल.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, मी जबाबदारीने आरोप करीत आहे. जे निदेश होते त्याप्रमाणे शासनाने कोकणासाठी तरतूद केली नाही. त्यामुळे तेथील प्रकल्प रेंगाळले, त्या प्रकल्पांची किंमत वाढली, प्रकल्प पूर्ण झाले नाहीत. ठेकेदार सातव हा बारामतीचा आहे, त्याला ॲडव्हान्स मिळाल्यामुळे काम पूर्ण करण्याची गरज नाही. जे निदेश दिले होते त्या निदेशाचा भंग झाला नाही म्हणून हे काम रेंगाळले नाही याचे उत्तर 'हो' किंवा 'नाही' या शब्दात मंत्रीमहोदय देतील काय?

डॉ.सुनील देशमुख : 1996-97 पासूनचा हा प्रकल्प आहे. प्रत्येक वर्षी किती रक्कम देणे आवश्यक होते याची मी माहिती घेतो. सन्माननीय सदस्यांना पूर्ण कोकणासाठी मागील 10 वर्षात किती निधी दिला याची माहिती अपेक्षित आहे, या माहितीचा या लक्षवेधी सूचनेशी संबंध नाही. एका स्पेसिफिक प्रकल्पाशी संबंधित ही लक्षवेधी सूचना आहे. या प्रकल्पाशी संबंधित जितके प्रश्न असतील त्या प्रश्नांना उत्तर देण्याची माझी तयारी आहे.

श्री.नितीन गडकरी : निदेश देऊन 6 वर्षे झाली. निदेशाप्रमाणे तरतूद केली असती तर कोकणातील हा प्रकल्प बारगळला नसता. मी जबाबदारीने आरोप करीत आहे. निदेशाचा भंग झाल्यामुळे कोकणावर अन्याय झाला. त्यामुळे सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांना न्याय मिळविण्यासाठी सभागृहात बोलावे लागले. शासन कोकणाची गळचेपी करीत आहे. शासनाने निदेशाचा भंग केला नसता आणि प्रकल्पाला तरतूद दिली असती तर प्रकल्प पूर्ण झाला असता का? निदेश कधी दिले गेले याची मंत्रीमहोदयांना माहिती आहे, बॅकलॉग किती होता याची माहिती आहे, चार वर्षे निदेशाचे पालन केले नाही याची माहिती आहे, उर्वरित सिंचन महामंडळाचे उधारीवर पैसे घेतले ते वापरले गेले नाही हे माहिती आहे, आम्ही सभागृहात मागणी केल्यानंतर हे पैसे परत दिले गेले हे माहिती आहे. मग उत्तर देण्यास का टाळाटाळ करीत आहात?





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्र.3............

डॉ.सुनील देशमुख : कोकणाला गेल्या 10 वर्षात किती पैसा मिळावयास पाहिजे होता आणि किती मिळाला ही विस्तृत माहिती आहे. या माहितीचा या लक्षवेधी सूचनेशी संबंध नाही.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, सुधारित उत्तर देण्यास सांगावे, अन्यथा ही लक्षवेधी सूचना राखून ठेवावी.

डॉ.सुनील देशमुख : या प्रकल्पाशी संबंधित संपूर्ण माहिती माझ्याकडे उपलब्ध आहे. परंतु कोकण पाटबंधारे महामंडळाला किती निधी देणे आवश्यक होते व किती निधी दिला गेला या माहितीचा या लक्षवेधी सूचनेशी संबंध नाही. मी माहिती घेऊन पटलावर ठेवतो.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, लक्षवेधी सूचना राखून ठेवावी. आम्हाला माहिती कळली पाहिजे. हा कोकणावरील अन्यायाचा पुरावा आहे. वेळेवर निधी मिळाला नाही तर 12 कोटी रुपयाचा हा प्रकल्प पूर्ण होण्यास 200 कोटी रुपये लागतील. या प्रकल्पाला त्यावेळच्या निदेशाप्रमाणे निधी दिला गेला असता तर हा प्रकल्प पूर्ण झाला असता आणि सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांना हा प्रश्न उपस्थित करण्याची गरज भासली नसती. हा कोकणावर अन्याय आहे. मंत्रीमहोदयांनी कमीत कमी "हो" तरी म्हणावे, का टाळाटाळ करीत आहेत? राज्यपाल महोदयांनी निदेश देऊन 5 वर्षे झाली. तरी देखील या प्रकल्पाला निधीची तरतूद झाली नाही. प्रकल्प पूर्ण झाला नाही. प्रकल्पाची किंमत वाढली. ठेकेदार सातव गायब झाले असून ते काम करीत नाहीत.

(नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी .....

आणि त्यांनी स्वत:च्या नावावर काम घेतले, थोडक्यात म्हणजे लग्न एकाने करावयाचे आणि संसार मात्र दुसऱ्याने करावयाचा, अशी ही परिस्थिती आहे.

श्री. विनोद तावडे : महोदय, माननीय मंत्री महोदयांनी सांगावे की, हे काम या ठेकेदाराला कोणी दिले ?

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदय या प्रश्नाचे उत्तर देत नाहीत, हा एक प्रकारे आपल्या कोकणावर अन्याय आहे, आपण असे चूप बसून चालणार नाही. आपला कोणी कितीही अपमान केला तरी या सभागृहात मात्र या गरीब विरोधी पक्षाला आपलाच आधार आहे. म्हणून आपण असे धृतराष्ट्रासारखे मौन धारण करुन बसलात तर द्रौपदीला वस्त्रहरण होण्यापासून कोण वाचविणार ?

**उपसभापती** : जॉइंट व्हेंचर असल्यानंतर वस्त्रहरण कसे होणार आहे ?

श्री. मधुकर चव्हाण : महोदय, जून, 2007 अखेर केलेल्या कामाप्रित्यर्थ सुमारे 2.30 कोटी निधीची मागणी आहे परंतु सदर निधी न मिळाल्यामुळे ठेकेदाराने अद्याप काम सुरु केलेले नाही. मार्च 2008 मध्ये 10 मार्च रोजी ठेकेदारास 1.30 कोटी रुपये अदा करण्यात आलेले आहेत. त्यामुळे आतासदर प्रकल्पाचे काम सुरु होईल. या कामाला जून 2007 पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली होती. तथापि निधी वेळेवर उपलब्ध न झाल्याने काम पूर्ण होऊ शकले नाही. ठेकेदाराने जून 2008 अखेर मुदतवाढीसाठी मागणी केली असून ही प्रक्रिया प्रगतीपथावर आहे.

श्री. नितीन गडकरी : सिमेंटची किंमत 90 रुपयावरुन 260 रुपये झाली, स्टीलचे भाव 45 रुपये पर्यंत गेले त्यामुळे एस्कॅलेशन कॉस्ट 10 पटीने वाढली. अशा प्रकारे जनतेच्या पैशाचा अपव्यय सुरु आहे. अशा प्रकारे कामाची किंमत वाढत जाते व गरीब आणि भोळया लोकांना फसविले जाते. म्हणून माननीय मंत्री महोदयांनी सांगावे की, या प्रकल्पाला निधी नेऊन एक प्रकारे अन्यायच केला आहे. हे खरे काय ?

डॉ. सुनील देशमुख : महोदय, हे काम युती शासनाच्याच काळात सुरु झाले असून सातव नांवाच्या ठेकेदाराला सन 1996-97 मध्ये हे काम दिले होते. त्यामुळे त्याची जबाबदारी आपणच घेतली पाहिजे.

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : महोदय, लग्न झाल्यानंतर आठ वर्षे झाले, आता तुमचा संसार सुरु आहे. पहिली दोन वर्षे ठीक आहे परंतु इतक्या वर्षानंतर काहीही झाले तरी आम्हीच जबाबदार आहोत काय ?

डॉ. सुनील देशमुख : सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, हे ठेकेदार बारामतीचे आहेत, ते बोगस आहेत परंतु त्यांना कोणी काम दिले याची चौकशी करण्यात येईल. कारण सन 1996 मध्ये हे काम देण्यात आले होते.

**उपसभापती** : माननीय मंत्री महोदयांनी यासंबंधीची माहिती पटलावर ठेवावी, आता आपण लक्षवेधी क्र. 4 चर्चेला घेऊ.

डॉ. सुनील देशमुख : ठीक आहे, ही माहिती पटलावर ठेवण्यात येईल.

श्री. जयंत प्र.पाटील : महोदय, मला न्याय मिळाला नाही. या ठिकाणी माझा पहिला आरोप होता की, काम न होता पैसे दिलेले आहेत. काम प्रत्यक्षात 30 टक्के झालेले आहे. म्हणून या कामाची चौकशी करण्यासाठी सभागृहातील सदस्यांचीच एक समिती नेमावी व चौकशी करावी.

डॉ. सुनील देशमुख : सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांना घेऊन मी स्वत: या कामाची पाहणी करणार आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय........

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांनी मागणी केल्याप्रमाणे समिती नेमण्यास हरकत नाही. आपण आता पुढे गेलेलो आहोत.

-----------

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: सिंधुदुर्ग जिल्ह्यासाठी रोजगार हमी योजनेचा निधी न मिळणे.
**मु.शी.**: सिंधुदुर्ग जिल्ह्यासाठी रोजगार हमी योजनेचा निधी न मिळणे

यासंबंधी श्री परशुराम उपरकर, डॉ. दीपक सावंत, ॲड.अनिल परब, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. परशुराम उपरकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय रोजगार हमी योजना मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये रोजगार हमी योजनेअंतर्गत गेल्यावर्षी सुमारे 3374 कच्च्या बंधाऱ्यांना मान्यता देण्यात येणे, सन 2007-08 या वर्षामध्ये सावंतवाडी-780, दोडामार्ग-250, वैभववाडी-165, देवगड-420, कणकवली-500, मालवण-600, वेंगुर्ला-350 कच्च्या बंधाऱ्यांचा आराखडे शासनाकडे पाठविण्यात येऊनही अद्यापपर्यंत मान्यता न मिळणे, त्यातच या जिल्ह्यातील पिण्याच्या पाण्याची टंचाई लक्षात घेता विंधन विहिरी, नळयोजना, विहिरींना भूगर्भातील पाण्याची पातळी वाढविण्यासाठी कच्चे व पक्के बंधारे, पाणी साठवण कार्यक्रमाला अधिक महत्व देण्याची आवश्यकता असताना या आराखड्यांना शासनाने मान्यता न देणे, या जिल्ह्यातील पाणी टंचाई दूर करण्यासाठी तसेच तेथील शेतमजूरांना रोजगार मिळण्याकरिता रोजगार हमी योजनेअंतर्गत या जिल्ह्यातील प्रस्तावित कच्चा बंधाऱ्यांना तातडीने मंजूरी देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

श्री. राणा जगजीतसिंह पाटील (रोजगार हमी योजना राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो. असे करीत असताना मी आपल्या अनुमतीने निवेदनात पुढील दुरुस्ती करु इच्छितो :--

निवेदनातील शेवटून तिसऱ्या ओळीमध्ये "दिनांक 31.1.2007 ऐवजी दिनांक 31.1.2008" असे वाचावे, उर्वरित छापल्याप्रमाणे.

**उपसभापती** : दुरुस्तीसह निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**नि वे द न**

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर : अध्यक्ष महाराज, सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये पाटबंधारे प्रकल्पाला निधी कमी दिला जातो. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील शेतकरी कच्चे बंधारे बांधतात, त्या कच्च्या बंधाऱ्यांसाठी रोजगार हमी योजनेतून पैसे कमी दिले जातात. त्याचबरोबर सन 2004-05 मध्ये 1395 बंधारे बांधण्यात आले, सन 2005-06 मध्ये 1153 बंधारे बांधण्यात आले, सन 2006-07 मध्ये जिल्हाधिकारी कार्यालयातून 25 जानेवारी रोजी पत्र देऊन 31 जानेवारीपर्यंत प्रस्ताव मागविण्याचा आग्रह धरुन प्रस्ताव न आल्यामुळे एकही बंधारा झाला नाही.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर ....

या ठिकाणी बंधारे न झाल्यामुळे पाण्याचे दुर्भिक्ष्य निर्माण झालेले आहे. सन 2007-08 मध्ये 3544 कच्चे बंधारे मंजूर होण्याच्या प्रतिक्षेत असतांना केवळ 45 कच्चे बंधारे मंजूर झाले असून त्यापैकी 4 बंधा-याचे काम पूर्ण झालेले आहे. 4 बंधारे पूर्ण झाल्यामुळे त्याचा फायदा शेतीला तसेच विहिरीच्या पाझरावर झालेला आहे. परंतु या ठिकाणी पाहिजे त्या प्रमाणात बंधारे न झाल्यामुळे जो भाग टँकरमुक्त होता त्या भागाला आता टँकरने पाणीपुरवठा करावा लागत आहे. बंधा-याच्या कामामध्ये जिल्हाधिका-यांनी दुर्लक्ष केल्यामुळे सिंधुदुर्ग जिल्हयांच्या जिल्हाधिका-यांवर आपण कोणती कारवाई करणार आहात? तसेच या ठिकाणचे बंधारे पूर्ण होण्यासाठी शासन कोणती ठोस उपाययोजना करणार आहे?

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, निवेदनामध्ये उल्लेख करण्यात आला आहे की, सिंधुदुर्ग जिल्हयाचा सन 2007-08 मधील घेण्यात येणा-या 3345 कच्चे बंधा-याचा रोहयो वार्षिक नियोजन आराखडा दिनांक 31 ऑगस्ट, 2007 रोजी मंजूर करण्यात आला. या आराखडयानुसार अंदाजपत्रके तयार करुन प्रशासकीय मान्यतेसाठी जिल्हाधिका-यास दिनांक 25.9.2007 पर्यंत पाठविण्याबाबत सर्व पंचायत समित्यांना सूचना देण्यात आल्या होत्या. आराखडयातील मंजूर केलेल्या 3345 कच्चे बंधा-यापैकी 45 कच्च्या बंधा-यांची अंदाजपत्रके दिनांक 5 नोव्हेंबर 17 डिसेंबर,2007 पर्यंत जिल्हाधिका-यास प्राप्त झाली. या प्राप्त झालेल्या सर्व कच्च्या बंधा-यास दिनांक 31.1.2008 रोजी जिल्हाधिका-याने त्यास प्रशासकीय मान्यता दिली. प्रशासकीय मान्यता दिलेल्या कच्चे बंधा-यापैकी 4 बंधा-यांची कामे दिनांक 22.2.2008 रोजी पूर्ण झालेली आहेत. उर्वरित कामाच्या संदर्भात वर्तमान पत्रात ऑक्टोबर महिन्यापासून ते फेब्रुवारी महिन्यापर्यंत आवाहन करण्यात आले होते. यासंदर्भात ग्रामपंचायतीकडून प्रस्ताव येणे आवश्यक होते परंतु 45 कामाव्यतिरिक्त प्रस्ताव न आल्यामुळे इतर प्रस्ताव उपलब्ध झाले नाहीत.पाणी टंचाईच्या संदर्भात सांगावयाचे झाले तर 21 गावातील 463 वाडयांमध्ये 330 लक्ष रुपयांचे आराखडे मंजूर झाले असून ही कामे आता सुरु होणार आहेत.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, या ठिकाणी माननीय मंत्रीमहोदयांनी सांगितले आहे की, 45 प्रस्ताव प्राप्त झाले आहे. तसेच वर्तमानपत्रात यासंदर्भात आवाहन देखील करण्यात आले होते. त्यामुळे यासंदर्भात माझा प्रश्न असा आहे की, जास्तीत जास्त बंधा-याची कामे व्हावीत यासाठी राज्यशासनाने काही खास प्रयत्न केलेले आहेत काय? केवळ प्रस्ताव न आल्यामुळे आपण या ठिकाणच्या लोकांना वा-यावर सोडणार आहे काय?सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये रोजगार हमी योजनेअंतर्गत गेल्यावर्षी सुमारे 3374 कच्च्या बंधा-यांना मान्यता देण्यात आली. सन 2007-08 या वर्षामध्ये सावंतवाडीमध्ये 780, दोडामार्ग येथे 250, वैभववाडीमध्ये 165, देवगडमध्ये 420, कणकवली येथे 500 मालवण येथे 600 व वेगुर्ला येथे 350 कच्चया बंधा-याचे आराखडे शासनाकडे पाठविण्यात आले होते. त्यामुळे या ठिकाणच्या बंधा-यांची कामे पूर्ण करण्यासाठी शासनाकडून काही विशेष प्रयत्न झाले आहेत काय?रोजगार हमीच्या कामासाठी मजूर मिळत नाही असे सांगितले जाते परंतु मजूर मिळविण्यासाठी आपण काही प्रयत्न केले होते काय?

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, सध्या 226 मजूरांची उपस्थिती आहे परंतु या ठिकाणच्या मंजूराची क्षमता 540 अशी आहे. 5 कामे सेल्फवर आहे. फेब्रुवारी, 2008 अखेर पर्यंत या जिल्हयात 170 लक्ष रुपयांची कामे झालेली आहेत. ऑक्टोबर,नोव्हेंबर, डिसेंबरमध्ये आम्ही यंत्रणेच्या माध्यमातून मजूरांना कामाच्या संदर्भात आवाहन केले होते.परंतु मजुरांकडून अर्ज प्राप्त झाले नाहीत.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्हयात सन 2007-08 मध्ये 45 कच्चे बंधारे बांधण्यात आले. सन 2007-08 मधील घेण्यात येणा-या 3345 कच्चे बंधा-याचा रोहयो वार्षिक नियोजन आराखडा दिनांक 31 ऑगस्ट, 2007 रोजी मंजूर करण्यात आला. खरे म्हणजे एक वर्षानंतर मंजुरी मिळालेली आहे. त्यामुळे मंजुरी मिळण्यासाठी एक वर्षाचा कालावधी लागण्याचे कारण काय आहे? मंजुरी मिळण्यासाठी ज्या अधिका-यांनी एक वर्षाचा कालावधी लावला अशा अधिका-यांवर आपण काय कारवाई करणार आहात? तसेच 31.1.2008 ते 22.2.2008 या 22 दिवसात 4 बंधा-यांची कामे कशी काय पूर्ण झाली?

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, निवेदनामध्ये दिलेली माहिती खरी आहे.

श्री.विक्रम काळे : प्रशासकीय मान्यता देण्यास एक वर्षाचा कालावधी का लागला ?

( उत्तर दिले नाही )

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी या संदर्भात प्रश्न विचारला असून माननीय मंत्री महोदयांनी असे सांगितले की, मजुरांची यादी न येणे, मजूर वेळेवर न मिळणे यामुळे काम सुरु झालेले नाही. या संदर्भात मला माननीय मंत्री महोदयांना स्पेसिफिक प्रश्न विचारावयाचा आहे की, संपूर्ण ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या कामामध्ये धान्य घोटाळा झाला होता त्यामुळे जिल्हाधिकारी, तहसीलदार ही कामे करण्यामध्ये उदासीन आहेत .सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी विचारले होते की, प्रशासन हे काम करण्यास उदासीन आहे काय तर त्या प्रश्नाचे उत्तर होय असे आहे. धान्य घोटाळयामध्ये सगळे अधिकारी गुंतलेले असल्यामुळे ही कामे सुरु करण्यामध्ये ते उदासीन आहेत हे खरे आहे काय ?

श्री.राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, यामध्ये थोडीशी अडचण निर्माण झाली होती हे मी नाकारत नाही. या संदर्भात माननीय उप मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली एक बैठक झाली होती आणि शासकीय अधिकाऱ्याविरुध्द कोणती कारवाई करावयाची असेल तर त्यासाठी नियमावली ठरविणे गरजेचे आहे असे त्या बैठकीत ठरले होते. त्यानंतर त्या भागात कामे व्यवस्थित सुरु झाली आहेत.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, आपल्या राज्यात ठीक ठिकाणची भौगोलिक परिस्थिती व भौगोलिक रचना वेगवेगळी आहे. कोकणामध्ये रोजगार हमी योजनेखाली कच्चे बंधारे, तलाव, रस्त्याची कामे हाती घेण्यात आली असून कोकणासाठी फार मोठे वरदान ठरलेली ही योजना आहे. परंतु यामध्ये शासनाची महत्वाची अडचण अशी आहे की, हे काम करणारे स्थानिक मजूर असले पाहिजे. शासनाच्या दृष्टीने ही अडचण बरोबर आहे.परंतु कोकणामध्ये ही कामे करण्यास मजूर मिळत नाहीत. त्यामुळे थोडया फार स्थानिक मजुरांची यादी दिली जाते अर्थात त्याबाबतीत येथे बोलणे चुकीचे आहे परंतु थोडयाशा स्थानिक मजुरांची यादी देऊन आणि बाहेरच्या मजरांकडून ते काम करुन घेतले जाते . त्यामुळे कधी कधी कायद्यावर बोट ठेवून यातील चुका दाखविल्या जातात. त्याचा अधिकाऱ्यांना त्रास होत असतो. त्यामुळे अधिकारी काम करण्याचे धाडस करीत नाहीत. त्यामुळे तेथील भौगोलिक रचना आणि स्थानिक मजूर उपलब्ध होत



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव ...

नाही ही अडचण लक्षात घेऊन बाहेरच्या मजुरांना तेथे काम करण्याची संधी दिल्यास कोकणात जी कामे थांबलेली आहेत ती कामे पूर्ण होतील तेव्हा या दृष्टीने शासन विचार करणार आहे काय ?

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय,सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव यांनी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे तो योग्य आहे. त्या भागात स्थानिक मजूर उपलब्ध होत नाही ही वस्तुस्थिती खरी आहे. त्यामुळे मध्यंतरी या संदर्भात एक बैठक घेण्यात आली होती. त्या ठिकाणच्या आजूबाजूच्या तालुक्यातील किंवा आजूबाजूच्या जिल्हयातील मजुरांकडून हे काम करुन घेण्याच्या बाबतीत आपल्याला कसा निर्णय घेता येईल याचा शासन सध्या विचार करीत आहे. फक्त पर राज्यातील मजुरांना या कामावर काम करण्यास आाल्याला मंजुरी देता येणार नाही कारण रोजगार हमी योजना ही आपल्या राज्याची योजना आहे.त्यामुळे आजूबाजूच्या तालुक्यातील वा जिल्हयातील मजुरांकडून ती कामे करुन घेण्याच्या बाबतीत निश्चितपणें विचार करण्यात येईल.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी : लातूर,उस्मानाबाद, बीड व औरंगाबाद येथील रोजगार हमी योजनेच्या कामावरील हजेरी सहाय्यकांना शासकीय सेवेपासून वंचित ठेवणे

मु.शी : लातूर, उस्मानाबाद, बीड व औरंगाबाद येथील रोजगार हमी योजनेच्या कामावरील हजेरी सहाय्यकांना शासकीय सेवेपासून वंचित ठेवण्यासंबंधी श्री.विक्रम काळे,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री.विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय रोजगार हमी योजना मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो

" लातूर, उस्मानाबाद, बीड व औरंगाबाद या जिल्हयातील रोजगार हमी योजनेच्या कामावर सुमारे 25 वर्षे सेवा केलेल्या हजेरी सहाय्यकांना शासकीय सेवेपासून वंचित ठेवणें, या कर्मचाऱ्यांनी अनेक आंदोलने करणे, अर्ज विनंत्या करुनही त्यांना सेवेत न ठेवणे, हे प्रकरण न्यायालयात गेल्यानंतर मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार विभागीय आयुक्तानी त्यांना सेवेत सामावून घेण्याचे आदेश काढूनही लातूर, उस्मानाबाद, बीड, औरंगाबाद जिल्हयात हजेरी सहाय्यकांना सेवेत सामावून न घेणे, परिणामी त्यांच्यात पसरलेला तीव्र असंतोष व याबाबत शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना तसेच कार्यवाही "

श्री.राणा जगजितसिंह पाटील ( रोजगार हमी योजना राज्यमंत्री ) :सभापती महोदय,लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.असे करीत असतांना मी आपल्या अनुमतीने निवेदनात पुढील प्रमाणे दुरुस्ती करु इच्छितो.

निवेदनाच्या शेवटच्या ओळी नंतर "उर्वरित 325 हजेरी सहाय्यकांना आता नियमित शासकीय सेवेत समावून घेण्यात आले आहे." असे वाचावे.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

<u>निवेदन</u>

(प्रेस : कृपया सोबत जोडलेले निवेदन येथे छापावे )

नतर श्री.सुंबरे



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, या निवेदनात असे म्हटले आहे की, उर्वरित 260 हजेरी सहाय्यकांना नियमित शासन सेवेत सामावून घेण्यासाठी पदस्थापनेचे आदेश विभागीय आयुक्त स्तरावरून निर्गमित केले आहेत. तर या सगळ्यांना आपण नियमित सेवेत सामावून घेणार आहात का ?

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, उरलेल्या सर्वांसाठीचे आदेश निर्गमित केलेले आहेत. मी आपल्याला निवेदनातील तेवढा भागच वाचून दाखवितो. यामध्ये मी सांगितले आहे की, लातूर, बीड्‌ उस्मानाबाद व औरंगाबाद जिल्ह्यातील एकूण 1310 हजेरी सहाय्यक शासन सेवेत सामावून घेण्यास पात्र होते. त्यापैकी 985 हजेरी सहाय्यकांना नियमित शासन सेवेत सामावून घेतले आहे आणि उर्वरित 260 हजेरी सहाय्यकांना नियमित शासन सेवेत सामावून घेण्यासाठी पदस्थापनेचे आदेश विभागीय आयुक्त स्तरावरून निर्गमित केले आहेत.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, आयुक्तांनी आदेश देऊन जवळपास 3 वर्षे झालेली आहेत. याबाबत जिल्हाधिकाऱ्यांकडे बैठक झाली होती आणि त्यावेळेस त्यांना सांगण्यात आले होते की, या हजेरी सहाय्यकांना नियमित शासन सेवेत सामावून घ्या. परंतु आजपर्यंत त्यांना शासन सेवेत नियमित म्हणून सामावून घेण्यात आलेले नाही.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, आयुक्त स्तरावर हजेरी सहाय्यकांना नियमित शासन सेवेत सामावून घेण्याच्या प्रक्रियेमध्ये थोडी दिरंगाई झालेली आहे. मी आज सकाळीच याबाबत संबंधितांशी बोललो आहे आणि हे जे हजेरी सहाय्यक शासन सेवेत घेण्याचे शिल्लक राहिलेले आहेत त्यांच्या बाबतीत त्यांना सेवेत सामावून घेण्याच्यादृष्टीने योग्य ती कारवाई करण्यात येईल.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, मला याची जाणीव आहे की, हा प्रश्न केवळ लातूर, उस्मानाबाद, बीड व औरंगाबाद जिल्ह्यापुरताच विचारलला आहे. पण आता योगायोगाने माननीय कॅबिनेट मंत्री येथे उपस्थित आहेत म्हणून मी ती संधी घेऊन थोडा व्यापक प्रश्न विचारू इच्छितो, कारण ते कॅबिनेट मंत्री असल्याने निर्णय घेण्यास सक्षम आहेत. सभापती महोदय, थोडीशी तारीख कदाचित चुकीची असेल, पण शासनाने जेव्हा हा निर्णय केला तेव्हा त्यात असे म्हटले होते की, 31 मे 2005 रोजी जे हजेरी सहाय्यक त्या दिवशी हजर असतील त्यांनाच कायम

..... डब्ल्यू 2 ...



श्री. भास्कर जाधव .....

शासकीय सेवेत सामावून घेण्यात येईल. सभापती महोद, या तारखेचा फटका आमच्या कोकण भागातील लोकांना बसला आहे. कोकणामध्ये या काळात भरपूर पाऊस पडतो आणि त्यामुळे त्या दिवशी असे 20-25 कर्मचारी, जे यापूर्वी आपल्याकडे 10-12 वर्षापासून काम करीत आहेत, ते कामावर उपस्थित राहू शकले `नाहीत आणि परिणामत: आपल्या निर्णयानुसार, त्यांना कायम शासकीय सेवेत सामावून घेण्यात आले नाही. त्यामुळे आता ते लोक कोर्टामध्ये गेले आहेत आणि शासन स्तरावर देखील ते आणि मी या बाबत पाठपुरावा करीत आहोत. तेव्हा त्यांचाही आपण कायम सेवेत सामावून घेण्याच्या दृष्टीने विचार कराल का ?

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, 1.12.1995 ला जो शासन निर्णय काढला होता त्यात साधारणपणे 31 मे 1993 पासून जे हजेरी सहाय्यक कामावर होते त्यांना शासन सेवेत सामावून घेण्याचा निर्णय झालेला आहे. सभापती महोदय, ही कट ऑफ डेट कशामुळे आली ? तर काही हजेरी सहाय्यक उच्च न्यायालयात गेले होते आणि न्यायालयाने ही तारीख ठरवून दिली होती. त्याप्रमाणे मग या लोकांना सामावून घेण्याचा आपण प्रयत्न केला. परंतु त्यानंतर जवळपास साडेचार ते 5 हजार खंडित हजेरी सहाय्यक आहेत त्यांचे वय आता 45, 55, 57 वर्षे आहे आणि आता आपल्याकडे आपण एमआरइजीएस लागू करण्याचा निर्णय घेतला आहे व त्यात आम्हाला स्टाफची अत्यंत आवश्यकता आहे. त्यामुळेच या उरलेल्या सर्वांच्या बाबतीत लवकरच निर्णय घेण्यात येईल.

***

...... डब्ल्यू 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**आजच्या कार्यक्रम पत्रिकेवरील क्रमांक 6 वर असलेल्या लक्षवेधी सूचनेबाबत .....**

**उपसभापती** : आजच्या कार्यक्रम पत्रिकेवरील क्रमांक 6 वर असलेली लक्षवेधी सूचना ही ऊर्जा विभागासंबंधीची असून त्यावर माननीय ऊर्जा मंत्री उत्तर देणार आहेत. मात्र ते आता सभागृहामध्ये उपस्थित नाहीत, त्यामुळे आता ती चर्चेला घेता येऊ शकत नाही. परंतु ही लक्षवेधी सूचना अत्यंत महत्त्वाची आहे आणि सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त व अन्य येथे आता उपस्थित आहेत तसेच त्याबाबत औचित्याचा मुद्दा देखील आलेला आहे. लक्षवेधी सूचनेचा विषय हा अत्यंत महत्त्वाचा आणि तातडीचा असल्याने माननीय ऊर्जा मंत्री जेव्हा सभागृहात येतील त्यावेळेस जरूर ती चर्चेला घेण्यात येईल. दरम्यानच्या काळात मी विनंती करू इच्छितो की, सध्या इयत्ता 10 वी व 12 वीच्या परीक्षा सुरू झालेल्या आहेत आणि अशा वेळी लोड शेडींगमुळे वीज नसेल तर परीक्षार्थी मुले नीट अभ्यास करू शकत नाही तसेच पेपर देखील लिहू शकत नाहीत अशी बिकट परिस्थिती निर्माण झालेली आहे. अनेकांकडून याबाबत तक्रारी येत आहेत म्हणून शासनाने याबाबत तातडीने लक्ष घालावे आणि सर्व संबंधितांना सूचना द्याव्यात की, याबाबत लक्ष घालून कोठल्याही परिस्थितीत विजेअभावी मुले परीक्षा देऊ शकली नाहीत असे होता कामा नये. काही ठिकाणी परीक्षा केंद्रांच्या ठिकाणी शाळांना जनरेटर्स वापरण्याचीही परवानगी दिली जावी. व त्यासाठी येणारा खर्च शासना कडून दिला जावा. कारण ग्रामीण भागातील अनेक शाळा आर्थिकदृष्ट्या तेवढ्या सक्षम नसल्याने, गरीब असल्याने त्यांना जनरेटर ठेवणे परवडणारे नाही. तेव्हा अशा प्रकारे आजच्या आजच उपाय योजना त्वरित सर्वत्र केली जावी. तसे पाहिले तर ही लक्षवेधी सूचना अगदी योग्य वेळी सभागृहात आलेली आहे. त्याबाबत सन्माननीय सदस्यांकडे तसेच माझ्याकडे देखील अनेक तक्रारी आलेल्या आहेत. सन्माननीय सदस्यांनी औचित्याचा मुद्दा देखील या संबंधात मांडलेला आहे. ....

( यानंतर श्री. सरफरे ....एक्स 1 ...

उपसभापती...

त्यामुळे केवळ ज्यांचे भावी आयुष्य घडणार आहे. ज्या शैक्षणिक विश्वामधून ते आपले पाऊल पुढे टाकणार आहेत, त्यांची या शासनाकडून आणि संबंधित विभागाकडून कोणत्याही परिस्थितीत अवहेलना होऊ नये यासाठी त्वरीत वीज पुरवठा सुरु करण्यासंबंधी सक्त सूचना देऊन या विद्यार्थ्यांची गैरसोय दूर करावी अशी मी शासनाला विनंती करीत आहे. माननीय ऊर्जा मंत्री श्री. दिलीप वळसे पाटील हे सभागृहामध्ये उपस्थित झाल्यानंतर बाकीचे सर्व कामकाज बाजूला ठेऊन ही लक्षवेधी सूचना तात्काळ घेण्यात येईल.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. आपण सभापती पदाच्या सर्वोच्च स्थानावर बसलेले आहात. तेव्हा याठिकाणी आम्ही आपणास विनंती केली पाहिजे...

**उपसभापती** : मी याठिकाणी पालकांच्या वतीने शासनाला विनंती केली आहे.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय,आपण शासनाला आदेश दिले पाहिजेत...

**उपसभापती** : विद्यार्थ्यांच्या परीक्षा सुरु असून विषय अतिशय महत्वाचा असल्यामुळे पालकांनी केलेल्या विनंतीनुसार त्यांचे काम तात्काळ होणे आवश्यक आहे.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, ही पध्दत बरोबर नाही. मी याठिकाणी राजकीय अभिनिवेषाने बोलत नाही. आपण एक वेगळी परंपरा निर्माण करीत आहात...

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, आम्ही आपणास विनंती केल्यानंतर आपण आम्हाला खाली बसा म्हटल्यानंतर आम्ही खाली बसतो, आपण उभे रहा म्हटल्यानंतर आम्ही उभे रहातो, आपण बोला म्हटल्यानंतर आम्ही बोलतो, आम्ही आपले आदेश पाळतो. याठिकाणी आपल्यासारख्या ज्येष्ठ पिठासीन अधिकाऱ्यांनी शासनाला विनंती कां करावी? याबाबतीत शासनामध्ये कुणाला उन्माद आला आहे काय? आपण दिलेल्या आदेशाची अवहेलना केली जात असल्यामुळे एक ज्येष्ठ सभापती म्हणून आपणास "विनंती करतो" यासारखे शब्द वापरावे लागतात याबद्दल आम्हाला दु:ख होत आहे. तेव्हा सभापती महोदय,आपण "विनंती" हे शब्द वापरु नका, आपण शासनाला आदेश द्यावेत. संत तुकाराम महाराज म्हणाल्याप्रमाणे "नाठाळाच्या माथी हानावी काठी". याठिकाणी विरोधी पक्षामध्ये किंवा सत्ताधारी पक्षामध्ये जर कुणी नाठाळ व्यक्ती असेल तर आपण काठीच हानली पाहिजे. तेव्हा आजच्या आज सर्व शाळांना जनरेटरचे पैसे देण्याची तरतूद शासनाने करावी अशाप्रकारचे निदेश देतो असे आपण याठिकाणी सांगावे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : या आसनावरुन मी निदेश दिल्यानंतर देखील काही शाळांमध्ये वीज पुरवठा सुरु करण्यात आला नाही. म्हणून सभापतीच्या स्थानावरुन आपण दिलेल्या निदेशाचा अवमान झाला असे मला आपणाकडून पुन्हा पुन्हा ऐकण्याचा आता कंटाळा आला आहे.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, हा अतिशय गंभीर मुद्दा आहे. मी याठिकाणी इच्छा व्यक्त करतो की, आपण लोकसभेचे कार्यवृत्त तपासून पहावे. त्या ठिकाणी सभापतींच्या स्थानावरुन पीठासीन अधिकाऱ्यांनी कधीही "विनंती" हा शब्द वापरला आहे काय?

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, मी सभागृहामध्येच मागील आसनावर बसलो होतो. आपल्या मुखातून "विनंती" हा शब्द ऐकू आल्यानंतर मी तेथून उठून माझ्या आसनावर आलो. सभापती महोदय, मला खरोखरच वाईट वाटते. आपण ज्या आसनावर बसला आहात ते पिठासीन अधिकाऱ्यांचे सर्वोच्च असे आसन आहे. त्या आसनावरुन शासनाला विनंती करणे हे कधीही योग्य नाही. म्हणून माझी आपणास विनंती आहे की, आपण सभागृहाचे कामकाज दहा मिनिटे तहकूब करावे. आणि सर्व संबंधित अधिकाऱ्यांना आपल्या चेंबरमध्ये बोलावून घ्यावे. आणि त्यानंतर या प्रश्नाची वासलात लावून टाकावी. परंतु एकदा या प्रश्नाची वासलात लावली गेली पाहिजे. "रोज मरे त्याला कोण रडे" अशाप्रकारची परिस्थिती या राज्यात निर्माण झाली आहे हे योग्य नाही. You cannot work as a helpless person from that Chair.

**उपसभापती** : मी लोकसभेमध्ये जाण्याची आपण वाट पहात आहात काय?

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, आपणास लोकसभेमध्ये जायचे असेल त्यावेळी जावे. परंतु याबाबतचा फैसला झाला पाहिजे. "विनंती" हा शब्द आपण कामकाजातून काढून टाकला पाहिजे.

**उपसभापती** : मी शब्दच्छल करीत नाही. यासंबधी विद्यार्थी आणि पालकांच्या अत्यंत तीव्र भावना आहेत. माननीय ऊर्जा मंत्री श्री. दिलीप वळसे पाटील हे विधानसभेमध्ये स्थगन प्रस्तावावरील चर्चेला उत्तर देत असल्यामुळे ती चर्चा संपल्यानंतर येणार आहेत. तशाप्रकारचा निरोप त्यांच्याकडून आलेला आहे. दरम्यानच्या काळात या संबंधी तात्काळ वीज पुरवठा सुरु करण्याची अंमलबजावणी झाली पाहिजे अशाप्रकारची सूचना आली. ज्या शाळांना वीजपुरवठा करणे अशक्य असेल त्या शाळा जनरेटर वापरण्याकरिता पुढे आल्यातर त्यासाठी येणारा खर्च सोसण्याची तयारी शासनाने ठेवावी. तसेच, शासनाने परवानगी दिली तर आम्ही आमच्या आमदार फंडामधून



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती**....

काही रक्कम या शाळांना देण्याची आमची तयारी आहे. परंतु याबाबतीत विद्यार्थ्यांची कोणत्याही परिस्थितीत अवहेलना होता कामा नये.

श्री. हर्षवर्धन पाटील (संसदीय कार्य मंत्री) : सभापती महोदय, होय.

(यानंतर सौ. रणदिवे)

अग्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ SBT/ KTG/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 14:00

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, मी असे ऐकले आहे की, बोलण्यातून ऊर्जा तयार होते आणि या सरकारमध्ये पोपटपंची करणारे एवढे मंत्री आहेत की त्यांचा जनरेटरसारखा उपयोग करता येईल. ते एवढी बडबड करतात की, त्याव्दारे ऊर्जा निर्माण करुन ती या शाळांना पुरवावी म्हणजे कमीतकमी विद्यार्थ्यांचे नुकसान तरी होणार नाही. भुजबळसाहेब, तुम्हाला माहिती आहे की, तुमच्या बाजूला किती मोठमोठे जनरेटर आहेत. ते वापरा. किती बोलतात, किती वायफळ बडबड करतात, आश्वासने देतात. नाही बोलले तरी टी.व्ही.समोर जातात आणि पटर्, पटर् करीत असतात. ती ऊर्जा वापरावी आणि विद्यार्थ्यांचे भविष्य वाचवावे.

(यावेळी माननीय ऊर्जा मंत्री श्री.दिलीप वळसे-पाटील सभागृहामध्ये येतात.)

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, आता सभागृहामध्ये माननीय ऊर्जा मंत्री आलेले आहेत. मुलांच्या परीक्षेच्या काळामध्ये लोड शेडींग असू नये याबाबतीत आपण नुकत्याच सूचना दिलेल्या आहेत. तर याबाबतीत माननीय मंत्री महोदयांनी खुलासा करावा.

. . . .वाय-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: राज्यामध्ये विजेच्या तुटवडयाअभावी सुरु असलेले भारनियमन

मु.शी.: राज्यामध्ये विजेच्या तुटवडयाअभावी सुरु असलेले भारनियमन यासंबंधी सर्वश्री.गोविंदराव आदिक, संजय दत्त,शरद रणपिसे,प्रतापसिंह मोहिते-पाटील, राजन तेली,नितीन गडकरी,पांडुरंग फुंडकर,विनोद तावडे, रणजितसिंह मोहिते-पाटील,व्ही.यू.डायगव्हाणे, बी.टी.देशमुख,शरद पाटील,जयंत प्र.पाटील,श्रीमती उषाताई दराडे,सर्वश्री श्रीकांत जोशी,सय्यद पाशा पाटील,संजय केळकर,रामनाथ मोते,मधुकर चव्हाण, दिवाकर रावते,मधुकर सरपोतदार,अरविंद सावंत, अनिल परब,परशुराम उपरकर,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.संजय दत्त (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय ऊर्जा मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.

"विजेच्या तुटवडयाअभावी राज्यातील सर्वसामान्य जनता भारनियमनामुळे त्रस्त असणे, सहाजिकच या प्रश्नांवर तोडगा काढण्यास शासनास वा वीज महामंडळास आलेले अपयश, भारनियमनामुळे त्रस्त झालेल्या जनतेच्यावतीने वेळोवेळी राज्यभर मोर्चे,आंदोलने आणि सत्याग्रह करणे,या समस्येमुळे राज्यभरातील 25 लाख विद्यार्थी आणि त्यांचे पालक हैराण असणे, 10 वी, 12 वी आणि महाविद्यालयातील तसेच शाळांच्या परीक्षेच्या कालावधीत भारनियमन करु नये अशी होत असलेली मागणी, मात्र त्याकडे वीज मंडळाच्या अधिकाऱ्यांनी केलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने गांभीर्याने दखल घेऊन तातडीने करावयाची कारवाई आणि त्यावर शासनाची प्रतिक्रिया."

श्री.दिलीप वळसे-पाटील (ऊर्जा मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

. . . .वाय-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

<u>निवेदन</u>

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

. . . .वाय-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : माननीय ऊर्जा मंत्री श्री.दिलीप वळसे पाटील यांनी सभागृहामध्ये उशीरा उपस्थित राहण्याबाबतचे कारण कळविलेले आहे. आता ते सदनामध्ये उपस्थित आहेत. मी त्यांच्या माहितीसाठी सांगू इच्छितो की, लक्षवेधी क्रमांक 6 वरील चर्चेला सुरुवात होण्यापूर्वी याठिकाणी काही चर्चा झाली. सर्व सन्माननीय सदस्यांचे असेच म्हणणे आहे की, सध्या दहावी आणि बारावीच्या परीक्षा सुरु आहेत. कृपया या परीक्षेच्या कालावधीमध्ये तरी लोड शेडींग होऊ नये आणि ज्या शाळा आपल्याही आवाक्याच्या बाहेर अशा ठिकाणी आहेत, तर त्यांना जनरेटर वापरण्यासाठी परवानगी द्यावी. यासंदर्भात शासनाकडे पैसे नसतील तर आम्हाला परवानगी द्यावी जेणेकरुन त्या-त्या शाळांमध्ये जनरेटर वापरण्यासाठी जो काही खर्च येईल, तो आम्ही आमदार फंडातून करावयास तयार आहोत. परंतु काहीतरी पर्यायी उपाययोजना उपलब्ध करुन द्यावी.

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, माझ्या माहितीप्रमाणे सभागृहामध्ये परीक्षेच्या काळातील भारनियमनाच्या बाबत चर्चा झाली. ती परीक्षेच्या काळातील भारनियमानाच्या संबंधात आहे की संध्याकाळच्या वेळेतील भारनियमनाच्या संबंधात आहे ?

**उपसभापती** : परीक्षेच्या काळामध्ये म्हणजे पेपर लिहीत असताना आणि रात्री अभ्यास करताना होणाऱ्या भारनियमानाच्या बाबतीत आहे.

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, जर आपण रात्री होणाऱ्या भारनियमनाच्या बाबतीत चर्चा करीत असलो . . . . .

डॉ.नीलम गोऱ्हे (खाली बसून) : परीक्षेच्या काळातील भारनियमन.

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, याचा अर्थ पेपरच्या वेळेतील भारनियमनाबात चर्चा करीत आहोत.

**उपसभापती** : याठिकाणी पेपरच्या वेळेतील भारनियमनाबाबत कसे बोलता येईल ? कारण विद्यार्थी दिवस-रात्र अभ्यास करतात. केवळ पेपरसाठी जो 3 तासाचा वेळ आहे, तेवढयापुरते म्हणून चालणार नाही. कारण जर रात्री अभ्यास करताना काळोख असेल तर कसे होईल ?

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, हा विषय परीक्षेच्या काळातील रात्रीच्या भार नियमनाचा आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, जरी विद्यार्थी सकाळी 10.00 ते 5.00 या वेळेमध्ये परीक्षा देत असले तरी रात्री घरी अभ्यास करतात. अशा वेळी जर लोड शेडींग असेल तर मुले....

. . . .वाय-5

अप्रसुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



श्री.नितीन गडकरी . . . .

रात्री अभ्यास करु शकत नाहीत. ग्रामीण भागामध्ये 16-16, 18-18 तास लोड शेडींग होत आहे. दहावी आणि बारावीची परीक्षा सुरु आहे. गेल्या तीन-चार वर्षापासून चांगले रिझल्ट लागत नाहीत. विद्यार्थी नापास होत आहेत कारण ते लोड शेडींगमुळे रात्री अभ्यास करु शकत नाहीत. तसेच आज परीक्षेला गेल्यानंतर तेथेही लोड शेडींग सुरु आहे. कमीतकमी परीक्षेच्या काळामध्ये जे लोड शेडींगच्या बाबतीत आणि रात्री अभ्यास करण्याच्या वेळी होणाऱ्या लोड शेडींगबाबतही मार्ग काढला पाहिजे.

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, सदनामध्ये यासंदर्भात चर्चा झाली होती. त्यानंतर माननीय उच्च न्यायालयाने काही आदेश दिले होते. यासंदर्भात राज्याचे ऊर्जा सचिव, महावितरण कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक आणि शालेय शिक्षण विभागाचे अवर सचिव यांची एम.ई.आर.सी.च्या चेअरमनबरोबर चर्चा झाली आहे. मी आज येथे मुद्दाम हा विषय स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला की, आज संध्याकाळच्या वेळेतील भार नियमानामध्ये जर काही रिलीफ द्यावयाचे ठरविले तर आजचा राज्यातील शॉर्टफॉल चार-साडेचार हजार मे.वॅ.च्या आसपास आहे. हा शॉर्टफॉल राज्यातील एखाद्या भागातील नाही तर सगळ्या राज्यामध्ये आहे. तेव्हा या वेळेमध्ये जर रिलीफ द्यावयाचा असेल तर मग दुसरीकडून कुठूनतरी वीज आणली पाहिजे आणि आज ती सुध्दा राष्ट्रीय पातळीवर एक हजार मे.वॅ.पेक्षा जास्त अशी अतिरिक्त ट्रेडेबल पॉवर नाही. अशा वेळी संध्याकाळच्या वेळेमध्ये जे प्लॅनप्रमाणे लोड शेडींग सुरु आहे, त्यामध्ये काही रिलीफ देणे हे आज तरी शक्य दिसत नाही. पण पेपर सुरु असताना शाळांमध्ये वीज असावी अशी जर सदनातील सन्माननीय सदस्यांची भावना असेल आणि त्याबाबतीत काही सूचना असतील तर शालेय शिक्षण विभाग आणि ऊर्जा विभाग एकत्र बसून यातून काही मार्ग काढता येतो का ? यादृष्टीने विचार करण्यासाठी एक बैठक घेऊ आणि त्याबाबतीत सभागृहाला अवगत करु.

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : या ठिकाणी मघाशी असे सुचविण्यात आले की, जर आपल्याकडे पेपर चालू असताना वीजपुरवठा नसेल आणि शाळांनी जनरेटर लावला तर जनरेटरचे पैसे शाळांना खर्च करण्यास शिक्षण विभागाने मान्यता द्यावी. शाळा गरीब आहेत. जर काही कारणाने महाराष्ट्र सरकारची आर्थिक स्थिती खराब असेल तर माननीय उपसभापती श्री. डावखरे साहेब म्हणाले की, आम्हीही जनरेटरचे पैसे देण्यास तयार आहोत. आम्ही झोळ्या घेऊन फिरु की, सरकार अडचणीत आहे, विद्यार्थ्यांकरिता जनरेटरसाठी पैसे खर्च करु या. त्यामुळे आपण त्यांना जनरेटरचे पैसे अलाऊ करावे.

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय मी सांगितले की, यासंदर्भात शालेय शिक्षण विभाग आणि आम्ही एकत्र बसू. कारण दहावी, बारावीच्या परीक्षांचा विषय हा शालेय शिक्षण विभागाच्या अखत्यारीत येतो. तरीही त्यांच्याबरोबर बसून आपण पुन्हा सभागृहाला अवगत करु.

**उपसभापती** : याला किती वेळ लागणार आहे ?

श्री. दिलीप वळसे-पाटील : एक दिवसात अवगत करु.

**उपसभापती** : परीक्षा सुरु आहेत.

श्री. दिलीप वळसे-पाटील : शक्यतो आम्ही आजच बसण्याचा प्रयत्न करु. आज किंवा उद्या याबाबत चर्चा करु.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, याबाबत आजच जाहीर करण्यात यावे. या ठिकाणी सर्वांच्या भावना व्यक्त झालेल्या आहेत.

**उपसभापती** : मी माननीय मंत्रिमहोदयांना सांगू इच्छितो की, या ठिकाणी जवळपास सर्व सभागृहाने आपल्याला यासंदर्भात केलेली विनंती आपण अंशत: मान्य केली की, आम्ही आता बसतो आणि विचार करतो. आता परीक्षा सुरु आहेत. या परीक्षा आणखी पंधरा वीस दिवस चालणार आहेत. बारावीच्या परीक्षेचा उद्या शेवटचा दिवस आहे. दहावीची परीक्षा चालू आहे. मला असे वाटते की, हा निर्णय आणखी दोन, चार, पाच तास उशिरा घेऊन चालणार नाही. आम्ही सगळे तयार आहोत. जनरेटरचे जे काही पैसे लागतील ते कॉन्ट्रीब्युशन आम्ही आमच्या आमदार फंडातून

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

**उपसभापती** ........

देण्यास तयार आहोत. फक्त शासनाने त्याला मंजुरी दिली पाहिजे. कारण परिस्थितीच आज तशी आहे. त्यामुळे मला असे वाटते की, हा निर्णय जर आपल्याला घ्यावयाचा असेल तर आपण आताही बसू शकता आणि आज संध्याकाळपर्यंत आपण आपला निर्णय द्यावा जेणेकरुन सभागृहाला त्याबाबत कळेल.

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, मी आताच माननीय शालेय शिक्षण मंत्री तसेच माननीच वित्त मंत्र्यांबरोबर यासंदर्भात चर्चा करतो आणि संध्याकाळ पर्यंत या सभागृहाला अवगत करतो.

-----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

## विशेष उल्लेख

**पृ. शी.** : कायदे करुनही गरिबांच्या किडण्या काढून देशविदेशातील श्रीमंतांना विकण्याचा धंदा तेजीत असणे.

**मु. शी.** : कायदे करुनही गरिबांच्या किडण्या काढून देशविदेशातील श्रीमंतांना विकण्याचा धंदा तेजीत असणे याबाबत डॉ. दीपक सावंत, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

डॉ. दीपक सावंत ( मुंबई विभाग पदवीधर ) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

" गरिबांच्या किडण्या काढून देशविदेशातील श्रीमंतांना विकण्याचा धंदा सध्या तेजीत असून किडनी दात्यांना या व्यवहारात फक्त 15-20 हजार रुपये देण्यात येऊन दलाल व डॉक्टरांना तीन ते दहा लाख रुपये मिळत असून हा व्यवहार कायदे करुनही तेजीत आहे. किडनी रॅकेटच्या प्रकरणात गुंतलेला नागपूरचा अमितकुमार उर्फ संतोष ह्या डॉक्टरने नागपूर सोडून मुंबईत दवाखाना सुरु करुन भिकाऱ्यांना दलालामार्फत लावून किडनी प्रत्यारोपण सुरु केले. सदर डॉक्टर विरुध्द 1993 मध्ये पहिला गुन्हा दाखल करण्यात आला. मूत्रपिंड रोपण करण्याचे कडक नियम असून काही डॉक्टर्सनी हा नियम पायदळी तुडवून या व्यवहारात मोठी अर्थप्राप्ती होत आहे. बॉम्बे हॉस्पिटलचे न्यूरोसर्जन डॉक्टर त्रिवेदी यांना तीन वर्षापूर्वी अटक करण्यात आली असता त्यांच्या चौकशीत त्याने काही मोठ्या रुग्णांची माहिती दिलेली आहे. जागतिक आरोग्य संघटनेने भारताला मानवी अवयवांच्या काळ्या बाजाराची राजधानी म्हटले आहे. मुंबई व महाराष्ट्रात मानवी अवयवांची तस्करी व व्यापार सुरु असून त्याबाबत कसून शोध घेऊन या व्यवहारांबाबत शासनाने तात्काळ निवेदन करावे, ही विनंती "

सभापती महोदय, मार्च महिन्यातील दुसरा गुरुवार हा मूत्रपिंड दिवस म्हणून मानला जातो.

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

डॉ. दीपक सावंत ......

भारतामध्ये दरवर्षी साधारणपणे दीड ते दोन लाख नवीन मूत्रपिंड विकाराचे लोक आढळतात. दरवर्षी किमान 1 लाख लोकांना मूत्रपिंड रोपणाची आवश्यकता पडते. गरिबांच्या किडण्या काढून देशविदेशातील श्रीमंतांना विकण्याचा धंदा आज सध्या मुंबईमध्ये अतिशय जोरात आहे. या व्यवहारात साधारणपणे 15 ते 20 हजार रुपये देऊन दलाल व डॉक्टरांना मात्र 3 ते 4 लाख रुपये मिळतात. नुकतेच किडनीचे रॅकेट आपल्यासमोर आलेले आहे. नागपूरचे डॉक्टर संतोष राऊत यांनी मुंबईत येऊन भिकाऱ्यांच्या किडण्या काढून त्या किडण्या विकल्या गेलेल्या आहेत. साधारणत: या किडनीची मागणी आपल्या मुंबईत जशी आहे तशी महाराष्ट्र आहे. महाराष्ट्रात जशी मागणी आहे तशी देशविदेशात देखील मागणी आहे. देशविदेशातील लोक येऊन मुंबईतील आणि महाराष्ट्रातील आणि हिंदुस्थानातील गरीब लोकांच्या किडण्या काढून घेऊन जातात. यासंबंधी एक मोठे रॅकेट आहे. काही दिवसांपूर्वी बॉम्बे हॉस्पिटलचे न्युरो सर्जन डॉ. त्रिवेदी यांना अटक करण्यात आली होती. डॉ. संतोष राऊत आजपर्यंत आपल्याला सापडलेले नाहीत. या किडनी प्रत्यारोपणाचा जो कायदा आहे, मानवी अवयवांच्या बाजाराविषयी जो कायदा आहे किंवा त्याचे प्रत्यारोपण करण्याविषयी जो कायदा आहे त्यामध्ये बदल करणे अत्यंत आवश्यक आहे. मला असे वाटते की, संसदेमध्ये हा कायदा काही वर्षांपूर्वी पास झाला. पण ज्याप्रमाणे या कायद्यामध्ये काही त्रुटी आढळून आल्या त्यामुळे हे आरोपी सुटत चाललेले आहेत. त्यामुळे हा कायदा सशक्त बनविण्याची आवश्यकता आहे. वेळोवेळी मूत्रपिंडाची मागणी जर आपण पाहिली तर दिवसेंदिवस ती वाढत चाललेली आहे. ती मागणी आणि पुरवठा यांचा समन्वय घालण्यासाठी आपल्याला हा कायदा अतिशय कडक करण्याची आवश्यकता आहे.

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्रीमती उषाताई दराडे )**

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत.....

जागतिक आरोग्य संघटनेने भारताला मानवी अवयवांच्या काळया बाजाराची राजधानी म्हटलेले आहे. त्यामुळे मुंबई व महाराष्ट्रामध्ये मानवी अवयवांची तस्करी व व्यापार करणा-यांचा गृह मंत्रालयानेशोध ताबडतोब घ्यावा आणि या किडणी रॅकेटमध्ये जे कोणी अडकलेले आहेत त्यांना ताबडतोब कायद्याच्या बंधनामध्ये आणून कडक शिक्षा करावी अशी मी या विशेष उल्लेख सूचनेद्वारे विनंती करीत आहे.

------

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

**पृ.शी.**: धारावी विकास योजनेंतर्गत भूमिपुत्रांना 400 चौ.फूटाची सदनिका मोफत देण्याची धारावी संघर्ष समितीने केलेली मागणी

**मु.शी.**: धारावी विकास योजनेंतर्गत भूमिपुत्रांना 400 चौ.फूटाची सदनिका मोफत देण्याची धारावी संघर्ष समितीने केलेली मागणी याबाबत डॉ.नीलम गो-हे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती ( श्रीमती उषाताई दराडे )** : माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

डॉ.नीलम गो-हे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदया, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते.

"धारावीचा विकास करण्याचा शासनाने घेतलेला निर्णय, त्यानुसार जागतिक निविदाही मागविण्यात येणे, धारावीमधील हजारो झोपडपट्टीधारक तेथे वर्षानुवर्षे रहात असून धारावी विकास योजनेंतर्गत तेथील भूमिपुत्रांना नवीन इमारतीमध्ये 400 चौ.फूटांची सदनिका मोफत देण्याची तेथील धारावी संघर्ष समितीने केलेली मागणी न्याय्य व रास्त असून या मागणीबाबत शासनाने आपली भूमिका जाहीर न केल्याने तेथील तमाम रहिवाशात पसरलेला तीव्र असंतोष व संताप लक्षात घेता धारावीतील झोपडीधारकांना 400 चौ.फूटाचे मोफत घर देण्याबाबत शासनाने तातडीने निवेदन करावे."

सभापती महोदया, धारावी पुनर्विकास प्रकल्पाचे धोरण प्रसिध्द करुन एक प्रकल्प सल्लागार पदाची नियुक्ती केलेली आहे. परंतु सर्वपक्षीय स्तरावर धारावी बचाव संघर्ष समिती स्थापन करण्यात आलेली आहे. या समितीच्या माध्यमातून धारावीमधील लाखो जनतेने अशी मागणी केलेली आहे की, सर्व झोपडीधारकास 400 चौ.फूट क्षेत्रफळाची पुनर्वसन सदनिका मिळाली पाहिजे. धारावी पुनर्वसन प्रकल्पासाठी 70 टक्के जनतेची संमती असावी ही अट अनिर्वाय केली पाहिजे. यामधील अनेक मुद्दे आहेत त्यावर देखरेख ठेवण्यासाठी धारावी बचाव आंदोलनाची दक्षता व सल्लागार समिती स्थापन करण्यात यावी, त्याचबरोबर तेथे व्यापारी व औद्योगिक पध्दतीने

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

डॉ.नीलम गो-हे.....

वापरात असलेल्या गाळयांना मोफत जागा मिळाली पाहिजे आणि विकसित धारावी पुनर्वसन प्रकल्प केले पाहिजे. या मागण्यांसाठी धारावी बचाव आंदोलनाची कृती समिती स्थापन करण्यात आलेली आहे. काल शिवसेना कार्याध्यक्ष श्री.उध्दवजी ठाकरे यांनी सर्वपक्षीय सभेला संबोधित केलेले आहे. धारावीतील संपूर्ण नागरिक आंदोलनाच्या पावित्र्यामध्ये आहेत. त्याचबरोबर धारावीतील नागरिकांनी सामाजिक स्वरुपाच्या मागण्या त्या समितीने केलेल्या आहेत. दुर्दैवाची गोष्ट अशी की, या प्रश्नासंबंधी सर्व पक्ष एकत्र आले असले तरी देखील या धारावीच्या प्रकल्पाचे प्रमुख सल्लागार श्री.मुकेश मेहता यांचे चिरंजीव यांनी मुकॉन कन्स्ट्रक्शन याबद्दल संशय व्यक्त करता येईल अशा पध्दतीच्या व्यक्तीला सल्लागार म्हणून नेमलेले आहे. धारावी बचाव समितीच्या लोकांनी अशाच पध्दतीच्या व्यक्तीची परत परत नेमणूक करण्यात येत आहे असे म्हटलेले आहे. या प्रश्नावर लक्षवेधी किंवा नियम 93 अन्वये शासनाकडून उत्तर अपेक्षित आहे. पण अनेक अग्रक्रमाचे कामकाज सभागृहासमोर असल्यामुळे या मुद्याकडे लक्ष वेधण्यासाठी मी या विशेष उल्लेखाच्या सूचनेद्वारे मी अशी मागणी करीत आहे की, या प्रश्नावर शासनाने जनतेला विश्वासात घेऊन प्रत्येक झोपडीधारकाला 400 चौ.फू.ची पुनर्वसित मोफत सदनिका द्यावी व आता प्रकल्पाची काय स्थिती आहे, याबाबतची माहिती द्यावी.

-------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

**पृ.शी.**: डोर्ले, जिल्हा रत्नागिरी येथील मागासवर्गीय वसतिगृहास निधी उपलब्ध करुन देणे

**मु.शी.**: डोर्ले, जिल्हा रत्नागिरी येथील मागासवर्गीय वसतिगृहास निधी उपलब्ध करुन देणे याबाबत श्री.संजय केळकर, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**तालिका सभापती** : माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत मागासवर्गीय मुलांच्या वसतिगृहाच्या इमारतीच्या बांधकामासाठी डोर्ले, ता. व जिल्हा रत्नागिरी येथील मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या वसतिगृहाचा प्रस्ताव समाजकल्याण संचालनालयाने मा.सचिव, सामाजिक न्याय व सांस्कृतिक विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे दिनांक 13.9.2001 रोजी सर्व कागदपत्राच्या पूर्ततेसह पाठविणे व त्यानंतर लोकप्रतिनिधींनी वारंवार पाठपुरावा करुनही सन्माननीय मंत्रिमहोदय अगर समाजकल्याण संचालनालय यांचेकडून पत्राची साधी पोहोचही न देणे, त्यामुळे ग्रामीण भागातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे हाल होणे व पर्यायाने विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहणे, सदरची बाब महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्यास अभिमानास्पद नसणे, सदर मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या वसतिगृहास प्राधान्यक्रमाने मंजुरी देऊन निधी उपलब्ध करुन द्यावा म्हणून विशेष उल्लेखाद्वारे सदरची बाब शासनाच्या निदर्शनास आणून देत आहे, तरी कार्यवाही व्हावी ही विनंती.

डोर्ले, ता. व जिल्हा रत्नागिरी येथील मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या वसतिगृहाचा प्रस्ताव समाजकल्याण संचालनालयाने मा.सचिव, सामाजिक न्याय व सांस्कृतिक विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे दिनांक 13.9.2001 रोजी सर्व कागदपत्रे सादर केल्यानंतर लोकप्रतिनिधींनी वारंवार पाठपुरावा करुनही सन्माननीय मंत्रिमहोदय अगर समाजकल्याण संचालनालय यांचेकडून पत्राची साधी पोहोचही दिली जात नाही. त्यामुळे ग्रामीण भागातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे हाल होत

5...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर....

आहेत, पर्यायाने विद्यार्थी शिक्षणापासून वंचित रहात आहेत. ही बाब महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्याला भूषणावह नाही. शासनाने प्राधान्यक्रमाने या वसतिगृहास निधी उपलब्ध करुन द्यावा अशी मी या विशेष उल्लेख सूचनेच्या माध्यमातून शासनाला विनंती करीत आहे. शासनाने या बाबीवर त्वरीत कार्यवाही करावी.

----

6....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## विशेष उल्लेखासंबंधी शासनाकडून उत्तर न मिळणे

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विशेष उल्लेखासंबंधी असलेल्या नियम 101 (फ) मधील तरतुदीकडे सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो. त्यामध्ये असे म्हटलेले आहे की, विशेष उल्लेख म्हणून मांडल्या गेलेल्या विषयासंबंधीचे उत्तर मंत्रिमहोदयांनी लगेच दिलेले असले तरी त्या संबंधीचे लेखी उत्तर ........

...नंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. मधुकर चव्हाण...

**सभापतीस्थानी माननीय उपसभापती**

एक महिन्याच्या आत पाठविण्याचे बंधन मंत्र्यावर राहील. मी या सभागृहामध्ये गेल्या वर्षभरामध्ये जे विशेष उल्लेख उपस्थित केले त्यांचे उत्तर दिलेले नाही. विशेष उल्लेखाला उत्तर देणे ही मंत्र्यांची जबाबदारी आहे. वास्तविक विशेष उल्लेख आदल्या दिवशी दिले जातात ,कारण विशेष उल्लेख ज्या खात्याशी संबंधीत असतो त्या खात्याच्या मंत्र्यांनी सभागृहामध्ये उपस्थित राहाणे आवश्यक असते. परंतु या ठिकाणी हे शासन आणि मंत्रिमहोदय जनतेच्या प्रतिनिधींना किती महत्व देतात हे या विशेष उल्लेखाच्या निमित्ताने दिसून येते. विशेष उल्लेखाच्या प्रकरणी काही वेळा माननीय सभापती देखील शासनाला आदेश देतात. म्हणून याबाबतीत सक्त कारवाई होणे आवश्यक आहे. आपण अधिवेशन घेतो, एवढा खर्च करतो, आणि त्या अधिवेशनामध्ये उपस्थित केलेल्या मुद्यांचे उत्तर मिळत नसेल तर मग या ठिकाणी चर्चाच कशाला करायची ? अधिका-यांनाच घेऊन राज्य चालवा. नियमाचे पालन होणार नसेल तर त्याला काही अर्थ नाही. सन 2007 मधील अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये अनेक सन्माननीय सदस्यांनी विशेष उल्लेख उपस्थित केले. त्यांची उत्तरे अजून दिलेली नाहीत. विशेष उल्लेखाच्या वेळी सभागृहामध्ये संबंधित खात्याचे कॅबिनेट मंत्री अथवा राज्यमंत्री देखील उपस्थित नसतात. अदृश्य असणारे अधिकारी देखील गॅलरीमध्ये नसतात. संबंधित खात्याच्या मंत्री महोदयांनी सभागृहामध्ये उपस्थित राहावे म्हणून विशेष उल्लेख हे आदल्या दिवशी द्यावे लागतात. तसेच विशेष उल्लेख हे याठिकाणी मनाप्रमाणे उपसिथत करता येत नाहीत. माननीय सभापतींकडे विशेष उल्लेखाची सूचना दिल्यानंतर कोणत्या सूचना स्वीकारायच्या हे माननीय सभापती ठरवितात. शहरातील तसेच ग्रामीण भागातील तातडीच्या आणि महत्वाच्या प्रश्नाबाबत विशेष उल्लेख विचारले जातात. परंतु त्याची उत्तरे वेळेवर दिली जात नाहीत. मी कामगार खात्याशी संबंधित असलेल्या विषयासंबंधी या सभागृहामध्ये विशेष उल्लेख उपस्थित केला होता. कारखान्यामध्ये कामगारांच्या सुरक्षिततेची काळजी घेतली जात नाही असा माझ्या विशेष उल्लेखाचा विषय होता. वर्षभरानंतर मला असे लेखी उत्तर आले की, होय, 186 कारखाने असे आहेत की त्या ठिकाणी धोकादायक स्थिती आहे. या ठिकाणी नियमांचे पालन होत नाही.

==2==

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. मधुकर चव्हाण...)

सभापती महोदय, लोकांच्या जिवाशी खेळण्याचा हा प्रकार आहे. महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज यांचे नांव घेऊन राज्यकर्ते हे शासन चालवतात. महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सामान्य लोकांचे दु:ख डोळयासमोर ठेवून चळवळी केल्या. सभापती महोदय, माझी आपणास या निमित्ताने विनंती आहे की, आपण या विशेष उल्लेखासंबंधी उत्तर देणे मंत्री महोदयांना बंधनकारक करण्यासाठी नियम तयार केलेला आहे. नियम 101-फ मध्ये असे म्हटलेले आहे की, विशेष उल्लेख म्हणून मांडल्या गेलेल्या विषयासंबंधीचे उत्तर मंत्रिमहोदयांनी लगेच दिलेले असले तरी त्या संबंधीचे लेखी उत्तर तीस दिवसांच्या आत संबंधित सदस्यांस पाठविण्याचे बंधन मंत्र्यांवर राहील. सभापती महोद, मी या सदनाचा मी गेली चार वर्षे सदस्य आहे. या ठिकाणी विशेष उल्लेख उपस्थित केल्यानंतर त्यास उत्तर देण्याकरिता कोणीही हरीचा लाल उठल्याचे गेल्या चार वर्षात मी पाहिलेले नाही. मी स्पष्टपणे सांगू इच्छितो की, काही माननीय मंत्री सोडले तर अनेक मंत्री हे अनुभवी आहेत. अधिका-यांच्या मदती शिवाय ते उत्तर देऊ शकतात. सभापती महोदय, आम्ही या ठिकाणी केवळ भत्ते घेण्यासाठी येत नाही. लोकप्रतिनिधी हे जनतेचे प्रश्न या सभागृहामध्ये मांडत असतात. त्यांच्या प्रश्नाला हे शासन वाटाण्याच्या अक्षता दाखवित असेल तर आपण नियम कशाला केले आहेत असा प्रश्न उपस्थित होतो. तेव्हा पुढच्या वेळी असे होणार नाही याची काळजी घ्यावी अशी सभापती महोदय, माझी आपणास विनंती आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सभागृहामध्ये उपस्थित केलेल्या विशेष उल्लेखाचे उत्तर येत नाही हे सांगण्याची ही तिसरी वेळ आहे. सुरुवातीला विशेष उल्लेखाची प्रथा सुरु करण्यात आली. त्या विशेष उल्लेखासंबंधी मंत्री महोदय उत्तर देत नाही हे लक्षात आल्यानंतर त्यासंबंधी आपण बैठक बोलावली आणि त्यासंबंधात नियम तयार करण्यात आला. सन्माननीय सदस्यांनी सभागृहामध्ये विशेष उल्लेख उपस्थित केल्यानंतर संबंधित खात्याच्या मंत्री महोदयांनी त्यासंबंधी लगेच उत्तर द्यावे किंवा किमान 1 महिन्यामध्ये लेखी उत्तर द्यावे असे नियमामध्ये नमूद करण्यात आलेले आहे. असे असताना हे शासन नियमांचे पालन करीत नाही. मग प्रत्येक वेळी आम्ही हक्कभंगाचे हत्यार घेऊन उभे रहायचे काय ?

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

सन्माननीय सदस्य सभागृहात वारंवार सांगतात की, हे सरकार आम्हाला जुमानत नाही, आम्ही विचारलेल्या प्रश्नांची माहिती देत नाही, नियमांचे पालन करीत नाही तर अशा वेळी पीठासीन अधिका-यांनी शासनाला गांभीर्याने सूचना दिल्या पाहिजेत. या ठिकाणी सन्माननीय सदस्य विशेष उल्लेखाच्या सूचना उपस्थित करतात, त्याबाबतची माहिती विभागास प्राप्त झाल्यानंतर त्याबाबतची दखल मंत्रालयातील प्रधान सचिवांकडून घेतली जात नाही तसेच ते अधिकारी माननीय मंत्री महोदयांना देखील उत्तर देऊ देत नाहीत ही देखील गंभीर गोष्ट आहे. अशा प्रकारे प्रशासन चालत असेल तर ती दुर्देवाची गोष्ट आहे. या ठिकाणी मी "मिजास" हा शब्द वापरत नाही. तो सरकारचा स्वाभिमानाचा भाग आहे. सरकारमधील मंत्री अतिशय स्वाभिमानाने सभागृहात सांगतात की, आमचे सरकार झोपलेले नाही. परंतु हे सरकार जागे आहे काय या विषयी मला शंका आहे. सन्माननीय सदस्य श्री. मुधकर चव्हाण यांनी विशेष उल्लेखाच्या सूचनांना सरकारकडून वेळेत उत्तरे दिली जात नाहीत अशा प्रकारचा मुद्दा या सभागृहात तिस-यांदा उपस्थित केलेला आहे. विशेष उल्लेखाच्या सूचनांना सरकारकडून वेळेवर उत्तरे दिली जात नाहीत अशी आमची सगळयांचीच भावना झालेली आहे. सरकारकडून विशेष उल्लेखाच्या सूचनांना उत्तरच मिळत नाही म्हणून मी सभागृहात विशेष उल्लेखाच्या सूचना उपस्थित करणे सोडून दिलेले आहे. सभापती महोदय, आपण पीठासीन अधिकारी आहात. याबाबतीत आपण आम्हाला संरक्षण दिले पाहिजे. आतापर्यंत सन्माननीय सदस्यांकडून विशेष उल्लेखाच्या सूचना किती उपस्थित केल्या ? त्यातील किती सूचनांना सरकारकडून उत्तरे दिली गेली ? सूचनांची उत्तरे मर्यादित वेळेत गेली आहेत काय ? मर्यादित वेळेत उत्तरे दिली गेली नसतील तर त्याबाबतीत कोणाला जबाबदार धरण्यात येणार आहे ? या सर्व गोष्टींचा अहवाल सन्माननीय सदस्यांना सरकारकडून देण्यात यावा अशी आमची मागणी आहे. सभापती महोदय, काल सन्माननीय सदस्य श्री. बाजोरिया यांनी मुद्दा उपस्थित केला होता. त्या मुद्याच्या अनुषंगाने 15 दिवसात शासनाने अंमलबजावणी करावी अशा प्रकारचे आपण निदेश दिले आहेत. परंतु संबंधित विभागाचे अधिकारी सांगतात की, विधिमंडळाच्या माध्यमातून माननीय सभापतींची सूचना आमच्याकडे अजून प्राप्त झालेली नाही. पीठासीन अधिकारी म्हणून आपणाकडून ज्या सूचना दिल्या जातात, त्या संबंधित विभागाकडे पाठविण्याची जबाबदारी विधिमंडळाच्या सचिवांची आहे की शासनातील संबंधित अधिका-यांची आहे याची

2...

श्री. दिवाकर रावते...

आम्हाला माहिती मिळावी. पीठासीन अधिकारी म्हणून आपण दिलेल्या निर्णयाचा पाठपुरावा कोणी करावयाचा आहे? याबाबतची देखील माहिती आम्हाला मिळाली पाहिजे. या सभागृहात जनतेचे प्रश्न मांडले जातात. त्या प्रश्नाला वाटाण्याच्या अक्षदा लावण्याचे काम या सरकारकडून केले जाते. त्याबाबतीत सरकारला कोणी विचारणार आहे किंवा नाही ? माझी आपणास विनंती आहे की, विशेष उल्लेखांच्या सूचनांच्या बाबतीत माननीय सभापतीच्या अध्यक्षतेखाली एक बैठक घ्यावी आणि त्या बैठकीत सरकारला जाब विचारावा. आतापर्यंत सन्माननीय सदस्यांकडून सभागृहात विशेष उल्लेखाच्या सूचना किती उपस्थित करण्यात आल्या ? त्यातील किती विशेष उल्लेखाच्या सूचनांना सरकारकडून उत्तरे दिली गेली आहेत ? सदरहू उत्तरे वेळेत दिली गेली आहेत काय ? उत्तरे वेळेत दिली गेली नसतील तर त्यासंदर्भात कोणला जबाबदार धरण्यात येईल ? या सर्व गोष्टींची माहिती सदनासमोर सादर झाली पाहिजे अशी माझी आपणास विनंती आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी विशेष उल्लेखाची सूचना मांडावयाची. माननीय मंत्र्यांनी ती ऐकून घ्यावयाची आणि हसत हसत मंत्र्यांनी सभागृहातून बाहेर निघून जावयाचे असे प्रकार सध्या सुरु आहेत. विशेष उल्लेखाच्या सूचनांची दखल न घेणे, त्यास वाटाण्याच्या अक्षदा लावणे, त्या सूचनेची अजिबात मुलाहिजा न करणे अशी प्रवृत्ती सरकारमध्ये वाढलेली आहे. सभापती महोदय, विशेष उल्लेखाच्या सूचनांच्या बाबतीत सन्माननीय सदस्यांना संरक्षण देण्यात यावे अशी माझी आपणास विनंती आहे.

श्री. मुधकर सरपोतदार : सभापती महोदय, विशेष उल्लेखाच्या सूचनांना शासनाकडून वेळेवर उत्तरे दिली जात नाहीत या अनुषंगाने दोन सन्माननीय सदस्यांनी मुद्दा उपस्थित केलेला आहे. मी देखील हा विषय सभागृहात तीन वेळा उपस्थित केलेला आहे. मी कामगार विभागाच्या बाबतीत तीन वेगवेगळया विषयाबाबत विशेष उल्लेखाच्या सूचना सभागृहात उपस्थित केलेल्या आहेत. परंतु मी उपस्थित केलेल्या विशेष उल्लेखाच्या सूचनांची दखल कामगार विभागाकडून घेतली जात नाही ही अतिशय खेदाची गोष्ट आहे. कामगार विभागास माझ्या सूचनांना उत्तरे द्यावयाची नसतील तर त्यांनी कळविण्याचे सौजन्य दाखविले पाहिजे की, या प्रश्नाचे आमच्याकडे उत्तर नाही. कृपया याबाबतीत नोंद घ्यावी. परंतु सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या विशेष उल्लेखाच्या सूचनांची दखलच घ्यावयाची नाही, त्यांना उत्तरेच द्यावयाची नाहीत, या सदनात हा काय प्रकार चालला आहे? माननीय पीठासीन अधिकारी याबाबतीत गांभीर्याने नोंद घेऊन काही

3...



ABG/ प्रथम श्री.शिगम 14:20

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार...

उपायोजना करणार आहेत काय ? जर याबाबतीत गांभीर्याने दखल घेतली गेली नाही तर सभागृहाच्या कामकाजाबाबतीत आम्हाला वेगळा विचार करावा लागेल. आम्ही उपस्थित केलेल्या मुद्याच्या बाबतीत आपण खुलासा करावा अशी माझी विनंती आहे.

( सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. उल्हास पवार )

श्री. छगन भुजबळ : अध्यक्ष महोदय, विशेष उल्लेखाच्या सूचनांना शासनाकडून वेळेत उत्तरे दिली जात नाही अशा प्रकारचा विषय अनेक सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेला आहे. ज्यावेळी सदस्यांकडून सूचना मांडण्यात येते त्यावेळी उपस्थित असलेल्या मंत्र्यांकडून सांगण्यात येते की, सन्माननीय सदस्यांच्या सूचनेची नोंद घेण्यात आली आहे. माझी विनंती आहे की, विधानमंडळ सचिवालयातील प्रधान सचिवांमार्फत मंत्रालयातील प्रत्येक विभागाच्या प्रधान सचिवांना विशेष उल्लेखाच्या सूचनांबाबतीत लेखी कळविले गेले पाहिजे. या ठिकाणी विशेष उल्लेखाच्या सूचना उपस्थित करण्यात येतात त्यावेळी सभागृहात उपस्थित असलेले मंत्री सामुहिक जबाबदारी म्हणून सांगतात की, सन्माननीय सदस्यांच्या सूचनेची नोंद घेण्यात आली आहे. सभापती महोदय, या ठिकाणी जो प्रश्न उपस्थित केला गेला आहे तो प्रश्न शासनाच्या निदर्शनास आणून देणार आहे. परंतु आपण विधानमंडळाच्या माध्यमातून शासनाच्या प्रत्येक विभागास अवगत करावे अशी माझी आपणास विनंती आहे.

यानंतर श्री. कानडे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती (श्री. उल्हास पवार ) :** विधानमंडळ सचिवालयाच्या माध्यमातून संबंधित विभागाला कळविले जाते. संबंधित खात्याकडून त्याबाबतचे उत्तर विशेष उल्लेख करणाऱ्या सन्माननीय सदस्याला दिले जाते.

श्री. छगन भुजबळ : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी आता सांगितल्याप्रमाणे विशेष उल्लेखाची अनेक उत्तरे संबंधित खात्याकडून मिळालेली नाहीत. सन्माननीय सदस्यांच्या विशेष उल्लेखाला उत्तरे मिळाली किंवा खरोखरच मिळाली नाहीत हे समजले पाहिजे. याचा लेखाजोखा विधानमंडळ सचिवालयाने घ्यावा. संबंधित खात्याकडून किती विशेष उल्लेखांची उत्तरे याची माहिती घ्यावी.म्हणणे खरोखरच सरकारकडून विशेष उल्लेखाची उत्तरे मोठया प्रमाणावर प्रलंबित आहेत काय याची माहिती मिळेल.

**तालिका सभापती** : विधानमंडळ सचिवालय आणि संबंधित विभाग यांनी परस्परांना याबाबत कळविले पाहिजे. विशेष उल्लेखाची सूचना विधानमंडळ सचिवालयाकडून संबंधित विभागाकडे कळविली जाते. खात्याकडून सन्माननीय सदस्यांना विशेष उल्लेखाची परस्पर उत्तरे दिली जातात. ती जर दिली गेली नसतील तर त्याची दखल घेतली गेली पाहिजे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, संबंधित विभागाकडून विशेष उल्लेखाचे उत्तर सदस्याला गेल्यावर त्याची एक प्रत विधानमंडळ सचिवालयास देखील पाठविण्याबाबत सूचना द्याव्यात.

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, एक महिन्यात आत विशेष उल्लेखाच्या सूचनेला उत्तर मिळाले पाहिजे असा नियमच आहे. परंतु विशेष उल्लेखाच्या सूचनेला 6/6 महिने उत्तरे मिळत नाहीत.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय....

**तालिका सभापती** : याविषयावर चर्चा झालेली आहे आणि त्याबद्दलचे विश्लेषण केलेले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

.....2

पृ.शी. : राज्यातील राजकीय नेते,बिल्डर,उद्योगपती यांना राज्य शासनाने दिलेले पोलीस संरक्षण

मु.शी. : राज्यातील राजकीय नेते,बिल्डर,उद्योगपती यांना राज्य शासनाने दिलेले पोलीस संरक्षण याबाबत श्री. मधुकर चव्हाण, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

राज्यातील अनेक राजकीय नेते, बिल्डर, उद्योगपती यांना राज्य शासनाने संरक्षणाकरिता पोलीस दिलेले आहेत. या सर्वांकडून शासनाला सुमारे एक कोटी रुपये येणे बाकी आहे. यांना दिलेल्या संरक्षणामुळे सामान्य नागरिकांच्या संरक्षणाकरिता व कायदा आणि सुव्यवस्थेकरिता पोलीस बळ कमी पडत आहे. अनेक मंत्र्यांना व त्यांच्या कुटुंबियांना झेड दर्जाची सुरक्षा पुरविण्यात आली आहे. त्यांचा दर्जा आणि आवश्यकता लक्षात घेऊन काही लोकांना खरोखरच सुरक्षा देणे आवश्यक आहे. यातील काही मंत्र्यांच्या कुटुंबियांच्या संरक्षणाकरिता सुमारे 30 ते 40 पोलिसांचे बळ तैनात करण्यात आले आहे. या संरक्षणापायी लाखो रुपयांचा भुर्दंड शासनाच्या तिजोरीवर पडत आहे. शासनाने या सर्व गोष्टींचा गंभीरपणे विचार करणे अत्यंत आवश्यक आहे. उदा. द्यावयाचे झाले तर नवी मुंबईतील नगरसेवकांनी जवळजवळ 90 लाख रुपये थकविले आहेत. कामगारमंत्री श्री. गणेश नाईक यांना नि:शुल्क पोलीस संरक्षण पुरविण्यात येते. नवी मुंबईतील अनेक नगरसेवकांना पोलीस संरक्षण देण्यात आलेले आहे. एक अतिशय गंभीर गोष्ट आहे. पोलीस संरक्षणासाठी कॉन्स्टेबल,हवालदार,पोलीस उपनिरीक्षकापर्यंत पोलीस बळ वापरले जाते. एका पोलिसासाठी 1464 रुपये खर्च केले जातात पण प्रत्यक्ष पोलिसाला 100 रुपये दिले जातात. मुख्यमंत्र्यांना नियमानुसार पोलीस संरक्षण दिले जाते. पण काही राजकीय नेते यांना शासनाने संरक्षण नि:शुल्क देणे आवश्यक नाही तरी सुध्दा त्यांनी मागितले आहे. कॉन्स्टेबल सकाळी 9 वाजल्यापासून रात्री 12.00 वाजेपर्यंत डयूटी करतात. रिलीव्हर आल्याशिवाय त्यांना सोडले जात नाही. एका कॉन्स्टेबलमागे

.....3





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण ...

1464 रुपये खर्च केले जातात आणि कॉन्स्टेबलला प्रत्यक्ष फक्त 100 रु. मिळतात. हा विषय अत्यंत महत्वाचा असून या सर्व गोष्टींची चौकशी केली जावी आणि आवश्यक असेल तेथेच पोलीस संरक्षण देण्यात यावे अशी मी या विशेष उल्लेखाच्या निमित्ताने विनंती करु इच्छितो.

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, आता विशेष उल्लेखाच्या सूचनेसंबंधी योग्यप्रकारे व वेळेवर उत्तर दिले जात नाही यासंबंधी चर्चा झाली. माझे सहकारी सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी पोलीस संरक्षणासंबंधीचा विषय विशेष उल्लेखाच्या सूचनेद्वारे मांडला. विशेष उल्लेखाची व्याख्या काय आहे? तो कोणत्या स्वरुपाचा असावा याची व्याख्या केली पाहिजे. या

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात)

सभागृहात शासनाच्या प्रत्येक कामकाजाबाबत विशेष उल्लेख, नियम 93 अन्वये सूचना मांडली जाते. कोणत्या विषयाची किती व्याप्ती आहे यावर हे अवलंबून असले पाहिजे. मोठया प्रमाणात स्कोप असलेला विषय विशेष उल्लेखाद्वारे, नियम 93 व्या सूचनेद्वारे मांडला जातो.

**तालिका सभापती** (श्री.उल्हास पवार) : विधीमंडळाच्या नियमाचा, कामकाजाचा आणि संकेताचा तो भाग आहे.

श्री.भास्कर जाधव : कोणते आयुध कोणत्या वेळी, कोणत्या व्याप्तीनुसार वापरावयाचे हे ठरले पाहिजे. तासन्तास एका बाजूला चर्चा होते आणि दुसऱ्या बाजूला शांतपणे बसून ऐकावे लागते. आमचे कामकाज किती? या विषयाची व्याप्ती आणि व्याख्या ठरली पाहिजे एवढेच मला सांगावयाचे आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव यांनी असा मुद्दा मांडला की, विशेष उल्लेखाबाबत निकष ठरविण्यात यावेत. हा पूर्ण अधिकार नियमाप्रमाणे माननीय सभापतींनी स्वत:कडे ठेवला आहे. ज्याअर्थी माननीय सभापतींनी एखाद्या विशेष उल्लेखाच्या सूचनेला मान्यता दिली, त्याअर्थी तो त्यांचा अधिकार असल्यामुळे त्या निर्णयावर आव्हानात्मक चर्चा होणार असेल तर आम्ही चर्चेस तयार आहोत. परंतु माननीय सभापतींच्या कोणत्याही निर्णयाबाबत या सदनामध्ये आक्षेप घेणे, त्यावर चर्चा करणे, वक्तव्य करणे, भाष्य करणे अनैतिक मानले जाते, त्यामुळे ते गैरलागू आहे.

**तालिका सभापती** : हा सर्वस्वी माननीय सभापतींचा अधिकार आहे हे मान्य आहे.

श्री.दिवाकर रावते : विशेष उल्लेखाच्या सूचनेसंबंधी वेळ दिलेली असून एक सूचना मांडण्यास जास्तीत जास्त 7 मिनिटे दिली जातात. माननीय सदस्यांनी सांगितले की, एकाच बाजूला चर्चा होते आणि आम्ही शांतपणे बसून ऐकतो. प्रत्यक्षात तसे होत नाही. याठिकाणी जी चर्चा चालू होती ती तुमच्या, माझ्या, सर्वांच्या संरक्षणासंबंधीची होती.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव : मी माननीय सभापतींच्या निर्णयाविषयी काही बोललोच नाही. त्यांनी विशेष उल्लेख मांडू नये असेही म्हटले नाही. विशेष उल्लेखाची सूचना कोणत्या स्वरुपाची असावी एवढाच माझा विषय होता.

श्री.मधुकर चव्हाण : माझे फक्त एवढेच म्हणणे आहे की, कोणती सूचना सभागृहात मांडू द्यायची हा अधिकार माननीय सभापतींचा आहे.

**तालिका सभापती** : हा विषय संपला आहे. सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी त्यांची विशेष उल्लेखाची सूचना मांडावी.

--------------------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : दुर्मिळ ग्रंथसंपदेचे जतन करणे.

**मु. शी.** : दुर्मिळ ग्रंथसंपदेचे जतन करणे याबाबत श्री.अरविंद सावंत, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

महाराष्ट्र राज्याचे आद्यदैवत छत्रपती शिवाजी महाराजांना उत्तम लिहिता वाचता येत असल्याचे सर्वप्रथम सिध्द करुन ब्रिटिशधार्जिण्या इतिहासकारांची तोंडे गप्प करणारे आणि भाषाशास्त्र, मोडीलिपी, वाङःमयांसह शिलालेखांच्या प्रांतात मुक्तहस्ते संचार करणारे इतिहासाचार्य वि.का.राजवाडे यांची ग्रंथसंपदा केवळ निधीअभावी प्रकाशित होऊ शकलेली नाही. तसेच त्यांनी संग्रहित केलेली शिवकालीन दुर्मिळ साहित्यसंपदाही नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वहस्ताक्षरातील 100 हून अधिक दुर्मिळ पत्रांचा अमूल्य दस्तऐवज, अन्य अमूल्य साहित्यसंपदा जीर्ण झाली असून ती नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. ग्रंथसंपदा जतन करण्यासाठी तसेच राजवाडे यांचे प्रकाशित साहित्य सातासमुद्रापार नेण्यासाठी केवळ निधीची कमतरता भासत आहे. तरी याबाबत शासनाने पुढाकार घेऊन निधी उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. याबाबत शासनाने निवेदन करावे अशी मी विनंती करतो.

-----------

(नंतर श्री.खर्चे......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: सांगली व कोल्हापूर जिल्ह्यातील अशंत: अनुदानावर आलेल्या शाळांना अनुदान उपलब्ध न होणे.

**मु.शी.**: सांगली व कोल्हापूर जिल्ह्यातील अशंत: अनुदानावर आलेल्या शाळांना अनुदान उपलब्ध न होणे याबाबत प्रा. शरद पाटील,वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती (श्री. उल्हास पवार)** : माननीय सदस्य प्रा. शरद पाटील यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे, त्यांनी ती मांडावी.

प्रा. शरद पाटील (पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

राज्यातील विशेषत: सांगली व कोल्हापूर जिल्ह्यातील अशासकीय नवीन माध्यमिक शाळा अंशत: अनुदानावर आलेल्या सन 2006-07 वार्षातील डिसेंबर, 2006 जानेवारी व फेब्रुवारी, 2007 या महिन्यातील देयके अनुदानाअभावी अदा झालेली नाहीत. त्यामुळे कर्मचाऱ्यांची कुचंबना होत असून वारंवार मागणी करुनही शासनाकडून अनुदान उपलब्ध झालेले नाही. वेतन पथकाकडे संस्थाचालक व शिक्षक यांचा सातत्याने तगादा असल्यामुळे त्यांची अडचण होत आहे. तरी 31 मार्च 2008 पूर्वी अनुदान वितरित करुन संबंधितांना दिलासा द्यावा, ही विनंती.

-------------

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: कल्याण-डोंबिवली-शिळफाटा या रस्त्याचे काम पूर्ण होईपर्यंत टोल न घेण्याबाबत

**मु.शी.**: कल्याण-डोंबिवली-शिळफाटा या रस्त्याचे काम पूर्ण होईपर्यंत टोल न घेण्याबाबत या विषयासंबंधी श्री. संजय दत्त, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**तालिका सभापती (श्री. उल्हास पवार)** : माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे, त्यांनी ती मांडावी.

श्री. संजय दत्त (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

कल्याण, डोंबिवली, अंबरनाथ, उल्हासनगर, बदलापूर, मुरबाड या शहरांची जीवनवाहिनी असलेला आणि मुंबईला जोडणारा "कल्याण-डोंबिवली शिळफाटा" हा रस्त सुरळीत करावा अशी वेळोवेळी जनतेने मागणी केली होती. तसेच याबाबत मा. सभापती व मा. उपसभापती यांनी या प्रश्नाबाबत स्थानिक जनतेच्या भवना लक्षात घेऊन या सार्वभौम सभागृहात वेळोवेळी याविषयी चर्चा करण्याची संधी दिली. याकडे स्वत: विशेष लक्ष घालून सार्वजनिक बांधकाम मंत्री मा. श्री. अनिल देशमुख यांनी तेथील काम वेळेवर पूर्ण व्हावे यासाठी प्रयत्न केले. मात्र असे निदर्शनास आले आहे की, तेथील कंत्राटदार काम पूर्ण होण्यापूर्वीच टोलची वसुली सुरु करण्याच्या बेतात आहे. रस्त्याचे काम शंभर टक्के पूर्ण झाल्याशिवाय तेथे टोलची वसुली करण्यात येऊ नये ही तेथील जनतेची भावना लक्षात घेऊन मा. सभापती महोदयांच्या माध्यमातून माननीय मंत्री महोदय श्री. अनिल देशमुख यांना मी विनंती करीत आहे की, काम पूर्ण झाल्याशिवाय टोल वसुली करु नये. त्यासाठी एक/दोन महिने थांबावे लागले तरी चालेल, पण बीओटीवर या रस्त्याचे बांधकाम करणाऱ्या कंत्राटदाराला काम पूर्ण झाल्याशिवाय टोल घेण्याची परवानगी देऊ नये असे स्पष्ट निर्देश मा. मंत्री महोदयांनी संबंधितांना द्यावेत, अशी विनंती या सार्वजनिकदृष्टया अत्यंत महत्वाच्या प्रश्नाच्या संदर्भात, विशेष उल्लेखाच्या सूचनेद्वारे करीत आहे.

......3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनिल देशमुख (सार्वजनिक बांधकाम मंत्री) : महोदय, मी सुरुवातीपासूनच सांगत होतो की, हा रस्ता मी चांगला करुन दाखवीन. त्यानुसार या रस्त्यचे काम झालेले आहे व ते सन्माननीय सदस्यांनी देखील मान्य केले आहे, त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. तसेच सन्माननीय सदस्यांनी टोलबाबत जी मागणी केली आहे त्याबाबत मला असे सांगावयाचे आहे की, याबाबत जो करारनामा झालेला आहे त्यानुसारच ही कार्यवाही करण्यात येईल.

-----------

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : गोंदिया जिल्हयात वेतन पत्रक कार्यालय सुरु करणे व इतर मागण्याबाबत शासनाचे झालेले दुर्लक्ष.

**मु. शी.** : गोंदिया जिल्हयात वेतन पत्रक कार्यालय सुरु करणे व इतर मागण्याबाबत शासनाचे झालेले दुर्लक्ष याबाबत श्री.केशवराव मानकर वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : माननीय सदस्य श्री. केशवराव मानकर यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. केशवराव मानकर ( विधानसभेने निवडलेले ) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, गोंदिया जिल्हयाच्या निर्मितीला आज आठ वर्षे लोटुनही गोंदिया जिल्हयात वेतन पथक कार्यालय नसणे, त्यामुळे जिल्हयातील शिक्षकांना वेतनासंदर्भात किंवा इतर कामाकरिता भंडारा येथे जावे लागणे, त्यामुळे गोंदिया जिल्हयातील शिक्षकांना होणारा कमालीचा त्रास, यासंबंधी जिल्हयाचे पालकमंत्री मा. अनिलजी देशमुख यांनी वेतन पथक कार्यालय सुरु करणेसंबंधी दिलेले आश्वासन, तसेच जिल्हयातील आमगांव तालुकाअंतर्गत येणा-या काही विभगातील शिक्षक एकस्तर वेतनश्रेणीपासून वंचित असणे, जिल्हयातील आमगाव तालुका वगळून इतर भागात 6 ऑगस्ट, 2002 पासून थकीत नक्षलग्रस्त प्रोत्साहन भत्ता मिळणे, परंतु आमगाव तालुका 6 ऑगस्ट, 2002 पासून मिळणा-या नक्षलग्रस्त प्रोत्साहन भत्त्यापासून वंचीत असणे, यासंदर्भात सन 2007 ला दुस-या अधिवेशनात माझे नावाने लागलेल्या प्रश्न क्र. 31878 ला मंत्रीमहोदयांनी प्रोत्साहन भत्त्याची थकबाकी देण्याचे जाहीर करणे, यासंदर्भात महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद, गोंदिया यांनी शासनाकडे उपरोक्त मागण्यांसाठी केलेला पाठपुरावा, याकडे शासनाचे होणारे अक्षम्य दुर्लक्ष, त्यामुळे गोंदियाच्या जिल्हाधिकारी कार्यालयासमोर महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद, गोंदिया ने दि. 26 फेब्रुवारी, 2008 पासून सुरु केलेले साखळी उपोषण आणि सद्यस्थितीत आमरण उपोषणाचा चौथा दिवस, परंतु आजपासून दहावीच्या परीक्षा सुरु होणे, त्यामुळे परीक्षा केंद्रावर होणारा परिणाम, त्यामुळे परीक्षा देणा-या विद्यार्थ्यांना होणारा त्रास आणि त्यांचे होणारे नुकसान लक्षात घेता शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही करावी अशी सूचना मी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे.

-------------

13-03-2008 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) GG-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : राज्यातील सर्व कर्मचा-यांबरोबरा शाळा व महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांना सहा टक्के महागाई भत्ता देण्याची अर्थसंकल्पात तरतूद करणे.

**मु. शी.** : राज्यातील सर्व कर्मचा-यांबरोबरा शाळा व महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांना सहा टक्के महागाई भत्ता देण्याची अर्थसंकल्पात तरतूद करणे याबाबत श्री.विक्रम काळे वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांनी एक विशेष उल्लेखाची सूचनाा दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. विक्रम काळे ( औरंगाबाद विभाग शिक्षक ) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, देशामध्ये नुकताच केंद्र शासनाने अर्थसंकल्प सादर केला. त्यामध्ये अनेक नवीन बाबींचा समावेश केलेला आहे. कर्मचा-यांच्या बाबतीमध्ये सुध्दा महत्वाचा निर्णय घेतला व सर्व कर्मचा-यांना 6 टक्के महागाई भत्ता देण्याची तरतूद अर्थसंकल्पात केली गेली ही बाब स्वागतार्ह आहे. राज्याच्या अर्थसंकल्प सादर होणे बाकी आहे. तेव्हा राज्यातील सर्व कर्मचा-यांबरोबर या सर्व प्रकारच्या प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक तसेच वरिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचा-यांना सुध्दा 6 टक्के महागाई भत्ता देण्याची तरतूद शासनाने येत्या अर्थसंकल्पात करण्यात यावी अशी सूचना मी या विशेष उल्लेखाद्वारे मांडत आहे.

--------------

...3





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : राज्यातील सर्व नगरपालिका, महानगर पालिका, जिल्हा परिषद सदस्य तसेच महापौर व अध्यक्षांना मंत्रालयात कायमची तात्काळ प्रवेश पत्रिका मिळण्याबाबत.

**मु. शी.** राज्यातील सर्व नगरपालिका, महानगर पालिका, जिल्हा परिषद सदस्य तसेच महापौर व अध्यक्षांना मंत्रालयात कायमची तात्काळ प्रवेश पत्रिका मिळण्याबाबत श्री. श्री.गोपीकिसन बाजोरिया वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : माननीय सदस्य श्री.गोपीकिसन बाजोरिया यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री..गोपीकिसन बाजोरिया (अकोला तथा वाशिम तथा बुलढाणा स्थानिक प्राधिकारी संस्था ) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, राज्यात सर्व नगरपालिका, महानगरपालिका आणि जिल्हा परिषद सदस्य, महापौर व अध्यक्षांना त्यांच्या कार्यालयीन कामासाठी मंत्रालयात यावे लागते व तासन्-तास, मंत्रालयाबाहेर प्रवेश पत्रिकेसाठी उभे राहावे लागते. महापौर आणि जिल्हापरिषद अध्यक्षांना राज्यमंत्र्यांचा दर्जा मिळालेला असतांना सुध्दा त्यांचा वेळ खूपच वाया जातो आणि या महानगरीमध्ये दोन दोन दिवस थांबावे लागते.

म्हणून मी या विशेष उल्लेखाद्वारे विनंती करतो की, सर्व अध्यक्ष व स्थानिक स्वराज संस्थांचा सदस्यांना त्यांच्या कार्यकाळात मंत्रालयात प्रवेश करण्याची प्रवेश पत्रिका कायमची देण्यात यावी अशी सूचना मी विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे.

----------

**तालिका सभापती** : आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 3.15 वाजता पुन: भरेल.

(दुपारी 2.43 ते 3.15 वाजेपर्यंत मध्यंतर)

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

मध्यंतरा नंतर

**(सभापती स्थानी : माननीय उपसभापती)**

पृ.शी : राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा

मु.शी : राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दलच्या आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावावर चर्चा

( प्रस्ताव पुनः प्रस्तुत झाला )

**उपसभापती** : संध्याकाळी 6.00 वाजे पर्यत ही चर्चा आपल्याला संपवावयाची आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती उषा दराडे यांनी भाषण सुरु करावे.

श्रीमती उषा दराडे (विधान सभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेला मी काल सुरुवात केली होती. आता मी थोडक्यात माझे मुद्दे मांडत आहे.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणातील सर्व मुद्यांना पाठिंबा देत असतांना केन्द्र सरकारचे आणि राज्य सरकारचे अभिनंदन करीत असतांना एका गोष्टीचा मला या ठिकाणी विशेष उल्लेख करावयाचा आहे की , शेतकरी, शेतमजूर, विद्यार्थी, युवक, महिला अल्पसंख्याक, मागासवर्गीय, विमुक्त जाती, भटक्या जमाती, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती या सर्वाचे हित जोपासण्याच्या दृष्टीने लोकसहभागातून लोक कल्याणाच्या विविध योजना राबविण्याचा राज्य सरकारने प्रयत्न केला आहे. समाजातील सर्वच लोकांच्या अपेक्षा पूर्ण होत नसतात. उलट त्या अपेक्षा वाढतच असतात. या वाढलेल्या अपेक्षा पूर्ण करण्याचा या शसनाने जाणीवपूर्वक प्रयत्न केला आहे . शेतकऱ्यांना पुन्हा आत्महत्या कराव्या लागू नयेत या दृष्टीने शासनाने पावले टाकण्याचा यशस्वी प्रयत्न केलेला आहे आणि त्याचा उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात करण्यात आला आहे. इतकेच नव्हे तर मुंबई शहराला आंतराष्ट्रीय दर्जा देण्याचा उल्लेख देखील माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात करण्यात आला आहे

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात ज्या ज्या बाबींचा उल्लेख केलेला आहे त्या सर्वच बाबींचा उल्लेख मला पुन्हा या ठिकाणी करता येणार नाही म्हणून शेवटी मी एवढेच सांगते की माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाला पाठिंबा देत असतांना पुन्हा एकदा केन्द्रीय

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषा दराडे..

कृषी मंत्री माननीय श्री. शरद पवार, माननीय पंतप्रधान, माननीय केन्द्रीय वित्त मंत्री, केन्द्र सरकासर आणि महाराष्ट्र शासन या सर्वाचे अभिनंदन करते आणि माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील माझे भाषण संपविते.

प्रस्ताव प्रस्तुत झाला

( सुधारणा मांडण्यात आल्या नाहीत )

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार ( विधान सभेने निवडलेले ) : सभापती महोदय,माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेत भाग घेण्यासाठी मी येथे उभा आहे.

सभापती महोदय, माननीय राज्यपाल श्री एस.सी..जमीर यांनी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी म्हणजे 10 मार्च 2008 रोजी अभिभाषण केले . त्यावेळी आम्हा सर्वाना एक नवीन अनुभव आला होता. कोणत्याही अधिवेशनाची सुरुवात " वंदे मातरम् " या राष्ट्रगीताच्या गायनाने होत असते आणि "जन गण मन " या राष्ट्रगीताच्या गायनाने सांगता होत असते. परंतु या वेळी सुरुवात मात्र "जन गण मन "या राष्ट्र गीताच्या गायनाने झाली होती तेव्हा हा बदल का करण्यात आला होता हे आम्हाला अजून पर्यंत समजलेले नाही. अधिवेशनाच्या सुरुवातीला " वंदे मातरम् " या राष्ट्रगीताचे गायन करुन त्यांचा मान ठेवण्याचे दोन्ही सभागृहाने ठरविलेले असल्यामुळे सुरुवातीला "वंदे मातरम् "आणि शेवटी "जन गण मन" यांचे गायन व्हावयास पाहिजे होते परंतु या वेळी यामध्ये बदल का करण्यात आला हे आम्हाला माहीत नाही. राष्ट्रगीताचा मान ठेवणे हे आमचे कर्तव्य असल्यामुळे ज्यावेळी "वंदे मातरम" म्हटले जात होते त्यावेळी या संबंधी आम्ही काहीही बोललो नाही. वंदे मातरम् साठी सर्वानी संघर्ष केला होता हे आपण लक्षात घेतले पाहिजे. त्यामुळे वंदे मातरम्चा अवमान होता कामा नये एवढेच मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, शेतकऱ्यांवरील कर्ज माफ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे ही चांगली गोष्ट आहे. केन्द्र सरकारने 60 हजार कोटी रुपयांचे कर्ज माफ करण्यास मंजुरी दिलेली आहे.

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सरपोतदार ....

परंतु केंद्र सरकारच्या अंदाजपत्रकामध्ये त्यासाठी तरतूद दाखविलेली नाही. ती नंतर जाहीर होणार आहे असे सांगितले जाते. कदाचित उद्या 14 तारखेला ते जाहीर करण्यात येईल असे वाटते. काल यासाठी 10 हजार कोटीची तरतूद केल्याच्या बातम्या आम्ही वाचल्या आहेत. परंतु सत्य हेच आहे की, या अंदाजपत्रकामध्ये मात्र त्यासाठी तरतूद नाही. ती तरतूद केंद्र सरकार निश्चितपणे करील आणि शेतकऱ्यांना काही रिलिफ मिळेल असा विश्वास ठेवण्यास हरकत नाही. परंतु त्यामध्येदेखील 5 एकरापेक्षा कमी जमीन ज्यांच्याकडे आहे अशा शेतकऱ्यांना केवळ कर्जमाफी आहे आणि त्यापेक्षा जास्त जमीन ज्याच्याकडे आहे अशा शेतकऱ्यांना या कर्जमाफीचा फायदा मिळणार नाही. या विषयावर महाराष्ट्रात सर्वत्र चर्चा चालली आहे. केंद्रीय कृषी मंत्री श्री.शरद पवार आणि राज्याचे मुख्यमंत्री माननीय श्री.विलासरावजी देशमुख यांनीसुद्धा याबाबत नोंद घेतलेली आहे आणि त्या संदर्भात 15 एकर जमीन असलेल्यांनाही काही मिळेल अशा भावना पसरली असून लोकांपर्यंत तसा मेसेज गेला आहे. पण प्रत्यक्षात काय होते ते मला माहिती नाही. मात्र कालच जळगाव किंवा अन्य कोठे तरी माननीय केंद्रीय कृषी मंत्री श्री.शरद पवार यांचे भाषण झाले त्यात त्यांनी म्हटले की, कर्जमाफी ही एकदाच व्हावी. तसेच जी काही कर्जमाफी दिली आहे ती सर्वांनाच न्याय देणारी आहे असे नाही आणि अशी कर्जमाफी परत परत देता येणार नाही हेही सर्वांनी लक्षात घेतले पाहिजे.तसेच यापेक्षा जास्त रक्कम खर्च केली जाणार नाही असेही त्यांनी म्हटले आहे. तेव्हा याचा नेमका अर्थ काय आहे याबाबत महाराष्ट्र शासनाने जास्त खुलासा केल्यास चांगले होईल. सभापती महोदय, महाराष्ट्र राज्याने 1075 कोटी रूपयांचे नागपूर पॅकेज जाहीर केले होते. त्याशिवाय माननीय पंतप्रधानांनी विदर्भास भेट दिली होती तेव्हा त्यांनीही काही पॅकेज दिले होते जे थकबाकीदार शेतकऱ्यांच्या कामाला आले. या पॅकेजेस्मधून कोणाचा फायदा झाला आणि कोणाचा नाही हा प्रश्न अलाहिदा. पण व्याज कापले जाणार नाही म्हणून सांगितले गेले. बँकांचे पैसे बँकांना मिळाले पण शेतकऱ्याला मात्र काही मिळाले नाही. विशेष करून नवीन कर्ज मिळण्याच्या बाबतीत काय परिस्थिती आहे ते सगळ्यांनाच माहिती आहे. त्यावर पुष्कळ चर्चा येथे आणि बाहेरही झालेली आहे व आजही चालू आहे. पण जोपर्यंत शेतकऱ्याचा 7-12 कोरा होत नाही तोपर्यंत शेतकरी या बोजातून मुक्त होणार नाही हे निश्चित आहे. या शासनाने देखील

...... आयआय 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अध्यक्षीय पत/ प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सरपोतदार ....

सत्तेवर येण्यापूर्वी हे तत्त्व स्विकारले होते, पण आज ते सत्ता उपभोगत आहेत तेव्हा मात्र त्याचा विसर त्यांना पडलेला आहे. अगोदर मोठमोठी आश्वासने द्यायची आणि नंतर सत्तेवर आल्यावर मात्र त्या दृष्टीने काहीही कृती न करणे हे कोठल्याही पक्षाला शोभनीय नाही असे माझे त्याबाबत स्पष्ट मत आहे. ...

सभापती महोदय, सभागृहामध्ये पुरेशी गणसंख्या नाही. खरे म्हणजे सभागृहामध्ये पुरेशी गणसंख्या उपस्थित ठेवणे हे सत्तारूढ पक्षाचे कर्तव्य आहे. आता मध्यंतरानंतर सभागृहाची बैठक सुरू होतानाच सभागृहात पुरेशी गणसंख्या नाही याची नोंद आम्ही घेतली आणि तसे आम्ही बोलूनही दाखविले. त्यावेळी सभागृहाच्या नेत्यांनी त्याकडे विशेष लक्ष दिले नाही. पण आपण येथे माननीय राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाबद्दल त्यांचे अभिनंदन करीत आहोत, त्यावेळेस तरी किमान सत्तारूढ पक्षातर्फे कोरम ठेवण्याची आवश्यकता होती, किंबहुना ते त्यांचे कर्तव्यच आहे. पण अशा प्रसंगी देखील त्यांनी आपले कर्तव्य नीटपणे पार पाडलेले नाही. केवळ सभागृहाच्या नेत्यांचा आदर राखवा म्हणून आम्ही कोरम नसताना, त्यावर अधिक भर न देता सभागृहाची बैठक सुरू ठेवून ही चर्चा सुरू केलेली आहे. पण तरीही नेहमीच विरोधी पक्षाला टेकन फॉर ग्रँटेड, गृहित धरले जाऊ नये. पण तसे ते गृहित धरले जाते ही लोकशाहीची शोकांतिका आहे. सत्तारूढ पक्षामध्ये आज स्पर्धा सुरू आहे की, राज्यसभेत कोणी जायचे आणि या सभागृहात कोणी यायचे. त्यामध्ये कदाचित सारे गुंतले असतील., त्यात पैशाचा घोडेबाजार मग चालणारच आणि निवडणुका होईपर्यंत आणखी काय काय होणार आहे ते माहिती नाही. सभापती महोदय, या निवडणुकीसाठी संसदेमध्ये जी पद्धत आहे तशीच पद्धत विधानसभेमध्येही केली तर बरे होईल. त्यामुळे कोणी कोणाला मत दिले हे तरी समजेल. पण मी या ठिकाणी पुन्हा एकदा सभागृहाच्या नेत्यांना, माननीय आर.आर.पाटील यांना सांगू इच्छितो की, सभागृहात कोरम ठेवणे ही सर्वस्वी सरकार पक्षाची, राज्यकर्त्या पक्षाची जबाबदारी आहे. ...

( यानंतर श्री. सरफरे ....जेजे 1 ..

श्री. मधुकर सरपोतदार...

सभापती महोदय, या सभागृहामध्ये गणसंख्या ठेवणे ही आपल्या प्रतोदांची जबाबदारी असतांना प्रतोद सुध्दा सभागृहात उपस्थित नाहीत. माननीय विरोधी पक्षनेते श्री. भाऊसाहेब फुंडकर यांच्या पुतण्याचा मध्यंतरी खून झाला, त्या संदर्भात साक्ष देण्याकरिता ते कोर्टामध्ये गेले आहेत.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणातील मुद्दा क्रमांक 4 मध्ये "राज्य शासनातर्फे राज्यात भू विकास बँकेच्या कर्जदारांसाठी एकरकमी कर्ज परतफेड योजना राबविण्यात येत आहे" असा उल्लेख करण्यात आला आहे. या भूविकास बँकेच्या पध्दतीसंबंधी सकाळी या सदनामध्ये प्रश्न उपस्थित झाला होता. एका शेतकऱ्याने 3.42 लाख रुपयांचे कर्ज घेतले असतांना त्याच्याकडून 8 लाखाची वसूली करण्यात आली. त्याशिवाय त्याच्याकडील 10 एकर जमीन जप्त करण्यात आली, ट्रॅक्टर जप्त करण्यात आले, त्याचे संपूर्ण घरदार जप्त करण्यात आले. तरीसुध्दा तो अजून कर्जबाजारी आहे. असे असतांना सुध्दा भूविकास बँकेला जाग येत नाही अशाप्रकारची नोंद या सदनामध्ये झाली आहे हे महाराष्ट्राचे दुर्दैव आहे. अशाप्रकारची वागणूक शेतकऱ्यांना मिळते आणि त्यासंबंधीचा उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये निराळया स्वरुपामध्ये केला जातो.

सभापती महोदय, काल शेतकऱ्यांच्या या महत्वाच्या प्रश्नावर चर्चा घडवून आणावी यासाठी आम्ही जरुर प्रयत्न करीत होतो. परंतु आपण ती चर्चा मान्य केली नाही. माननीय उप मुख्यमंत्री श्री. आर.आर. पाटील साहेब आपण विरोध केल्यामुळे ती चर्चा थांबली. त्याअगोदर माननीय सभापती हे चर्चेला तयार झाले होते. परंतु आपण विरोधाची भूमिका घेतल्यानंतर सभागृहाचे मत बदलले. कालच्या परिस्थितीसंबंधी मी हे आपल्यासमोर बोलत आहे, आपल्या पाठीमागे बोलत नाही. काल माननीय राजयपालांच्या अभिभाषणावरील चर्चा सुरु झाल्यानंतर सत्ताधारी पक्षाचे माननीय सदस्य श्री.सुरेश देशमुख यांनी अथपासून इतिपर्यंत संपूर्ण भाषण वाचण्याचा कार्यक्रम केला. ही गोष्ट सन्माननीय सदस्यांनी तालिका सभापतींच्या निदर्शनास आणून दिली त्यावेळी ते डोळे मिटून ध्यानस्थ बसले होते. सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाचा मान ठेवला पाहिजे अशापध्दतीने सर्वांनी वागले पाहिजे असे आपण म्हणालात. परंतु सत्ताधारी बाजूकडील माननीय सदस्यांकडून कशाप्रकारे चर्चा केली जाते हे देखील आपल्याला समजले पाहिजे म्हणून मी याठिकाणी उल्लेख केला. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेमध्ये भाग



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ KTG/

श्री. मधुकर सरपोतदार...

घेण्याकरिता माननीय सदस्य आग्रही असतात. परंतु आपले एक माननीय सदस्य ज्या पध्दतीने भाषण करीत होते ते कोणत्या शिस्तीमध्ये बसते? याबाबतीत आपल्या बाजूकडील वरिष्ठ पदाधिकाऱ्यांची देखील तितकीच जबाबदारी आहे. याकडे त्यांनी देखील लक्ष ठेवण्याची आवश्यकता आहे. विरोधी पक्ष म्हणून शासनाच्या ध्येय धोरणामधील त्रुटीं दाखविण्याची आमची जबाबदारी आहे, ते आमचे काम आम्हाला केले पाहिजे. सकाळी प्रश्नोत्तराच्या तासाच्या वेळी काही माननीय सदस्यांनी "शासन झोपले आहे काय" असा उल्लेख केला. त्यावेळी मंत्रिमहोदयांना "शासन झोपले नाही ते जागे आहे" असे सांगावे लागले. मी जागा आहे असे सांगण्याची परिस्थिती कां यावी? असे सांगण्याची आवश्यकता नाही. असे सांगणे म्हणजे आपण झोपला होता हे सिध्द होते.

सभापती महोदय, मुद्दा क्रमांक 4 मध्ये "राज्य शासनातर्फे राज्यात भूविकास बँकेच्या कर्जदारांसाठी एकरकमी कर्ज परतफेड योजना राबविण्यात येत आहे. सदर योजनेनुसार, शेतकऱ्यांनी भूविकास बँकेकडून घेतलेल्या आणि दिनांक 31 मार्च 2004 रोजी त्यांच्याकडून येणे असलेल्या एकूण कर्जावरील व्याज शासनातर्फे भरण्यात येणार आहे" अशाप्रकारचा उल्लेख माननीय राज्यपालांच्या भाषणामध्ये आला आहे म्हणून मी तो याठिकाणी मांडला. सभापती महोदय, मला याठिकाणी एक गोष्ट सांगावयाची आहे की, संसदीय परंपरा कशी आहे? पहिले राज्यपाल चार दिवसापूर्वी राजीनामा देऊन निघून जातात. आणि दुसरे राज्यपाल आदल्या दिवशी येतात याठिकाणी भाषण करतात आणि निघून जातात. माननीय राज्यपालांचे भाषण शासन तयार करते.परंतु महाराष्ट्राची परिस्थिती काय आहे हे आपण त्यांना समजावून सांगितले पाहिजे. कोणकोणते प्रश्न आहेत त्यांचा त्यांनी उल्लेख केला. शेतकऱ्यांचा उल्लेख करतांना ते "शेटकरी" म्हणत होते. असे प्रकार व्हावेत ही महाराष्ट्राच्या दृष्टीने अतिशय शोकांतिका आहे. माननीय राज्यपाल अशाप्रकारे उल्लेख करीत असतील तर माननीय उप मुख्यमंत्र्यांनी त्याकडे लक्ष दिले पाहिजे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार . . . .

सभापती महोदय, मुद्दा क्र.5 मध्ये उल्लेख केल्याप्रमाणे नियोजित 9 हजार चेक डॅम्सपैकी गेल्या 3 वर्षामध्ये 2842 डॅम्स बांधून पूर्ण झालेले आहेत. परंतु मध्यम व छोटे पाटबंधारे बांधून कोणत्या भागातील सिंचन क्षमता वाढविली याची माहिती येथे दिलेली नाही. तसेच पुढे असे म्हटलेले आहे की, 3000 शेततळी बांधण्यात आली आहेत. याशिवाय 20 मध्यम पाटबंधारे आणि 233 लहान पाटबंधारे प्रकल्प पूर्ण करुन 45,860 हेक्टर सिंचन क्षमता निर्माण करण्यात आलेली आहे. पण सध्या परिस्थिती काय आहे ? याबाबतीत कोणतीही माहिती दिलेली नाही.

सभापती महोदय, मुद्दा क्र.7 बाबत सांगावयाचे तर आमच्या शेतकऱ्यांना भाकड म्हशींचे वाटप करण्यात आलेले आहे. कसल्या म्हशी ? तर शेतकऱ्यांच्या गळयामध्ये भाकड म्हशी आणून बांधलेल्या आहेत. अहो, ही वस्तुस्थिती आहे. याबाबतीत वर्तमानपत्रामध्ये अनेक वेळा बातम्या आल्या आहेत आणि त्याचा कोणीही इन्कार केलेला नाही. हे काय चालले आहे ? खरे म्हणजे ही लोकशाहीची टिंगल सुरु आहे. आम्ही सर्वजण शेतकऱ्यांचे कैवारी आहोत असे नेहमी सांगत असतो. माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील तुम्ही देखील शेतकरी आहात आणि तुमच्या घरामध्ये भाकड म्हैस आणून बांधली असती तर तुम्हाला काय वाटले असते ? याचा आपण स्वत: देखील विचार करावयास पाहिजे. तसेच या सगळयावर लाखो रुपये खर्च झालेले आहेत ही दुदैवाची गोष्ट आहे. मुद्दा क्र.7 मध्ये दुभत्या जनावरांच्या वाटपाबाबत उल्लेख केलेला आहे. पण शेळया, मेंढया, दुभती जनावरे या मोबदल्यात दुधाचा महापूर न येता, भ्रष्टाचाराची गटारगंगा वाहत आहे असा मला याबाबतीत मुद्दाम उल्लेख करावयाचा आहे. राज्यामध्ये दूधाचा महापूर आला असता तर खूप आनंदच वाटला असता आणि सगळया गरीब मुलांना दूध तरी पिण्यासाठी मिळाले असते. पण याबाबतीत भ्रष्टाचाराची प्रचंड गटारगंगा वाहत आहे हे या राज्याचे दुर्दैव आहे. असे होऊ नये. यावर बंधन घालण्याची आवश्यकता आहे. तुमच्यासारखे कार्यक्षम गृहमंत्री असताना भ्रष्टाचार वाढत चालला आहे. मी तुम्हाला ज्यापध्दतीने काम करताना पाहिलेले आहे, त्याच्या विरोधात सर्व काम सुरु आहे. माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील खूप बोलतात, पण त्याप्रमाणे कृती मात्र होत नाही आणि आमची तशी अपेक्षा नाही. मी नंतर शेतकऱ्यांच्या प्रश्नाबाबत उल्लेख करीन, तेव्हा त्या संदर्भात उल्लेख करणार आहे. आमच्या तुमच्याकडून खूप मोठया अपेक्षा होत्या. माननीय पंतप्रधान यांनी जाहीर केलेल्या पॅकेजच्या बाबतीत सुध्दा अनेक गोष्टी समोर आलेल्या आहेत. शेतकऱ्यांना

. . . .2 के-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार . . . .

दहा रुपयाचा चेक सुध्दा पाठविला गेला आहे. पण शेतकऱ्यांचे चेक परत देखील गेले आहेत अशी परिस्थिती निर्माण झाली. माननीय पंतप्रधान यांच्यापर्यंत ही प्रकरणे गेली होती. शेवटी त्याचा काय निकाल लागला हे कळलेले नाही. असे चेक देण्यात आले की, जे डिस-ऑनर झाले. बँकेतून परत गेले आणि संबंधित शेतकऱ्यांना त्याचा फायदा मिळालाच नाही अशी स्थिती आहे.

सभापती महोदय, मुद्दा क्र.9 मध्ये उल्लेख केलेला आहे की,"कृषी क्षेत्राचा विकास दर वाढविण्याबाबतच्या राष्ट्रीय धोरणास अनुसरुन, माझ्या शासनाने 11 व्या पंचवार्षिक योजनेमध्ये दरसाल 4 टक्के इतका विकास दर साध्य करण्याचे ठरविलेले आहे." देशाचा विकास दर काय आहे ? ते सर्वांना माहिती आहे. पण आज महाराष्ट्रातील विकास दर काय आहे ? याबाबतीत उल्लेख केलेला नाही. आपल्याला काय साध्य करावयाचे आहे ते सांगितले, परंतु आतापर्यंत आपण काय साध्य केले आहे ते सांगावयास पाहिजे होते. आतापर्यंत एवढे साध्य केले असून भविष्य काळामध्ये अमुक इतके साध्य करु याचा उल्लेख करावयास हवा होता. शेवटी शासनाचे जे धोरण असते, त्याबाबत माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाच्या माध्यमातून प्रकाश टाकण्याचे, जनतेला मार्गदर्शन करण्याचे महत्वाचे काम असते आणि ते काम शासनाने या अभिभाषणाच्या माध्यमातून केलेले नाही.

सभापती महोदय, वीज निर्मितीच्या बाबतीत सांगावयाचे तर काही साखर कारखान्यांना वीज निर्मिती करण्यासाठी परवानगी दिलेली आहे. त्यामुळे साधारणपणे किती वीज उपलब्ध होणार आहे याचा अंदाज दिलेला आहे. यामध्ये म्हटलेले आहे की,"राज्यातील साखर कारखाने आर्थिकदृष्टया अधिक सक्षम व्हावेत आणि विजेच्या उपलब्धतेमध्ये वाढ व्हावी म्हणून शासनाने साखर विकास निधीतून समभाग कर्ज उभारुन, वाणिज्यिक संस्थांकडून कर्जे घेऊन आणि काही प्रमाणात शासनाकडून समभाग अंशदान देऊन साखर कारखान्यांमध्ये सह-वीज निर्मिती प्रकल्प कार्यान्वित करण्यास चालना देण्याचे ठरविले असून त्या प्रकल्पापासून 1000 मेगावॅट वीज निर्मिती अपेक्षित आहे."ही सुरुवात आहे. सध्या विजेचा जो दुष्काळ निर्माण झाला आहे, त्यावेळी यादृष्टीने काही मदत झाली असती तर ती महत्वाची होती. याबाबतीत नुकतीच लक्षवेधी सूचना आली होती, त्यावर काही चर्चा झाली. पण दहावी-बारावीची परीक्षा सुरु असून विद्यार्थ्यांना अंधारामध्ये बसून अभ्यास करावा लागत आहे.त्यामुळे ते खूप नाराज आहेत.परीक्षेच्या कालखंडामध्ये,पेपर लिहीताना सुध्दा त्यांना अंधाराला

. . . .2के-3



APR/ KTG/ SBT/ 15:30

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार . . . .

सामोरे जावे लागत आहे. या विद्यार्थ्यांच्या जीवनामध्ये अशा प्रकारचा अंधार निर्माण करण्यापेक्षा, खरे म्हणजे त्यांच्या जीवनामध्ये प्रकाश निर्माण करण्याचे काम शासनाचे असते.

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार .....

ते सुध्दा शासनाने पाळलेले नाही. त्या विषयी चर्चा करावी लागते हे महाराष्ट्राचे दुर्दैव आहे.

सभापती महोदय, आधुनिक पणन सुविधा पुरविण्यासाठी, मुंबई, नाशिक आणि नागपूर येथे खाजगीकरणांतर्गत टर्मिनल बाजार उभारण्याचे प्रस्तावित केले आहे. यासाठी अंदाजे अनुक्रमे 200 कोटी, 60 कोटी आणि 55 कोटी रुपये इतका खर्च अपेक्षित आहे असे अभिभाषणामध्ये म्हटले आहे. ही केवळ शब्दांची पेरणी केलेली आहे. यासाठी आर्थिक तरतूद किती केली हे सांगावयास पाहिजे.

सभापती महोदय. शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पन्नाचा चांगला मोबदला मिळण्यासाठी आंबा, मोसंबी, द्राक्षे, डाळिंबे, केळी, संत्री व भाजीपाला इत्यादींसाठी निर्यात सुविधा केंद्र सुरु करण्यात येत आहेत असे माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये म्हटले आहे. त्यासंदर्भात आर्थिक तरतूद काय केली ? तरतूद केली नसेल तर या अर्थसंकल्पामध्ये ती केली जाणार आहे काय याची माहिती मिळाली तर बरे होईल. राज्यपालांचे भाषण म्हणजे लोकांच्या डोळ्यात धूळ फेकावयाची असा अर्थ नाही. प्रत्यक्षात केलेले काम आणि पुढच्या काळात काय करणार आहोत याबाबतीतील स्पष्ट चित्रण अभिभाषणामध्ये करणे हा प्रमुख उद्देश असतो. तो उद्देश कितपत साध्य झाला याबाबतची माहिती शासनाने द्यावयाची असते.

सभापती महोदय, दिनांक 1 एप्रिल, 2008 पासून महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेची व्याप्ती वाढवण्यात येणार असून ती सर्व जिल्ह्यांमध्ये कार्यान्वित करण्यात येणार आहे असे या अभिभाषणामध्ये म्हटले आहे. आताच कोकणाच्या संदर्भात चर्चा झाली. आपण व्यवसाय कर चालू ठेवला. त्या व्यवसाय कराची रक्कम बजेटमध्ये वळविण्याची भूमिका शासनाने घेतलेली आहे. केवळ 2 हजार कोटी रुपये रोजगार हमी योजनेसाठी खर्च करण्यात येणार आहेत. बाकीचा निधी नियमित बजेटमध्ये जाणार आहे. अंदाजपत्रकात त्याची मिळवणी होणार आहे असे चित्र दिसते. जेव्हा त्यासंदर्भातील विषय चर्चेला येईल त्यावेळी त्यावर बोलता येईल.

सभापती महोदय, विदर्भ आणि मराठवाड्यातील कापूस उत्पादक जिल्ह्यांतील जलसिंचन सुविधेमध्ये वाढ करण्यासाठी माझ्या शासनाने 17500 शेततळ्यांचे बांधकाम हाती घेतलेले आहे

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार ......

आणि त्यासाठी अंदाजे 80 कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे असे माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये म्हटले आहे. यामुळे जनतेला दिलासा मिळेल काय ? आणखी वर्षभरानंतर निवडणुका येतील. चार वर्षे महाराष्ट्र अंधारात आहे. गेल्या आठ वर्षात काहीही जादा वीजनिर्मिती केली नाही. गेल्या चार वर्षात यासाठी कोणताही प्रकल्प राबविलेला नाही आणि पुढे काय होणार आहे हे माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात सांगितले आहे. आज काय देऊ शकलो हे सांगणे अत्यंत आवश्यक होते. ते सांगितलेले नाही याचे दु:ख होते.

सभापती महोदय, शासनाने गडचिरोली, चंद्रपूर, गोंदिया व भंडारा या जिल्ह्यांतील जुन्या मालगुजारी तलावांच्या दुरुस्तीच्या बांधकामास देखील मंजुरी दिलेली आहे आणि त्यांचा अंदाजित खर्च 20 कोटी रुपये आहे. ही दुरुस्ती बांधकामे पूर्ण झाल्यानंतर 3875 हेक्टर जलसिंचन क्षमता पुन:स्थापित होईल असे या अभिभाषणामध्ये म्हटले आहे. यासंदर्भात सुध्दा निधीची काय तरतूद झ ाली, त्याबाबत काय व्यवस्था केली यासंदर्भात कोणतीही माहिती आपल्याजवळ उपलब्ध नाही.

सभापती महोदय, काल एका सन्माननीय सदस्यांने फक्त माननीय राज्यपालांचे अभिभाषण वाचून दाखवले. दुसऱ्या सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे यांनी सुध्दा काल भाषण केले. त्यांचे भाषण ऐकावयास मिळाले नाही परंतु त्या जोराजोरात हावभाव करत होत्या. त्या शासनाचे कौतुक करणार हे माहीत होते. अधूनमधून एखादा शब्द आम्हाला ऐकावयास मिळाला. आम्हाला त्यांचे भाषण ऐकावयाचे होते.

श्रीमती उषाताई दराडे : आपण भाषण ऐकावे अशी आमची इच्छा होती.

श्री. मधुकर सरपोतदार : आपली इच्छा नव्हती म्हणून आपण तशा परिस्थितीमध्ये बोलला. आपली इच्छा असती तर परिस्थिती शांत झाल्यानंतर आपण भाषण केले असते. काल दोन सन्माननीय सदस्यांनी 2 तास भाषण केले. संपूर्ण भाषण वाचून दाखविण्यासाठी दोन तास घेतले. आता आमच्या बाजूच्या सन्माननीय सदस्यांना किती वेळ मिळतो ते पहावयाचे आहे. भाषण लवकर आवरा असे आज म्हणता येणार नाही. काल जे झाले त्यावरुन तरी तसे दिसते. आज पाहिजे तेवढा वेळ बोलावे. प्रत्येकाने भाषण वाचावयास सुरुवात केली तरी कोणी काही म्हणणार नाही.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ KTG/

श्री. मधुकर सरपोतदार ......

नियमात अशी तरतूद आहे की, कोणत्याही सदस्याला कोणतेही पुस्तक वाचता येत नाही. काल सन्माननीय सदस्यास अभिभाषण वाचण्याची परवानगी माननीय तालिका सभापतींनी दिलेली होती. त्यावेळी हरकत घेऊन सुध्दा त्यांनी परवानगी दिली. तालिका सभापती एका शब्दानेही काही बोलले नाहीत. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते तसेच सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी ही गोष्ट निदर्शनास आणली परंतु ते शांत होते.

सभापती महोदय, गोसीखूर्द प्रकल्प हा विदर्भातील महत्वाचा प्रकल्प आहे. कित्येक वर्षापासून हा प्रकल्प चालू आहे. त्याची सद्यस्थिती काय आहे, त्यासाठी आणखी किती निधीची आवश्यकता आहे वगैरे कोणतीही गोष्ट स्पष्ट केलेली नाही. फक्त गोसीखूर्द प्रकल्प पूर्ण करुन जनतेला त्याचा फायदा मिळेल अशा पध्दतीचा उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात केलेला आहे.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार....

या अभिभाषणामध्ये खारपाणपट्टयाचा विषय यामध्ये घेतलेला आहे, त्याबद्दल मी नंतर बोलणार आहे. गेले 3 वर्षामध्ये 11 हजार कोटी रुपये खर्च करुन 4 लाख 10 हजार हेक्टर सिंचन क्षमता निर्माण करण्यात आली. सिंचन क्षेत्रातील आर्थिक अनुशेष रुपये 5501 कोटीवरुन 3217 कोटी पर्यंत कमी झाला आहे. सन 2007-08 मधील होणारा खर्च विचारात घेता हा अनुशेष सुमारे 1000 कोटी रुपयांनी आणखी कमी होणार आहे. गोसीखुर्द प्रकल्प ही विदर्भातील 2.50 लाख हेक्टर सिंचन क्षमता असणारी मोठी सिंचन योजना असून या प्रकल्पाला भारत सरकारने राष्ट्रीय प्रकल्प म्हणून मान्यता दिली आहे. मान्यता देण्यास हरकत नाही. परंतु राष्ट्रीय प्रकल्प म्हणून लवकर निधी उपलब्ध करुन दिला तर तो प्रकल्प लवकर कार्यान्वित होईल आणि पुष्कळशी जमीन सिंचनाखाली येऊ शकते. स्वातंत्र्यानंतरच्या 60 वर्षाच्या प्रदीर्घ राजवटीत ग्रामीण जनतेसाठी, शाळांना, अंगणवाडयांना हे शासन पाणीपुरवठा करु शकले नाही हे मोठी शोकांतिका आहे.

या अभिभाषणातील 19 क्रमांकाच्या मुद्यामध्ये "ग्रामीण शाळांना आणि अंगणवाडयांना पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्याची योजना यावर्षी पूर्ण करण्यात येईल असे नमूद केलेले आहे." परंतु अद्यापपर्यंत हे शासन शाळांमधील लहान मुलांसाठी पाणी पुरविण्याची व्यवस्था करु शकत नाही हे मोठे दुर्दैव आहे.

क्रमांक 20 वरील मुद्यामध्ये असे नमूद केले आहे की, ' मला हे सांगण्यास आनंद होत आहे की, संपूर्ण स्वच्छता मोहिमेंअंतर्गत निर्मल ग्राम पुरस्कार मिळणा-यांमध्ये माझे राज्य आजही अग्रेसर आहे. ही निश्चितच चांगली गोष्ट आहे. परंतु त्याचे श्रेय तेथे काम करणा-या कष्टकरी जनतेला जाते. त्या योजनेवर काम करणा-या लोकांना, त्या त्या ग्रामपंचायतींना, त्या खेडयांना, विभागाला श्रेय जाते, त्याचे श्रेय सरकारने घेण्याची आवश्यकता नाही आणि राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये त्याचा उल्लेख करण्याची आवश्यकता होती असे मला वाटत नाही.

या अभिभाषणातील मुद्दा क्रमांक 21 मध्ये नैसर्गिक महासंकटामुळे बाधित राज्यांना मदत करणे हा विषय आहे. त्यामध्ये असे म्हटलेले आहे की, इतर राज्यांमध्ये सरकारने घरे बांधण्याचे काम केले असून आतापर्यंत 500 घरांचा ताबा दिलेला आहे. या कामामध्ये हे राज्य आघाडीवर राहिलेला आहे, ही चांगली गोष्ट आहे. हे सर्व शासनाने करावे, परंतु 2004 पासून आतापर्यंत केवळ 500 घरे देऊ शकलो. उर्वरित घरे पूर्ण झाली नाहीत जे चांगल्या कामाचे लक्षण नाही.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.जगदीश गुप्ता)**

श्री.मधुकर सरपोतदार......

सभापती महोदय, मुद्दा क्रमांक 22 ते 25 हे केंद्र सरकारच्या योजनांचे विषय आहे. त्यामुळे राज्यपालांच्या भाषणात या गोष्टी आल्या नसत्या तर ते योग्य झाले असते. यासंबंधी सभागृहाच्या नेत्यांनी त्यांच्या उत्तरामध्ये त्यांचा उल्लेख करावा. मुद्दा क्रमांक 26 मध्ये असे म्हटले आहे की, मुंबई शहराला जागतिक दर्जाचे शहर बनविण्याच्या योजनेचा एक भाग असलेले गेटवे ऑफ इंडियाच्या परिसराच्या सुशोभिकरणाचे कामही प्रगतिपथावर आहे. वांद्रे-वरळी सागरी मार्ग या वर्षाअखेर वाहतुकीसाठी खुला करण्यात येईल. छत्रपती शिवाजी आंतरराष्ट्रीय विमानतळाचे आधुनिकीकरण करण्याचे काम चालू असून त्याची चांगली प्रगती झालेली आहे. या कामासाठी किती वर्षे लागतील, हे माहीत नाही. या कामामध्ये अनेक संकटे उभी रहात आहेत. काही लोक कोर्टामध्ये गेल्यामुळे न्यायप्रविष्ट प्रकरण होते. त्यामुळे अडचणी निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे ही सर्व प्रकरणे राज्यपालांच्या अभिभाषणात आणण्याची काय आवश्यकता होती ? हया पुस्तिकेमध्ये 81 मुद्दे घेण्यात आले आहेत. वरळी-वांद्रे सागरी मार्ग हा प्रकल्प पूर्वीच्या एस्टिमेटप्रमाणे 600 कोटी रुपयांचा होता. या प्रकल्पाची किंमत कोठपर्यंत वाढणार आहे हे सांगता येणार नाही. परंतु माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांचा त्या कामाचा चांगला अभ्यास आहे. त्यांनी त्यांच्या मंत्री पदाच्या काळात या मार्गाचे भूमिपूजन केले होते, तेच या कामामधील त्रुटींवर अधिक प्रकाश टाकू शकतील अशी मला खात्री आहे. मुंबई या शहराला जागतिक कीर्तीचे शहर बनविण्यापूर्वी मुंबईमध्ये येणारे लोंढे जोपर्यंत थांबत नाहीत तोपर्यंत हे शहर जागतिक कीर्तीचे शहर होईल यावर शेंबडे पोर सुध्दा विश्वास ठेवणार नाही. सगळया बाजूने हे शहर बकाल होत चाले आहे, हे शहर जागतिक दर्जाचे कसे होणार हे मला सांगता येणार नाही. मुद्दा क्रमांक 27 मध्ये असे म्हटले आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने आतापर्यंत बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील पायाभूत सुविधांच्या विकास कामांकडेच लक्ष केंद्रित केलेले होते. आता मात्र प्राधिकरणाने मुंबई महानगर प्रदेशामध्ये असे पायाभूत सुविधा विकास प्रकल्प हाती घेण्याचे ठरविलेले असून यामध्ये ठाणे, मीरा-भाईंदर, मुंबई, कल्याण-डोंबिवल, नवी मुंबई, भिवंडी-निजामपूर, उल्हासनगर या महानगरपालिका व नगरपालिकांसाठी......

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

यानंतर श्री.शिगम....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. मधुकर सरपोतदार...)

2 लाख कोटी रु. खर्च करुन या सुविधा लोकांना उपलब्ध करुन द्यावयाच्या आहेत. परंतु या संदर्भात अर्थसंकल्पामध्ये काय चित्र दिसते ते 19 मार्चला अर्थसंकल्प मांडल्या नंतर समजेल. नाही तर बोलाचीच कढी आणि बोलाचाच भात. आम्ही येथे यावयाचे, राज्यपालांनी अभिभाषण वाचायचे आम्ही टाळया वाजवाच्या आणि निघून जायचे इतकेच याला महत्व आहे.

सभापतीय महोदय, भारत सरकारने, नागरी क्षेत्रात पायाभूत सुविधांचा विकास करण्याकरिता डिसेंबर 2005 मध्ये जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निमाण अभियान सुरु केले आहे. या अभियानाच्या संदर्भात माझे एकच म्हणणे आहे की, या अभियानाचे नाव घेऊन कमाल जमीन धारणा कायदा रद्द करण्यात आला. हा कायदा रद्द केल्यानंतर किती जमीन उपलब्ध झाली, किती लोकांच्या घरांची योजना तयार केली, किती लोकांना घरे मिळणार आहेत यासंबंधीची माहिती या अभिभाषणामध्ये थोडक्यात तरी द्यावयास पाहिजे होती. भारत सरकारने राज्यातील सुमारे 7,000 कोटी रुपये खर्चाच्या 49 प्रकल्पांना मंजुरी दिली असून त्यासाठी महाराष्ट्राला अनुदानाचा पहिला हप्ता म्हणून 750 कोटी रुपये रक्कम वितरित केली आहे. सर्व राज्यांसाठी देण्यात आलेल्या एकूण अनुदानाच्या सुमारे एक तृतीयांश रक्कम महाराष्ट्राला मिळालेली आहे. मंजूर प्रकल्प व मिळणारे अनुदान यांमध्ये महाराष्ट्र सर्व राज्यांमध्ये अग्रेसर आहे. आपण नुसता महाराष्ट्र अग्रेसर आहे, महाराष्ट्र अग्रेसर आहे असा सारखा धोशा लावता, पण कोणत्या क्षेत्रात तो अग्रेसर आहे यासंबंधीची स्पष्ट भूमिका जनतेसमोर येण्याची नितांत आवश्यकता आहे.

मुंबई शहतील पाणी वाहून जाण्यासाठी पर्जन्यजलवाहिन्यांचे जे काम चालू आहे त्याची सद्यःस्थिती काय आहे याबाबतची माहिती मिळाली तर बरे होईल.

या शासनाने गृहनिर्माण धोरण जाहीर केले. परंतु त्या धोरणावर या सभागृहामध्ये चर्चा झालेली नाही. मात्र अभिभाषणामध्ये त्यासंबंधी उल्लेख करण्यात आलेला आहे. त्यासंबंधी अभिभाषणामध्ये असे म्हटलेले आहे की, माझ्या शासनाने नवीन गृहनिर्माण धोरण जाहीर केलेले असून त्यामध्ये विशेष नगर वसाहतींचे बांधकाम, जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींचा पुनर्विकास, नागरी पुनर्निर्माणासाठी सामूहिक विकास योजना, पुनर्विकास प्रकल्पांसाठी संयुक्त योजना, जुन्या म्हाडा वसाहतींचा व गावठाणांचा पुनर्विकास यासाठी तरतूद आहे. अशा प्रकारे



(श्री. मधुकर सरपोतदार...)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अनेक गोष्टींचा यामध्ये उल्लेख केलेला आहे. आता एक वर्ष राहिलेले आहे. एक वर्षानंतर निवडणुका होणार आहेत. एक वर्षानंतर कोणते सरकार येईल हे काही सांगता येत नाही. त्यामुळे ज्या पध्दतीने हे काम चाललेले आहे ते जनतेसमोर आहे. त्यामुळे जनतेला त्याबाबतीत निर्णय घ्यावयाचा आहे. तेव्हा ह्या गोष्टींचा उल्लेख अभिभाषणामध्ये करुन शासनाने काय साध्य केले याची माहिती मिळणे आवश्यक आहे.

जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियानांतर्गत झोपडपट्टीवासीयांसाठी व दुर्बल घटकांसाठी घरे बांधण्याचा एक मोठा कार्यक्रम हाती घेण्यात आलेला आहे. तेव्हा हे शासन असे पर्यन्त किती घरे बांधून होणार आहेत याची माहिती मिळाली तर बरे होईल.

सभापती महोदय, राज्यातील बेरोजगारीचा प्रश्न फार मोठा आहे. राज्यपालांच्या अभिभाषणामध्येय असे नमूद करण्यात आलेले आहे की, उद्योजक व सेवा उद्योग हे कायमच राज्याच्या प्रगतिशील धोरणांवर आणि कार्यपोषक वातावरणावर विश्वास दर्शवीत आले आहेत. सन 2007मध्ये राज्यात सुमारे 62,600 कोटी रुपयांची गुंतवणूक असणारे आणि 2 लाख 10 हजार व्यक्तींना रोजगार मिळू शकेल इतक्या क्षमतेचे 454 प्रकल्प कार्यान्वित करण्याचे प्रस्ताव अंतर्भूत असलेली औद्योगिक आवेदन पत्रे व इरादापत्रे सादर करण्यात आलेली आहेत. 72 खाजगी आय.टी.पार्क्सना इरादापत्रे देण्यात आली आहेत आणि 19 जैव तंत्रज्ञान युनिटांची नोंदणी करण्यात आली आहे. परंतु किती बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करुन दिला याची माहिती या अभिभाषणामध्ये दिलेली नाही, ती दिली असती तर शासन किती कार्यक्षम आहे हे दिसून आले असते.

सभापती महोदय, एक खिडकी योजनेची चर्चा खूप होते. एक खिडकी योजनेमुळे सर्व प्रश्न विनाविलंब मार्गी लागतात असे सांगितले जात असले तरी प्रत्यक्षात अशा प्रकारच्या सेवांचा उपद्रव लोकांना होत आहे. एक खिडकी योजनेमुळे मार्गी लागली अशी एकही योजना आज महाराष्ट्रामध्ये अस्तित्वात नाही हे मला येथे नमूद करावयाचे आहे.

सभापती महोदय, अभिभाषणामध्ये बांधा, वापरा, हस्तांतरित करा, या योजनेचा उल्लेख केलेला आहे. ही योजना केन्द्राची आहे. अभिभाषणामध्ये असे नमूद केलेले आहे की, माझ्या

..3..


(श्री. मधुकर सरपोतदार...)

शासनाने, शासकीय इमारतींची बांधकामे हाती घेता यावीत या दृष्टीने, बांधा, वापरा, हस्तांतरित करा, या तत्वावर राबवावयाच्या प्रकल्पांची व्याप्ती देखील वाढवली आहे. सध्या 1000 कोटी रुपये खर्चाच्या 8 प्रकल्पांची कामे हाती घेण्यात आली आहेत. यामध्ये नवी दिल्ली येथील नवीन महाराष्ट्र सदन, मुंबई येथील हायमाऊंट राज्य अतिथिगृह, फोर्ट येथील बांधकाम भवन, अंधेरी येथील प्रशासकीय इमारत अशा महत्वाच्या इमारतींचा समावेश आहे. सभापती महोदय, या सगळया कामातून शेवटी काय साध्य होणार आहे, त्याचा जनतेला काय फायदा होणार आहे, जनतेला कोणती सुविधा उपलब्ध होणार आहे यासंबंधीचा उल्लेख अभिभाषणामध्ये नाही.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार...

सभापती महोदय, स्वातंत्र्य सैनिकांना निवास प्रयोजनांसाठी जमीन देण्याबाबतच्या योजनेत सुधारणा करण्यात आली आहे. महानगरपालिका क्षेत्र वगळता, नागरी क्षेत्रांमध्ये जमिनीच्या उपलब्धतेनुसार 2500 चौरस फुटापर्यंत शासकीय जमीन देण्यात येणार आहे. देशाला स्वातंत्र्य मिळून 60 वर्षांचा कालावधी होऊन गेला आहे. या राज्यात बोगस स्वातंत्र्य सैनिक शासनाच्या सर्व योजनांचा फायदा घेत आहे. म्हणून बोगस स्वातंत्र्य सैनिक किती आहेत यासंबंधीची शासनाने चौकशी करावी आणि ती माहिती सदनासमोर सादर करण्यात यावी असे मला विनम्रपणे सुचवावेसे वाटते.

सभापती महोदय, सैनिकांना किंवा माजी सैनिकांना शेतजमिनीचे नियतवाटप करण्यासाठी विहित केलेली वार्षिक उत्पन्नाची मर्यादा रुपये 35 हजार वरुन रुपये 1 लाखापर्यंत वाढविण्यात आली आहे. शासनाने जो निर्णय घेतलेला आहे तो स्वागतार्ह आहे. परंतु त्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यात यावी अशी माझी शासनास विनंती आहे.

सभापती महोदय, विकलांग व्यक्तींना, मनोरंजन केंद्र, संशोधन केंद्र यांसह विविध प्रयोजनाकरिता सवलतीच्या दराने शासकीय जमिनीचे नियत वाटप करण्याचे ठरविले आहे. परंतु विकलांग व्यक्तींना शासकीय जमिनीचे वाटप अद्यापपर्यंत झालेले नाही. या योजनेची देखील चांगल्या प्रकारे शासनाने अंमलबजावणी करावी अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, कायद्याची अंमलबजावणी अधिक प्रभावी व मजबूत करण्यासाठी शासनाने पोलीस विभागामध्ये 55 हजार पदांची निर्मिती करण्याचा निर्णय यापूर्वीच घेतलेला होता. मागील दोन वर्षात, त्या पदांपैकी 22042 पदे भरण्यात आली आहेत. 2008-09 या वर्षात आणखी 11 हजार 21 पदांची निर्मिती करुन ती भरण्यात येतील अशा प्रकारचे आश्वासन शासनाने दिलेले आहे. या राज्यात पोलिसांची संख्या खूप कमी असल्यामुळे सदरची पदे तातडीने भरण्यात यावीत अशी माझी मागणी आहे. पोलिसांची संख्या कमी असल्यामुळे पोलीस विभागात आपसात गँगवार सुरु झाले आहे. ते थांबविण्यासाठी शासनाने लक्ष देण्याची नितांत आवश्यकता आहे. महाराष्ट्रातील लोकंसख्येच्या मानाने पोलिसांची संख्या कमी असल्याने सदरची पदे तात्काळ भरण्यात यावी अशी मी पुन्हा शासनास विनंती करतो.

2...

श्री.मधुकर सरपोतदार...

सभापती महोदय, माझ्या शासनाच्या यशस्वी "आत्मसमर्पण योजने " व्दारे बहुसंख्य नक्षलवाद्यांनी त्यांच्या मार्गापासून परावृत्त करुन त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यात यश मिळाले आहे. या योजने अंतर्गत 231 नक्षलवादी शरण आले असून आता या योजनेची मुदत ऑगस्ट, 2008 पर्यंत वाढविण्यात आली आहे. बहुसंख्य या शब्दाचा अर्थ मला माननीय मंत्री महोदयांनी सांगावा. त्याचप्रमाणे एकूण नक्षलवादी किती आहेत ? याची माहिती देखील सभागृहात देणे गरजेचे आहे. या ठिकाणी बहुसंख्य शब्द का वापरला या बाबतीत देखील खुलासा करणे गरजेचे आहे. माझे तर असे म्हणणे आहे की, बहुसंख्य नक्षलवादी अजून मोकळे आहेत आणि त्यांच्या कारवाया चालू आहेत. त्यांच्या कारवाया बंद करण्याच्या दृष्टीने अजून नव्याने ठोस उपाययोजना केल्या पाहिजेत आणि त्या योजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे केली पाहिजे.

सभापती महोदय, दिवाणी व फौजदारी दावे स्थानिक पातळीवर सलोख्याने मिटविण्याच्या दृष्टीने माझ्या शासनाने जनतेचा सहभाग असणारी एक पर्यायी तंटा निवारण यंत्रणा सुरु केली आहे. " महात्मा गांधी तंटा मुक्त गाव मोहीम" या नावाने ही योजना सुरु केली असून या योजनेला संपूर्ण राज्यातून प्रचंड प्रतिसाद मिळत आहे अशा प्रकारचा अभिभाषणात उल्लेख करण्यात आला आहे. शासनाने तंटा निवारण योजना काढली आहे. परंतु सत्ताधारी पक्षांमध्ये जे तंटे आहेत ते सुटत नाहीत. तर गावातील तंटे निवारण कशा प्रकारे शासन करीत आहे यासंबंधी साशंक आहे. ही योजना प्रत्येक गावात चांगल्या प्रकारे राबविली जावी. गावातील तंटे कमी व्हावेत अशी स्वाभाविक लोकप्रतिनिधींची इच्छा असते. परंतु ही योजना प्रत्यक्षात कशा प्रकारे राबविली जात आहे याबाबतची माहिती घेणे जरुरीचे आहे. फक्त समाधानासाठी अशा प्रकारच्या योजना राबविल्या जाऊ नये. ही खरोखरच चांगल्या प्रकारची योजना असल्यामुळे ती प्रभावीपणे राबविली जावी अशी माझी शासनास विनंती आहे.

सभापती महोदय, विजेची उपलब्धता आणि त्या तुलनेत असलेली विजेची मागणी यांनी उभे केलेले आव्हान अद्यापही कायम आहे. पारस, परळी, खापरखेडा व भुसावळ येथे नवीन वीज निर्मिती प्रकल्पांचे काम सुरु करण्यातआले असून त्याव्दारे एकूण 2 हजार मेगावॅट अतिरिक्त वीज उपलब्ध होणार आहे. याच्याव्यतिरिक्त पारस येथे 250 मेगावॅट क्षेमतेचे एक वीजनिर्मिती युनिट सुरु करण्यात आले आहे. आपण गेल्या आठ वर्षापासून ऊर्जा मंत्री आहात.

3...



श्री. मधुकर सरपोतदार.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आपल्या कारकिर्दीत किती मेगावॅट वीज निर्मिती केली याची माहिती सदनाला दिली पाहिजे. राज्यातील किती लोकांना आपण अंधारातून प्रकाशाकडे आणले यासंबंधीचा देखील खुलासा ऊर्जामंत्र्यांनी सदनात करावा अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, "सिंगल फेजिंग योजना" आणि "गावठाण फिडर सेपरेशन योजना" यांचा पहिला टप्पा कार्यान्वित झाला असून त्यामुळे सुमारे 15 हजार 597 गावांना विजेच्या बाबतीत दिलासा मिळालेला आहे. या योजनेच्या दुस-या टप्प्याचे काम हाती घेण्यात आले असून त्यामुळे आणखी 12 हजार 600 गावांना विजेच्या बाबतीत दिलासा मिळेल. आपण हे शासकीय आकडेवारी दिलेली आहे. शासकीय आकडेवारीमुळे अडचणींच्या प्रसंगाना तोंड देण्याची वेळ अनेक मंत्र्यांवर येते. या वीज योजनेचा फायदा खरोखरच लोकांना मिळतो आहे अशा प्रकारचे चित्र जनतेला दिसले पाहिजे. 12 हजार 600 गावांना ताबडतोबीने विजेच्या बाबतीत दिलासा देण्यात यावा अशी माझी माझी शासनास विनंती आहे.

सभापती महोदय, पुनर्वापरयोग्य स्त्रोतामंधून वीजनिर्मिती करण्यात देशात राज्याचा दुसरा क्रमांक आहे. या क्षेत्रातील एकूण स्थापित क्षमता अंदांजे 2046 मेगावॅट इतकी आहे. यापैकी पवन ऊर्जेव्दारे 1650 मेगावॅट आणि ऊसाच्याचिपाडांपासून 175 मेगावॅट वीजनिर्मिती करण्यात येते. वीज निर्मितीवर सर्वांचे लक्ष आहे. विजेचा विषय अतिशय जिव्हाळयाचा आहे. वीज हा शेतक-यांचा जीवन मरणाचा प्रश्न आहे. राज्यात विजेचा पुरवठा पूर्णपणे होत नसल्यामुळे ग्रामीण भागातील शेतकरी हतबल झालेले आहे. ग्रामीण भागात भारनिमयम मोठया प्रमाणात असल्यामुळे लोकांना तसेच जनावरांना पिण्यासाठी उपलब्ध होत नाही. वीज नसल्यामुळे पुढे पाऊल टाकता येत नाही अशी परिस्थिती महाराष्ट्रात निर्माण झालेली आहे. त्यावर परिणामकारक उपाययोजना करण्याची जबाबदारी ऊर्जामंत्र्यांची आहे. मागच्या कालावधीत विजेच्या संदर्भात शासनाने श्वेतपत्रिका काढली होती. त्या श्वेतपत्रिकेतील आकडे आणि आताचे आकडे पाहिजे तर त्यात बरीच तफावत आपणाला दिसून येईल. त्यावेळी आपण लिहिले होती की, महाराष्ट्राला 18 हजार कोटी रुपये मिळाले तर महाराष्ट्रातील वीज टंचाईचा प्रश्न मार्गी लागेल. राज्यात मोठया प्रमाणात वीज निर्मिती व्हावी म्हणून जास्तीत जास्त निधी मिळवून घेण्याचा प्रयत्न काय प्रयत्न करण्यात येणार आहे याचा सभागृहात खुलासा करावा. परंतु माननीय राज्यपालांच्या अभिभाषात लोकांची दिशाभूल होईल अशा प्रकारचे आकडे येऊ नयेत असे मला नम्रपणे सुचावयाचे आहे.

यानंतर श्री. कानडे...



श्री. मधुकर सरपोतदार ...

शासनाने जे चांगले काम केले आहे त्याला आम्ही चांगलेच म्हणणार. शासनाने चांगले काम केले नाही तर चांगले म्हणणार नाही. राज्यातील जनतेला वीज टंचाईमुळे सोसाव्या लागणाऱ्या अडचणींची माझ्या शासनाला पूर्ण जाणीव असून शासन ही आव्हाने पेलण्याच्या दृष्टीने सर्वतोपरी प्रयत्न करीत आहे. विजेचा काटकसरीने वापर करुन आपण सर्वांनी हे आव्हान पेलण्यासाठी शासनाला सहकार्य करावे असे मी आपणा सर्वांना आवाहन करीत आहे.

हे आपले आव्हान फक्त जनतेला आहे. शासन हे आव्हान पेलण्यासाठी काय उपाययोजना करणार आहे हे जनतेला कळणे महत्वाचे आहे. राज्यात 5000 मे.वॅ. वीजेचा तुटवडा आहे त्यामुळे भारनियमन चालूच राहणार आहे असे रोज आपण सांगत आहात. लोकांच्या डोळयात पाणी आले तरी शासनाला जाग येत नाही. लोकांचे काय करायचे याचा शासनाने विचार करावा. बाहेरील राज्यातून वीज मिळत नाही, राज्याला वीज मिळत नाही आणि राज्यात वीज निर्मिती होत नाही त्यामुळे शासनाकडून पुढील 3/4 वर्षात परिस्थितीत सुधारणा होईल असे दिसत नाही.

रोज संध्याकाळी टी.व्ही.वर निर्मिती सावंत निर्मित कार्यक्रम दाखविला जातो. आरोग्य केंद्रे स्वच्छ आणि चांगली सेवा देत आहेत याचे कौतुक केले जाते. हे आरोग्य खाते नसून अनारोग्य खाते आहे.लोकांचे आरोग्य डबघाईस आले आहे. औषधे घेतली तर त्याची गॅरंटी नाही. एक्सपायरी झालेली औषधे वापरली जातात. आरोग्य खात्याची परिस्थिती भयावह आहे. टीव्हीवर लोकांच्यावर संस्कार करण्यासाठी आरोग्य खात्याची फार चांगली सेवा आहे असे सांगितले जाते. मुंबईतील कोणत्याही रुग्णालयात जा मग ते केईएम असो अथवा जेजे असो सगळे रुग्ण व्हरांडयात झोपलेले दिसतील. बाहेरुन आजारी लोकांचे लोंढेयेतात आणि आले की लगेच रुग्णालयात भरती होतात. कोणी काय बोलले की त्यांच्यावर केस करायची असे शासनाचे धोरण आहे.

आगामी वर्षामध्ये एड्सग्रस्त रुग्णांसाठी 15 एआरटी उपचार केंद्रे सुरु करण्यात येणार आहेत. ही केंद्रे कार्यान्वित झाल्यावर सर्वजिल्हयांमध्ये प्राथमिक एआरटी औषधोपचार उपलब्ध होतील. कर्करोगाचे निदान आणि उपचार याकरिता सुविधा पुरविण्यासाठी औरंगाबाद येथे एक नवीन रुग्णालय बांधण्याचे माझ्या शासनाने ठरविले आहे. कर्करोग आणि एड्स या रोगांना टॉप प्रायॉरिटी देऊन त्यावर तातडीने औषधोपचार होणे आवश्यकआहे. या रुग्णांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. पुणे येथील बी.जे.वैद्यकीय महाविद्यालयामधील आणि ससून सर्वोपचार रुग्णालयांमधील सुविधांचा दर्जा वाढविण्याचे देखील ठरविले आहे. अद्याप केलेले नाही. ......2



श्री. मधुकर सरपोतदार ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

दुधामध्ये भेसळ ही मुंबई, ठाणे, पुणे या शहरांमध्ये सुरु आहे. कायदा सशक्त झाला पण अंमलबजावणी करणारे सशक्त होत नाहीत तोपर्यंत यावर परिणामकारक उपाययोजना होईल असे मला वाटत नाही.

अनु. जाती आणि नवबौध्द यांचे जीवनमान उंचावण्यासाठी माझे शासन अनेक नवीन योजना सुरु करीत आहे. विचार कधी होणार आणि लोकांना फायदा कधी मिळणार आणि त्यानुसार कृती कधी करणार याचा उल्लेख राज्यपालांच्या पुढील अभिभाषणामध्ये येईल.

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार.............

माझी सन्माननीय आदिवासी मंत्र्यांशी भेट झाली होती. मी त्यांना सांगितले, स्वातंत्र्य मिळून 60 वर्षे झाली तरी आदिवासींचे हाल आहेत तसेच आहेत. मंत्रीमहोदय स्वत: आदिवासी समाजाचे आहेत, सुशिक्षित आहेत, त्यांना या समाजाविषयी कणव आहे. या आदिवासी समाजाला प्रवाहात आणणे हे त्यांचे काम आहे. त्यांना सुविधांपासून वंचित ठेवणे योग्य नाही. त्यांना दारुचे व्यसन का जडते? त्यांना कोणत्या सोयी सुविधा आहेत? अद्याप त्यांच्यापर्यंत रस्त्याची सुविधा पोहोचलेली नाही. 15-15 कि.मी.अंतरावरुन डोलीमधून त्यांना उपचारासाठी रुग्णालयात नेण्याची पाळी येते इतकी शोचनीय अवस्था आहे. महाराष्ट्र शासन 60 वर्षाच्या स्वातंत्र्योत्तर काळानंतरही या आदिवासी समाजाला दिलासा देऊ शकत नाही. या समाजासाठी तरतुदी काय करीत आहात हे पहा. आमच्या शासनाकडून खूप अपेक्षा आहेत. आज आदिवासी-आदिवासींमध्ये द्वंदयुध्द सुरु आहे. एकमेकाचे पाय खेचण्याचा प्रकार सुरु आहे. मराठी माणसाचा हा खास गुण आहे. त्यावर इलाज नाही. केवळ इच्छाशक्ती असली पाहिजे, मनामध्ये काही करुन दाखविण्याची जिद्द असली पाहिजे. आदिवासी समाजाला कसा न्याय देता येईल याचा जरुर विचार करावा. आदिवासी समाजाला प्रगत समाजाबरोबर पुढे नेण्याची नितांत आवश्यकता आहे.

सभापती महोदय, आदिवासी समाजाकडे होत असलेले दुर्लक्ष, व्यसनाधीन समाज, रस्ते, साफसफाई, शिक्षण, आरोग्य सुविधा आणि उपेक्षित समाज या संदर्भात राज्यपालांच्या अभिभाषणातील अनुक्रमे मुद्दा क्रमांक- 54 ते 57 मध्ये उहापोह करण्यात आलेला आहे.

सभापती महोदय, मुद्दा क्रमांक-59 अन्वये महिला आर्थिक विकास महामंडळ या राज्य शासन अंगीकृत उपक्रमाद्वारे राज्यातील महिलांना स्वयंसहाय्यता बचत गटामार्फत सूक्ष्म पतपुरवठा करण्यात येत आहे. माविम, "तेजस्विनी" ही योजना राबवित असून या योजनेंतर्गत राज्यातील 62 हजार स्वयंसहाय्यता बचत गटांना पुढील 8 वर्षाच्या कालावधीत सूक्ष्म पतपुरवठा करण्यात येईल असा उल्लेख करण्यात आला आहे. सूक्ष्म म्हणजे किती सूक्ष्म, त्याचा आकार काय, केव्हा होणार, किती होणार याची मला कल्पना नाही.

सभापती महोदय, अंगणवाडी कर्मचाऱ्यांचे दुर्लक्षित जगणे विचारात घेऊन शासनाने त्यांच्या मानधनात वाढ केली, केंद्र शासनाने देखील वाढ केली आहे. अंगणवाडी कार्यकर्तींचे जीवन विचारात घेता रुपयाच्या किंमतीच्या मानाने किती वाढ दिली?ती किती जस्टीफाय आहे हे शासनाने

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार............

तपासण्याची आवश्यकता आहे. सरकारी कर्मचाऱ्यांना आता सहावा वेतन आयोग लागू होणार आहे. त्यादृष्टीकोनातून या अंगणवाडी सेविकांच्या मानधनाचा विचार झाला पाहिजे. इतर वर्गाला भरपूर वाढ दिली जाते आणि या वर्गाकडे इतके दुर्लक्ष का? रुपयाची किंमत काय होती, आज किती आहे हे तपासून त्यांना न्याय देणे खूप महत्वाचे आहे.

सभापती महोदय, संपूर्ण मुंबई महानगर प्रदेशामध्ये ऑटोरिक्षा व टॅक्सीमधून प्रवास करण्यास मुक्त परवानगी दिली आहे. संपूर्ण मुंबईचा उल्लेख का करण्यात आला? मुंबई शहरात ऑटोरिक्षांना परवानगी दिली का? आतापर्यंत मुंबई शहरामध्ये ऑटोरिक्षांना परवानगी नव्हती. अभिभाषणातील अनुक्रमांक-60 मध्ये नमूद केलेले वाक्य महत्वाचे आहे. 'मुंबई महानगर प्रदेशात नागरिकांना प्रवास करणे सोयीचे व्हावे म्हणून माझ्या शासनाने या क्षेत्राकरिता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या अधिकारितेप्रमाणे अधिकारिता असणारे स्वतंत्र प्रादेशिक परिवहन प्राधिकरण स्थापन करण्याचे ठरविले आहे. त्यामुळे प्रवाशांना संपूर्ण मुंबई महानगर प्रदेशामध्ये ऑटोरिक्षा व टॅक्सीमधून प्रवास करणे सुलभ होईल', याचा अर्थ काय? मुंबई शहरामध्ये टॅक्सीला परवानगी आहे. ऑटोरिक्षाला परवानगी दिली आहे का? आता संगणकीकृत स्मार्टकार्ड वाहनचालन परवाना देण्याची पध्दत सुरु केली आहे. बांगलादेशी नागरिकांना स्मार्टकार्ड ड्रायव्हिंग लायसन्स मिळते. त्यामुळे अपघातांचे प्रमाण वाढत आहे. रोज अपघात होत आहेत.

सभापती महोदय, राज्याच्या ग्रामीण भागातील रेल्वे वाहतूक वाढविण्याच्या दृष्टीने रेल्वे मंत्रालयाने वर्धा-यवतमाळ-पुसद-नांदेड आणि मनमाड-मालेगाव-धुळे-शिरपूर-इंदौर असे अंदाजे 462 कि.मी. लांबीचे दोन नवीन रेल्वे मार्ग जाहीर केले आहेत.

(नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार......

माझ्या शासनाने या प्रकल्पाकरिता आर्थिक सहाय्य देण्याचे ठरविले आहे, पण आमचे रेल्वे खाते तुम्हाला का जुमानत नाही, याकडे रेल्वेने दुर्लक्ष केले आहे. यासंदर्भात महाराष्ट्रातून जे जे म्हणून खासदार लोकप्रतिनिधी दिल्लीत जातात ते मात्र लोकसभेत जिद्दीने बोलत नाहीत फक्त शासनाने जे केले त्याला "मम" म्हणून हात लावावयाचा एवढेच ते काम करतात. इतर राज्यांची परिस्थिती पाहिली तर आंध्र प्रदेश, कर्नाटक, तामिळनाडू या राज्यांचा प्रश्न असेल तर त्या राज्यांमधील सर्वपक्षीय खासदार मात्र आपल्या राज्यातील प्रश्नासाठी एकत्र येऊन भांडतात. असे चित्र मात्र महाराष्ट्राच्या बाबतीत दिसत नाही. आता नुकतीच महाराष्ट्रावर टीका झाली त्यात मुंबईचे लोक गटाराजवळ आणि समुद्राच्या खाऱ्या पाण्याच्या शेजारी राहतात अशा प्रकारची टीका होत होती त्यावेळी मात्र आपल्या राज्यातील खासदार टाळया वाजवित होते, अशी दुर्देवी परिस्थिती या राज्याची आहे.

शासनाने मध्यान्ह भोजन योजना राबविण्याचा निर्णय घेतला परंतु त्यासंबंधीची वस्तुस्थिती काय आहे हे आपण कधी तरी तपासले आहे काय ? कारण हे जेवण कसे दिले जाते, पाणी स्वच्छ मिळते की नाही, अन्न कशा प्रकारे शिजविले जाते याबाबतची पाहणी सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे व डॉ. नीलम गोऱ्हे यांनी करावी, अशी माझी सूचना आहे.....(अडथळा)....

त्याचप्रमाणे आरोग्याऐवजी अनारोग्य, भ्रष्टाचार व व्यवस्थापन शुन्य कारभार याबाबत काय परिस्थिती आहे हे देखील मागे वळून पाहण्याची गरज आहे, मात्र तिकडे कोणी लक्ष देत नाही.

क्रीडा विभागाच्या संदर्भात मला असे सांगावयाचे आहे की, या देशात फक्त क्रिकेटचाच बाजार आता सुरु झालेला आहे. ऑलिम्पीकमध्ये प्रवेश मिळण्यासाठी हॉकीची स्पर्धा सुध्दा आपण जिंकू शकलो नाही आणि ही पहिलीच वेळ आहे की, आमचा संघ ऑलिम्पीक सामन्यांमध्ये सामील होऊ शकणार नाही, यापेक्षा मोठे दुर्देव कोणते असावे. अन्य मैदानी खेळांच्या बाबतीत तर आनंदी आनंदच आहे.

न्यायदानाची प्रक्रिया गतिशील व्हावी या ठिकाणी न्यायाधीशांची संख्या वाढविण्याचे सुतोवाच केले आहे परंतु न्यायालयात मराठीचा वापर किती प्रमाणात होतो हा संशोधनाचाच भाग आहे. माननीय राज्यपालांचे अभिभाषण काळजीपूर्वक वाचले तर इंग्रजी शब्दांचीच जास्त पेरणी केली आहे, असे आपल्याला दिसून येईल.

यानंतर श्री. जुन्नरे ....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार .....

माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणामध्ये जास्तीत जास्त इंग्रजी शब्द वापरण्यात आलेले आहेत. ज्या ठिकाणी इंग्रजी शब्द वापरण्यात आले आहेत त्या ठिकाणी मराठी शब्द सुध्दा वापरता आले असते परंतु सचिवांना मराठी समजत नाही असेच यातून दिसून येते आणि हीच खरी महाराष्ट्राची शोकांतिका आहे. माननीय राज्यपाल महोदयांनी जे अभिभाषण केले ते त्यांच्या शब्दोच्चारामुळे आम्हाला व्यवस्थीत समजले नाही. परंतु ज्यांचे शब्दोच्चार आम्हाला समजत नाही अशाच व्यक्तींना महाराष्ट्राचे राज्यपाल केले जाते. आमच्या राज्यात आम्हाला हेच राज्यपाल पाहिजेत असे सांगण्याची हिंमत या शासनाने कधीही दाखवलेली नाही.

सभापती महोदय, महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्न न्यायालयात असल्यामुळे या प्रश्नावर मी भाष्य करणे योग्य होणार नाही. परंतु महाजन अहवालाचे जसे झाले तसे महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्नाच्या संदर्भात होणार नाही याची काळजी घेण्याची आवश्यकता आहे. महाजन आयोगाच्या संदर्भात आपल्याकडून ज्या चूका झाल्या तशा चूका पुन्हा महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्नाच्या बाबतीत न्यायालयात होणार नाही याची काळजी घेण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्नाच्या संदर्भात जे न्यायालयाच्या कामाकाजाच्या संदर्भात एक्सपर्ट आहेत, ज्यांची बौध्दिक क्षमता चांगली आहेत त्यांना हा विषय देऊन न्यायालयाचा निकाल महाराष्ट्राच्या बाजूने कसा लागेल हे पाहण्याची जबाबदारी महाराष्ट्र शासनाची आहे. सभापती महोदय, माझ्याकडे बोलण्यासाठी बरेच मुद्दे आहेत परंतु माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणावरील चर्चेला माझ्या सहकार्यांना जास्तीत जास्त अवधी मिळावा म्हणून मी माझे भाषण आटोपते घेतो.

जय हिंद, जय महाराष्ट्र.

-------------

....2

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी (नागपूर विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणावर विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, मी हरकतीच्या मुद्यावर विचार मांडण्यासाठी उभा आहे. माननीय राज्यपाल महोदयांचे अभिभाषणावरील चर्चा म्हणजे शासनाचे धोरण असते. शासनाच्या धोरणावर या ठिकाणी चर्चा सुरु असतांना तसेच सन्माननीय सदस्य चांगल्या प्रकारचे मुद्दे मांडत असतांना अधिका-यांच्या गॅलरीत एक सुध्दा अधिकारी उपस्थित नाहीत हे काही योग्य नाही.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, ज्या मंत्र्यांचा या विषयाशी संबंध आहेत तेच मंत्री या ठिकाणी नाईलाजाने उपस्थित आहेत. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार साहेबांनी चांगल्या प्रकारचे मुद्दे मांडलेले आहेत परंतु असे असतांना देखील त्यांच्या मुद्याची या ठिकाणी माननीय मंत्रीमहोदयांकडून नोंद घेतली गेली आहे असे वाटत नाही.

डॉ. विजयकुमार गावीत : सभापती महोदय, या ठिकाणी जे सन्माननीय सदस्य, माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणावर विचार मांडत आहेत त्यांचे मुद्दे मी लिहून घेत आहे.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, सभागृहामध्ये प्रत्येक वेळी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल त्यांचे अभिनंदन करणारे माजी सन्माननीय सदस्या श्रीमती सुधा जोशी आणि माजी सन्माननीय सदस्य ॲड. गुरुनाथ कुलकर्णी आज येथे नाहीत. केवळ माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर बोलण्यासाठीच नव्हे तर पुढच्या वेळी प्रश्नाची उत्तरे देण्यासाठी तुम्ही येथे दिसाल अशा प्रकारे मी त्यांना शुभेच्छा देत होतो.परतु त्यांना प्रश्नांची उत्तरे देण्याची संधी तर मिळाली नाहीच पंरतु माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर बोलण्यासाठी हे दोघेही या ठिकाणी उपस्थित नाहीत याबद्दल मी मनापासून खेद व्यक्त करतो.

सभापती महोदय, मी माननीय राज्यपालांचे मनापासून अभिनंदन करतो. माननीय राज्यपालांनी या ठिकाणी अभिभाषण केले आहे. हे अभिभाषण तयार करण्यासाठी तीन कॅबिनेट मंत्र्यांची एक समिती असते . ही समिती हे भाषण तयार करीत असते आणि त्यानंतर माननीय राज्यपाल राज्याचे धोरण म्हणून ते अभिभाषण या ठिकाणी वाचून दाखवतात. या शासनाचे माननीय राज्यपालांनी अभिनंदन केले आहे तसेच शासनाच्या कामकाजाबद्दल समाधान व्यक्त केलेले आहे. परंतु हे सरकार निगरगट्ट आहे आणि या सरकारने जनतेच्या हिताचे कोणती कामे केली आहेत आणि कोणते निर्णय घेतले आहे हा खरा संशोधनाचा विषय आहे. गेल्या आठ वर्षामध्ये या शासनाकडून लोकांच्या ज्या काही अपेक्षा आणि आकांक्षा होत्या त्या सगळया फोल ठरलेल्या आहेत. जनतेच्या आशा अपेक्षांना हरताळ फासला गेला आहे. तरी सुध्दा अकार्यक्षम, भ्रष्ट आणि नाकर्त्या सरकारचे महामहीम राज्यपाल महोदयांनी अभिनंदन केले आहे व माझे शासन असा त्यांनी उल्लेख केला आहे त्या माननीय राज्यपाल महोदयाचे अभिनंदन करण्यासाठी मी येथे उभा आहे.

सभापती महोदय, संस्कृतमध्ये एक सुभाषित असे आहे की,

"काक: कृष्ण: पिका: कृष्ण: पीक काक: का: भेद:

वसंत समय प्राप्ते: काक: काक: पिका: पिका:"

याचा अर्थ असा आहे की,कावळा देखील काळा असतो आणि कोकीळ देखील काळा असतो . तेव्हा कावळा आणि कोकीळ यामधील फरक कसा ओळखावयाचा ? तर जेव्हा वसंत ऋतू येतो तेव्हा कोकीळच्या मधुर गाण्याने तो कोकीळ आहे असे स्पष्ट होते आणि तेव्हा कावळयाची काव काव तो कावळा असल्याचे दाखवून देतो.

13-03-2008 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) TT 2

VTG/ KGS/ MMP/ प्रथम श्री.जुन्नरे 16.15

श्री.नितीन गडकरी ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( सभापती स्थानी तालिका सभापती श्रीमती उषा दराडे)

सभापती महोदय, मला एकच दु:ख होत आहे की वसंतऋतूमध्ये कोकीळ कोठेही दिसत नाही परतु कावळे मात्र काव काव करीत फिरत आहेत. वास्तविक या वसंतऋुला आता पश्चाताप होत असेल. निवडणुकीच्या काळात जनतेला मोफत वीज देऊ, कर्ज माफ करु, कापसाला 2700 रुपये क्विंटल असा भाव देऊ, धानाला 1000 रुपये हमी भाव देऊ, अशा प्रकारची खोटी आश्वासने द्यावयाची आणि जनतेची फसवणूक करावयाची परंतु सत्ता मिळाल्यानंतर मात्र असे सांगावयाचे की, जाहीरनाम्यात लिहिलेली वचने ही फक्त लिहिण्यासाठी असतात , पाळण्यासाठी नसतात. कॉंग्रेसच्या अध्यक्षांनी असे सांगितले की, " ती आमची प्रिन्टीग मिस्टेक झाली आहे." केन्द्रीय उर्जा मंत्री प्रामाणिक असून त्यांनी सद्सद्विवेक बुध्दीला स्मरुन सांगितले की, "आम्ही जी काही आश्वासने दिली होती तो आमचा निवडणूक स्टंट होता, ती आमची स्ट्रॅटीजी होती. निवडणूकीच्या व्यूह रचनेचा तो एक भाग होता" ज्यांनी महाराष्ट्रातील जनतेची फसवणूक केली, जनतेचा विश्वासघात केला त्यांचा कावेबाजपणा या निमित्ताने उघड झाला आहे . ज्या सरकारने कावेबाजपणे, धूर्तपणे जनतेला खोटी आश्वासने दिली ते माझे सरकार समाधानकारकपणे काम करीत आहे त्या सरकारचे मी अभिनंदन करतो असे म्हणणाऱ्या माननीय राज्यपाल महोदयांचे मी सुध्दा अभिनंदन करीत आहे.

सभापती महोदय, कर्ज मुक्तीचे ढोल वाजविण्यामध्ये सध्यास महाराष्ट्रात स्पर्धा सुरु आहे सन्माननीय उपमुख्यमंत्र्यांना एवढी घाई झाली होती की,केन्द्रीय अर्थसंकल्प सादर होण्याच्या तीन दिवस अगोदर वर्तमानपत्रात पहिल्या पानावर अशी बातमी प्रसिध्द करण्यात आली होती की "पाच एकराखालील शेतकऱ्यांचे कर्ज व व्याज माफ होणार - उप मुख्यमंत्री श्री.आर.आर. पाटील." तुमचा या कर्जमुक्तीशी काय संबंध आहे ?

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गडकरी ....

दणादण घोषणा देतात. पहिल्यांदा नवे नवे असताना बरे वाटले. पण त्यामुळे आमचे मित्र नामदार डॉ.पतंगराव कदम यांच्यावर मात्र अन्याय झाला आहे, होतो आहे. डिपार्टमेंट त्यांचे, कर्जमाफीची घोषणा डिपार्टमेंटचे मंत्री म्हणून त्यांनी करायची पण ती घोषणा दुसरे करीत आहेत आणि त्यावर ढोल तिसरेच वाजवित आहेत. म्हणजे बजेट यायच्या आधी तीन दिवस वर्तमानपत्रात केंद्र सरकारचे बजेट फोडण्याचे महापाप या सरकारातील उपमुख्यमंत्र्यांनी केले आहे. त्यावरून त्यांच्या पक्षाच्या लोकांच्या जाहिराती तयार झाल्या. महाराष्ट्रातील सर्व वर्तमानपत्रे मिडिया मालामाल झाले. त्यानुसार कार्यक्रम ठरले, त्याच्याही जाहिराती झाल्या आणि आज काय परिस्थिती आहे महाराष्ट्रात? मी आमच्या उपमुख्यमंत्र्यांना सांगेन की, तुमच्यावर हे सारे बूमरँग होणार आहे. जून महिना आल्यानंतर शेतकऱ्याला कळेल की, आपण मूर्ख बनलो आहोत आणि मग ते तुम्हाला दारामध्येही उभे करणार नाहीत. सभापती महोदया, या कर्जमाफीसंबंधात राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, या साऱ्याचे श्रेय श्रीमती सोनिया गांधीं आणि पंतप्रधान श्री.मनमोहनसिंग यांचे आहे. राज्याच्या उपमुख्यमंत्र्यांनी, श्री.आर.आर.पाटील यांनी सांगितले की, केंद्रीय कृषीमंत्री श्री.शरद पवारांचे हे श्रेय आहे. जो आमचा माल कॉंग्रेसमध्ये गेला आहे, ते म्हणतात की, मीच हे माफ केले आहे. जो उठतो तो सांगतो आहे की, हे मीच केले. म्हणजे या सरकारमध्ये आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याच्या टाळूवरील लोणी चाटून खाण्यासाठी स्पर्धा सुरू झाली आहे. आता हे कर्ज 10 हजार कोटीचे माफ होईल असे म्हणतात. परंतु माझ्याकडे याची आकडेवारी आहे. कोणत्या रिजनचे किती आहे ती सारी आकडेवारी आहे. सभापती महोदया, शेतकऱ्यांशी विश्वासघात सुरू आहे. सर्वात आधी राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी राज्यातील शेतक-यांसाठी पॅकेज जाहीर केले. त्याचे लिफाफे शेतकऱ्यांच्या हातात आले आणि त्यानंतर राज्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्यांची संख्या अधिकच वाढली, दुप्पट झाली. त्यानंतर देशाच्या पंतप्रधानांनी विदर्भामध्ये भेट दिली आणि त्यांनीही त्यावेळी शेतकऱ्यांसाठी एक पॅकेज जाहीर केले. यामध्ये खरोखरी राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नेते अतिशय हुश्शार आहेत. त्यांचा माल आणि नाव मात्र कॉंग्रेसचे, शेतकऱ्यांसाठी फायदा म्हणून केले जाते आणि बँकांचा फायदा होतो, त्या साऱ्या बँका राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या नेत्यांच्या हातात. असे पॅकेज झाले. त्यामध्ये 1200 कोटी बँकांनो मिळाले, त्या बँका राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या नेत्याच्याच. परवा येथे

...... यूयू 2 ...

श्री. गडकरी ....

सन्माननीय सदस्य श्री.रावते यांनी फळा वगैरे साहित्य दाखविले. शिवसेनेचे श्री.राठोड म्हणून आमदार आहेत त्यांनी विधानसभेतील विरोधी पक्षनेता असलेल्या श्री.रामदास कदम यांच्या बंगल्यावर ते सारे आणले होते. तेच त्यांनी दाखविले. सभापती महोदय, आजच मला समजले की, पंतप्रधानांच्या आणि राज्याच्या मुख्यमंत्र्यांच्या पॅकेजची अमलबजावणी राज्यात झालीच नाही. घोषणा मात्र मोठ्या मोठ्या झाल्या. एक गोष्ट मी आपल्याला सांगतो. मी क्रिकेट लहानपणापासून खेळलो आहे. अगदी शाळा-कॉलेज स्तरापासून मी खेळलो आहे आणि रणजी पर्यंत पोहोचलो होतो. तर त्या क्रिकेट मॅचमध्ये या महाराष्ट्रात काय होते ? तर एक दोन मुली मैदानाच्या सीमारेषे बाहेर कंबर हलवित असते. खेळाडूने सिक्सर मारली की ती ठकठक नाचते. टीव्हीवर आम्ही हे रोजच आर.आर.आबांच्या सौजन्याने चालू असल्याचे पाहतो आहोत. सभापती महोदया, त्या नाचणाऱ्या मुलीमध्ये मला आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्याची मुलगी दिसत होती, आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्याची बायको दिसत होती. या राज्यामध्ये शेतकऱ्यांचे सगळ्यात मोठे नुकसान कोणत्या काळात झाले असेल तर ते गेल्या 8 महिन्यांच्या काळामध्ये झालेले आहे. राज्यातील साखर कारखानदारीचे कंबरडे मोडण्याचे कामही या 8 महिन्यामध्येच झाले आहे. सन्माननीय मंत्री श्री.बबनराव पाचपुते साहेब तुम्ही तेथे साखर कारखाना काढलात आणि मी देखील काढला. ....

( यानंतर श्री. सरफरे ....व्हीव्ही 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी...

मी जर एक शब्द चुकीचा बोललो आणि माझे मित्र माननीय श्री. बबनराव पाचपुते म्हणाले तर मी खाली बसेन. केंद्रीय कृषी मंत्री हे जाणता राजा, शेतकऱ्यांचा मसिहा आहेत. राज्यामध्ये पॅकेजचे काय झाले? आम्ही खाजगी कारखाने काढावयास गेलो आमचे कारखाने लंबे झाले. माननीय श्री. बबनराव पाचपुते यांच्या नेतृत्वाखाली आम्ही दिल्लीमध्ये भेटलो , आमची वाट लागली. परंतु आमच्या नशिबाने आमचे कारखाने तगले आणि आम्ही जगलो. सहकारी कारखान्यांचे कंबरडे या सरकारने मोडले. आज राष्ट्रवादी कॉंग्रेसचे सर्व कारखाने लंबे झाले. आणि आमच्या सरकारमध्ये ज्यांना तुम्ही म्हणत होता की, माननीय श्री. अटलबिहारी वाजपेयी, माननीय श्री. अडवाणी नावाचे शेतकरी बघितले आहेत काय? आम्ही माननीय श्री. आर.आर. पाटील बघितले, माननीय श्री. जयंत पाटील बघितले, माननीय, श्री. बबनराव पाचपुते बघितले, माननीय श्री. शरदचंद्र गोविंदराव पवार बघितले आहेत. आम्ही इथेनॉल आणला. आमच्या माननीय श्री. राम नाईक आणि माननीय श्री. वाजपेयी साहेबांनी शेतकऱ्यांचे ग्रीन फ्युएल म्हणून इथेनॉल आणले. या क्षेत्रात महाराष्ट्रामधील साखर कारखान्यांमध्ये साडे चार हजार कोटींची गुंतवणूक झाली. 80 कारखान्यांमध्ये इथेनॉलचे प्रॉडक्शन सुरु झाले. परंतु शेतकऱ्यांच्या जाणता राज्याच्या मार्गदर्शनाखाली माननीय श्री. मुरली देवरा यांनी 2 लाख 40 हजार कोटी रुपयांचे क्रूड ऑईल इंपोर्ट केले. या देशामध्ये क्रूड ऑईलला पर्यायी ठरलेल्या इथेनॉलबाबत डेहराडूनच्या टेक्निकल इंस्टिटयूटने सांगितले की,ते 15 टक्के डिझेलमध्ये आणि 22 टक्के पेट्रोलमध्ये टाकावयास हरकत नाही. माननीय श्री. मुरली देवरा साहेब आणि माननीय श्री. शरद पवार साहेब हे सरकार शेतकऱ्यांचे आहे असे सांगतात. आमच्या माननीय श्री. अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने जे मॅंडेटरी काम केले होते, आणि केवळ 5 ते 10 टक्के साधनसामुग्री वापरुन इथेनॉल करावयाचे होते. ते निर्माण केल्यानंतर आज एक थेंब सुध्दा विकत घेतले जात नाही याचे मला वाईट वाटते. माननीय श्री. विलासराव देशमुख हे सुसंस्कृत मुख्यमंत्री आहेत. त्यांनी एक बैठक घेतली. त्यावेळी श्री. विजयसिंह मोहिते पाटील, माननीय मुख्यमत्री, श्री. मुरली देवरा साहेब आणि मी होतो. त्या वेळी सर्व ऑईल कंपन्यांचे चेअरमन आणि महाराष्ट्र सरकारचे अधिकारी होते. मी त्यांना विचारले की. चार महिन्यापूर्वी दिल्लीमध्ये मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये निर्णय झाला. It is headed by Hon. Prime Minister, the decision is taken in Cabinet and declare by the Finance

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MMP/ KGS/

श्री. नितीन गडकरी...

Minister. चार महिन्यापूर्वी निर्णय असा झाला की, 21.50 पैश्याच्या भावाने इथेनॉल विकत घ्यावयाचे. या साखर कारखान्यामधून मोलॅसिस निघते, त्यापासून इथेनॉल तयार होते. किंवा ऊसाच्या रसापासून इथेनॉल तयार होते. साखरचे भाव कडाडले. सुरुवातीला 22 रुपये किलो असलेली साखर 11.50 पैसे किलोवर खाली आली. साखरेचे भाव खाली आल्यानंतर ब्राझिल देशामध्ये अशी व्यवस्था आहे की, ज्यावेळी ऊसाचा रस काढला जातो त्यावेळी साखरेचे भाव जास्त असतील तो साखरेकडे जातो. नाहीतर साखरेच्या ऊसापासून इथेनॉल तयार होते. तशी व्यवस्था केली असती तर आपल्या देशामध्ये साखर कमी तयार झाली असती आणि भाव खाली आले नसते. परंतु मला सांगण्यास वाईट वाटते की, या महाराष्ट्रामध्ये शेतकऱ्यांचा जाणता राजा असतांना सुध्दा महाराष्ट्रातील साडे चार हजार कोटी रुपयांची गुंतवणूक आज लिलावात काढण्याची या देशातील बँकांवर पाळी आली आहे. हे सर्व कारखाने बंद आहेत. त्यापैकी 80 टक्के कारखाने राष्ट्रवादी कॉंग्रेसचे आहेत. आमच्या सरकारने तुमचे भले केले. आणि तुमच्या शेतकऱ्यांच्या जाणत्या राजाने त्यावर नांगर फिरविला. त्यांनी एक थेंब देखील इथेनॉल घेतले नाही. 2 लाख 40 हजार कोटी रुपयांचे इंधन इंपोर्ट केले. त्या बैठकीत मी म्हटले की, माननीय श्री. देवरा साहेब माननीय पंतप्रधानांनी हा निर्णय घेतला आहे, मंत्रिमंडळाने निर्णय घेतला आहे. हा निर्णय सुप्रिम असल्यामुळे तो सरकारवर बंधनकारक आहे. हा निर्णय श्री. चिदंबरम यांनी जाहीर केला असतांना त्याची अंमलबजावणी कां होत नाही? त्यावेळी माननीय श्री. विलासराव देशमुख म्हणाले त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. ते असे म्हणाले की, हे तुम्ही कशासाठी जाहीर करता? तुम्हाला घ्यावयाचे नसेलतर आम्हाला घ्यावयाचे नाही असे सांगा. तसे जाहीर करुन अडचण कशासाठी निर्माण करता?. माननीय पंतप्रधानांनी आणि केंद्रीय मंत्रिमंडळाने निर्णय घेतल्यानंतर जर तुम्हाला तो निर्णय पाळावयाचा नसेल तर तुम्ही मुंबईत रहाता मी देखील मुंबईत रहातो, मी तुम्हाला बघून घेईन. माननीय श्री. विलासराव देशमुख असे म्हणाल्यानंतर सुध्दा त्यांच्या चेहऱ्यावर काहीही फरक पडलेला नाही. त्यांच्या मनामधील चीड वाढली, ते कधीही असे बोलत नाहीत. परंतु ते कडक शब्दामध्ये बोलले. यापेक्षा त्यांनी आणखी काय बोलले पाहिजे.? याबाबतीत मी त्यांना दोष देत नाही. माननीय श्री. विजयसिंह मोहिते पाटील मला म्हणाले की, मी दिल्लीमध्ये साहेबांशी बोललो आहे तू काळजी करु नकोस.

(यानंतर सौ. रणदिवे)



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी . . . .

बबनरावांना सांगितले की, काळजी करु नको, मला सांगितले की, काळजी करु नको, आबा साहेबांना सांगितले की, काळजी करु नको. पण सगळे दुकानवाले लंबे झाले. आम्हा सगळयांना काळजीच निर्माण झाली. एक थेंबही इथेनॉल घेतला नाही. हे शेतकऱ्यांचे सरकार आहे. आणखी काय झाले ? लाल गहू, सडका आणि कुजका गहू बाबत काय सांगावयाचे ?.महाराष्ट्रातील गव्हाचे 365 नमुने घेतले. माझ्याजवळ त्यांचा रिपोर्ट आहे. त्यानुसार हा गहू माणसांना खाण्यासाठी योग्य नाही याचा माझ्याजवळ माहितीच्या अधिकारानुसार प्राप्त झालेला रिपोर्ट आहे.डॉ.गावितसाहेब, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, शाहू महाराजांच्या महाराष्ट्रामध्ये तुमच्या आदिवासीं लोकांकरता ठाणे जिल्हयामध्ये जबरदस्तीने हा सडका, कुजका, लाल गहू जो खाण्यास योग्य नाही, त्याचे वाटप करण्यास सुरुवात झाली आहे. बोंबला यांच्या नावाने. हा गहू खाऊन हागवण सुरु झाली, गॅस्ट्रोचा त्रास सुरु झाला, लोक आजारी पडले आहे. मग कसला जाणता राजा, कसले सरकार. काय चालले आहे ? हे शेतकऱ्यांचे सरकार आहे का ? क्रिकेटपटूंचे लिलाव सुरु झाले आहेत. आम्ही क्रिकेटच्या मॅचमध्ये मुली नाचताना बघतो, मग आता तेथे शेतकऱ्यांना नाचवावे. शेतकऱ्यांचा लिलाव करा. ही काय वेळ आली आहे ? महाराष्ट्रावर अशी वेळ आणली आहे ? शेतकरी आत्महत्या करीत आहेत, गावे ओसाड होत आहेत, त्यांची बायका-मुले रस्त्यावर आलेली आहेत. मात्र दुसरीकडे क्रिकेटच्या मॅचमध्ये मुली अर्ध्या कपडयांमध्ये नाचत आहेत आणि आपल्याकडे त्याची स्पॉन्सरशीप आहे. महाराष्ट्रामध्ये हे काय सुरु आहे ? माननीय श्री.आर.आर.पाटीलसाहेब, आपण याबाबतीत काही बोलता की नाही ? काही सांगता की नाही ? साहेबांना काहीतरी समजावून सांगा. अहो, शेतकऱ्यांचे भले केले नाही तरी कमीतकमी त्या क्रिकेटच्या मॅचच्या वेळी मुली तरी नाचवू नका.ते बघवत नाही. माननीय गृहमंत्र्यांनी बारबालांवर बंदी आणली आणि महाराष्ट्रामध्ये शाबासकी मिळविली आणि दुसरीकडे त्या अर्धवस्त्रातील मुली स्टेडिअमवर सिक्सर मारली की ढँ ढँ करुन नाचतात. काय चालले आहे ? तुमच्या कायद्यानुसार यावर बंधन घालता येईल काय ? सभापती महोदया, ताई, मी आपली क्षमा मागून हे सांगतो. तुम्हाला हे पटते का ? तर तुमच्यातील महिला जागृत होईल. त्यामुळे तुम्हाला ते कधीही पटणार नाही. अर्धवस्त्र महिला फोर आणि सिक्सर मारल्यानंतर नाचते आणि ते कोणाच्या मार्गदर्शनाखाली? कोण हा शाहरुख खान ? कोण ती प्रिती झिंटा ? या लोकांचा क्रिकेटशी काय

. . . .डब्ल्यु-डब्ल्यु-2

संबंध आहे ? यांना बॅट कशी असते ते माहिती आहे काय ? बॉल बाबत माहिती आहे काय ? कशा प्रकारे खेळतात ते माहिती आहे काय ? त्यांना या खेळाशी काय देणे-घेणे आहे ? या देशा मध्ये काय तमाशा सुरु आहे ? क्रिकेटमध्ये लिलाव सुरु आहे आणि तिकडे शेतकरी आत्महत्या करीत आहे.

श्री.आर.आर.पाटील (खाली बसून) : आपण आता माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबाबत बोलावे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदया, ठीक आहे. मी आता अभिभाषणाबाबत बोलतो. माझा तुम्हाला वैधानिक प्रश्न आहे की, पूर्ण वस्त्रामध्ये बारबाला नाचतात, ते गैरकायदेशीर आहे आणि हे बिअरच्या बाटल्या पितात आणि स्टेडिअममध्ये अर्ध कपडयांमधील मुली फोर आणि सिक्सर मारल्यानंतर नाचतात हे कोणत्या कायद्यामध्ये बसते ? ओपन टू स्काय आणि लोक ते हासत पाहतात. राज्यामध्ये काय चालले आहे ? आम्ही हेच का स्वप्न पाहिले ? आम्हाला हे पहावयाचे होते ? शेतकऱ्यांचा जाणता राजा, मसीहा आणि तुम्ही एवढे कौतुक करता. मेळावे घेऊन फोटो छापता. मग कर्जमुक्तीच्या मेळाव्याला क्रिकेटमध्ये सिक्सर मारल्यानंतर अर्ध वस्त्रातील महिला नाचतात त्यांचाही फोटो छापावयाचा.

**तालिका सभापती (श्रीमती उषाताई दराडे)** : सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरीसाहेब, मी तुम्हाला क्रॉस करीत नाही. तुमचा आदर राखून मला फक्त एवढाच संशय व्यक्त करावयाचा आहे की, आपले भाषण हे माननीय राज्यपालांच्या अभिभाषणासंबंधात सुरु आहे की जाणता राजा वर सुरु आहे ?

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदया, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये कर्ज मुक्तीचा विषय असल्यामुळे आणि तो केंद्रीय कृषी विभागाशी संबंधित असल्यामुळे त्यातील काही विसंगती सांगावयाच्या आहेत. म्हणून मी बोलत आहे. मी उदाहरण देत आहे आणि एखाद्या वेळेस माझे भाषण काही लोकांना ऐकण्यास जड जात असेल. कदाचित दु:खही होईल. कारण काही वेळेला माझे शब्द ऐकण्यास कसेतरी वाटतील. पण जे सत्य आहे, ते बोलले पाहिजे की नाही ? तसेच मी कायदेशीर मुद्दा उपस्थित केलेला आहे आणि माझा माननीय उप मुख्यमंत्र्यांना असा प्रश्न आहे की, जर तुमच्यादृष्टीने बारबाला दोषी आहेत, तुम्ही त्यांच्यावर बंदी आणता ? तर मग माझा

. . . .डब्ल्यु-डब्ल्यु-3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तुम्हाला सवाल आहे की, तुम्ही गृहमंत्री आहात, मग क्रिकेटमध्ये चाललेला तमाशा बंद करणार आहात काय ? निदान महाराष्ट्रात तरी बंद करावा. दाखवा हिंमत की, पवारसाहेब, दिल्लीमध्ये काहीही करा, कलकत्ता मध्ये काहीही करा. पण मी आबासाहेब पाटील, मी राज्यामध्ये बारबालांना बंदी केली आहे. त्यामुळे मी ही गोष्ट महाराष्ट्रामध्ये तरी चालू देणार नाही असा बाणेदारपणा, असा स्वाभिमानाचा परिचय तुम्ही करुन देणार आहात काय ? नसेल तर नाही म्हणून सांगावे.मी चूप राहीन. प्रश्न मिटला. आपल्याला त्यावर काही म्हणावयाचे नाही. काही वेळेला मजबूरी असते, तसे नाही सांगता येत. सहनही होत नाही आणि सांगताही येत नाही.

(सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते खाली बसून काही बोलतात.)

जाऊ द्या. रावते, तुम्ही वारंवार काय बोलता ? सहनही होत नाही आणि सांगताही येत नाही. कधी-कधी असे असते.

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी .....

सभापती महोदय, सहकारी बँकांचे शोषण सुरु आहे. आज सकाळी सभागृहात बोललो. आज पुरावा दिला. श्री. गुजर नावाच्या शेतकऱ्याचे उदाहरण दिले. माननीय मंत्रिमहोदय डॉ. पतंगराव कदम यांना बोलवा. ते एवढे मिष्किल आहेत की त्यांना कशाचीही गंभीरता नाही. मी महाराष्ट्राच्या राजकारणात इतका गंभीर नसलेला मंत्री पाहिलेला नाही. सर्व रेकॉर्ड त्यांनी तोडलेले आहेत. माननीय मंत्रिमहोदय श्री. राणे साहेब आपण बसला आहात त्या ठिकाणी ते बसले होते. 6 टक्के व्याजाच्या कर्जाच्या बाबतीत विचारले तर ते असे म्हणाले की, दिले. कोठे दिले, काय दिले ? 6 टक्के दराने कोठे कर्ज दिलेले आहे ? सभापती महोदया, आपण बीड जिल्ह्यातून आलेल्या आहात. 6 टक्के दराने कोठल्या शेतकऱ्यांना कर्जपुरवठा झालेला आहे काय ? सिंधुदुर्ग जिल्ह्यात 6 टक्के दराने कर्ज पुरवठा झाला काय हे माननीय मंत्रिमहोदय श्री. राणे साहेबांनी सांगावे. माननीय आबासाहेब आपल्या सांगली जिल्ह्यात 6 टक्के दराने कर्ज पुरवठा झाला काय ? अहमदनगर जिल्ह्यामध्ये झाला असे माननीय मंत्रिमहोदय श्री. बबनराव पाचपुते बसून सांगत आहेत. आपण एका तरी शेतकऱ्यांचे नाव सांगावे. बबनराव आपल्या बरोबर आहेत. त्यांचे शरीर फक्त तिकडे आहे. त्यांचा आत्मा आपल्या बरोबर आहे. फक्त लाल दिव्याची गाडी आहे म्हणून ते सर्व सहन करीत आहेत. ते संत आहेत. हे सर्व बघून त्यांना नकोसे वाटते परंतु त्यांचा नाईलाज आहे. 5 टक्के दराने नाबार्डकडून कर्ज मिळते. तुम्ही असा कायदा का करत नाही की, अर्धा टक्के राज्य सहकारी बँक, अर्धा टक्के जिल्हा सहकारी बँक आणि अर्धा टक्के सोसायटी, साडेसहा टक्क्यातील 2 टक्के सबसिडी, साडेचार टक्के दराने कर्ज पुरवठा असे का करीत नाही ? या कोऑपरेटिव्ह बँकांनी भ्रष्टाचार करावयाचा आणि शेतकऱ्यांचे शोषण करावयाचे. भूविकास बॅकांनी काय केले ? मघाशी मी त्याबाबत सांगितले. 3 लाख 48 हजार रुपयांच्या कर्जावर 9 लाख रुपये वसूल केले. त्या 9 लाख रुपयांपैकी 8 लाख रुपये मुद्दलात जमा केले आणि बाकीचे पैसे व्याजात जमा केले. त्यांच्या 10 एकर जमिनीचा लिलाव केला. त्यांचा 1 लाख 24 हजार रुपयांचा ट्रॅक्टर विकाला. श्री. गुजर हे बिचारे पागलासारखे फिरत आहेत. हे शेतकऱ्यांचे सरकार आहे काय ? ही शेतकऱ्याला केलेली मदत आहे काय ? भूविकास बँक, जिल्हा सहकारी बँक, राज्य सहकारी

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ KGS/

श्री. नितीन गडकरी......

बँक तुमच्या अधीन आहेत. मग सावकारासारखे या तीनही बँकांचे शोषण आपण का चालू ठेवता ? एक आदेश काढून अर्धा टक्का, अर्धा टक्का करुन तुम्ही व्याजाचा दर साडेचार टक्क्यावर का आणत नाही ? नागपूर जिल्हा बँकेत 150 कोटी रुपयांचा घोटाळा झाला. वर्धा जिल्हा बँकेत 50 कोटी रुपयांचा घोटाळा झाला. नांदेड जिल्हा बँकेत 280 कोटी रुपयांचा घोटाळा झाला. उस्मानाबाद जिल्हा बँकेत 275 कोटी रुपयंचा घोटाळा झाला. सगळे घोटाळेच घोटाळे आहेत. बँका लुटल्या आहेत. सोसायट्या बघा, बँका बघा सगळीकडे घोटाळेच घोटाळे आहेत. भुदरगडचे लोक मला आता भेटावयास आले होते. तत्कालीन मंत्र्यांनी त्यांना आदेश देऊन कसे करावयास लावले याचे पुरावे त्यांनी दिले. आता ते मोठ्या जागेवर आहेत. महाराष्ट्रामध्ये काय झाले ? आपण शेतकऱ्यांचे शोषण करुन बँका मजबूत करीत आहात. आपण शेतकऱ्यांचा जाणता राजा, शेतकऱ्यांचे सरकार असे म्हणता. कधी तरी आपण हा निर्णय करणार की नाही ? हा व्याजाचा दर कमी करणार की नाही ?

सभापती महोदय, ऊस, कापूस, धान, ज्वारी लावावयाची असेल तर व्याजाचा दर 13 आणि 14 टक्के आहे. ट्रॅक्टर विकत घ्यावयाचा असेल तर त्यासाठी 13 ते 14 टक्के व्याज आहे आणि मर्सिडीज गाडी विकत घ्यावयाची असेल तर त्यासाठी व्याजाचा दर साडेसात ते आठ टक्के आहे. ट्रॅक्टर घ्यावयाचा असेल तर 13 टक्के व्याजाचा दर आहे. श्री. गुजर यांना भूविकास बँकेने साडेसतरा टक्के व्याजाचा दर लावला. वाहरे राजा. मर्सिडीज गाडीला साडेसात टक्के व्याजदर आणि भूविकास बॅंकेने नाबार्डकडून 5 टक्के दराने आलेल्या कर्जावर साडेबारा टक्के कमीशन घेऊन गरीब शेतकऱ्याला साडेसतरा टक्के दराने कर्ज देणे हा शेतकऱ्याला कोणता न्याय आहे ? मर्सिडीज गाडीकरिता साडेसात टक्के व्याजदर आणि ट्रॅक्टरसाठी साडेसतरा टक्के व्याजदर आहे. ऊस, कापूस, धान ज्वारी लावावयाची असेल तर 13 ते 14 व्याजदर आहे. एच.डी.एफ.सी. कडून हाऊसिंग फायनान्सचे कर्ज पाहिजे असेल तर त्यासाठी आठ ते साडेआठ टक्के व्याज दर आहे. हा कोणता न्याय आहे. हे कोणत्या शेतकऱ्याचे सरकार आहे ? या बँकांच्या टक्केवारीमध्ये सगळे शोषण झाले आहे.फलोद्यान कसे वाचणार आहे ? मी माझी एक हजार संत्र्यांची झाडे उखडून तोडून टाकली.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ MMP/ श्री.बरवडनंतर 16:40

श्री.नितीन गडकरी....

माननीय मंत्री श्री.अनिल देशमुख यांच्या नरखेड व काटोल या भागामधील संत्र्यांच्या बागा वाळल्या आहेत. त्या भागात विहिरींना पाणी आहे, पंप आहेत, परंतु वीज नाही. दिवसातील 16-16 तास लोड शेडिंग होत असेल तर फलोत्पादनामध्ये राज्याची प्रगती कशी काय होणार ? शाळेतून संध्याकाळी 6 वाजता घरी येतात त्यावेळी वीज नसते, 8.30 वाजता आई-वडिलांबरोबर जेवण्यासाठी बसतात त्यावेळी वीज नसते, त्यानंतर सास भी कभी बहू थी ही सिरियल बघण्यासाठी बसतात, त्यावेळी वीज नसते. रात्री 12 वाजता झोपण्याची वेळ येते त्यावेळी मात्र माननीय श्री.दिलीपराव वळसे-पाटील यांच्या खात्याचे व्होल्टेज वाढते. म्हणजे जेव्हा विजेची गरज असते तेव्हा वीज मिळत नाही. परंतु रात्र झाल्यानंतर विजेची गरज नसते तेव्हा व्होल्टेज वाढते. विजेच्या पंपावर वीज नसताना बिलिंग सुरु आहे. झाडे वाळून जात आहेत, शेतकरी आत्महत्या करीत आहेत. तरी सुध्दा राज्यपाल महोदयांच्या भाषणामध्ये माझे सरकार चांगले काम करीत आहे असा उल्लेख असेल तर मी त्यांना धन्यवाद देतो. शेतक-यांच्या आत्महत्यास जबाबदार असणा-या आणि राज्यावर 1 लाख 47 हजार कोटीचे कर्ज वाढवून राज्याला भिकेला लावणा-या या सरकारचे राज्यपाल अभिनंदन करीत असतील तर मी राज्यपालांचेच अभिनंदन करतो.

सभापती महोदया, दिल्लीमध्ये या राज्याचे बलाढय मंत्री आहेत. श्री.शिवराज पाटील-चाकूरकर यांच्या चेह-यावरील व कपडयावरील क्रीझ कधीच जात नाही. ते गुजरात राज्यामध्ये प्रचाराला गेले होते. त्यावेळी एनएसयूआयचे अध्यक्ष श्री.सुनिल अहिरे हे निवडणुकीसाठी लागणा-या पेटया घेऊन चालले होते. त्या पेटया जड होत्या, त्यात काय होते हे माहीत नाही. परंतु त्या श्री.अहिरे यांना पैशासहित लुटले गेले. त्या लुटीबाबत कोठे हाक ना बोंब झाली. परंतु तेथील पोलीस स्टेशनमध्ये सामान चोरीला गेले अशी नोंद करण्यात आली. केंद्रामध्ये राज्याचे गृहमंत्री आहेत. राज्यात 1500 जीवंत बॉम्ब सापडले, त्याबाबत ते फक्त सांगतात की, I will look into the matter. याशिवाय ते काहीच बोलत नाहीत. केंद्रामध्ये या राज्याचे पेट्रोलियम मंत्री आहेत. त्यांनी सर्व इंथेनॉलवाल्यांना लंबे केले. देशात सर्वात महाग पेट्रोल या राज्यात मिळते. आमचे पेट्रोलियम मंत्री आहेत. 2 लाख 40 लाख लिटर पेट्रोलची आयात सुरु आहे,

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ MMP/

श्री.नितीन गडकरी....

परंतु शेतक-यांचे ग्रीन फ्यूएल नको. केंद्रीय कृषी मंत्री राज्याचे आहेत. त्यांनी 16 रुपयांनी डुक्कराला खाण्यायोग्य गहू खरेदी केला, आमच्या शेतक-यांना मात्र 8.50 रु.भाव मिळतो. या देशामध्ये खेळाचा लिलाव होतो, शेतकरी आत्महत्या करीत आहेत. परंतु केंद्रीय कृषीमंत्री खेळामध्ये दंग आहेत.

दुसरे केंद्रीय मंत्री श्री.प्रफुल्ल पटेल हे नागरी हवाई वाहतूक मंत्री आहेत. या पटेल यांना पटेल तर पटेल नाही तर सगळे लुटेल, अशी म्हणण्याची वेळ आलेली आहे. त्यांनी 30 हजार कोटींची विमान खरेदी केली. शेतक-यांसाठी, मजुरांसाठी आणि तुमचा प्रवास आरामदायी होण्यासाठी 30 हजार कोटी रुपयांची विमान खरेदी केली. श्री.प्रफुल्ल पटेल हे देशातील गोरगरीबांचे विमान खरेदीतून भले करीत आहेत. गरीब कामगारांच्या भल्यासाठी, तुम्हाला वारंवार विमानातून प्रवास करता यावा म्हणून 30 हजार कोटींची त्यांनी विमाने घेतली आहेत. या विमान खरेदीचा फायदा सगळया लोकांना झाला आहे, त्याच्या खोलामध्ये मी जात नाही. परंतु शेतकरी मात्र आत्महत्या करीत आहेत. शेतक-यांना मदत करण्यासाठी 10 हजार कोटी रुपयांची गरज असेल तर मात्र सरकारकडे पैसा नाही.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

(श्री. नितीन गडकरी...

30 हजार कोटींची विमाने घ्यायला यांच्याकडे पैसे आहेत. भंडारा जिल्ह्यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने आनंद यात्रा काढली. "ई टीव्ही"वरुन ती दाखविण्यात आली. त्या यात्रेमध्ये 15-20 वातानुकूलित गाडयांमध्ये 30-40 लोक खादीचे कपडे घालून बसले होते. मागे ट्रकवर बैलबंडी ठेवली होती. तिला बैल जोडलेला नव्हता. बैलबंडीवर नेतेमंडळी बसली होती...जाणता राजा..30 हजार कोटीची विमाने घेणारे प्रफुल्ल पटेल... सभापती महोदय, ही नाटके राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने भंडारा जिल्हयामध्ये केली. ट्रकवर बैलबंडी ठेवली होती आणि त्या बैलबंडीला बैल लावलेले नव्हते हे नशीब. नाही तर एअर कंडिशण्ड बस ठेवून त्यावर बैलबंडी ठेवली असती... काय चालले आहे ? किती पोरकटपणा सुरु आहे ? श्री. सुशीलकुमार शिंदे हे केन्द्रामध्ये ऊर्जामंत्री आहेत. या महाराष्ट्रातील विजेचा प्रश्न सुटणार.... एक हसतमुख आणि दुसरे देखमुख.. दोघांनी मिळून महाराष्ट्राची वाट लावली. महसूल मंत्री श्री.नारायण राणेसाहेब हे वाट पहात आहेत, पण ते वाटेवरच अडकले. आमच्या मर्दगड्याला संधी देऊन बघा... मला वाटते श्री. नारायण राणे साहेबांनी माझे विचार ऐकावेत. तेच मला प्रेरणा देणारे आहेत. जे आहे ते आहे. श्री. नारायण राणे हे माझे मित्र होते आणि आहेत आणि पुढेही राहातील. सभापती महोदय, केन्द्रीय ऊर्जा मंत्र्यांनी महाराष्ट्राला 100 मे.वॅ. वीज दिली. 6000 मे.वॅ. विजेची टंचाई असताना फक्त 100 मे.वॅ. वीज त्यांनी महाराष्ट्राला दिली. राजा उदार झाला आणि हाती भोपळा दिला. आता कोणी म्हणेल की तुम्ही नुसते का हसता ? तर मी हायकमांडच्या सहवासात असतो त्यामुळे नेहमी हसत राहाण्याचा प्रयत्न करतो. भाषणाने आणि हसण्याने ऊर्जा निर्माण करता येते काय याचे संशोधन "रिसर्च आणि डेव्हलपमेंट इन्स्टिटयूट"कडून महाराष्ट्र सरकारने करुन घेतले पाहिजे. बरेचसे रिकामे लोक भाषणे करीत फिरत असतात. त्यामुळे भाषणाने आणि हसण्याने ऊर्जा निर्माण होते असा शोध लागला तर महाराष्ट्रातील 6 हजार कोटी मे.वॅ.ची वीज टंचाई दूर होईल आणि महाराष्ट्रातील अंधार कायमचा नाहिसा होईल. आमच्या मौद्याच्या बाबतीत काहीही हाती लागत नाही. केन्द्रामध्ये आमच्या राज्याचे राज्यमंत्री आहेत. ते काय करतात मला माहीत नाही.

दुसरे महाराष्ट्रातील नेते श्री. अे.आर. अंतुले आहेत. त्यांना केन्द्रामध्ये अल्पसंख्यांक खात्याचे मंत्री केले. परंतु त्यांना टेबल दिले नाही आणि खुर्ची देखील दिली नाही. आपल्या राज्य

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ MMP/ पूर्वी श्री. खंदारे 16:45

(श्री. नितीन गडकरी

मंत्रिमंडळामध्ये रिपब्लिकन पक्षाचे श्री. दयानंद म्हस्के हे गृहनिर्माण राज्यमंत्री होते. मी विरोधी पक्षनेता असताना त्यावेळी मलबार हिल येथे राहात होतो. ते देखील तिकडे राहात होते. एकदा तेथील रस्त्याच्या चढावावर त्यांची गाडी बंद पडल्यामुळे त्यांना मी माझ्या गाडीमध्ये घेतले आणि कामाबद्दल विचारपूस केली. त्यांनी सांगितले की, सरकारने गाडी दिली, पण त्यात पेट्रोल नाही, घर दिले ते देखील डॉ. मुंदडा मॅडमनी घेतले. एक फाईल सही करायला येत नाही. मी विचारले, काही लक्ष्मी दर्शन वगैरे.. ते म्हणाले लक्ष्मी दर्शन वगैरे काही नाही, आमच्या हातात काहीही नाही. श्री. ए.आर.अंतुले हे हुशार आहेत. अल्पसंख्यांकांना कसे पटवायचे हे त्यांना चांगले माहीत आहे. दलित मुस्लिमांना कसे पटवायचे, त्यांचा कसा वापर करुन घ्यायचा, वेळ आली की कसा विश्वास मिळवायचा हे चांगले माहीत आहे. ती फार मोठी शक्ती आहे.

....नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी....

सभापती महोदय, श्रेय घेण्यावरुन यांच्यात हमरी तुमरी झाली. काही निकाल माननीय श्री. शरद पवार यांच्या आदेशान्वये घेतले गेले असतील याची मला कल्पना नाही. परंतु बजेट जाहीर होण्यापूर्वी जाहिरातीचे मॅटर तयार केले गेले, मेळावे आयोजित करण्यासाठी सभागृहे निश्चित केली गेली, कार्यकर्त्यांना आणण्यासाठी ट्रक बूक केले, कार्यकत्यांना एकत्र करण्यासंदर्भात प्रत्येकाकडे जबाबदा-या सोपविण्यात आल्या. नागपूर जिल्हयातील काटोल गावातील एक शेतकरी यांच्या आंनदी मेळाव्यासाठी आला आणि तो शेतकरी मेळाव्यात सहभागी घेऊन आपल्या घरी गेला. घरी गेल्यानंतर त्याने विष पिऊन आत्महत्या केली. आत्महत्या करण्यापूर्वी त्याने आपल्या वडिलांना विचारले की, आपल्याकडे शेती किती आहे ? कर्ज किती आहे ? त्या प्रश्नास वडिलांनी उत्तर दिले की, आपल्याकडे सात एकर शेती असून कर्ज दीड लाख रुपये आहे. त्याने वडिलांना सांगितले की, बाबा आपण मेलो. हा यांचा विजयी आणि आनंदी मेळाव्याचा परिणाम आहे. काटोल येथील शेतक-याने आत्महत्या केली. त्या आत्महत्येचे श्रेय घेण्यासाठी सर्व जण तेथे पोहोचले आहेत. जाणता राजे माननीय श्री. शरद पवार यांचे दौरे आटोपले आहेत. आता श्रीमती सोनिया गांधी यांचे दौरे सुरु आहेत. आम्ही शेतक-यांचे कर्ज माफ केले, आम्ही कर्ज माफ केले असे प्रत्येक ठिकाणी सत्ताधारी पक्षाकडून सांगितले जात आहे. शेतक-याचे कर्ज माफ करण्याचे श्रेय घेणे म्हणजे आत्महत्या करणा-या शेतक-यांच्या टाळूवरील लोणी खाण्याचा हा एक प्रकार आहे. सभापती महोदय, संस्कृतमध्ये एक श्लोक आहे तो असा आहे की,...

" यस्यं नास्ति स्वयं प्रज्ञा
शास्त्रं तस्यं करोति किं
लोचनां पूर्ण विहिन
दर्पणां किं करिष्यति "

अर्थात ज्याच्याकडे बुध्दीच नाही त्याला शास्त्राचा काय उपयोग आहे. ज्याच्याकडे दृष्टीच नाही त्याला आरशाचा काय उपयोग आहे आणि ज्याला दूरदृष्टीच नाही, शेतक-यांबद्दल तर सोडाच पण त्याला कोणाच्याच भविष्याबद्दल साधी सहानुभूती नाही त्याच्याबद्दल काय बोलावे ? अशा असंवेदनशील, दृष्टीहीन सरकारचे माननीय राज्यपाल महोदयांनी अभिनंदन केले, त्याबद्दल मी माननीय राज्यपालांना धन्यवाद देतो आणि त्यांचे अभिनंदन करतो.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी....

सभापती महोदय, कॉग्रेस आणि राष्ट्रवादी कॉग्रेसच्या राजवटीमध्ये लक्ष्मीदर्शन कार्यक्रम मोठया प्रमाणात चालला आहे. एक अतिशय सुंदर गीत आहे त्याचा मी या ठिकाणी उल्लेख करीत आहे. सन्माननीय सदस्य श्री. भास्करराव जाधव आपण हे गीत नीट ऐकून घ्यावे. सदर गीत असे आहे की,

" तुझ्या गळा माझा गळा गुंफू मोत्यांच्या माळा "

माननीय मंत्री महोदय हे गीत कसे गातात ते मी सांगतो...

" तुझ्या गळा माझा गळा गुंफू भूखंडाच्या माळा
तुजं मंदिर, मजं दर्गा, अनहि वक्फची जमीन कोणाला
वेड लागले दादाला, मला तर वाटे आबाला
तुझ्या गळा माझा गळा गुंफू भूखंडाच्या माळा"

लक्ष्मीदर्शन झिंदाबाद. लक्ष्मीदर्शना शिवाय कोणीही काम करीत नाही. मंत्री महोदय, मंत्री महोदयांना सोडत नाही. साखर कारखाने, दूध सहकारी सोसायटया, कशालाही माननीय मंत्री महोदय सोडत नाही. चणा डाळ घोटाळा, पवन ऊर्जा घोटाळा, बॉक्साईट घोटाळा, सगळीकडे घोटाळाच घोटाळा आहे...

यानंतर श्री. कानडे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ SBT/ KTG/ MMP/ KGS/ 16:55

श्री. नितीन गडकरी .....

सन्माननीय सदस्य श्री. भास्करराव जाधव यांना मी सांगू इच्छितो की, हे सर्व तुमच्या समजण्यापलिकडचे आहे. सभापती महोदय, या आघाडी शासनाच्या काळात बॉक्साईट घोटाळा, भूविकास बॅक घोटाळा, शरबत घोटाळा असे अनेक घोटाळे झाले. 12 कोटी रुपयांचे शरबत कोण प्यायले ? वैद्यकीय साहित्य खरेदी घोटाळा झाला. मुद्रांक घोटाळा झाला. मुद्रांक घोटाळयात जेट एअरवेजची तिकीटे, तिकीटे तेलगीने काढून दिली होती. मुंबई-इंदौर, इंदौर-मुंबई, मुंबई-बंगलोर, बंगलोर-मुंबई अशी जेट एअरवेजची तिकीटे तेलगीने दिली होती. खाण्यापिण्यापासूनचा खर्च तेलगीने केला होता एवढेच नाही तर वरुन 2/2 प्युअर सिल्कच्या साडया दिल्या. तेलगी झिंदाबाद. सभापती महोदय, या आघाडी शासनाच्याकाळात शेण घोटाळा झाला. शेण पण खाल्ले गेले. खाण्यामध्ये तरी स्टॅन्डर्ड मेंटेन करावयाला पाहिजे होते. मागील काळात कोणी शेण खाल्ले होते काय ? मागील काळात खाण्याचा दर्जा मेंटेन केला होता. आघाडी शासनाने 40 कोटी रुपयांचे शेण खाल्ले. मी बाहेर बोलतो. माझ्यावर का केस टाकत नाही ? मी सांगलीला बोललो, कोल्हापूरला बोललो. सभागृहात हा विषय उपस्थित केला होता त्यावेळी कृषीमंत्री श्री. बाळासाहेब थोरात यांनी उत्तर दिले होते. मी त्यांना प्रश्न विचारला होता की 9 लाख जनावरे 8 महिने गुरांच्या छावणीमध्ये होती. एका जनावराने 8 महिन्यांमध्ये एक ट्रॉली शेण दिले. 9 लाख जनावरांनी 8 महिन्यांमध्ये किती ट्रॉली शेण दिले ? ते म्हणाले, 9 लाख ट्रॉली शेण झाले. 9 लाख ट्रॉली शेण कुणी खाल्ले असा मी मंत्रीमहोदयांना प्रश्न विचारला ? शेण कोणी खाल्ले ? त्यांनी सांगितले की, मी नाही खाल्ले. घोटाळा झाला. 40 कोटीचे शेण खाल्ले. चौकशा सुरु आहेत. खा पण काही तरी चांगले खा. दर्जेदार खा. पचेल ते खा. प्रकृती बिघडेल असे का खाता? दर्जा राखा. खाण्यासाठी साखर कारखाने आहेत, दूधसंघ आहेत, दूध सोसायटया आहेत, सूत गिरण्या आहेत, भूखंड आहेत.कोंबडया-बकऱ्या अनेक गोष्टी आहेत. तुम्ही काहीही खा. शांत आणि सुसंस्कृत श्री. उल्हासदादा पवार बिचारे शांत राहतात. ते तक्रार करीत नाहीत. प्रचवन करतात. आमचे वनमंत्री श्री. बबनराव पाचपुते यांना एवढया सगळया गदारोळात देव तरी आठवतो. का आठवतो तर सरकारचे पाप पाहून त्यांना पश्चाताप होतो आणि ते कमी करण्यासाठी ते देवळात जातात. त्यांना ही उपरती होण्याचे कारण म्हणजे हे सगळे पापी शासन पाहिल्यानंतर परिमार्जन करावे म्हणून त्यांच्यातील देव जागा झाला आणि विठ्ठल विठ्ठल म्हणून भगवान नाम घ्या. एवढे पाप आहे करतील काय बिच्चारे !

......2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ SBT/ KTG/ MMP/ KGS/ 16:55

श्री. नितीन गडकरी ......

ते काय एअरकंडीशन गाडीमध्ये बसून बंडीवर जाणार काय ? त्यांना विरोधी पक्षाचे संस्कार आहेत. जनतादलाच्या,समाजवादी पक्षाच्या संस्कारात ते राहिलेले आहेत. ट्रकवर बैलबंडी ठेवून आनंदयात्रा काढणे त्यांच्या मनाला कधीही पटणार नाही. पाप बघवत नाही. विठ्ठल विठ्ठल करीत अनवाणी पायाने ते जातात आणि विठ्ठला एवढे पाप झालेले आहे पण मी काही करु शकत नाही परंतु कमीत कमी माझ्या अंगावर पाप चढवू नको पुण्य ठेव म्हणून विठ्ठलाच्या पाया पडतात. बाकी काय व्हायचे आहे ते होऊ दे. बिच्चारे पायी पायी यात्रमध्ये ते जातात त्याच्यामागची व्यथा ही आहे.

सभापती महोदय, आज महाराष्ट्र 10 वर्षे पिछाडीवर आहे. तुम्ही गुजरातचे मुख्यमंत्री श्री. नरेंद्र मोदी यांना का शिव्या देता ? त्यांच्या राज्यात एकही शेतकरी आत्महत्या करीत नाही. एक मिनिटांचे लोडशेडींग नाही. कृषी उत्पन्न 9 हजार कोटीवरुन 34 हजार कोटींवर गेले. गुजरातचा कापूस चीनमध्ये निर्यात होतो. गुजरात हे देशातील पहिल्या क्रमांकाचे राज्य बनले आहे. गुजरातचा मुख्यमंत्री आणि आम्ही एकत्र बसलो होतो. श्री. अजित पवार साहेब त्यावेळी तेथे होते. ते गुजरातची प्रगती सांगत होते तेव्हा सगळे चाट पडले होते. ज्यांना तुम्ही सकाळ,दुपार आणि संध्याकाळ शिव्यांची लाखोली वाहता. त्यांना राजीव गांधी ट्रस्टने देशातील उत्तम मुख्यमंत्री म्हणून गौरविले आहे. या आघाडी शासनाने पहिल्या क्रमांकावर असलेला महाराष्ट्र 1 लाख 47 हजार कोटींच्या कर्जात डुबवून या राज्याचे वाटोळे केले.

नंतर श्री.भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी.......

या काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या सरकारने दिवाळखोरी केली, सत्यानाश केला. मी या राज्याचा बांधकाममंत्री होतो. रस्ते विकास महामंडळाचा अध्यक्ष होतो. मी 450 कोटी रुपयांचे बॉण्ड विकावयास काढले होते. एमएसआरडीसीचा हा इतिहास आहे. 450 कोटी रुपयांचे बॉण्ड विकावयास काढले आणि 1080 कोटी रुपये गोळा झाले. तुम्ही 1600 कोटी रुपयांचे बॉण्ड विकावयास काढले परंतु तुम्हाला 60 कोटी रुपये देखील मिळाले नाहीत. ट्रिपल बी तुमचे रेटिंग आहे. इतकी दयनीय स्थिती झालेली असताना तुम्हाला कोणतीही फायनान्शीयल इन्स्टिट्यूट पैसे देऊ शकत नाही. युती सरकारच्या काळात 39 हजार कोटी रुपयांचे कर्ज होते. तुम्ही सत्तेवर आल्यानंतर कर्ज वाढविले. युती सरकारने दिवाळखोरीत राज्य नेले म्हणून प्रचार केला. गावागावात जाऊन फिरलात आणि सांगितले की, युती सरकारने महाराष्ट्राचे वाटोळे केले, राज्याला कर्जबाजारी केले. पहिल्याच अधिवेशनात तुम्ही श्वेतपत्रिका काढली. त्यावेळी महाराष्ट्रावर 39 हजार कोटी रुपयांचे कर्ज होते. युती सरकार सत्तेवर आले त्यावेळी राज्याचे कर्ज 19 हजार कोटी रुपयांचे होते. आम्ही उड्डाणपूल बांधले, रस्ते बांधले, 5 सिंचन महामंडळांची निर्मिती केली. मी स्वत: पब्लिक प्रायव्हेट पार्टिसिपेशन इन्व्हेस्टमेंटमधून 8 हजार कोटी रुपयांची कामे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत केली. मी आजही शासनाला आव्हान देतो. मुंबई-पुणे एक्स्प्रेस रस्त्याचे 3600 कोटी रुपयांचे रिलायन्स कंपनीचे लोवेस्ट टेंडर असताना मी रिजेक्ट केले होते. महाराष्ट्राच्या बांधकाम खात्याच्या इंजिनिअर्सना सोबत घेऊन 1650 कोटी रुपयात कामे पूर्ण करुन राज्याचे 2000 कोटी रुपये वाचविले. मुंबईतील उड्डाणपुलांची किंमत 1800 कोटी रुपये होती. ही सर्व कामे 1000 कोटी रुपयात पूर्ण करुन महाराष्ट्राचे 650 ते 700 कोटी रुपये वाचविले. तुमच्या राज्यात एक तरी असे उदाहरण सांगता येईल का? सरकारच्या एस्टीमेट कॉस्टपेक्षा कमी पैशात कामे करुन दाखविली आणि राज्याचे पैसे वाचविले असे उदाहरण आहे का? तुमच्याकडे एकही उदाहरण नाही. तुमच्या राज्यातील टेंडर प्रक्रिया बंद झालेली आहे.

सभापती महोदया, आज राज्यात दर तीन तासाला एक खून होतो, दर चार तासाला एक दरोडा पडतो, दर सहा तासाला स्त्रियांच्या अब्रूवर हल्ला होतो. हे मी सांगत नसून राज्याचे पोलीस महासंचालक यांनी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांना दिलेल्या अहवालात नमूद केले आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी.......

महाराष्ट्राची ही आज स्थिती आहे. मुंबईच्या लोकलमध्ये बॉम्बस्फोट करणाऱ्या अतिरेक्यांवर खटले दाखल केले नाहीत. 1500 आरोपी फरार आहेत. बांगलादेशी लोक मुंबईत आले आहेत. बॉम्बस्फोट होत आहेत, निरपराध माणसे बळी पडत आहेत. तुम्ही एकाही बॉम्बस्फोट करणाऱ्या गुन्हेगारांना पकडू शकत नाही ही स्थिती आहे. फक्त बोलता, बडबड करता, काही करुन दाखवा. आज मुंबई शहर हे आतंकवाद्यांचे केंद्र बनले आहे.

सभापती महोदया, राज्याच्या 25 टक्के कर्जाच्या व्याजाचा दर हा 10 टक्के आहे. हे कर्ज 16 ते 18 हजार कोटी रुपयांचे आहे. सन्माननीय सहकारमंत्री डॉ.पंतगराव कदम, उद्योगमंत्री श्री.अशोक चव्हाण, मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख हे परदेशातून गुंतवणूक यावी म्हणून अमेरिकेत गेले. अमेरिकेतील उद्योगपतींना काय पिसाळलेला कुत्रा चावला आहे? ते काय वेडे आहेत? आज राज्यात पुरेशी वीज नसताना कोण या राज्यात येऊन उद्योग काढणार? तुम्ही आम्ही याठिकाणी वातानुकूलित हॉलमध्ये बसतो. उद्योग क्षेत्रात प्रगती करावयाची असेल तर चार गोष्टींची नितांत गरज आहे. पाणी, वीज, वाहतुकीची सुविधा आणि दळणवळण या गोष्टी महत्वाच्या आहेत. राज्यात 4500 मे.वॅट विजेची टंचाई असेल तर कोण उद्योगपती कारखाना काढायला येईल. माझ्या गावात डेअरी आहे. बघावयास या. दीड लाख रुपये नफ्यात होती. 16 तास लोडशेडिंग असल्यामुळे डेअरी एक लाख रुपये तोट्यात गेली. जनरेटरवर उद्योग चालणार का?

(नंतर श्री.खर्चे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी.......

13 हजार कोटीचा करार झाल्याचे माननीय मंत्री महोदय, श्री. दिलीप वळसे-पाटील यांनी सभागृहात बसून सांगितले होते. कुठे गेला तो करार ? टाटा आणि रिलायन्सला या शासनाने किती जागा दिली ? काय केले गेल्या 7 वर्षात ? या सर्व गोष्टींचे स्पष्टीकरण झाले पाहिजे. आणखी किती वर्षे आमच्या नावाने ओरडणार आहात ? एनरॉनच्या बाबतीत कोर्टात खोटे ॲफिडेव्हीट सादर केले की, आपल्याला विजेची गरज नाही, महाराष्ट्रात वीज सरप्लस आहे. अशा प्रकारे कारभार करुन या राज्याचे संपूर्ण वाटोळे करुन एक मेगावॅटही वीज निर्माण केली नाही. आजच सभागृहात विजेसंबंधीची लक्षवेधी सूचना होती. दरवर्षी विजेची टंचाई कशी वाढत चालली आहे, गेल्या आठ वर्षात विजेची निर्मिती झालेली नाही आणि सांगण्यात आले की, युती शासनामुळे विजेची निर्मिती होऊ शकली नाही. आठ वर्षांपासून कॉंग्रेस-राष्ट्रवादी कॉंग्रेसचा संसार सुरु आहे पण अजूनही लाडू आणि साखर वाटण्याचा योग आला नाही, त्याला काय आम्हीच जबाबदार आहोत ? म्हणून या सरकारने केवळ उद्योगाचेच वाटोळे केले नाही, केवळ शेतकऱ्यांच्या आत्महत्त्यांनाच जबाबदार नाही तर गेल्या पाच वर्षांत राज्यातील दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांच्या भवितव्याचेच नुकसान केले आहे. राज्यात 16-16 तास लोड शेडिंग असल्यामुळे मुलांना रात्री अभ्यास करणे शक्य होत नाही. मला अत्यंत खेद होत आहे की, पीठासीन अधिकाऱ्यांना आज म्हणावे लागले की, सरकारकडे जर पैसे नसतील आमदार निधीतून पैसे देण्यास तयार आहोत, यापेक्षा कोणती वाईट गोष्ट असू शकेल ? मी मघाशीच सांगितले की, एवढे कर्ज वाढले तरी महाराष्ट्र डुबला, श्वेत पत्रिका काढण्यास तयार नाही आणि 1.47 लाख कोटीचे कर्ज वाढले तरी देखील आमच्या राज्यपालांकडून या शासनाचे अभिनंदनच होत आहे. ज्यांनी हा महाराष्ट्र लुटला, महाराष्ट्राचा सत्यानाश केला, महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना आत्महत्त्याकरण्यास भाग पाडले, ग्रामीण भगातील मुलांचे भविष्य उध्वस्त केले तरी देखील माननीय राज्यपाल अभिनंदन करीत आहेत. या सर्व गोष्टी घडून देखील, राज्याचा सत्यानाश करुन देखील या शासनाचे मी नाईलाजाने अभिनंदन करीत आहे. माननीय सभापती महोदया, मला वाईट वाटत आहे की, ही अभिनंदन करण्याची वेळ आपल्यावर आली आहे. खरे म्हणजे चांगले काम करणाऱ्या म्हणून आपल्याला संधी द्यायला पाहिजे होती परंतु आमच्या सुधा ताई सभागृहाच्या आता सदस्या नसल्यामुळे ही वेळ आपल्यावर

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी ......

आज आली, याचे मला दु:ख वाटत आहे.

वांद्रे-वरळी सी लिंक या कामाबाबत दररोज सहारा टी.व्ही. वर ऐकायला मिळते. या ब्रिजचे उद्घाटन माननीय शिवसेनाप्रमुखांनी केले त्यावेळेस मी मंत्री म्हणून उपस्थित होतो. त्यावेळी या ब्रिजची किंमत 420 कोटी रुपये एवढी होती, तशी ऑर्डर सुध्दा ठेकेदाराला दिली होती. हे काम 420 कोटी रुपयात पूर्ण झाले नसते तर मी राजकारण सोडून दिले असते. परंतु आता या कामाची किंमत 1700 कोटीवर गेली आहे. हा ब्रिज 420 कोटीमध्ये पूर्ण होणे आवश्यक होते मग हे 1200 कोटी जास्तीचे कोणाचे गेले आणि त्याला जबाबदार कोण आहे ? हा जनतेचा पैसा कोणी खर्च केला, त्याला हे शासनच जबाबदार आहे. या ब्रिजचा जो कंत्राटदार आहे तो हिंदुस्थान कन्स्ट्रक्शन कंपनीचा ठेकेदार माझ्याबरोबर सुध्दा होता. मुंबई-पुणे एक्सप्रेस हाय-वेच्या एका टप्प्याचे काम त्याने केले आहे. त्या ठिकाणी गेलो असता जेवणाची तयारी केलेली होती, मांडव वगैरे टाकलेला होता आणि नवीन मशिनरी लाईनमध्ये उभी केली होती. वहां पर उस कंपनी का एक कबीर नाम का अधिकारी था, मैंने उसे बुलाकर कहा कि ये मशीनें बैल की तरह यहां पर खड़ी क्यों की है ? मैंने उनसे यह भी कहा कि अपने मालिक को यह बताना कि गडकरी ने कहा है कि निर्धारित समय पर इस प्रोजेक्ट का काम पूरा होना चाहिए. अगर नहीं हुआ तो जेल में भेज दूंगा. मेरा नाम गडकरी है. त्यावेळेस तो ठेकेदार जागृत झाला. मी त्या कामासाठी धर्माधिकारी यांना अपॉइंट केले व त्यांच्या काळात या कामाचा पनवेलपर्यंतचा पहिला टप्पा पूर्ण करण्यात आला.....

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ KTG/ SBT/ 17:10

श्री. नितीन गडकरी ....

माझ्या कार्यकाळात मी ठेकेदारांकडून वेळेत काम करुन घेतलेले आहे. माझ्या कार्यकाळात जेवढया रक्कमेचे काम दिले होते तेवढयाच किंमतीत ते काम पूर्ण करुन घेतलेले आहे. परंतु वांद्रे वरळी सी लिंकचे काम 420 कोटी रुपयांमध्ये दिले होते परंतु आता या कामाची किंमत 1700 कोटी रुपयांपर्यंत गेलेली आहे. योजनाओं का खर्च कैसे बढ़ जाता है,कौन यह धंधा कर रहा है ? मैं यह कहना चाहता हूं कि इसके लिए दिल्ली वालों का सिग्नल है. दिल्ली तक कमीशन जा रहा है. 6 लोगों का ब्लेक मार्केट चालू है. यह ब्लेक मार्केट दिल्ली के आशीर्वाद से चालू है. सीमेंट के भाव बढ़ रहे हैं, लोहे के भाव बढ़ रहे हैं. ये सब दिल्ली में लक्ष्मी दर्शन कराकर हो रहा है. ज्या सिमेंटच्या गोणीची किंमत 90 रुपये होती त्या सिमेंटच्या गोणीची किंमत आता 260 रुपयांपर्यंत गेलेली आहे. लोखंडाचे दर 8 हजार रुपये टन होते आता ते 45 हजार टनावर गेलेले आहे. सिमेंटचे दर दिल्लीच्या सरकारनेच वाढवले आहेत. सिमेंटच्या बॅगची किंमत जर 260 रुपयांवर गेली असेल तर गरीब माणूस काय घर बांधू शकेल ? आता तर इम्पोर्ट केलेले सिमेंट आपल्याकडे आलेले आहे. सभापती महोदया, हे लोक एवढे बदमाश आहेत की, मला आयुष्यात दुसरे कोणतेही पद नको परंतु दरवाजे बंद करुन या बदमाश लोकांना फटके मारण्याची संधी मिळाली पाहिजे एवढीच माझी देवाजवळ मागणी आहे. हे सरकार गरीब लोकांना लुटण्याचे काम करीत आहे. लोक नक्षलाईट केव्हा बनतात ? जेव्हा सामान्य माणसाला न्याय मिळत नाही, त्याचे शोषण होते तेव्हाच सामान्य माणूस नक्षलाईट बनतो व कायदा हातात घेतो. कोणी खुशीने कायदा हातात घेत नाही.

सभापती महोदया, रोजगार हमी योजनेत 18 जिल्हयामध्ये 1,61,682 कामगारांनी काम मागितल्यावर, आम आदमीके सरकाने किती मजूरांना काम दिले तर फक्त 278 कामगारांना 100 दिवस या आम आदमीच्या सरकारने काम दिले. ही तुमची रोजगार हमी योजना, हा तुमचा गरीबांच्या बद्दलचा कळवळा, हे तुमचे आम आदमीचे सरकार? आणि गावात गेले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, शाहु महाराजांचे सरकार आहे असे पोपटासारखे बोलतात. सभापती महोदय, तुमच्या सारखे जातीयवादी दुसरे कोणीही नाही. परंतु नाटक कंपनीमध्ये पैसे दिल्यानंतर पात्र जसे शब्द फेकतात तसे तुम्ही भाषणे देतात. रोजगार हमी योजनेमध्ये 1,61,682 कामगारांनी काम मागितले असता फक्त 278 कामगारांना 100 दिवसाचे काम देण्यात आले.आणि त्याला 200 रुपये खर्च करुन बँकेत खाते उघडावयास सांगितले. व्वारे गरीबांचे सरकार. ही

...2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी .....

माहिती माझी नसून केंद्रीय रोजगार हमी मंत्री श्री. रघुवंश प्रसाद सिंह, राष्ट्रवादी पक्षाचे केंद्रीय राज्य मंत्री श्रीमती सुर्यकांता पाटील यांनी म्हटले आहे की, " केंद्राने महाराष्ट्राला 478 कोटी रुपये दिले त्यापैकी महाराष्ट्र सरकारने फक्त 78 कोटी रुपये खर्च केले". आणि वरुन आम आदमी की सरकार, गरीबों की सरकार म्हणावयाचे ? गरीबांची क्रुर थट्टा करणा-या या सरकारचे माननीय राज्यपाल महोदय अभिनंदन करतात. मला अतिशय वाईट वाटते, त्यांच्याकडे बघून मला दया येते. शेवटी मी सुध्दा नाईलाजास्तव तुमचे अभिनंदन करतो.

सभापती महोदया, गिरणी कामगारांना या आघाडी सरकारने लुटले आहे. 80 हजार मिल कामगारांजवळ रोजी रोटीचा आता काहीही व्यवसाय नाही, त्यांना उपाशी पोटी बसून रहावे लागते त्यामुळे नाईलाजास्तव त्यांच्या मुलींना बार मध्ये काम करावे लागत आहे. या सरकारने गिरणी कामगारांना पहिल्यांदा 60 हजार घरे देण्याबाबत करार केला. टीसीआर रुलमध्ये तुम्ही तीन वेळा बदल केला व 33 टक्के जागा मिल मालकाला द्यावयाच्या असतांना तुम्ही 90 टक्के जागा मिल मालकाला दिल्या. मी जर चुकीची माहिती देत असेल तर तुम्ही मला चॅलेंज करा. आज मिलच्या ठिकाणी मॉल उभे राहिले आहेत. आता त्या ठिकाणी लायटींग सुरु आहे, एअर कन्डीशन्स सुरु आहे. आज या ठिकाणी मिलची जुनी आठवण म्हणून फक्त चिमणी दिसते.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी..

आतमध्ये मात्र सगळीकडे ए.सी.लावलेंले आहेत . हे काय गरीबांचे आणि आम आदमीचे सरकार आहे काय ? 33 टक्के प्लॉट देण्या ऐवजी 90 टक्के प्लॉट या बिल्डरांना देण्यात आलेले आहे. पैसे घेऊन त्यांना हे प्लॉट दिलेले आहेत. असा मी आपल्यावर आरोप करीत आहे. या आरोपाची चौकशी करण्यात यावी. डी.सी. रुल्समध्ये केस टू केस बदल करण्यात आला होता. परवाच्या दिवशी गिरणी कामगारांचे समेलन आयोजित करण्यात आले होते व त्या कार्यक्रमाला मी उपस्थित होतो. आंधळे आणि वयोवृध्द असे अनेक कामगार काठी टेकवत त्या संमेलनाला उपस्थित राहण्यासाठी आले होते. त्यांना जी काही कायदेशीर देणी द्यावयाची होती ती सुध्दा अजून दिलेली नाहीत. सन्माननीय नगर विकास राज्यमंत्र्यांनी असे सांगितले होते की,या कामगारांना बी.पी.एल.चे कार्ड देण्यात येईल परंतु हे कार्ड अजूनही त्यांना दिलेले नाहीत त्यामुळे या कामगारांची उपासमार होत आहे. तसेच या कामगारांना राहण्यासाठी घरेही नाहीत. काही कामगाराना उदरनिर्वाहाचे साधन नसल्यामुळे ते रस्त्यावर बसून लहान मोठे धंदे करीत आहेत . त्या कामगारांची युनियन इंटक आहे. या युनियनच्या अध्यक्षांनी कामगारांसाठी काय केले आहे ? मी देखील नागपूरच्या इंटकच्या युनियनचा अध्यक्ष आहे. श्री.हरिभाऊ नाईक यांचा पराभव करुन इंटकचा अध्यक्ष म्हणून मी निवडून आलो आहे. परंतु आता ते मला अडचणीचे झाले आहे. इंटक युनियन म्हणजे लक्ष्मी दर्शनाचा एक कार्यकम आहे. या शासनाने गरीब कामगरारांना लुटले आहे. या गिरण्यांच्या सगळया जागा विकून कामगारांना उद्ध्वस्त करण्यात आले आहे. आज त्यांच्या मुलांना नोक-या नाहीत, त्यांच्या मुली उघडयावर पडल्या आहेत. गिरणी कामगारांना उद्ध्वस्त केले आणि गिरणी मालकांना मात्र या शासनाने श्रीमंत केले आहे. हे आम आदमीचे आणि गरीब कामगारांचे सरकार आहे काय ?. या शासनाने हायकोर्टामध्ये खोटे प्रतिज्ञापत्र सादर केले होते. कामगारांच्या पोटावर लाथ मारुन हायकोर्टात खोटे प्रतिज्ञापत्र सादर करणाऱ्या सरकारचे माननीय राज्यपाल महोदयांनी अभिनंदन केले आहे. तेव्हा या निर्लज्ज सरकारचे त्यांनी अभिनंदन केले म्हणून मी देखील त्यांचे अभिनंदन करतो.

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी..

सभापती महोदय, शेवटचा एक मुद्दा मांडून मी माझे भाषण संपवितो. नियती फार क्रूर असते. फार काळ कोणीही लोकांना मूर्ख बनवू शकत नाही असे म्हटले जाते. सत्य काय आहे हे महाराष्ट्रातील जनतेला समजलेले आहे. कितीही भाडोत्री वाहनातून लोकांना पैसे देऊन सभेसाठी या शासनाने लोकांना एकत्र केले आणि कितीही मेळावे घेतले ,कितीही पोपटपंछी केली, कितीही घोषणा केल्या, कितीही आश्वासने दिली तरी या शासनाची विश्वासनीयता आता संपलेली आहे. लोक तुमच्या तोंडावर असे प्रश्न विचारावयास लागले आहेत की, तुम्ही या सभेमध्ये अमुक अमुक आश्वासन दिले होते त्याचे काय झाले होत ? , परंतु त्या प्रश्नाचे उत्तर तुम्ही देऊ शकत नाही. महाराष्ट्राची तुम्ही एक प्रकारे दुर्दशा केलेली आहे. या महाराष्ट्राची वाट लावणारे, महाराष्ट्राला कर्जबाजारी करणारे , महाराष्ट्राच्या शेतकऱ्यांच्या आत्महत्येला जबाबदार असलेले, बारबालांवर कारवाई करण्याचे धाडस दाखविणारे परंतु क्रिकेटच्या मॅचमध्ये उभे राहून अर्धवस्त्रात नाचणाऱ्या मुलींवर कोणत्याही प्रकारची कारवाई करण्याची हिंमत नसलेल्या या सरकारचे माननीय राज्यपाल महोदय का अभिनंदन करतात हे मला समजत नाही . मी त्यांचे अभिनंदन या करता करतो की, एवढे सगळे होऊन सुध्दा कोणत्याही प्रकारची संवेदनशीलता नसतांना हे राज्य मात्र चालू आहे. लक्ष्मी दर्शन घेतल्या शिवाय कोणालाही पुढे जाता येत नाही. लक्ष्मी दर्शन घेण्याचे काम जोरात सुरु आहे तरीसुध्दा हे सरकार अस्तित्वात आहे . परंतु या सरकारला जनता वठणीवर आणल्याशिवाय राहणार नाही असा मी विश्वास व्यक्त करतो आणि माझे भाषण संपवितो.

---

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी ज्या पद्धतीने या सरकारचे धिंडवडे काढले, जे ओरखडे काढले आहेत ते माननीय राज्यपाल महोदयांनी ऐकले असते तर या सरकारचे अभिनंदन करण्यासाठी ते आले असते की नाही याची मला शंकाच वाटते.

सभापती महोदया, मला अत्यंत दु:ख आणि खेद होतो की, माननीय राज्यपालांनी या अभिभाषणाची सुरूवात करताना केंद्र सरकारने 2008-09 च्या अंदाजपत्रकात शेतकऱ्यांचे 60 हजार कोटी रूपये कर्ज माफ करण्याच्या घेतलेल्या निर्णयाचे ऐतिहासिक व क्रांतिकारी निर्णय असे वर्णन करूनच सुरूवात केली आणि योगायोग असा आहे की, जेव्हा माननीय राज्यपाल महोदय दुपारी 1.00 वाजता त्या सदनामध्ये भाषण करीत होते, या सरकारचे अभिनंदन करीत होते त्याचवेळेस अकोल्यामध्ये एका शेतकऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यासमोर आत्महत्या केली आणि या अभिभाषणाचे स्वागत केले. ही या सरकारची पत या महाराष्ट्राच्या जनतेत आहे. सभापती महोदया, मी अकोल्याचे नाव एवढ्याचसाठी घेतले आहे की, आता या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.अरूण गुजराथी उपस्थित नाहीत. पण त्यांनी त्यांच्या एका भाषणात अकोल्याचे वर्णन कर्जमुक्तीचे तीर्थक्षेत्र असे केले आहे. कारण काय तर अशा प्रकारे कर्जमुक्ती होणार याचे सूतोवाच किंवा वल्गना म्हणा या अकोल्यामध्येच देशाच्या कृषीमंत्र्यांनी केले आणि मग देशात कर्जमुक्ती झाली. त्याच तीर्थक्षेत्री या शासनाचे अभिनंदन करीत असताना एका शेतकऱ्याने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आत्महत्या करून तुमच्या या निर्णयाची धिंड काढली. सभापती महोदया, या कर्जमुक्तीवर आमच्या समोरच्या मित्रांनी, त्यांच्या नेत्यांनी ज्या प्रकारे ढोल वाजविले तसे ढोल स्वातंत्र्यानंतरही कोणी वाजविले नसतील पण असे ढोल वाजवून सगळे पुढे निघाले. सभापती महोदय, आम्ही या कर्जमुक्तीच्या आंदोलनामध्ये शेतकऱ्यांना कर्जमुक्ती करा, त्यांचे 7-12 कोरे करा असे सांगितले होते. आता राष्ट्रवादी काँग्रेसचे अनेक नेते असे म्हणू लागले आहेत की, देशाचे कृषी मंत्री असलेल्या श्री.शरद पवार यांनी कर्जमुक्ती देणार असे म्हटले म्हणून यांनी म्हणजे आम्ही कर्जमुक्ती आंदोलन सुरू करून कर्जमुक्तीचे श्रेय घेण्याचा प्रयत्न सुरू केला. पण मी आपल्याला सांगू इच्छितो की, 2004 साली शिवसेना प्रमुख माननीय बाळासाहेब ठाकरे यांनी घोषणा केली होती की, माझ्याकडे सत्ता द्या आणि पुन्हा या राज्यात शिवशाही आणा. मी सर्व शेतकऱ्यांचे 7/12 कोरे करीन. तेव्हा पुढील

..... 3 जी 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते .....

काही वर्षांनी श्री.शरद पवार हे असे काही बोलणार आहेत असे त्यांना त्यावेळी स्वप्न पडले होते काय ? सभापती महोदया, आम्ही दोन्ही पक्षांनी, नेत्यांनी प्रामाणिकपणे हे आंदोलन केले. उद्धवजी ठाकरे यांच्या नेतृत्त्वाखाली प्रामाणिकपणे आम्ही या आंदोलनासाठी उभे राहिलो. या आंदोलनाद्वारे शेतकऱ्यांचा आक्रोश शासनापर्यंत पोहोचविण्याचा आम्ही प्रामाणिक प्रयत्न केला. सत्तेवर असलेल्या, लाल दिव्याच्या गाड्यांतून फिरणाऱ्या या सरकारातील मंत्र्यांपर्यंत, त्यांनी त्यांची जबाबदारी पार पाडावी म्हणून विरोधी पक्षानी निर्माण केलेल्या आंदोलनातून शेतकऱ्यांचा आक्रोश पोहोचविल्यानंतर असा काही निर्णय घेणे भाग पडले. तुम्हीच काय पण तुमच्या जागी आम्ही असतो तरी आम्हाला देखील ते करावे लागले असते. परंतु हे एवढे अकांड-तांडव करीत असताना तुम्ही हे विसरलात. एक तर आमच्यातूनच तुमच्याकडे गेलेल्या आणि मुख्यमंत्री पदाच्या शर्यतीत असलेल्याने तर एवढा मोठा क्रांतिकारी निर्णय घेतल्यानंतर देखील काँग्रेस निष्क्रीय झाली आणि मीच एकटा या पक्षात मर्द आहे हे दाखविण्यासाठी प्रेस कॉफरन्स घेतली आणि प्रेसवाले देखील आता ते काय मोठा फुगा फोडणार म्हणून लगेच त्यांच्याकडे धावले. त्या प्रेस कॉन्फरन्समध्ये ते म्हणाले की, काँग्रेसमध्ये सारे नपुंसक आहेत आणि म्हणूनच एवढ्या चांगल्या निर्णयाचे श्रेय घेण्यास कोणी पुढे येत नाही म्हणून त्याने सांगितले की, मी हे केले आहे. मीच पहिला, मीच मर्द. त्यात पुढे ते असेही बोलून गेले की, मुलगा आम्हाला झाला आणि पुढे कोण देते ते पहा. त्यावर मी देखील प्रतिक्रिया दिली. घरात शेजारच्याची जास्त उठबस असल्यानंतर तो जास्त पेढे का वाटतो हे जनतेलाही कळते. ....

( यानंतर श्री. सरफरे .....3एच 1 ..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

आम्ही पेढे कां वाटले म्हणून त्यांनी चिंता व्यक्त करावयाची. मुलगा आम्हाला झाला तर तुम्ही पेढे कां वाटता? माननीय श्री. आर. आर. आबा कोल्हापूरला म्हणाले की, मुलगा आम्हाला झाला तर तुम्ही साखर कां वाटता? असे आपण कोल्हापूरला केलेले भाषण छापून आले, ते मी आपणास दाखवीन. मला कळेना, मुलगा कुणाला झाला? माननीय श्री. आबा साहेब म्हणाले की, आम्हाला झाला. माननीय श्री. राणे साहेब म्हणाले की, आम्हाला झाला. हे पोरगे कुणाचे? प्रश्न असा आहे की, आम्ही या कर्जमाफीचे श्रेय घेण्यासाठी फिरलो नाही. दिल्लीमध्ये कुणी कुणावर बलात्कार केला, त्याबाबत आम्ही काय सांगणार? सभापती महोदया, मी हे एवढयासाठी मांडतो की, आपण कर्जमुक्ती केली. मागील चार-पाच वर्षात हजारो शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या झाल्या. आणि त्यामुळे माझ्या हजारो भगिणींचे कुंकू पुसले गेले. यासंबंधी सकाळच्या प्रश्नोत्तराच्या तासामध्ये उपस्थित झालेला विषय गंभीर आहे. मागील चार महिन्याच्या कालावधीत राज्यामध्ये 582 शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या झाल्या. त्यामध्ये विदर्भात 419 शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या आहेत. ग्रामीण भागामध्ये शेतकऱ्यांमध्ये एवढा आक्रोश निर्माण झाला आहे. ज्या सहा जिल्हयांचा प्रश्न घेऊन आम्ही हे आंदोलन उभे केले. त्याकरिता माननीय पंतप्रधानांनी महाराष्ट्रासाठी पॅकेज जाहीर केले त्याचा संबंध सहा जिल्हयांशी येतो. आत्महत्त्या विदर्भात झाल्या त्याप्रमाणे आत्महत्त्या मराठवाडयात झाल्या, आत्महत्त्या पश्चिम महाराष्ट्रात झाल्या. त्यामुळे विरोधी पक्षांनी हा विषय लावून धरला. महाराष्ट्रामध्ये झालेल्या आत्महत्त्या हे चुकीच्या कृषी धोरणाचे फलित आहे. कर्जमाफी झाल्यानंतर आम्ही आमची पाठ थोपटून घेण्यासाठी राज्यामध्ये फिरत नाही. कर्जबाजारीपणामुळे उद्ध्वस्त शेतकऱ्याला दिलासा देण्यासाठी केंद्र सरकारने उचललेले हे पाऊल आहे. अशाप्रकारे नगारे पिटण्यात आले. माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी म्हणतात त्याप्रमाणे त्यांच्या नेत्यांनी आनंदयात्रा काढली. आता चेतना दिंडी काढीत फिरत आहेत. हे दिंडी कुणी काढावयाची यावरुन देखील दिल्लीमध्ये भांडण लागले आहे. माननीय श्रीमती सोनिया गांधी, माननीय पंतप्रधान श्री. मनमोहनसिंग यांनी चेतना दिंडी काढावयाची की, माननीय केंद्रीय कृषी मंत्र्यांनी काढावयाची यावरुन भांडण लागले आहे. त्याचे आपल्याला काय करावयाचे आहे? महत्वाचा विषय असा आहे की, आम्ही न थांबता न थकता गेली साडे चार वर्षे अविरत श्रम करुन शेतकऱ्याचा आवाज उठविला, त्यांच्या व्यथा सभागृहापुढे मांडल्या. कोणतेही राजकारण न करता मांडल्या. या

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KTG/ SBT/

श्री. दिवाकर रावते...

देशामधील एकाही राज्यामध्ये आत्महत्तेच्या विरोधात आंदोलन झाले नाही. फक्त महाराष्ट्रामध्ये झाले, त्याची चर्चा देशभर झाली. लोकसभेमध्ये महाराष्ट्रातील आत्महत्त्येची चर्चा झाली. जगाच्या पाठीवर झाली. दोन ऑक्टोबरला महात्मा गांधी जयंती दिन साजरा होत असतांना सर्व देशात प्रार्थना झाल्या. महाराष्ट्रामध्ये आत्महत्या झालेल्या सर्व शेतकऱ्यांना सद्‌गती मिळावी याकरिता जगभर प्रार्थना झाली. परंतु हा विषय महाराष्ट्राचा असतांना तुम्ही देशासाठी कर्जमाफी जाहीर केली हे ठीक केले. त्यानंतर आपण मोठया प्रमाणावर जाहिराती केल्या त्याविषयी मी बोलत नाही. दोन दिवसानंतर आपल्या लक्षात आले की, जाणता राजाच्या नावाने बडविलेले ढोल फुटले. आता गडबड होऊन शेतकरी आपल्या अंगावर येणार असे आपल्याला वाटू लागले आहे. त्यावेळी ताबडतोब माननीय श्री. उध्दवजी ठाकरे आणि मी विदर्भामध्ये गेलो. त्याचे श्रेय घेण्यासाठी गेलो नाही. या निर्णयाचा विदर्भाला बिलकुल फायदा झालेला नाही अशी विदर्भामध्ये पहिली प्रतिक्रिया आम्ही दिली. या निर्णयामुळे जर काही घडले असेल तर या विदर्भाच्या भूमितून आत्महत्त्येचा प्रश्न निर्माण झाला त्याचे उत्तर शोधण्याचा आपण प्रयत्न केला. परंतु यामध्ये शेतकऱ्यांचे वाटोळे झाले आहे. विदर्भातील शेतकरी उद्‌ध्वस्त झाला असतांना या निर्णयाचा फायदा मराठवाडा, विदर्भाला झाला नाहीतर हा फायदा पश्चिम महाराष्ट्राला झाला अशी प्रतिक्रिया ताबडतोब दिली. याचा थोडासा रिलिफ 5 एकरापर्यंतच्या शेतकऱ्यांचा मिळेल. म्हणून क्षणभराच्या आनंदासाठी काही लोकांनी साखर वाटली. आम्ही पेढे, लाडू वाटले नाही. अपंग मूल जन्माला आले, त्यामुळे तुम्ही साखरेवर निभावले.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती (श्रीमती उषाताई दराडे)** : मला सन्माननीय सदस्यांना असे सांगावयाचे आहे की, मराठी भाषा फार सुंदर आहे. ती चांगल्या पध्दतीने वळेल. आपल्याला देखील ती चांगल्या पध्दतीने वळविता येईलच.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी मूल अपंग आहे असे म्हणालो आहे.

**तालिका सभापती** : मी आपल्याविषयी बोलत नाही. मी मराठी भाषेविषयी बोलत आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदया, ते मूल अपंग झाले. पण मूल कसे झाले आहे हे पाहण्यापूर्वी मूल झाले, मूल झाले, मूल झाले अशा प्रकारे सगळे ढोल बडवत सुटले. यावेळी आघाडीवर पिपाण्या वाजविल्या गेल्या. त्यावेळी अकोला येथे बबनराव देखील होते. मग तेथून ते सुसाट निघाले आणि अख्या गावभर, अख्या महाराष्ट्रभर धुमाकूळ घातला की, आम्ही केले, आम्ही केले.मग माननीय मंत्री श्री.नारायण राणे म्हणाले की,"ये क्या भानगड है.हम किधर नाही ?" आमचे काय ? मग त्यांना साक्षात्कार झाला की, हे जाणता राजाच्या संबंधात काही आहे. त्यांनी एक फार महत्वाचा प्रश्न विचारला की, आठ खासदारांच्या जीवावर तुम्हाला कर्जमाफी देता येते काय ? पण अजून तुम्ही या प्रश्नाचे उत्तर दिलेले नाही. ज्यांचे फक्त आठच खासदार आहेत, त्यांची कर्ज मुक्ती देण्याची ताकद आहे काय ? म्हणजे मूल आमच्याकडे आणि मिशीला तुमचे तूप कशासाठी ? हा प्रश्न त्यांनी विचारलेला आहे, मी नाही. आता माननीय मंत्री महोदय याठिकाणी हवे होते. ते येथे असते तर मला बरे वाटले असते. मग मी त्यांना विचारणारच होतो की, बाकी तुम्ही सगळे सांगितले. असेही सांगण्यात आले की, श्रीमती सोनियाताई येणार आहेत, अमुक येणार आहेत, तमुक येणार आहेत. परंतु आता कर्ज माफ झाल्यानंतर गोंधळ उडालेला आहे. त्यानंतरही 27 आत्महत्या झालेल्या आहेत. यासंबंधात सकाळीच विषय उपस्थित झाला असल्याने मी तो परत मांडत नाही. सकाळी जी चर्चा झाली, त्यावेळी मी माझ्याकडील सगळीच्या सगळी नावे सदनामध्ये वाचणार होतो. पण माननीय सभापती महोदयांनी सांगितले की, जाऊ दे, विषय समजलेला आहे. या विषयाच्या बाबतीत मी अशी प्रतिक्रिया दिली होती की, आता विदर्भातील आत्महत्या वाढतील. त्यानंतर आदरणीय श्री.शरद पवारसाहेबांनी बीड येथील मेळाव्यामध्ये एक सुधारणा केली. त्यांनी असे सांगितले की, यामध्ये जिरायत,अमुक-तमुक वगैरे पहावे लागेल. त्यांनी असे सांगितल्या नंतर मग हे सर्व नेते हडबडले. त्यांना असे वाटू लागले की, आपण कालपासून ढोल पिटत होतो. मग आता कोणती गडबड झाली.आपणही त्या मेळाव्याला उपस्थित होतात.मला त्यांची भूमिका आवडली

. . . .3 आय-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

नाही, असे काही नाही. त्यांनी सांगितले की, महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचा घात झालेला आहे. ही बाब माननीय केंद्रीय कृषी मंत्र्यांच्या लक्षात आली आहे. पण अगोदर जाहिराती देऊन फसले, हे आम्हीच केले आहे असे सांगून बसले. पण अजून शेतकरी आत्महत्या करीत आहेतच. मघाशी सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे हे बुमरँग होणार आहे आणि मग तुम्हाला शेतकरी माफ करणार नाही. मला माननीय गृहमंत्र्यांना एकच सांगावयाचे आहे की, तुमचे शेवटचे भाषण बरोबर आहे. त्यानंतर मी तुमचे कोणतेही भाषण झाल्याचे ऐकलेले नाही. तुम्ही सांगितले की, विरोधी पक्षाने आपले काम केले आणि सरकारने आपले काम केले. अशा प्रकारचे तुमचे शेवटचे सावध भाषण होते. बीडनंतर बसलेल्या फटक्यानंतरचे हे भाषण आहे.

श्री.आर.आर.पाटील (खाली बसून) : त्या अगोदरही भाषण केलेले आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदया, बीड येथील मेळाव्यानंतर जी सभा झाली, त्या सभेतील तुमचे हे भाषण आहे. माननीय गृहमंत्र्यांनी भाषणामध्ये असे सांगितले की, विरोधी पक्षाने आपले काम करुन जनतेची व्यथा मांडली आणि सरकारने आपले काम केले.पण त्यापूर्वी तुम्हाला असे वाटले होते की, आमच्या साहेबांनीच हे काम केले आहे. अहो, तुमचे साहेब काय म्हणाले होते ? माननीय शिवसेना प्रमुखांच्या वक्तव्यावर त्यांनी अशी प्रतिक्रिया दिली होती की, "मोफत वीज आणि कर्जमाफी या गोष्टी अव्यवहार्य आहेत." त्यावेळी तेथे पत्रकार देखील हजर होते. नागपूर येथील पत्रकार आता सुध्दा पत्रकार कक्षामध्ये हजर असतील. जेव्हा आदरणीय केंद्रीय कृषीमंत्री श्री.शरद पवार नागपूरला आले होते, त्यावेळी त्यांना पत्रकारांनी विचारले होते की, विदर्भामध्ये एवढया मोठया प्रमाणात आत्महत्या होत आहेत. त्यावर त्यांनी असे उत्तर दिले होते की, मी देशाचा कृषीमंत्री आहे, महाराष्ट्र राज्याचा नाही. हे त्यांचे उत्तर वर्तमान पत्रामध्ये छापून आलेले आहे. ही त्यांची आस्था आहे. जर तुम्हाला शेतकऱ्यांच्या आत्महत्येबद्दल एवढी आस्था होती, तर या सदनामध्ये झालेल्या शेतीच्या संदर्भातील चर्चेबाबत आपण कोणती दखल घेतली आहे ? बी-बियाणांमध्ये होणाऱ्या फसवणुकीच्या संदर्भातील कायदा केंद्र शासनामार्फत करुन देतो असे मला या सदनामध्ये आश्वासन दिले होते.पण अजूनही हा कायदा झालेला नाही.फक्त घोषणा केली आहे. औषधांच्या फसवणुकीच्या संदर्भात देखील अजून कोणताही कायदा अस्तित्वात नाही.जागतिक व्यापाराच्या संदर्भात सांगावयाचे तर कापूस आणि साखरेच्या बाबतीत इम्पोर्ट आणि एक्सपोर्ट ....

. . . .3 आय-3

श्री.दिवाकर रावते . . . .

ड्युटीच्या अनुषंगाने जो गोंधळ झालेला आहे, तो अजूनही निस्तरलेला नाही. त्यामुळेच कापसाचे भाव, शेतक-यांच्या आत्महत्या वगैरे प्रश्न निर्माण झाले आहेत, त्याबाबत कोणतेही धोरण आखलेले नाही. जेव्हा लोकसभेमध्ये अर्थसंकल्प मांडला जातो, त्यावेळी सर्व सन्माननीय सदस्यांना "देशाची आर्थिक पाहणी"असा एक अहवाल दिला जातो.आपल्या राज्यामध्ये अर्थसंकल्प मांडताना देखील सन्माननीय सदस्यांना "राज्याची आर्थिक पाहणी "असा अहवाल दिला जातो. देशाच्या आर्थिक पाहणीमध्ये असे म्हटलेले आहे की, कृषी क्षेत्राची प्रगती 4.82 वरुन 2.62 पर्यंत घसरलेली आहे आणि हे माननीय कृषीमंत्र्यांचे कर्तृत्व आहे.

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .......

हे कृषी मंत्र्यांचे कर्तृत्व कालच्या आर्थिक पाहणीमध्ये आलेले आहे. हे मी म्हणत नाही. आपण ढोल पिटा. हे अभिनंदन करताना या भाषणाची जी सुरुवात झाली आहे ते अभिनंदन किती फसवे आहे आणि या सरकारच्या धोरणामध्ये किती फोलपणा आहे हे दिसेल. कशासाठी हे करता ? तुमचे कर्तव्य आहे. मला आबांना प्रश्न विचारावयाचा आहे. आपण उत्तरामध्ये सांगावे की, होय, वेळ पडली तर आमची पूर्ण तिजोरीच्या तिजोरी रिती करु आणि शेतकऱ्यांकरिता ओतून टाकू. एकदा दोनदा नव्हे तर आबांचे पाच वेळा भाषण झालेले आहे. आपण राज्यकर्ते आहात. आपण लोकांना किती फसवता ? आम्ही अशी भाषणे केली तर लोक म्हणतील यांच्याकडे काय आहे ? पण आपण स्वत: राज्यकर्ते आहात आणि आपण लोकांमध्ये जाऊन विरोधी पक्षाला शोभेल अशी भाषणे करता. आता आपण कोठली तिजोरी रिती करणार आहात ते सांगावे. माननीय मुख्यमंत्र्यांनी या सदनामध्ये उत्तर देताना सांगितले होते. त्यावेळी माननीय उपमुख्यमंत्री शेजारी बसले होते. मुख्यमंत्र्यांनी असे उत्तर दिले होते की, केंद्राने आपली जबाबदारी निभावल्यावर राज्य आपली जबाबदारी निभावेल. आपणही परत ते कोठे तरी बोललात. आता आमचे सरळसरळ असे म्हणणे आहे की, राज्यपालांच्या या अभिभाषणामध्ये आपले अभिनंदन झालेले आहे. त्या अभिनंदनाला आपण योग्य आहात की अयोग्य आहात ? मी लायक, नालायक असा शब्द वापरत नाही. त्यासाठी आपण योग्य आहात की अयोग्य आहात हे ठरविण्याची वेळ आलेली आहे. आपण या सदनामध्ये शेतकऱ्यांना जे आश्वासित केलेले आहे की, आम्ही आमचा भार उचलू तर उद्या आपल्या भाषणामधून आपण ते जाहीर करावे की, राहिलेले जे शेतकरी आहेत त्यांचा सातबारा कोरा करण्याकरिता आणखी 5-7 हजार कोटी रुपये लागणार आहेत ते आम्ही देऊ. तुमची ती हिंमतच नाही. कारण आताच सांगितल्याप्रमाणे 16 हजार कोटीचे कर्ज मागितले तर आपल्याला 60 कोटी रुपये कोणी देत नाहीत तर याकरिता आपल्याला कोण पैसे देणार हा प्रश्न निर्माण झालेला आहे. म्हणून केंद्र सरकार काय करते याची सगळे वाट बघत बसले. आपली पत बाजारात राहिलेलीच नाही. कष्टकऱ्याला मजुरी तरी मिळते पण यांनी कष्ट केले तर कालची उधारी फेडतो आणि परत उद्या कष्टाला ये म्हणून सांगतात अशी यांची अवस्था आहे. यामध्ये पॅकेजचे कौतुक झाले. मी खरोखरच

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ KTG/

श्री. दिवाकर रावते .....

जास्त बोलणार नाही पण मला अत्यंत दु:ख होते. माननीय पंतप्रधानाचे पॅकेज आले, सरकारचे पॅकेज आले ते प्रामाणिकपणाने आले. ते शेतकऱ्यांना मदत देण्याकरिता आले. पण मंत्र्यांची जबाबदारी होती की नाही ? ज्या ठिकाणी पालकमंत्री राष्ट्रवादीचा असेल त्या ठिकाणी कॉंग्रेसचा संपर्कमंत्री आणि ज्या ठिकाणी कॉंग्रेसचा पालकमंत्री असेल त्या ठिकाणी राष्ट्रवादीचा संपर्कमंत्री हे कोण किती खातो, वाटा देतो की नाही यामध्येच पडलेले असतात. या पॅकेजकरिता जर पालकमंत्र्यांनी आणि संपर्कमंत्र्यांनी ठाण मांडले असते तर एकाही अधिकाऱ्यांने भ्रष्टाचार केला नसता. आबा, मी आपल्याला आव्हान देतो. आपण विदर्भात चला. त्या पॅकेजमध्ये आलेल्या सर्व गोष्टी पहा. पशुसंवर्धन आणि दुग्धविकास मंत्रालयाचे मी या ठिकाणी वाभाडे काढले. त्या ठिकाणी गाई-म्हशी वाटल्या. हिंमत असेल तर या अधिवेशनात नाही तर पुढच्या अधिवेशनात मांडावे की, त्या ठिकाणी किती गाई-म्हशी गेल्या. किती बोगस गेल्या, किती वाटा खाल्ला ते सांगावे. 25 हजार रुपयांची गाय असेल तर 10 हजार रुपयांचा चेक शेतकऱ्याच्या हातात आणि 15 हजार रुपये अधिकाऱ्यांच्या हातात असे घडले नसेल तर मी इथून निघून जाईन. दोष आपला नाही पण जे अधिकारी हे करीत आहेत त्यांच्यावर आपला अंकुश नाही. आपण त्यांना हात लावण्यास तयार नाही. काय भानगड आहे हे कळत नाही. त्या ठिकाणी भाकड गाई, भाकड म्हशी वाटल्या. हे सगळे चाललेले आहे. शासनाच्या पैशाने मेळावे घेतले. कशासाठी असे मेळावे घेतले ? कशासाठी पैसे उधळले. माझ्याकडे सर्व माहिती लॅपटॉपमध्ये आहे. मी तो आणला असता तर सर्व दाखवले असते. श्री. गडकरी साहेब, मी सकाळी उल्लेख केला. आपण सांगितले की, ठीक आहे हो, योग्य आहे की अयोग्य आहे ते सोडून द्या पण आत्महत्या झाली आहे ना, मग 1 लाख रुपये द्या. त्यामुळे त्यांच्या विधवेला आणि मुलांना आधार तरी वाटेल. आपण 60 हजार कोटीचे ढोल बडवत फिरत आहात. आणखी पाच दहा कोटी रुपये गेले असते तर किमान माझ्याच महाराष्ट्राच्या मातीतील भूमिपुत्रांच्या घराच्या उद्‌ध्वस्ततेला सरकारचा आधार मिळाला असे वाटले असते की नाही ?

यानंतर श्री. खंदारे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

ते का करीत नाहीत असा मला प्रश्न पडला आहे. हा सर्व पैसा उधळला जात आहे. या पॅकेज अंतर्गत दूध डेअ-या वाटण्यात आल्या, त्यामध्ये भांडणे झाली, हाणामा-या झाल्या आहेत. विदर्भातील आमच्या सहकारी मित्रांना याची माहिती आहे. पंतप्रधानांच्या पॅकेज अंतर्गत या दूध डेअ-या राष्ट्रवादी कॉंग्रेस व कॉंग्रेसच्या लोकांना वाटण्यात आल्या. वास्तविक या डेअ-या सामान्य शेतक-यांना द्यावयाच्या होत्या. माननीय उपमुख्यमंत्र्यांनी यासंबंधीची चौकशी करुन सभागृहासमोर यादी ठेवावी. इनकम् टॅक्स रिटर्न भरणा-या कार्यकर्त्यांना दूध डेअ-या वाटल्या आहेत. यावर नियंत्रण कोणाचे आहे ? पंतप्रधान पॅकेज अंतर्गत गाईंचे वाटप कशाप्रकारे केले जाते ते सांगतो. 50 टक्के अनुदानित, विशेष घटक योजनेंतर्गत 100 टक्के अनुदानित, सुवर्ण जयंती योजनेंतर्गत 50-50 टक्के अनुदानित वाटल्या जातात. परंतु त्यातील 70 टक्के भाग या योजनेचा भाग अधिका-यांनी गिळंकृत केला. या पॅकेजचा फायदा शेतक-यांना व्हावयास पाहिजे होता, परंतु अधिका-यांना या पॅकेजचा फायदा झाला आहे, असे घडले आहे हे सत्य आहे. मी मागील वेळी सुध्दा सांगितले होते की, अशा अधिका-यांच्या घरावर सरकारने नांगर फिरवावा. त्यांना त्या पदावर ठेवू नका, परंतु अजूनही तशाप्रकारची कारवाई होत नाही. सरकारला माहीत नसेल पण हे सत्य आहे. या पॅकेजचा या अभिभाषणात उल्लेख केला म्हणून मी हे सर्व सांगितले आहे.

सभापती महोदय, दूध भेसळीचा एक नवीन विषय निर्माण झाला आहे. दूध भेसळ प्रतिबंधक कायदा करण्यात आल्यानंतर भेसळीची अनेक प्रकरणे उघडकीस आली. दूध उत्पादक शेतकरी राष्ट्रवादी कॉंग्रेस व कॉंग्रेसचे आहेत. दुधामध्ये युरिया मिसळून दुधाचे फॅट वाढाविणा-यांचे दूध घेतले जात आहे आणि सामान्य लोकांचे दूध परत पाठविले जात आहे. हे सत्य आहे, कारण मी रात्री फिरत असतो, डोळयांनी पाहत असतो. या पशुसंवर्धन विभागामध्ये एवढया मोठया प्रमाणावर घोटाळे झाले असताना संबंधित मंत्र्यांना हात लावता येत नाही. कारण केंद्रामध्ये त्यांचे गॉडफादर बसलेले आहेत. त्यांचा सर्व भ्रष्टाचार बाहेर काढला आहे. परंतु या पॅकेजचे कौतुक करुन सांगितले आहे. राज्यपालांना कळले असते तर त्यांनी सरकारचे अभिनंदन केले नसते. सभापती महोदय, अवजार खरेदीमध्ये सुध्दा प्रचंड भ्रष्टाचार झालेला आहे, त्याची चौकशी केली जाईल असे

2....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ KTG/

श्री.दिवाकर रावते....

सांगितले जाते, परंतु प्रत्यक्षात चौकशी केली जात नाही.

"या मुंबई शहराला जागतिक दर्जाचे शहर बनविण्याच्या योजनेचा एक भाग असलेले गेटवे ऑफ इंडियाच्या परिसराच्या सुशोभिकरणाचे कामही प्रगतिपथावर आहे." अशाप्रकारचा उल्लेख या अभिभाषणात करुन सरकार स्वतःची टिंगल स्वतः का करुन घेत आहे ? या सुशोभिकरणाचा भाग असलेले काम मागील 5 वर्षापासून सुरु आहे. सुशोभिकरण झाले म्हणजे हे शहर जागतिक दर्जाचे होईल काय ? सरकारच्या अपंगत्वाचा हा दाखला आहे, असे मला वाटते.

राज्याचे गृहनिर्माण धोरण हाही एक सरकारला चिंतन करावयास लावणारा विषय आहे, परंतु अद्याप तो विषय सभागृहासमोर आलेला नाही. मागील 3 अभिभाषणांमध्ये त्याचा उल्लेख झालेला आहे. त्या धोरणानुसार गरीब लोकांसाठी किती घरे बांधण्यात येणार आहेत ते स्पष्ट व्हावयाचे आहे. बोलाचाच भात, बोलाचीच कढी...अशातील हा प्रकार आहे.

सभापती महोदय, या राज्यातील 128 विशेष आर्थिक क्षेत्रांना मान्यता मिळालेली आहे. माननीय उपमुख्यमंत्र्यांच्या प्रामाणिकपणाबद्दल आम्हाला आणि संपूर्ण महाराष्ट्राला शंका नाही, परंतु त्यांचे गणित कसे काय बिघडले आहे ते समजत नाही. ते नेहमी कोपरापासून ढोपरापर्यंत सोलण्याची भाषा करतात. त्यांना अशाप्रकारचे शब्दप्रयोग करण्याची सवय लागली आहे. एखाद्या कारखानदाराने शेतक-यांची जमीन ताब्यात घेतली तर त्या कारखानदारास जेलची हवा खाण्यास पाठविले जाईल असे त्यांनी एका ठिकाणी म्हटले आहे. कोणत्याही भांडवलदाराने, कारखानदाराने शेतक-यांची जमीन घेतली तर त्याला तुरुंगात पाठवू असे म्हटल्यावर सगळया वर्तमानपत्रात श्री.आर.आर.पाटील यांच्या या वक्तव्याची बातमी हेड लाईनमध्ये छापून आली.

नंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते....)

जरा काही झाले की आबा पटकन बोलतात. सभापती महोदय, मला सांगायला अतिशय वाईट वाटते की या सरकारने शेतक-याची निर्घृण चेष्टा चालविलेले आहे. शेतक-यांच्या घरी जाऊन कमिटी विचारते की, तो दारु पित होता काय? त्याची पत्नी सांगते की होय, कधी तरी ते घेत होते. मग दारु पिऊन आत्महत्या केली असा रिपोर्ट कमिटी देते. रायगड जिल्हयामध्ये काही लोक स्पिरिट पिऊन मेले. त्यांना एक-एक लाख रु. मदत दिली. म्हणजे दारु प्या आणि मरा आणि एक लाख रु. घ्या. पण कर्जाला, नापिकीला वैतागलेला शेतकरी कधी तरी दारु प्याला असेल तर त्याबाबतीत मात्र सांगितले जाते की शेतक-याने दारु पिऊन आत्महत्या केली. अशा प्रकरणी त्या शेतक-याला एक लाख रुपयाची मदत दिली जात नाही. परंतु स्पिरिट पिऊन जे मेले त्यांना मात्र एक लाख रु.ची मदत शासनाने दिली. ज्ये स्पिरिट प्याले ते व्यसनाधीन होते म्हणून ते स्पिरि प्याले, दुर्दैवाने ते विष प्याले आणि मेले. त्याबाबतीत शासनाने एकेक लाख रु. मदत केली. त्याबद्दल माझी तक्रार नाही. सभापती महोदय, वणीमध्ये बसला अपघात झाला पण अजून बस चालकावर कलम 302 खाली गुन्हा दाखल झालेला नाही. 42 प्रवासी क्षमता असलेल्या बसमध्ये 82 लोक कोंबले होते. आमच्या मराठवाड्यामध्ये बेकायदेशीरपणे वाहने चालविली जातात. बसमधून 35 ऐवजी 70-80 लोक नेले जातात. बेकायदेशीर गोष्टी बंद करण्याची शासनामध्ये क्षमता नाही, बेकायदेशीर गोष्टींना शासन शरण गेले आहे. कायद्याचे उल्लंघन करणा-यांना शिक्षा करता येत नाही आणि मग अपघात होतात आणि त्या अपघातात मृत्यू पावलेल्याना 1 रु. दिले जातात. सभापती महोदय, पण शेतक-याने नापिकी आणि कर्जबाजारीपणामुळे आत्महत्या केली असेल तर त्याने दारु पिऊन आत्महत्या केल्याचे सांगून त्याला मदत नाकारली जाते. त्याला मदत करताना ही कमिटी ती कमिटी असे केले जाते. 512 शेतक-यांनी आत्महत्या केल्या आणि त्यापैकी फक्त 165 जणांनाच मदत करण्यात आली. मुंबई सेंट्रल येथे खोपडी पिऊन 82 माणसे मेली त्यावेळी केवढी धांदल झाली. लगेच एक लाख रु. दिले. पण ते सर्व व्यसनी होते. शासनाचे हे किती नादानपणाचे धारेण आहे आणि त्याचे अभिनंदन आम्ही करायचे काय असा प्रश्न निर्माण होतो

सभापती महोदय, स्वातंत्र्यसैनिकांना निवासी प्रयोजनांसाठी जमीन देण्याबाबतच्या योजनेत सुधारणा करण्यात आली आहे, असे अभिभाषणामध्ये नमूद करण्यात आलेले आहे. महाराष्ट्रामध्ये

..2..

(श्री. दिवाकर रावते.......)

बोगस स्वातंत्र्यसैनिक निघाले, कोर्टाने त्याबाबतीत आदेशही दिले. त्याबाबतीत कोणतीही कारवाई केलेली नाही. शासनाच्या माध्यमातून आपल्या पक्षाच्या कार्यकर्त्यांमधील कोणाला कलाकार तर कोणाला स्वातंत्र्यसैनिक बनवायचे आणि सरकारच्या तिजोरीची लुटालूट करायची असे काम या माध्यमातून होत आहे. तेव्हा याबाबतीत माननीय उप मुख्यमंत्री कारवाई करणार आहेत की नाही, असा माझा त्यांना प्रश्न आहे.

अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक फी, परीक्षा फी माफ करण्यात आल्याचे या अभिभाषणामध्ये सांगितलेले आहे. सभापती महोदय, आजच सकाळी मला जालना जिल्ह्यातून फोन आला होता. अजूनही खाजगी विद्यालयामधून अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांनी शैक्षणिक आणि परीक्षा फी भरावी लागते हे मी या ठिकाणी मुद्दाम नमूद करीत आहे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

सभापती महोदया, माननीय राज्यपालांना देखील आपण किती कमीपणा आणता आहात त्यासंबंधीचा एका मुद्याचा मी या ठिकाणी उल्लेख करु इच्छितो. "माझ्या शासनाने न्यायालयांमध्ये मराठी भाषेच्या वापराला उत्तेजन दिले आहे आणि त्यानुसार दुय्यम न्यायालयांमधील न्यायाधीशांनी मराठीमध्ये न्यायनिर्णय देण्यात सुरुवात केली आहे." सभापती महोदया, माननीय राज्यपालांनी असत्य भाष्य केले तर त्यांचेविरुध्द विशेषाधिकारभंगाची सूचना दाखल करता येते काय ? सभापती महोदया, मी शेवटचा मुद्दा मांडून माझे भाषण संपविणार आहे. न्यायालयात मराठीचा वापरासाठी असलेले सॉफ्टवेअर डेव्हलपकरण्यासाठी 25 लाख रुपयांचा निधी पडून आहे. साफ्टवेअरचा वापर केला नाही म्हणून न्यायमूर्ती श्री. शरद बोबडे आणि श्री. विलाल नचकी यांनी शासनाला आठ दिवसात ॲफीडेव्हीट सादर करण्यास सांगितले आहे. या ठिकाणी माननीय राज्यपाल म्हणता आहेत की, न्यायालयात मराठी भाषा सुरु झाली आहे. आतापर्यंत मराठीच्या सॉफ्टवेअरचा उपयोग न्यायालयात का केला नाही म्हणून सरकारला नोटीस दिली आहे. माननीय राज्यपालांकडून सरकार किती असत्य वदवून घेणार आहे ? आम्हाला यातना होत आहे की, सरकारने माननीय राज्यपालांचे भाषण तयार करुन देऊन त्यांना देखील फसविण्याचे काम केलेले आहे. मी एवढेच सांगू इच्छितो की, मराठी भाषेच्या अंमलबजावणीच्या बाबतीत शासन अजूनही जागरुक नाही. यासंदर्भात मी विशेषाधिकारभंगाची सूचना देणार आहे.

शेवटी मी एकच गोष्ट सांगू इच्छितो की, श्री. एस.एम.कृष्णा राज्यपाल पदावरुन दुसरीकडे गेले. या ठिकाणी माननीय राज्यपाल श्री. जमीर यांनी अभिभाषण केले. मला जी काही माहिती मिळाली ती नंतर मिळाली. परंतु ती माहिती मला वेळीच मिळाली असती तर माननीय राज्यपालांचा निषेध करण्याची वेळ आली असती. आमच्या महाराष्ट्रात जी रीतभात आहे ती माननीय राज्यपालांनी पाळावी. त्यांना काय वाटते याकरिता त्यांना सन्मान नाही. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. मधुकरराव सरपोतदार यांनी उल्लेख केला की, महाराष्ट्रामध्ये असे ठरलेले आहे की, प्रत्येक अधिवेशनाची सुरुवात वंदे मातरम्ने होते आणि अधिवेशनाची सांगता ही राष्ट्रगीताने होते. माननीय राज्यपालांनी सांगितले की, मला वंदे मातरम् नको आहे, मला कार्यक्रम सुरु होण्यापूर्वी आणि संपण्यापूर्वी राष्ट्रगीत हवे आहे. श्री. एस.एम.कृष्णा गेले ते बरे झाले. ते या राज्यातून गेले त्याचा आम्ही आनंद व्यक्त करतो. वंदे मातरम् संबंधी त्यांच्या डोक्यात द्वेष घुसला होता हे

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

आम्हाला नंतर कळले. त्यांचा द्वेषाबद्दल आम्ही खेद व्यक्त करतो. माननीय राज्यपालांचा खेद व्यक्त करता येत नाही असे कोणी सांगितले तर मी राज्यकर्त्यांना एवढेच सांगतो की, आज सत्तेवर तुम्ही आहात, भविष्यात आम्ही सत्तेवर येऊ शकतो. महाराष्ट्रातील प्रथा परंपरा आणि संकेत यांचा सन्मान हा ठेवला गेला पाहिजे. वंदे मातरम्साठी हजारो बळी गेले.अनेकांनी रक्त सांडले. त्याच्यासाठी द्वेष मानू नका. मुस्लीम समाज मानत नाही म्हणून तुम्ही तसे करु नका एवढीच माझी या शासनास विनंती आहे.

सभापती महोदया, मी शेवटचा एक मुद्दा या ठिकाणी उपस्थित करीत आहे. या ठिकाणी राज्य सरकारकडून मोठया अर्विभावात सांगितले गेले की, राज्यातील मदरशा आहेत, त्यांना अनुदान देण्यात येणार आहे. तो समाज आपल्या प्रवाहात आला पाहिजे. त्या शाळेतील विद्यार्थ्यांनी महाराष्ट्रातील अभ्यासक्रम शिकला पाहिजे. 15 ऑगस्टला शाळेत तिरंगा फडकवा, आम्ही तुम्हाला अनुदान देऊ असे या देशातील सरकारकडून सांगितले जाते ही गोष्ट बरोबर नाही. या शाळा आपल्याच देशात आहेत, महाराष्ट्रात आहेत, तरी देखील शाळेत तिरंगा फडकवा, आपल्याला अनुदान दिले जाईल म्हणून सांगितले जाते ही बाब अतिशय खेदजनक बाब आहे हे पुन्हा मी नमूद करु इच्छितो. देशातील आणि राज्यातील प्रत्येक शाळेत नियम आहे की, शाळेत विद्यार्थ्यांची प्रार्थना झाल्यानंतर शाळेतील सर्व विद्यार्थी " भारत माझा देश आहे, सारे भारतीय माझे बांधव आहेत, मी या देशाचा नागरीक आहे " अशी प्रतिज्ञा रोज घेत असतात. परंतु मदरशांच्या शाळेत आजही प्रतिज्ञा घेतली जात नाही तरी देखील तुम्ही अनुदान देता आहात ते अनुदान ताबडतोब बंद करण्यात यावे अशी माझी मागणी आहे. मदरशामध्ये मुस्लीम समाजाचे विद्यार्थी शिक्षण घेत असले तरी " भारत माझा देश आहे, सारे भारतीय माझे बांधव आहेत, या देशाचा मी नागरिक आहे" अशी प्रतिज्ञा घेण्याची सक्ती शासनाने करावी अन्यथा त्या शाळांचे अनुदान बंद करावे अशा प्रकारची मागणी करतो आणि आपण मला बोलण्याची संधी उपलब्ध करुन दिली त्याबद्दल आभार मानतो आणि माझे भाषण संपवितो.धन्यवाद.

---------

3...



ABG/ KTG/ SBT/ प्रथम श्री शिगम 17:50

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: सभागृहातील कामकाजाच्या वेळेबाबत.

श्री. आर.आर.पाटील : सभागृहासमोरील कामकाज सायंकाळी 5.00 वाजता संपविणार होते. त्यानंतर सभागृहाची वेळ एक तासाने वाढविण्यात आली होती. आता सायंकाळचे 6.00 वाजले आहेत. सभागृहाचे कामकाज अजून किती वाजेपर्यंत चालविण्यात येणार आहे ?

**तालिका सभापती ( श्रीमती उषाताई दराडे )** : माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर बोलण्यासाठी काही सन्माननीय सदस्यांनी परवानगी मागितलेली आहे. सन्माननीय सदस्यांना या विषयावर पाच-पाच मिनिटे बोलण्याची संधी देऊ.

श्री. आर.आर.पाटील : उद्या कामकाज काय आहे ?

**तालिका सभापती ( श्रीमती उषाताई दराडे )**: उद्या अशासकीय कामकाज आहे.

श्री. आर. आर. पाटील : आज यावर सविस्तर चर्चा होऊ द्यावी. फार उशिराने उत्तर देण्यात काही अर्थ नाही. उद्या लक्षवेधी सूचनावरील चर्चा संपल्यानंतर अभिभाषणावरील उत्तरासाठी वेळ राखून ठेवावी. माझे उत्तराचे भाषण पूर्ण झाल्यानंतर अशासकीय कामकाज घेण्यात यावे.

**तालिका सभापती ( श्रीमती उषाताई दराडे )** : ठीक आहे. सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव यांनी भाषणास सुरुवात करावी.

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ SBT/ KGS/ MMP/ KTG/ 17:55

**पृ.शी.**: राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा

**मु.शी.**: राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावावर चर्चा

( चर्चा पुढे सुरु )....

श्री. भास्कर जाधव (रायगड तथा रत्नागिरी तथा सिंधुदूर्ग स्थानिक प्राधिकारी संस्था ) :सभापती महोदय, या राज्याचे माननीय राज्यपाल महोदय श्री. एस.सी.जमीर यांनी केलेल्या अभिभाषणाबद्दल त्यांचे अभिनंदन करण्याकरिता आणि त्याला पाठिंबा देण्याकरिता मी याठिकाणी उभा आहे. सभापती महोदय, माननीय राज्यपालांचे अभिभाषण म्हणजे सरकारच्या कामगिरीचा आरसा असतो. सरकारने गत वर्षामध्ये जे समाजहिताचे आणि लोकहिताचे तसेच सर्वसामान्य माणसाचा विकास करण्याच्या दृष्टीने आणि सामाजिक न्यायाच्या दृष्टीने जी केलेली कामगिरी असते आणि घेतलेले निर्णय असतात त्याचा आढावा आणि परामर्ष असतो. त्याचबरोबर पुढील वर्षामध्ये म्हणजे येणाऱ्या वर्षामध्ये या शासनाचे कोणते संकल्प आहेत, शासनाची समाजविकासाच्या दृष्टीने कोणती वाटचाल होणार आहे, सरकार कोणत्या प्रकारचे संकल्प करुन येत्या वर्षभरात आपला राज्यकारभार करणार आहे यादृष्टीने काही विचार राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणामध्ये मांडलेले असतात. राज्यपालांचे संपूर्ण अभिभाषण जर आपण पाहिले तर भाषणाच्या सुरुवातीलाच त्यांनी केंद्र सरकारने आणि राज्य सरकारने शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने जो महत्वाचा निर्णय घेतला आहे त्याचे स्वागत करुन आपल्या अभिभाषणास सुरुवात केली आहे. त्याचबरोबर पाण्याच्या योजनेकरिता भारत निर्माण योजना आणि त्या योजनेच्या माध्यमातून या राज्यातील खेडी टँकरमुक्त कशी केली जाणार आहेत ते देखील सांगितलेले आहे. सभापती महोदय, राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये रस्ते विकास योजना, पंतप्रधान ग्रामसडक योजना, बांधा वापरा आणि हस्तांतरित करा या तत्वावरील योजनांचा संकल्प सोडलेला आहे. मुंबईतून फार मोठया प्रमाणावर केंद्र शासनाला कर दिला जातो. परंतु केंद्र सरकार मात्र महाराष्ट्राला त्यातून काहीच देत नाही आणि राज्यकर्ते केंद्र सरकारकडून राज्याचा हिस्सा मिळविण्यामध्ये कमी पडतात अशा प्रकारचा वारंवार आरोप केला जातो. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये या आरोपाला पूर्णपणे छेद देण्यात आला असून केंद्र शासनाने राज्य सरकारला दिलेल्या करोडो रुपयांचा उल्लेख करण्यात आलेला आहे. या अभिभाषणामध्ये स्वातंत्र्यसैनिकांचा देखील विचार करण्यात आलेला आहे. त्याचप्रमाणे

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव .....

अपंग,विकलांग यांचा देखील विचार केलेलाआहे. सर्वसामान्य माणसाला झटपट न्याय मिळण्याकरिता मराठी भाषेतून न्यायदान व्हावे म्हणून गावोगाव न्यायालये भरवून तंटा किती कालावधीत आणि कशा पध्दतीने सोडविला यासाठी महात्मा तंटामुक्त समिती स्थापन करण्यात आलेली आहे. समितीच्या माध्यमातून गावामध्ये सलोखा, न्यायाची आणि आपुलकीची भावना निर्माण होण्याच्या दृष्टीने विचार करण्यात आलेला आहे. वीज उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने सरकार कोणती पावले उचलणार आहे याचा देखील उल्लेख करण्यात आला आहे. कर्करोगासारख्या दुर्धर रोगावर इलाज करण्यासाठी टाटा कॅन्सर हॉस्पीटलमध्ये 6/6 महिने रुग्णांना नंबर लावावा लागतो आणि त्यासाठी प्रसंगी फूटपाथवर देखील झोपावे लागते. कॅन्सरपीडीतांची व्यथा आणि करुणा लक्षात घेऊन औरंगाबाद येथे आणखी एक कॅन्सर हॉस्पीटल भविष्यामध्ये सुरु करण्याचा शासनाने विचार केलेला आहे.

सभापती महोदय, दुधामध्ये होणाऱ्या भेसळीला आळा घालण्यासाठी आणि मुलांच्या आरोग्यावर त्याचा परिणाम होऊ नये यासाठी अधिक कडक कायदा करुन सरकार कोणती पावले उचलणार आहे याचा उल्लेख करण्यात आला आहे. अनु.जाती आणि अनु.जमाती तसेच मागासवर्गीय समाजासाठी विकास करण्याच्या दृष्टीने कोणत्या योजना आखल्या आहेत आणि त्याची कशा प्रकारे अंमलबजावणी करण्यात येणार आहे याचा देखील उल्लेख या अभिभाषणामध्ये करण्यात आलेला आहे. अंगणवाडी सेविकांना दिलेले मानधन तसेच अंगणवाडयांच्या इमारती मोठया प्रमाणावर नादुरुस्त आहेत त्यांना टप्प्याटप्प्याने अनुदान आणि निधी उपलब्ध करुन दिला जाणार आहे. त्याचा देखील या अभिभाषणामध्ये उल्लेख करण्यात आला आहे. अल्पसंख्याकांचा देखील उल्लेख करण्यात आला आहे. कलाकारांना मानधन देण्यासाठीचा उल्लेख केलेला आहे. अभिभाषणाच्या शेवटी महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्नाबाबत महाराष्ट्राची कणखर भूमिका काय असणार आहे याचा देखील उल्लेख करण्यात आलेला आहे. सभापती महोदय, मुलांपासून ते अंगणवाडी सेविकांपर्यंत ......

**तालिका सभापती ( श्रीमती उषा दराडे)** : अजूनही काही सन्माननीय सदस्यांना चर्चेमध्ये भाग घ्यावयाचा आहे असे दिसते. सन्माननीय सदस्यांनी 5/5 मिनिटात आपले विचार व्यक्त करावेत असे मला वाटते. सभागृहाची वेळ 6.30 पर्यंत वाढविण्यात येत आहे.

नंतर श्री.भोगले





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदया, मुलांपासून अंगणवाडी सेविकांपर्यंत या शासनाने विचार केलेला आहे. अल्पसंख्यांकापासून मागासवर्गीयांपर्यंत आणि शिक्षणापासून मुलांच्या दूधापर्यंत, स्वातंत्र्यसैनिकांपासून शेतकऱ्यांपर्यंत परामर्श घेणारा, या सर्व बाबींना स्पर्श करणारा राज्य शासनाचा दृष्टीकोन आणि त्यादृष्टीने माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात उल्लेख झ ाल्याबद्दल मी माननीय राज्यपाल महोदयांचे आणि महाराष्ट्र शासनाने मन:पूर्वक अभिनंदन करतो.

सभापती महोदया, या सभागृहाचे नेते आणि राज्याचे माननीय उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील याठिकाणी उपस्थित आहेत. शासनाने 14 रस्ते विकास प्रकल्पासाठी 1800 कोटी रुपये खर्च करण्याचे ठरविले आहे. हा खर्च करीत असताना पनवेल ते गोव्यापर्यंतचा रस्ता चौपदरी करणार अशा प्रकारची घोषणा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आदरणीय श्री.विलासराव देशमुख यांनी नागपूरच्या अधिवेशनामध्ये केली होती. दिवाळीनंतर या कामाचे भूमिपूजन होऊन पहिला टप्पा इंदापूरपर्यंत होईल असे सांगितले होते. या कामाची अद्याप सुरुवात झालेली नाही. याचा विचार करण्याची नितांत आवश्यकता आहे. कोल्हापूर ते कोकण रेल्वेमार्गाने जोडण्याचा राज्य शासनाचा विचार आहे. त्यादृष्टीने सर्व्हे देखील सुरु झाला आहे. सन्माननीय सदस्य श्री.राजन तेली याठिकाणी बसलेले आहेत. कदाचित ते मालवण ते कोल्हापूर रेल्वेमार्गाने जोडावे अशी मागणी करतील. सावंतवाडी आणि मालवण हे महाराष्ट्रातील शेवटचे तालुके आणि शेवटच्या जिल्हयातील आहेत. शेवटचा तालुका आणि शेवटचा जिल्हा कोल्हापूरला जोडण्याचा विचार होईल असे मला वाटत नाही. परंतु चिपळूण किंवा रत्नागिरी दरम्यान कोल्हापूरला जोडण्याचा विचार करावा अशी मी विनंती करतो. कर्करोगावरील उपचारासाठी औरंगाबाद येथे रुग्णालय होऊ घातले आहे. परंतु कोकणाच्या दृष्टीने आज मुंबईमध्ये येणारी माणसे, अनेक प्रांतातून मुंबईत येणारी माणसे यामुळे मुंबईतील नागरी सोयी सुविधांवर प्रचंड पडणारा ताण विचारात घेता कोकणाला मुंबई जवळ वाटत असली तरी मुंबई खऱ्या अर्थाने कोकणी माणसाला प्रत्येक बाबतीत उपलब्ध होईल अशी स्थिती राहिलेली नाही. म्हणून मिरजसारख्या ठिकाणी सिध्दीविनायक सारखे हॉस्पिटल आहे, तोच विचार ज्या पध्दतीने औरंगाबादच्या धर्तीवर रुग्णालय उभारण्यात येणार आहे तसे रुग्णालय कोकणात निर्माण करण्याचा विचार करावा अशी विनंती करतो.

सभापती महोदया, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावावरील चर्चेत बोलत असताना ज्येष्ठ नेते सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी बोलायला

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

उभे राहिले आणि कळत नकळत आम्ही देखील बोलावे अशी आम्हाला स्फूर्ती आली. सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी आणि दिवाकर रावते यांनी केलेले भाषण केंद्र सरकारने 60 हजार कोटी रुपयांचे पॅकेज या देशातील 4 कोटी शेतकऱ्यांना दिले त्या भोवतीच फिरत राहिले. त्यातून एक गोष्ट निश्चितपणे जाणवते ती म्हणजे शिवसेना आणि भारतीय जनता पक्षाने कितीही सांगितले की, आम्ही याचे श्रेय घेण्याचा प्रयत्न करीत नाही, याचे श्रेय घेणार नाही, आम्हाला श्रेय घेण्याची गरज नाही, श्रेय घेता न घेता सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी बोलले ते माझ्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे आहे. ते म्हणाले की, जून महिन्यानंतर तुम्हाला कोणाच्याही दरवाजासमोर जाता येणार नाही, तुम्हाला कोणी दरवाजासमोर उभे करणार नाही. खऱ्या अर्थाने यांचे दुःख आणि वेदना कोणत्या असतील तर याच आहेत, मागील 5-6 महिने सातत्याने शेतकऱ्यांच्या आत्महत्या आणि कर्जमाफी यावर बोलणारी ही मंडळी, यांनी स्वप्नात देखील असा विचार केला नव्हता, किंबहुना कोणीही असा विचार केला नव्हता की, एकाच वेळी 60 हजार कोटी रुपयांची शेतकऱ्यांची कर्जमाफी करण्याचे धाडस कोणतेही सरकार किंवा कोणतेही राज्यकर्ते दाखवतील.

(नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव........

या लोकांना असे वाटले होते की, कर्ज वगैरे काही माफ होणार नाही, शेतकऱ्यांच्या आत्महत्त्यांचा सुध्दा विचार केला जाणार नाही, आत्महत्त्या थांबणार नाहीत म्हणून येत्या निवडणुकीपर्यंत आपण हेच भांडवल करीत राहू. पण अचानकपणे तुमच्या हातातले हा पत्ताही निघून गेला आणि आता पश्चातापाची वेळ तुमच्यावर आली आहे. म्हणून तुम्ही कितीही सांगा, श्रेय घेण्याचा प्रयत्न करीत नाही, क्रेडिट घेण्याचा प्रयत्न करीत नाही परंतु आपल्या शिवालयासमोर एक बॅनर लागला आहे आणि त्यावर स्पष्टपणे असे लिहिलेले आहे की, "शिवसेना गरजली, शेतकरी भडकला, सरकार वरमले व शेतकऱ्यांचे कर्ज माफ झाले". याचाच अर्थ आपल्याला आजही सांगावयाचे आहे की शिवसेना गरजली म्हणून कर्ज माफ झाले. आम्ही मोर्चे काढले म्हणून कर्ज माफ झाले. आज बोलता बोलता सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते म्हणाले की, आम्ही जी आंदोलने केली, जे मोर्चे काढले, ज्या सभा घेतल्या, प्रामाणिकपणे काम केले, वाह । वाह । आपला प्रामाणिकपणा. आपल्या प्रामाणिकपणाबद्दल सांगायचे झाले तर काही दिवसांपूर्वी या राज्यात ऊसाचे पीक जास्त प्रमाणात झाले होते त्यावेळी आपण ऊस तोड कामगारांनी ऊस तोडू नये म्हणून आंदोलन केले होते. कारण ऊसतोड कामगारांना जास्तीत जास्त मजुरीचा दर मिळाला पाहिजे. असे करुन ऊस तोड कामगार बाजुला केले. त्यानंतर ऊस तोडणीसाठी उशिर झाला म्हणून ऊस गाळपालाही उशिर झाला म्हणूनही आपण आंदोलन केले. सरकारने त्यानंतर ऊसाला मदत केली आणि राहिलेल्या ऊसाला एकरी मदत केली, ट्रान्सपोर्टमध्ये सूट दिली, अबकारी करात सूट दिली, एक्स्पोर्टसाठी मदत केली आणि ही सर्व मदत केल्यानंतर देखील काही ऊस राहिला म्हणून आंदोलन केले. अशा प्रकारचे आपले प्रामाणिकपणाचे आंदोलन आहे. हा ऊस शिल्लक राहिला म्हणून आपण ऊस जाळण्याचे आंदोलन केले. ज्या शेतकऱ्यांनी घाम गाळून आपले शेत ऊभे केले, आपले संसार उभे करण्याची स्वप्ने पाहिली त्यांना मदत करण्यावेजी त्यांचा ऊस जाळण्याचे काम आपण केले.

ठाणे महानगरपालिका आपल्या ताब्यात आहे परंतु या भागातील लोकांना पिण्याचे पाणी मिळत नाही म्हणून ज्यांचे नाव घेऊन हे आंदोलन केले ते कसे तर गरिबांची मडकी फोडून आंदोलन केले. सामान्य माणूस आपल्या घरातील किडूक-मिडूक एकत्र करुन आपला संसार उभा

......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव........

करतो त्यांचे संसार जाळण्याचे काम आपण करतात, त्यांची भांडी-कुंडी फोडण्याचे काम करतात, देण्याचे काम करीत नाही. त्यानंतरचे आपले आंदोलन म्हणजे घंटा आंदोलन. लोकांचे हात तुटेपर्यंत त्यांच्याकडून घंटा वाजवून घ्यायच्या असे आपले आंदोलन आहे. त्यानंतर "देता की जाता" अशा प्रकारचे आंदोलन आपण केले. मला असे म्हणावयाचे आहे की, आयुष्यभर भीक मागण्याचे काम काय करतात, काही तरी द्यायचे काम करा. त्यानंतर आसूड आंदोलन आपण सुरु केले.....अडथळा.....सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत मी आपल्याला सांगू इच्छितो की, आपल्याला लोकांच्या जिवाची काळजी आहे काय ? शेतकऱ्यांच्या जिवाची काळजी असती तर चंद्रपूर, गडचिरोलीचे जिल्हाध्यक्ष श्री. शिरीष गिरीपुंजे, ज्यांच्या मागे साक्षात मृत्यू लागला होता, यम चार दिवस त्याच्या पाठी लागला होता तो भेटायला आला असता माझा मासा पडला म्हणून त्याला भेटलो नाही, तुमचा मासा मेला म्हणून त्याला आपण भेटू शकत नाही. ज्या संघटनेच्या कार्यकर्त्यांने संघटनेसाठी रक्त सांडले......

डॉ. दीपक सावंत : महोदया, माझा हरकतीचा मुद्दा असा आहे की, सन्माननीय सदस्यांचे भाषण अभिभाषणाच्या पलिकडे सुरु आहे. कारण कोणाचा मासा मेला, कोणाच्या मागे यम लागला या गोष्टींचा येथे काहीच संबंध नाही. त्यांनी कृपया शेतकऱ्यांच्या आत्महत्त्यांबाबत बोलावे. शेतकऱ्यांच्या गळयात फास टाकण्याचे काम केले आहे तो पहिल्यांदा आवरा, कारण पॅकेज जाहीर करुनदेखील आत्महत्त्या होत आहेत, त्यावर आपले विचार मांडावेत....

यानंतर श्री. जुन्नरे ......

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आरपाटील : सभापती महोदया, समोरच्या बाजुने आमच्या पक्षाच्या नेत्यावर धणाधाती टीका केली, अंगविक्षेप करुन टीका झाली फक्त नाचकाम करावयाचेच बाकी राहीले होते त्यावेळेस आपल्या लक्षात ही गोष्ट का आली नाही ? आता सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव विचार मांडत आहेत त्यामुळे आपण थोडी कळ काढावी. सन्माननीय सभापती महोदया, आपण सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव यांना संरक्षण द्यावे अशी माझी आपल्याला विनंती आहे.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदया, मी हरकतीच्या मुद्यावर बोलण्यासाठी उभा आहे. आजची चर्चा शिवसेना या विषयावर नाही, शिवसेनेने कोणती आंदोलने केली यावर नसून माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणावर चर्चा आहे. आपल्याला जर शिवसेनेवर, शिवसेनेच्या आंदोलनावर चर्चा करावयाची असेल तर त्यासाठी आपण वेगळी चर्चा करा आमची त्यावर चर्चा करण्याची तयारी आहे. मी ज्यावेळेस माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणावर विचार मांडले तेव्हा मी विषय सोडून कोणावरही टीका केली नव्हती.

**तालिका सभापती** : या सभागृहातील प्रत्येक सन्माननीय सदस्यांनी विचार मांडतांना समोरच्या बाकावर बसणा-या सदस्यांच्या नेत्याचा अपमान होणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे.

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदया, या अगोदर ज्या सन्माननीय सदस्यांनी आमच्या नेत्यांबद्दल अपमानजनक शब्द वापरले आहेत ते सुध्दा कामकाजातून काढून टाकले पाहिजेत.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री. मधुकरराव सरपोतदार साहेब उभे राहिले होते त्यामुळे मी खाली बसलो होतो. ज्यांचा या चर्चेत संबंध नाही त्यांचे घेऊ नये परंतु समोरच्या बाकावरील सन्माननीय सदस्यांनी माननीय अंतुले साहेब, माननीय सुशीलकुमार शिंदे, माननीय मुरली देवरा, माननीय पवार साहेबांचा उल्लेख केला होता त्यावेळस यांना ही बाब का समजली नाही ?

( अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी उभे राहून बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**तालिका सभापती** : ज्या सन्माननीय सदस्यांना बोलण्याची परवानगी देण्यात आलेली आहे त्याच सन्माननीय सदस्यांनी आपले विचार मांडावेत.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोया, माझा हरकतीचा मुद्दा यासाठी होता की, जे या सभागृहाचे सदस्य नाही त्यांच्यावर टीक होता कामा नये. मी माझ्या भाषणात कोणावरही टीका केली नाही. जे या सभागृहाचे सदस्य नाहीत तसेच नेत्यांची नावे न घेताही आपल्याला विचार मांडता येतात. तसेच आपण ज्यांच्यावर टीका करतो ती टीका सुध्दा ठराविक मर्यादेपर्यंत असली पाहिजे. या ठिकाणी पक्षीय टीका होता कामा नये एवढाच माझा हरकतीचा मुद्दा आहे.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदया, मी माझ्या भाषणात कोणत्याही नेत्याच्या नावाचा उल्लेख केला नव्हता उलट समोरच्या बाकावरील सन्माननीय सदस्यांनीच त्यांच्या नेत्यांच्या नावाचा उल्लेख केलेला आहे. या ठिकाणी समोरच्या बाकावरील सन्माननीय सदस्य शेतक-यांबद्दल कणव दाखवित आहेत, कळवळा दाखवित आहेत परंतु ही वस्तुस्थिती नाही.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ KGS/ MMP/ प्रथम श्री.जुन्नरे 18.15

श्री.भास्कर जाधव..

हे पुतना मावशीचे प्रेम आहे. लबाडा घरचे जेवणाचे हे आमंत्रण आहे. 2009 साली होणाऱ्या निवडणुका डोळयासमोर ठेवून शेतकऱ्यांबद्दल प्रेम दाखविले जात आहे. या पक्षाच्या एका कार्यकर्त्याने वर्षानुवर्षे घामाच्या ठिकाणी आपले रक्त सांडून पक्ष वाढविला होता , अनेक ठिकाणी संघर्ष केला होता. त्यामुळे त्याच्या पाठीमागे साक्षात मृत्यू लागला होता , ज्या पक्षाचा व नेत्यांचा तो कार्यकर्ता आहे त्या पक्षाच्या नेत्याच्या भेटीसाठी व आपली व्यथा मांडण्यासाठी तो दरवाजासमोर चार चार दिवस जात होता . आपल्या गळयातील यमाचा फास सोडवा अशी याचना करणाऱ्या कार्यकर्त्याच्या वेळी तुमचा आसूड कोठे गेला होता ? त्या वेळी आसूड का कडाडला नाही ? वास्तविक स्वत:च्या कार्यकर्त्यासाठी ज्यांचे आसूड कडाडत नाहीत. त्यावेळी शेतकरी मेले तरी त्यांना काहीही देणे घेणे नाही. केवळ 2009 सालच्या निवडणुकांकडे त्यांचे लक्ष आहे. शेतकऱ्यांच्या संदर्भात त्यांना आता प्रेम का आले आहे हे मी एका वाक्यात सांगतो. एक भावगीत असे आहे की, "मी ओळखून आहे सारे तुझे बहाणे " त्याच्या पुढची ओळ अशी आहे की, "हाती धनुष्य ज्याच्या त्याला कसे कळावे , हृदयात बाण ज्याच्या त्यालाच दु:ख त्याचे." तुमच्या हातामध्ये फक्त धनुष्य आहे. त्यामुळे रोज नवीन नवीन प्रश्नाच्या संदर्भातील बाण माननीय केंद्रीय कृषी मंत्री श्री.शरद पवार यांच्यावर आपण सोडत आहात. हा बाण कधी क्रिकेटच्या खेळासंबंधी असतो , कधी लाल गव्हाचा असतो, कधी ऊसाचा असतो, कधी साखरेचा असतो ,कधी शेतीचा असतो, कधी शेतीच्या विकास दराचा असतो, कधी धरणांचा असतो, कधी जे.टी.चा असतो तर कधी बंदराचा असतो , अशा प्रकारे दररोज नवीन नवीन प्रश्नांचा बाण आपण त्यांच्यावर सोडत आहात आणि हा बाण सोडत असतांना जो बाण सोडतो त्याला कधीही वेदना होत नसतात फक्त ज्याला बाण लागतो त्यालाच वेदना होत असतात. आपल्या हातामध्ये फक्त धनुष्य आहे म्हणून दररोज बाण सोडण्या ऐवजी ज्याला बाण लागतो त्याच्या वेदना समजावून घेण्याचा आपण प्रयत्न करावयास पाहिजे. अशा प्रकारचा प्रयत्न आपण ज्या दिवशी कराल त्या दिवशी खऱ्या अर्थाने तुम्हाला शेतकऱ्यांचे प्रेम कळेल त्याशिवाय तुम्हाला हे प्रेम कळणार नाही.शेतकऱ्यांच्या आत्महत्येसंबंधी किंवा शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसंबंधीचे क्रेडिट घ्यावयाचे नाही असे आपण कितीही सांगितले तरी ती वस्तुस्थिती मात्र खरी नाही. तुमच्या कार्यालयासमोर ते बॅनर लावलेले आहे ते तुम्ही जाऊन पहा. त्या बॅनरमध्ये काय लिहिलेले आहे ते मी आपल्याला वाचून दाखवतो. त्यात स्पष्टपणे असे

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव..

म्हटलेले आहे की, शिवसेना गरजली, शेतकरी भडकला, सरकार नरमले, व शेतकऱ्यांचे कर्ज माफ केले " शेतकऱ्यांवरील कर्ज माफ करणे एवढे सोपे आहे काय ? सभापती महोदय, काल या ठिकाणी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेला सुरुवात झाली होती . सन्माननीय सदस्य श्री मधुकर सरपोतदार यांना मी सांगू इच्छितो की, मी देखील शिवसेनेमध्ये काम केलेले आहे आणि शिवसेनेमध्ये मी काम केलेले आहे असे सांगताना मला कधीही कमीपणा वाटत नाही. कारण मी कोणतीही चोरी केलेली नाही, लांडी लबाडी केलेली नाही, माझ्यावर कोणताही भ्रष्टाचाराचा आरोप नाही, माझ्यावर कोणताही शिंतोडा नाही. त्यामुळे येथे घडलेला प्रकार पाहिल्यानंतर आमचासुध्दा जीव जळतो. काल मी जो काही प्रकार पाहिला तो पाहिल्यानंतर मला तुमची कीव करावीशी वाटली. तुमच्या एका आंदोलनामुळे, कोणत्या तरी शेतकरी मेळाव्यामुळे, चार सभा घेतल्यामुळे शेतक-यावरील 60 हजार कोटी रुपयांचे कर्ज माफ झाले आहे काय ? काल आपल्याला सभागृहाचे कामकाज बंद पाडावयाचे होते , एका सान्माननीय सदस्यांचे भाषण थांबवावयाचे होते म्हणून तुम्ही जो काही प्रकार केला त्यावेळी तुमची केविलवाणी स्थिती पाहून मला तुमची दया आली होती. पूर्वीची शिवासेना कोठे गेली आहे? पूर्वीचा शिवसेनेचा आक्रमकपणा कोठे गेला आहे ? पूर्वीचा शिवसैनिक कोठे गेला आहे? असे मला वाटू लागले आहे तुम्ही फक्त माननीय सभापतींच्या आसनासमोर गेला होता आणि घोषणा देत होता. "हाय" "हाय" म्हणून कोणी तरी टाळया वाजवून पैसे मागत असतात .60 हजार कोटी रुपयांचे कर्ज माफ केल्या मुळे तुमच्यावर तशी परिस्थिती आली होती. तुम्ही सन्माननीय सदस्यांच्या भाषणात अडथळा आणला होता. सभागृहातील एका सन्माननीय सदस्यांचे भाषण तुम्ही बंद पाडू शकत नाही तर 60 हजार कोटी रुपयांचे कर्ज माफ करण्यासाठी देशाच्या पंतप्रधानांचे व देशाच्या कृषी मंत्रयांचे मन वळविण्यासाठी तुमचे एक आंदोलन पुरेसे होऊ शकते काय ? तुम्ही घेतलेल्या सभा त्यासाठी पुरेशा होऊ शकतात काय ? कोठे तरी सभा घेतल्यामुळे 60 हजार कोटी रुपयांचे कर्ज सहजा सहजी माफ होत असते काय ? कर्ज माफीचे फुकटचे श्रेय घेण्या ऐवजी शिवसेनेचा जो बाणा आहे आणि शिवसेना प्रमुखांचे जे विचार आहेत त्या प्रमाणे आपण वागले पाहिजे ज्यांनी चांगले केले आहे त्याला चांगले म्हणण्याची प्रवृत्ती आणि विचार तुमच्या आमच्या मनामध्ये शिवसेना प्रमुखांनी रुजवले आहेत. वास्तविक काल टीका करण्या ऐवजी आणि निषेध करण्या ऐवजी उदार

3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव..

अंत:करणाने आदरणीय केद्रीय कृषी मंत्री. श्री.शरद पवार यांचा व केन्द्रीय मंत्रीमंडळाचा अभिनंदन करणारा ठराव मांडावयास पाहिजे होता. महाराष्ट्रातील एक मराठी व्यक्ती केन्द्रीय कृषी मंत्री होऊन या शेतकऱ्यांचे 60 हजार कोटी रुपयांचे कर्ज माफ केले म्हणून त्यांचे अभिनंदन करणारा ठराव उदार अंत:करणाने मांडला असता तर ते तुम्हाला शोभून दिसते असते. मराठीच्या मुद्यावर माननीय राष्ट्रपती श्रीमती प्रतिभा पाटील यांना तुम्ही पाठींबा दिला होता ना ? अशा प्रकारे जर त्यांना मराठीच्या मुद्यावर तुम्ही पाठिंबा देऊ शकता तर महाराष्ट्रातील एखादा मराठी माणूस एवढा मोठा घाडसी निर्णय घेऊ शकतो म्हणून त्यांचे अभिनंदन करणारा ठराव मांडला असता तर तुमच्या विचाराला आणि तत्व प्रणालीला ती एक चांगली झालर शोभून दिसली असती . तुमचे विचार उठून दिसते असते आणि तुमच्या मनाचा मोठेपणा समाजामध्ये दिसून आला असता परंतु तुमच्या मनाचा कोतेपणा मला काल दिसून आला याची मला कीव करावीशी वाटते.

नंतर श्री. सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव .....

सभापती महोदया, मला वेळ कमी आहे याची जाणीव आहे. म्हणूनच मी माझ्या काहीच मुद्यांचा परामर्ष येथे घेतला आहे. त्यात कोठला कोठला उल्लेख केला आहे. या संपूर्ण सभागृहातील चर्चा ही 60 हजार कोटी रूपयांच्या पॅकेज भोवतीच फिरत राहिली. पण ती फिरती केवळ टीका-टिपण्णी करण्यामध्येच फिरत राहिली. त्यातील दोष काढण्यामध्ये, उणीवा, चुका दाखविण्यातच फिरत राहिली. तसे पाहू गेल्यास, दोष आणि चुका कशामध्ये नसतात? कोणतीही योजना निकोप, निर्दोष होण्यासाठी तुम्ही तुमचे योगदान काय देता ते तरी अगोदर सांगा. तुम्ही यासाठी काय योगदान देणार आहात ? तुम्ही तुमची काय भूमिका बजावणार आहात ? शेतकऱ्यांच्याप्रति तुम्ही तुमचे काय योगदान टाकणार आहात ? हातामध्ये केवळ आसूड घेऊन, एखाद्या गावामध्ये ज्याप्रमाणे गावगुंड फिरतो अशा प्रकारे फिरायचे, तर मग तुम्हाला कोण विचारतो ? मग तुम्ही या पद्धतीने का काम करीत नाही ? आज संपूर्णपणे या 60 हजार कोटीची विभागणी विभागवार कशी कशी होते आहे, त्यातून आपल्या राज्याला किती फायदा झाला आहे, तो होत असताना कोणत्या प्रकारची त्यात उणीव राहिली आहे याची आकडेवारी घेऊन तुम्ही राज्यांच्या नेत्यांमध्ये बसायला पाहिजे होते, देशाच्या नेत्यांसोबत बसायला पाहिजे होते आणि त्यांना सांगितले पाहिजे होते की, या या ठिकाणी अमुक इतकी भर टाका, अमुक इतकी मदत करा म्हणून सांगायला पाहिजे होते. कोकणासारखा भाग तुमच्या पाठीशी आहे. पण तुम्ही या कोकणासाठी काय केले आजवर ? मत्स्यशेतीसाठी तुम्ही कधी आंदोलन केले आहे ? नाही केले. मग तुम्ही कोकणासाठी काय केले ? आंबे बागायतदारांसाठी तुम्ही संघर्ष केला कधी ? तेही केले नाही. मी मघाशी म्हटल्याप्रमाणे तुम्ही अशी कोणता ना कोणता चांगला विचार घेऊन तुम्ही समाजा समोर जायला पाहिजे होते. टीका करण्याऐवजी असे केले असते तरी खूप काही चांगले झाले असते. पण तुम्ही केवळ येथे टीका आणि टीकाच करीत बसलात. म्हणून मी या ठिकाणी बोलण्यासाठी उभा राहिलो. अन्यथा मी या ठिकाणी बोललो नसतो. म्हणून मी मघाशी सांगितले की, 'हाती धनुष्य ज्याच्या, त्याला कसे कळावे, हृदयात बाण ज्याच्या, त्यालाच दु:ख त्याचे'. तुमच्या हाती केवळ धनुष्य आहे आणि बाण सोडण्याचेच तुम्ही काम करीत आहात. त्याच्या ऐवजी कधी तरी आपल्या हृदयामध्ये, दुसऱ्या कार्यकर्त्याचे, शेतकऱ्यांचे, कष्टकऱ्यांचे, कामकऱ्यांचे,

...... 3एस 2 ...

श्री. जाधव ....

विद्यार्थ्यांचे बाण टोचून घ्या तरच खऱ्या अर्थाने त्यांची दु:खे आणि वेदना कळतील. अन्यथा केवळ बाणच सोडत राहिलात तर तुम्हाला दुसऱ्याची दु:खे कळणार नाहीत एवढे सांगतो. सभापती महोदया, पुन्हा एकदा ज्या राज्यपाल महोदयांनी राज्यातील सगळ्या प्रकारच्या विकासाच्या गोष्टींचा उल्लेख करून, राज्याचा निश्चितपणे उठावपणा, ठशठशीतपणा दाखवून राज्याची जी दमदारपणे वाटचाल चालली आहे हे सांगितले आहे त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करतो आणि आपली रजा घेतो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

***

( यानंतर श्री.सय्यद जामा यांचे हिंदी भाषण श्री.शर्मा यांचेकडे...)

( यानंतर श्री. सरफरे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सय्यद जामा (महाराष्ट्र विधान सभा द्वारा निर्वाचित) : सभापति महोदय, महामहिम राज्यपाल महोदय के अभिभाषण पर धन्यवाद प्रस्ताव को समर्थन देने के लिए मैं खड़ा हुआ हूँ. आज हमने अपने विपक्षी साथियों को बहुत लम्बे समय तक सुना. उनका यहां पर बोलने का हक है. लेकिन ऐसा लगा कि उनका भाषण राज्यपाल महोदय के अभिभाषण पर नहीं बल्कि पूरी तरह से राजनैतिक था. जैसे भाषण चुनाव के समय पर बाहर होते हैं, वहां पर जिस तरह से एक दूसरे की आलोचना करते हैं, उस तरह से सेन्ट्रल गवर्नमेंट से लेकर स्टेट गवर्नमेंट तक की उन्होंने क्रिटिसाइज की. वास्तव में देखा जाए तो राज्यपाल महोदय के अभिभाषण में सरकार ने जो कार्य किए हैं या जो कार्य सरकार करना चाहती है, उसका ट्रू रिफलेक्शन इसमें होता है. यह रिवाज है वर्ष के पहले अधिवेशन के पहले दिन राज्यपाल महोदय दोनों सदनों के संयुक्त अधिवेशन को संबोधित करते हैं. इस अभिभाषण में सरकार की जो भी नीतियां हैं, चाहे वह ग्रामीण विभाग के बारे में हो, चाहे वह किसानों के बारे में हों, चाहे वह उद्योग के बारे में हों, चाहे वह इरीगेशन के बारे में हो, चाहे वह स्वास्थ्य के बारे में हो, सारी बातें इसमें विवरण के साथ दी गई हैं. मुझे इस बात का बहुत दुख है कि हमारे विरोधी पक्ष के माननीय सदस्यों की तरफ से एक भी कन्सट्रक्टिव सुझाव नहीं आया है. हमारे माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव ने बहुत सटीक विश्लेषण किया है कि विरोधी पक्ष के लोगों के हाथ से मुद्दा निकल गया है. हमारे माननीय प्रधानमंत्री ने विशेष आर्थिक पेकेज की घोषणा की थी, उस समय किसी ने मोर्चा नहीं निकाला था. हमारी महाराष्ट्र सरकार ने 1070 करोड़ रुपए का पेकेज दिया था, उस समय किसी ने भी मोर्चा नहीं निकाला था. लेकिन जब 60 हजार करोड़ रुपए का कर्जा किसानों का माफ किया गया है तो विपक्षी दल मोर्चा निकाल रहे हैं. आजादी के बाद किसानों के लिए इतना बड़ा पेकेज आज तक किसी ने भी नहीं दिया है और इस प्रावधान से निराश होकर विपक्षी दल के माननीय सदस्य राजनैतिक भाषण दे रहे हैं. लेकिन मैं इस बारे में ज्यादा नहीं बोलना चाहता.

सभापति महोदय, महाराष्ट्र सरकार ने पिछले 3-4 सालों में जो काम किए हैं और केन्द्र सरकार ने जो अच्छे काम किए हैं, चाहे वह ग्रामीण विकास के बारे में हो, चाहे वह स्वास्थ्य के बारे में हो, चाहे वह शिक्षण के बारे में, चाहे नगर विकास के बारे में हो या अन्य विभागों के बारे में हो, बहुत सारी योजनाएं केन्द्र शासन और महाराष्ट्र शासन ने मिलकर पूरी की हैं और अगर

. . . 3T 2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. . . . श्री सय्यद जामा

इनमें कुछ कमी रह जाती है तो हम अपनी पार्टी में बैठकर कन्सट्रक्टिव क्रिटिसिज्म करते हैं और उनको दूर करने के उपाय बताते हैं. लेकिन एक बात सभी माननीय सदस्यों को याद रखनी होगी कि पिछले कुछ सालों से जो गठबंधन की सरकार आई हैं तो उसके कुछ बाय-प्रोडक्ट भी है जो कि हमें और आपको सहन करने पड़ेगें. गठबंधन सरकार की वजह से ब्यूरोक्रेसी पर कंट्रोल कम रहता है, "सेंस ऑफ रेस्पोन्सिबिलिटी" कम हो जाती है. ये लोग पॉलिटिकल वीकनेस का फायदा उठाते हैं और बहुत सारी अच्छी योजनाओं में भ्रष्टाचार, मिस-यूज या डिले होता है. मा. सदस्य श्री गडकरी जी ने यहां पर एक उदाहरण दिया कि 400 करोड़ रुपए का प्रोजक्ट 1700 करोड़ रुपए का हो गया है. ऐसी बहुत सारी योजनाएं हैं, जिनमें डिले होने की वजह से उनकी कॉस्ट बढ़ जाती है, लेकिन डिले की जिम्मेदारी किसी अधिकारी पर फिक्स नहीं होती है. चाहे केन्द्रीय सरकार के अधिकारी हों या राज्य सरकार के अधिकारी हों, प्रोजक्ट डिले होने पर किसी अधिकारी पर आज तक एक्शन नहीं हुआ है.

सभापति महोदय, महाराष्ट्र सरकार ने जो अच्छा काम किया है, उसका लेखा-जोखा राज्यपाल महोदय ने अपने अभिभाषण में पेश किया है. मैं उनका अभिनन्दन करता हूॅं. अगर हम आलोचनात्क विश्लेषण करेंगे तो जो बहुत सारे अच्छे काम महाराष्ट्र सरकार ने किए हैं, उसका उल्लेख इस अभिभाषण में किया गया है. लेकिन इसमें 2-3 बातों का जिक्र कम किया गया है, उसके बारे में मैं माननीय मुख्यमंत्री महोदय से अनुरोध करता हूॅं कि वे इस बारे में ध्यान दें और उचित स्थान दिलाने की कोशिश करें.

. . . भाषण जारी, नंतर तालेवार

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री सय्यद जामा ....

सभापति महोदय, माननीय राज्यपाल जी के भाषण में बहुत सारी बातें कही गई हैं. उच्च न्यायालय में जजों की संख्या बढ़ाने की बात कही गई है. शीघ्र न्यायालय की स्थापना की बात कही गई है. मैं लेबर क्षेत्र में काम करता हूं इसलिए मैं यह बताना चाहता हूं कि श्रम एवम् औद्योगिक न्यायालयों में भी बहुत सारे केसेस अनेक सालों से पेंडिंग हैं इसलिए श्रम एवम् औद्योगिक न्यायालयों में भी जजों की संख्या बढ़ाई जाने के बारे में विचार किया जाए ताकि पेंडिंग मामलों का जल्द निपटारा हो सके. कामगारों की नौकरियों का भी मुद्दा है. इन मामलों के बारे में जल्द से जल्द निर्णय लिया जाए, फास्ट सिस्टम लायी जाए. नागपुर में मिहान प्रकल्प किया जा रहा है. इस के लिए मैं सरकार का अभिनंदन करना चाहता हूं. इस प्रकल्प की वजह से नागपुर शहर को विश्व में पहचान मिली है. नागपुर शहर में कार्बो हब भी आ रहा है. लेकिन इस सिलसिले में मैं यह बताना चाहूंगा कि इस प्रकल्प के लिए जिन लोगों की जमीन एक्वायर की जा रही है, उनके पुनर्वास के बारे में योग्य निर्णय लिया जाना चाहिए. क्योंकि पुनर्वास एवं मुआवजे के संबंध में लोगों में असंतोष है. मैं इस संबंध में यह बताना चाहूंगा कि जो लैंड एक्वीजिशन एक्ट, 1894 है, यह एक्ट बहुत पुराना है. समय के अनुसार इस एक्ट में संशोधन होना चाहिए. इस एक्ट में पुनर्वास के संबंध में ठीक तरह से प्रावधान नहीं है. हम केन्द्रीय सरकार से भी अनुरोध कर रहे हैं कि इस एक्ट को अप-टू-डेट किया जाए. इस विषय में विचार करने के लिए दिल्ली में कमेटी भी गठित की गई है. हम यह चाहते हैं कि जिन लोगों की जमीन एक्वायर की जाती है उन्हें उचित मुआवजा मिलना चाहिए और ठीक प्रकार से पुनर्वास किया जाना चाहिए. अत: मेरा अनुरोध है कि मिहान प्रकल्प के लिए जिन किसानों की जमीन एक्वायर की गई है और की जाएगी उनके पुनर्वास पर विशेष ध्यान दिया जाए.

**तालिका सभापती (श्रीमती उषाताई दराडे)** : आता 6 वाजून 30 मिनिटे झालेली आहेत. त्यामुळे सभागृहाची वेळ वाढवावी लागेल.

श्री.अरविंद सावंत : सभागृहापुढील कामकाज संपेपर्यंत वेळ वाढविण्यात यावी.

**तालिका सभापती** : मला असे वाटते की, सध्या आपण अर्धा तास वेळ वाढवावी. त्यानंतर जर गरज भासली तर आणखी वेळ वाढविता येईल. त्याचबरोबर मला सन्माननीय सदस्यांना उद्याच्या कामकाजाच्या संबंधात माहिती द्यावयाची आहे. उद्या सभागृहाचे कामकाज सकाळी 11.00

...2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती....

वाजता सुरु होईल. त्यावेळी सुरुवातीला प्रश्नोत्तराचा तास होईल, त्यानंतर कागदपत्रे सभागृहासमोर ठेवली जातील. नंतर नियम 93 अन्वये सूचना, लक्षवेधी सूचना घेण्यात येतील. मग माननीय उप मुख्यमंत्री हे माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेला उत्तर देतील. त्यानंतर अशासकीय कामकाज होईल. माझी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, आपण सभागृहाचे आजचे कामकाज 7.00 वाजेपर्यंत संपविण्याचा प्रयत्न करु या.

आता सन्माननीय सदस्य श्री.सय्यद जामा यांनी आपले भाषण पुढे सुरु करावे.

श्री.सय्यद जामा : सभापति महोदय, मैं यह बता रहा था कि मिहान प्रकल्प के लिए जिन किसानों की जमीन ली जा रही है, उन किसानों के पुनर्वास पर विशेष ध्यान दिया जाए. क्योंकि किसान पुनर्वास के संबंध में निराश है.

सभापति महोदय, प्रधानमंत्री जी ने अल्पसंख्याक के लिए 15 सूत्रीय कार्यक्रम प्रस्तुत किया है. मैं हमारे सम्माननीय मुख्यमंत्री जी से अनुरोध करुंगा कि इस 15 सूत्रीय कार्यक्रम का राज्य के बजट में रिफलेक्शन होना चाहिए. आज शहरों में और ग्रामीण क्षेत्रों में अल्पसंख्याक उपेक्षित है, उनको योजनाओं का फायदा नहीं मिल रहा है. सरकार के आदेश होने के बावजूद भी अल्पसंख्याक योजनाओं के लाभ से वंचित है. इसलिए मेरा अनुरोध है राज्य के बजट में अल्पसंख्याक के लिए प्रधानमंत्री जी के 15 सूत्रीय कार्यक्रम का रिफलेक्शन होना चाहिए.

सभापति महोदय, बुनकरों की सहायता के लिए महाराष्ट्र हेण्डलूम एंड पावरलूम कार्पोरेशन बनाया गया है. लेकिन ग्लोबलाईजेशन के कारण बुनकर आर्थिक मुसीबत में आ गए हैं क्योंकि बुनकरों के व्यवसाय पर विपरीत परिणाम हुआ है. इसके अलावा बुनकरों की हेण्डलूम एंड पावरलूम कार्पोरेशन के साथ जो लिंक थी वह भी खत्म हो गई है. आज बुनकर कर्ज से ग्रस्त है, उनके पास आज रोजी-रोटी का कोई जरिया नहीं है. अत: मुझे आशा है कि सरकार बुनकरों की खस्ता हालत को देखते हुए बुनकरों एवम् हेण्डलूम एंड पावरलूम कार्पोरेशन की दशा पर ध्यान देगी.

सभापति महोदय, इरीगेशन के बारे में प्रधानमंत्री के पेकेज से कुछ गति आई है, लेकिन मैं आपको बताना चाहता हूँ कि हमारे इरीगेशन के प्रोजक्ट झुड़पी जंगल की वजह से क्लीयर

........ 3 U 3

. . . . श्री. सय्यद जामा

नहीं हो रहे है. यह हमारी मुख्य अडचन है. झुड़पी जंगल के कारण प्रोजक्ट डिले हो रहे हैं, उनकी कॉस्ट बढ़ रही. हमारे पड़ोसी राज्यों मध्य प्रदेश और छत्तीसगढ़ में झुड़पी जंगल की वजह से प्रोजक्ट डिले नहीं होते हैं. झुड़पी जंगल में कोई बड़े पेड़ नहीं है, केवल छोटी-मोटी झाड़ियां हैं, लेकिन फोरेस्ट कंजरवेशन एक्ट की वजह से क्लीयरेंस नहीं मिलता है और इससे विदर्भ के लोगों को बहुत तकलीफ होती है.

सभापति महोदय, महाराष्ट्र शासन में बॅकलॉग को पूरा करने के लिए रिक्रूटमेंट किया जा रहा है. मेरा शासन से अनुरोध है कि हॅन्डीकॅप्ड लोगों को और मेन्टली रिटार्डेड लोगों को अपाइंट करने के लिए विशेष योजना का प्रावधान होना चाहिए.

सभापति महोदय, 1 हजार मेगावाट विद्युत उत्पादन का प्रोजक्ट मौदा में आने वाला है. इस प्रोजक्ट के लिए महाराष्ट्र शासन और केन्द्र शासन की तरफ से काम चल रहा है. इसके लिए प्रधानमंत्री आने वाले थे, लेकिन बाबा आमटे के निधन की वजह से प्रधानमंत्री का कार्यक्रम रद्द हो गया. मैं महाराष्ट्र शासन से अनुरोध करुंगा कि मौदा के एन.टी.पी.सी. के प्रोजक्ट के लिए लँड एक्वीजीशन का काम शुरु हुआ है, पानी और कोयला की व्यवस्था हो गई है और प्लानिंग कमीशन ने भी इसको ओ.के. कर दिया है. लेकिन इसकी गति थोड़ी कम है. मैं महाराष्ट्र शासन से अनुरोध करुंगा कि इसके ऊपर विशेष ध्यान दिया जाए.

सभापति महोदय, मैं एक बात का जिक्र विशेष रुप से करना चाहता हूॅं कि हमारी व्यवस्था में कुछ कमजोरी है, भ्रष्टाचार है और इसको दूर करने के लिए महाराष्ट्र शासन को कड़े कदम उठाने होंगे ताकि हमारी गुड गवर्नेंस की कल्पना साकार हो सके. इसके लिए ब्यूरोक्रेसी के स्तर पर और राजनैतिक स्तर पर भी सरकार को विशेष ध्यान देना चाहिए.

सभापति महोदय, महाराष्ट्र में एस.ई.जेड बनाए जा रहे हैं और किसानों की जमीन ली जा रही है. मेरा केन्द्र शासन से अनुरोध है कि एस.ई.जेड के लिए फर्टाइल लँड नहीं लेनी चाहिए. अगर हम खेती की जमीन लेंगे तो अनाज के उत्पादन पर फर्क पड़ सकता है. महाराष्ट्र जैसे राज्य के लिए जहां पर औद्योगिक प्रगति हुई है, वहां पर बहुत ज्यादा एस.ई.जेड की आवश्यकता नहीं है. सरकार एफ.डी.आई. और एन.आर.आई. के माध्यम से इन्वेस्टमेंट करे और एस.ई.जेड के लिए फर्टाइल जमीन लेना छोड़ दें, ऐसा मेरा शासन से अनुरोध है. अन्त में मैं राज्यपाल महोदय के अभिभाषण का समर्थन करता हूॅं. धन्यवाद. . . . भाषण पूर्ण, नंतर बरवड.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदया, या ठिकाणी अतिशय रुपेरी आणि चांगल्या तऱ्हेचे सुंदर चित्र या अभिभाषणातून निर्माण केले गेले आहे. मी सन्माननीय सदस्य श्री. भास्करराव जाधव यांना सांगू इच्छितो की, मी मुद्दा सोडून बोलणार नाही. 60 हजार कोटी रुपयांची कर्जमाफी देऊन आपण फार मोठा तीर मारलेला आहे असा उल्लेख यामध्ये आलेला आहे. मग आपण माणसे मरण्याची वाट बघत का बसला ? अगोदर चार वर्षापासून हे का केले नाही ? आपण प्रत्येक अधिवेशनातील कामकाज जर पाहिले तर या ठिकाणी दोन गोष्टींवरच जास्त चर्चा झालेली आहे. एक म्हणजे विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्राचा जो बॅकलॉग राहिला त्याची चर्चा आणि दुसरे म्हणजे शेतकऱ्यांच्या आत्महत्यांबद्दल जास्त चर्चा झालेली आहे. मी आपल्या हेतूबद्दल शंका घेत नाही. खरोखरच जर आपल्या मनामध्ये होते तर आपण अगोदर हे का केले नाही ? मी आपल्या माहितीसाठी सांगतो की, परवा सह्याद्रीवर ज्यावेळला चहापाण्याची बैठक होती त्यावेळेला चर्चा चाललेली असताना माननीय मंत्रिमहोदय डॉ. पतंगराव कदम म्हणावयास लागले, ते आम्हाला उद्देशून बोलले नाहीत पण ते असे म्हणाले की, ज्यांना बडवावयाचे आहे त्यांनी बडवावे, यु.पी.ए.च्या नेत्या श्रीमती सोनिया गांधी आहेत आणि डॉ. मनमोहन सिंग पंतप्रधान आहेत. त्यावेळी माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर. आर. पाटील बाजूला बसलेले होते. त्यामुळे विरोधी पक्ष आपल्यावर आसूड ओढण्याचे काम करणारच. ते त्यांचे कामच आहे. सत्यनारायणाच्या पूजेला बायको नवऱ्याच्या बाजूला बसते आणि मम म्हणते त्याप्रमाणे हाताला हात लावून मम म्हणण्यासाठी आम्ही या ठिकाणी आलेलो नाही. आम्ही या ठिकाणी सांगणारच. आपण या ठिकाणी सांगितले की, सूचना करा. मी माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर. आर. पाटील साहेबांना सांगू इच्छितो की, आपण तेवढेच संवेदनशील मंत्री आहात आणि आपण उपमुख्यमंत्री असला तरी आपल्यालाही तेवढाच अधिकार आहे. मुंबई शहराला जागतिक दर्जा द्यावयाचा आहे. विमानतळाचे सुशोभिकरण करणे हे मी समजू शकतो परंतु गेट वे ऑफ इंडियाच्या परिसरात सुशोभिकरण करणे म्हणजे मुंबई शहराला जागतिक दर्जा देणे आहे काय ? या शहराची लोकसंख्या 1 कोटी 37 लाख झालेली आहे. आपण 1975 पासून पाहिले तर काँग्रेसच्या प्रत्येक नेत्यांनी भुलभुलय्या करुन, मायाजाल पसरवून गरिबांच्या ठिकाणी स्वप्न रंगवले.



अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MMP/

श्री. मधुकर चव्हाण ......

श्री. रजनी पटेल होते तेव्हापासून प्रत्येक वेळी जाहीर केले आहे. मुंबई शहरामध्ये 1971 ला निवडणूक झाली त्यावेळी आम्ही 1980 सालच्या झोपडपट्टयांना मान्यता देऊ असे जाहीर केले. 1980 साली श्रीमती इंदिराजी गांधी यांनी जनता पार्टीकडून केंद्रात सत्ता हातात घेतली त्यावेळी श्री. रजनी पटेल यांनी जाहीर केले की, आम्ही 1985 पर्यंतच्या झोपड्यांना मान्यता देऊ. त्यानंतर असे सांगण्यात आले की, 1990 पर्यंतच्या झोपड्यांना मान्यता देऊ. ही स्पर्धा आम्ही लावलेली नाही. परवा सुध्दा त्या ठिकाणी टायपिंग मिस्टेक झाली. लोकांना उल्लू बनविण्याचे काम आम्ही केले का ? ते काम आम्ही केले नाही. या मुंबई शहराला सुशोभित करावयाचे असेल तर कठोरपणे कायद्याची अंमलबजावणी आपण केली का ? आपण ती अंमलबजावणी केली नाही.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण....

जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निमाण अभियान अंतर्गत 4 टक्के चटईक्षेत्र दिले, 5 टक्क्यांपर्यंत चटईक्षेत्र वाढवून दिले तरी हे मुंबई शहर एक बेट असल्यामुळे शासन एक इंचही जमीन वाढवू शकत नाही. या मुंबई शहरातील 1995 पर्यंतच्या, त्यानंतर 1999 पर्यंतच्या झोपडपट्टयांना मान्यता देऊ असे सांगितले, त्यानंतर 2000 सालापर्यंतच्या झोपडपट्ट्यांना मान्यता देण्याचे धोरण अवलंबिले आहे. मग शासनाने कायदाच करावा. कोर्टामध्ये शासनाने ॲफिडेव्हिटद्वारे सांगितले आहे. मग अशारितीने वर्षांची मर्यादा वाढवू लागलो तर हे शहर जागतिक दर्जाचे कसे काय होणार ? मुंबई शहरातील लोकांची शासन फसवणूक करीत आहे असे माझे ठाम मत आहे. या राज्याने लहान व मध्यम शहरांसाठी असलेल्या नागरी पायाभूत सुविधा विकास योजनेंतर्गत 61 शहरांचे 81 विकास प्रकल्प अहवाल पाठविलेले आहेत. यापैकी राज्यातील 25 प्रकल्पांसाठी भारत सरकारने 190 कोटी रुपये वितरित केलेले आहेत. 10 कोटी लोकसंख्या असलेल्या या राज्यात 4 कोटी 95 लाख लोक शहरात राहतात. आपले पोट भरण्यासाठी या मुंबई शहरांमध्ये आलेले आहेत. हे लोक वाटेल तशा पध्दतीने जगत आहेत. या मुंबई शहराची लोकसंख्या का वाढत जात आहे ? शहरे फुगत चालली आहेत, गावे ओस पडत आहेत याचा कधी विचार केला का ? आज नागरीकरण मोठ्या प्रमाणावर होत आहे. आज महाराष्ट्रातील अनेक शहरांमध्ये सांडपाण्याची व्यवस्था नाही, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नाही, कचरा टाकण्याची व्यवस्था नाही, बगीचा नाही. या कामांसाठी केवळ 190 कोटी ठेवले आहेत त्यावर आम्ही टीका नाही करावयाची तर काय मम म्हणावे अशी सरकारची अपेक्षा आहे काय ? घरामध्ये म्हातारी माणसे असतील किंवा विधवा भगिनी असतील त्यांची मुले या मुंबईत किंवा ठाणे शहरात आलेली आहेत. मघाशी माननीय सदस्य श्री.जागा म्हणाले की, विधायक सूचना कराव्यात. तुमचे सरकार माझी सूचना मान्य करते का ते सांगावे. मी विधायक सूचना करणार आहे. या अभिभाषणामध्ये असे नमूद केले आहे की, ' राज्यात सन 2007 मध्ये 62,600 कोटींची गुंतवणूक असणारे आणि 2.10 लाख लोकांना रोजगार मिळू शकेल इतक्या क्षमतेचे 454 प्रकल्प कार्यान्वित करण्याचे प्रस्ताव अंतर्भूत असलेली औद्योगिक आवेदन पत्रे व इरादापत्रे सादर करण्यात आलेली आहेत.

2.....

श्री.मधुकर चव्हाण....

72 खाजगी आय.टी.पार्क्सना इरादापत्रे देण्यात आली आहेत.' मी आरोप करुन सांगतो की, पेनिनसुला बिल्डर्सला आय.टी.पार्कसाठी परवानगी दिलेली असताना त्यांनी 100 टक्के जागा कॉर्पोरेट्सना जागा दिलेली आहे. या आय.टी.पार्क्ससाठी चांगल्या चांगल्या जमिनी घेतल्या जात आहेत. पिंपरी-चिंचवड येथील हाफकिन इन्स्टिटयूटची जमीन घेण्याचा घाट घालण्यात आला आहे. या 72 आय.टी.पार्क्ससाठी सरकारने परवानगी दिलेली आहे. या सगळया बिल्डर्सनी त्यांना देण्यात आलेल्या परवानगीप्रमाणे आय.टी.पार्क्स सुरु केले नाहीत, सगळयांनी खाजगी बिझनेसला जागा दिलेली आहे, कोठेही आय.टी.पार्क्स उभे राहिलेली नाहीत. मी पेनिनसुला बिल्डर्ससंबंधी आरोप करतो की, आपल्या एका राजकारणी व्यक्तीने पैसे घेतले परंतु नवी मुंबईत आय.टी.पार्क सुरु केलेले नाही. याची चौकशी करण्यासाठी संयुक्त समिती नियुक्त करावी, सरकारची तयारी असेल तर मी खाली बसतो. माननीय सदस्य श्री.भास्करराव जाधव यांना सांगू इच्छितो की, आपण हिंदुत्ववादी आहात. जे पंडित जवाहरलाल नेहरुंनी केले नाही, लालबहादूर शास्त्री यांनी केले नाही ते या अभिभाषणातील मुद्दा क्रमांक 75 मध्ये नमूद केलेले आहे. 'माझ्या शासनाने केवळ अल्पसंख्यांकांच्या विकासाकरिता म्हणून एक स्वतंत्र विभाग नुकताच स्थापन केला आहे.' होय, या देशामध्ये हिंदू, मुसलमान असा भेदभाव केला जात नाही. परंतु या देशाचे विभाजन धर्माच्या आधारावर झालेले आहे, हे कोणालाही नाकारता येणार नाही. ज्यांना धर्माच्या आधारावर सवलती पाहिजे असतील तर त्यांनी पाकिस्तानात गेले पाहिजे. उद्या भविष्यामध्ये अल्पसंख्यांक मतदार क्षेत्रांची मागणी केली जाईल. अशाप्रकारची व्यवस्था करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे असे सांगितले जात आहे. 25 हजार कोटी रुपयांची तरतूद केंद्राने केलेली आहे. मग राज्य सरकारने तशी तरतूद का केली नाही ? या मुद्यामध्ये पुढे असेही म्हटले आहे की,' त्यांच्या विकासासंबंधातील सर्व विषय अल्पसंख्याक विकास विभागाच्या नियंत्रणाखाली आणण्यात आले आहेत.' हे कशासाठी केले ? याची महाराष्ट्रात गरज आहे काय ? फार तर आर्थिक निकषावर आधारित अशी व्यवस्था करावी. या देशात हिंदू असेल, मुसलमान असेल या मातीमध्ये जन्माला आला असेल, ज्याला वंदे मातरम् म्हणण्याची शरम वाटत नसेल, जो या देशाची संस्कृती मानत असेल, जो गरीब असेल त्याला द्यावे. धर्म हा चार भिंतीच्या आड साजरा झाला पाहिजे किंवा

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण....

आपल्या भावना व्यक्त करण्याची ती जागा आहे. काल येथे एम.बी.बी.एस.मध्ये शिकत असलेले विद्यार्थी आलेले होते. हे विद्यार्थी विमुक्त जाती, भटक्या जमातीतील आहेत. त्या विद्यार्थ्यांना तुमची सर्व फी शासनामार्फत भरण्यात येईल असे सांगितले होते. त्यांना तसे लिहून दिले होते, पण आता एम.बी.बी.एस.च्या पहिल्या वर्षातील विद्यार्थ्यांना असे सांगितले जात आहे की, तुम्ही 3.5 लाख रुपये फी भरली नाही तर तुम्हाला परीक्षेला बसता येणार नाही.

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.अरविंद सावंत)**

नंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ MMP/ पूर्वी श्री. गिते 18:45

(श्री. मधुकर चव्हाण पुढे सुरु...)

या शासनाने गृहनिर्माण योजना जाहीर केली. ज्या दिवशी यू.एल.सी. कायदा पास झाला त्या दिवशी लालबाग, परळ, दादर मधील घरांचे भाव जे प्रति चौ.फूट 5 हजार रु. होते ते 15 हजार, 20 हजार, 25 हजार रु. चौ.फूट असे झाले. महाराष्ट्रातील जमीन मोकळी झाल्यानंतर खरे म्हणजे जागाचे भाव खाली यावयास पाहिजे होते. तुमची हौसिंग पॉलिसी येईल त्यावेळी मी सविस्तरपणे बोलेन. जागांचे रेट ठरविण्याच्या संदर्भात तुम्ही आयोग नेमणार आहात. मी या निमित्ताने शासनाला सूचना करतो की, ज्या जमिनी बिल्डर्सना बांधकाम करण्यासाठी मिळणार आहेत त्या बिल्डर्सना अशी अट घालावी की तुला मध्यमवर्गीयांना परवडतील अशी घरे बांधावी लागतील. तुला जर 10 लाख चौ.फूट बांधकामाची परवानगी दिली तर 5 लाख चौ.फुटावर मध्यमवर्गीयांना परवडणारी वन रुम किचन, हॉलची घरे बांधावी लागतील. केवळ श्रीमंतासाठी 800-1000 चौ.फुटाची घरे तुला बांधता येणार नाहीत. यासंबंधीचे जे बिल येणार आहे त्यामध्ये मध्यमवर्गीयांसाठी फक्त 20 टक्के बांधकाम करण्याची परवानगी देण्यात आलेली आहे. उर्वरित 80 टक्के बांधकाम बिल्डरने हवे तसे करावे अशी तरतूद त्या बिलामध्ये आहे. माननीय राज्यपाल हे मुस्लिम समाजाचे असल्यामुळे साधे "वंदे मातरम्" या ठिकाणी म्हटले गेले नाही. मला त्यांच्या जाती-धर्माबद्दल बोलावयाचे नाही. माननीय राज्यपालांबद्दल आमच्या मनात आदर आहे. परंतु माझे म्हणणे इतकेच आहे की, अशा प्रकारचे लांगूनचालन तुम्ही कशाकरिता करीत आहात ?

या ठिकाणी अनेक मुद्दे बोलण्यासारखे आहेत. शेवटी मी झोपडपट्टीच्या संदर्भात एक मुद्दा मांडून माझे भाषण संपविणार आहे. अनधिकृत झोपडपट्टयाबाबत काही तरी ठोस निर्णय घ्या. 2002, 2003, 2004, किंवा पाहिजे असल्यास 2008 पर्यन्तची तारीख ठरवा. त्या पलिकडे कोणतेही अनधिकृत बांधकाम केले गेले तर ते कठोरपणे तोडले जाईल असा कायदा करा. मुंबई येथील छत्रपती शिवाजी आंतरराष्ट्रीय विमानतळाचे आधुनिकीकरण करण्याचे काम करुन आणि गेटवे ऑफ इंडियाच्या परिसराचे सुशोभीकरण करुन मुंबई शहराला जागतिक दर्जाचे शहर बनविण्याची योजना आहे. विमानतळ हे श्रीमंतासाठी आहे. आज मुंबई शहरातील बेस्टच्या जागा तुमचे खोब्रागडे हे विकायला निघालेले आहेत. त्याबाबत त्यांना कोणी विचारत आहे काय ? मुंबई शहरातील लोकांना खेळण्यासाठी चांगले मैदान देण्याचे, पिण्यासाठी चांगले पाणी देण्याचे, मुंबई

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. मधुकर चव्हाण...)

शहरातील लोकांना चांगले पार्क देणाचे, आरोग्याच्या सुविधा देण्याचे सरकारचे धोरण आहे काय ? मुंबईमध्ये एक कॅन्सरचे हॉस्पिटल आहे, त्याचा किती ढोल बडवता ? आज तेथे कॅन्सर रुग्णांची खूप गर्दी झालेली आहे. मी या सदनामध्ये मागील चार वर्षापासून विविध आयुधांच्या माध्यमातून गांधी हॉस्पिटल हे जनरल हॉस्पीटल करण्यासाठी शासनाला सूचना करीत आहे. परळ येथील महात्मा गांधी हॉस्पिटल हे 750 खाटांचे आहे. मुंबई मधील गिरण्या बंद झाल्यामुळे ते हॉस्पिटल देखील बंद पडत चालले आहे. के.ई.एम. हॉस्पिटल, नायर हॉस्पिटल, लोकमान्य टिळक हॉस्पिटल ही हजार-हजार खाटांची हॉस्पिटल्स असली तरी तेथे 2500 पेक्षा जास्त रुग्ण असतात, दोन खाटांच्या मध्ये रुग्ण, गॅलरीमध्ये रुग्ण, सगळीकडे रुग्ण दिसतात. म्हणून महात्मा गांधी हॉस्पिटल हे जनरल हॉस्पिटल करावे अशी मी सातत्याने मागणी करीत आहे. त्याबाबत आम्ही प्रस्ताव पाठविलेला आहे, पत्र पाठविलेले आहे असे सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री श्री. रणजित कांबळे यांनी सांगितले. मग आपण पाठविलेल्या पत्राला काय उत्तर मिळाले ? सभापती महोदय, या सदनामध्ये एक तरी मंत्री जबाबदारीने बसतो काय ? हे शासन कसे चालले आहे ? सभागृहामध्ये दिलेल्या आश्वासनांचे काय झाले हे कधी मंत्री महोदयांनी पाहिलेले आहे काय ? सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर अनेक सन्माननीय सदस्यांनी विस्तृतपणे चर्चा केलेली आहे. पूर्वी या देशावर जेव्हा इंग्रज राज्य करीत होते त्यावेळी व्हॉईसरॉय सभागृहामध्ये अभिभाषण करायचे आणि त्याची चमचेगिरी करणारे लोक व्हॉईसरॉयच्या अभिभाषणाबद्दल, वा ! काय भाषण केले, अशी त्यांची भलामण करायचे. त्यावेळची ही प्रथा अजूनही चालत आलेली आहे. ही प्रथा बंद झाली पाहिजे. या अभिभाषणामध्ये राज्यातील जनतेला काय दिलेले आहे ? राज्याच्या हाती भोपळा दिलेला आहे. सभापती महोदय, 4 कोटी 95 लाख लोक महाराष्ट्राच्या शहरांमध्ये राहातात. भारताचे अर्बनायझेशन 27 टक्के आहे आणि महाराष्ट्राचे अर्बनायझेशन 48 टक्के आहे. लोक पोट हातावर घेऊन शहराकडे का जात आहेत याचा कधी विचार केलेला आहे काय ? शहरे का फोफावली, रस्ते का अपुरे पडायला लागले ? टाटाला आपली सांगण्याची हिंमत आहे काय ? की, तुझी 1 लाखाची गाडी मुंबई शहरामध्ये आणू नको. मध्यमवर्गीयांना सुध्दा गाडी

==3==

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. मधुकरराव चव्हाण....)

फिरविण्याचा हक्क आहे. टॅक्सी मिटर लावण्याचे बिल या ठिकाणी पास झाले. टॅक्सीवाले लोकांना लुटत आहेत. टॅक्सी भंगार झालेल्या आहेत. परंतु त्याकडे परिवहन मंत्र्यांना बघायला वेळ नाही.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ MMP/ KGS/ प्रथम श्री. शिगम 18:50

श्री. मधुकर चव्हाण.....

युतीचे शासन असल्यामुळे, संयुक्त शासन असल्यामुळे प्रशासन अतिशय ढिले पडले आहे. प्रशासन ढिले नाही, प्रशासनातील प्रमुख ढिला पडलेला आहे. घोडयावर बसणारा घोडस्वार मजबूत असावा लागतो. त्या घोडयाची मान, घोडयाचे पाय यांच्यावर घोडेस्वाराची कमांड असावी लागते. घोडेस्वार घोडयावर बसल्याबरोबर घोडयाला कळले पाहिजे की, घोडेस्वाराला कोणत्या दिशेला जावयाचे आहे एवढी कमांड घोडेस्वाराची घोडयावर असली पाहिजे. परंतु शासनकर्ते इतके हलके फुलके झालेले आहेत की, तुमची किंमत आय.ए.एस्. अधिका-यांनी ओळखली आहे. हमने बहुत कुछ किया हैं. अपक्ष सदस्यांचे बरे आहे की, कधी तळयात तर कधी मळयात जायचे. सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात अभिनंदन करण्यासारख्या ठोस योजना काहीही नसल्यामुळे मी खेद व्यक्त करतो आणि माझे भाषण संपवितो.

-------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ( मुंबई विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर खेद व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. विरोधी पक्षाचा सदस्य आहे म्हणून खेद व्यक्त करीत नाही. तर खेद व्यक्त करण्यासारखेच हे अभिभाषण माननीय राज्यपालांनी केलेले आहे. काल आम्ही अभिभाषणावर बहिष्कार टाकला. शिवसेना पक्ष कमजोर झाला, शिवसेना पक्षात आता काही दम उरलेला नाही, तो पक्ष सभागृह बंद पाडू शकत नाही. तशी परिस्थिती नव्हती. मी अतिशय नम्रपणे सांगू इच्छितो की, शिवसेना पक्षाने काल डेकोरम पाळला. शिवसेना पक्षाने ठरविले होते की, आपण आपला निषेध नोंदवावयाचा, परंतु सभागृह बंद पडेल अशी कोणत्याही प्रकारची हरकत करावयाची नाही. आम्ही मनात आणले असते तर सभागृहाचे कामकाज दहा मिनिटात बंद करु शकलो असतो. सभागृह दहा मिनिटांमध्ये बंद पाडण्याची शक्ती शिवसेना आणि भारतीय जनता पक्षाच्या सदस्यांमध्ये आहे. उद्या, परवा किंवा आपण सांगाल त्या दिवशी सभागृह बंद पाडण्याची शक्ती आम्ही दाखवून देऊ. जसे तुमच्या भात्यात बाण आहेत, तसे आमच्या भात्यात देखील बाण आहेत. राज्यात ज्या ज्या ठिकाणी शेतक-यांच्या आत्महत्या केल्या त्या त्या ठिकाणी आमच्या पक्षाचे नेते गेले. मृत शेतक-यांच्या कुटुंबियांना आमच्या नेत्यांनी आर्थिक मदत केली. आम्ही सत्तेत नाही तरी देखील माणुसकी आणि कळवळा या भावनेने आमचे नेते त्या ठिकाणी गेले होते. संभाजीनगर येथे विजेची घोषणा केली गेली, त्या दिवशी लागलीच शिवसेनेचे खासदार श्री. चंद्रकांत खैरे हे आत्महत्या करणा-या शेतक-याच्या घरी गेले आणि त्यांच्या कुटुंबियांना 1 लाख रुपयांची आर्थिक केली. आत्महत्या केलेल्या शेतक-यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत करण्याची परंपरा शिवसेना पक्षाने आजही सुरु ठेवलेली आहे. कै. प्रमोद महाजन देखील आत्महत्या केलेल्या शेतक-यांच्या कुटुंबियांना भेटण्यासाठी गेले होते. माननीय श्री. गोपीनाथराव मुंडे देखील आत्महत्या केलेल्या शेतक-यांच्या कुटुंबियांना भेटण्यासाठी गेले होते. आमचे शिवसेना पक्षाचे नेते माननीय श्री.उध्दव ठाकरे आत्महत्या केलेल्या शेतक-यांच्या कुटुंबियांना भेटण्यासाठी गेले होते. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते हे तर आत्महत्या केलेल्या शेतक-यांच्या कुटुंबियांसाठी साडी-चोळी घेऊन गेले होते आणि मृत शेतक-यांच्या पत्नीकडून राख्या बांधून परत आले होते. मला सत्ताधारी पक्षातील मंत्र्यांना विचारावयाचे आहे की, तुमचे कोणते नेते आत्महत्या केलेल्या शेतक-यांच्या कुटुंबियांना भेटण्यासाठी गेले होते ? तुमच्या कोणत्या नेत्यांनी मृत शेतक-यांच्या कुटुंबियांचे अश्रू

3...



ABG/ MMP/ KGS/ प्रथम श्री. शिगम 18:50

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत....

पुसले आहेत ? याबाबतची माहिती माननीय उप मुख्यमंत्र्यांनी आपल्या उत्तराच्या भाषणात द्यावी अशी माझी मागणी आहे. माननीय पंतप्रधानांचे पॅकेज आणि राज्य पॅकेज या दोन्ही पॅकेजखालील विविध उपययोजनांच्या प्रभावी अंमलबजावणीचे राज्यात अनुकूल परिणाम दिसू लागले आहेत. सदर पॅकेज जाहीर करुन 27 शेतक-यांनी आत्महत्या केल्या आहेत. राज्यात किती शेतक-यांनी आत्महत्या केल्या आहेत यासंबंधीची यादी आज सकाळी सभागृहात वाचून दाखविण्यात येणार होती. राज्यातील शेतकरी आत्महत्या करीत आहेत हा अनुकूल परिणाम झाला आहे काय ? शासनाकडून वारंवार सांगितले जात आहे की, शेतक-यांवरील कर्जमाफीसाठी 60 हजार कोटी रुपये दिले. एवढे पैसे उपलब्ध करुन दिल्यानंतरही 27 शेतक-यांनी आत्महत्या का केल्या ? यासंबंधीचा खुलासा शासनाने आपल्या उत्तराच्या भाषणात करावा अशी माझी मागणी आहे. शेतकऱ्यांनी केलेल्या आत्महत्येची कारणे शोधण्यासाठी पाच-पाच, सहा-सहा अहवाल शासनाने मागविले. आत्महत्येची कारणे शोधण्यात शासन अपयशी का ठरले यासंबंधीचे उत्तर अभिभाषणात कुठेही दिलेले नाही. आपण पाच एकरपर्यंतच्या शेतक-यांना कर्जमाफीची सवलत दिली. पाच एकरापेक्षा जास्त शेती असलेल्या शेतक-यांच्या बाबतीत काय करणार आहात ? आत्महत्या केलेल्या शेतक-यांचे पंचनामे शासनाकडून ज्या ज्या वेळी केले गेले, त्या त्या वेळी शेतक-याला दारुच्या गर्तेत बुडालेला आहे असे दाखवून दिले आहे. आजच सकाळी या विषयावर सभागृहात चर्चा झाली आहे. 584 आत्महत्या प्रकरणापैकी पैकी फक्त 162 प्रकरणे पात्र ठरविली आहेत. बाकी शेतक-यांनी आत्महत्या केल्या नाहीत काय ? शेतक-याला तंबाखू, विडी या गोष्टीचे व्यसन असते. परंतु ज्यावेळी शेतक-यांवरील कर्जांचा डोंगर वाढत जातो त्यावेळी तो दारुच्या आहारी जातो. आत्महत्या केलेल्या शेतक-यांतील अनेक शेतक-यांनी आपल्या मुलीच्या लग्नासाठी कर्ज घेतलेले आहे. आपल्या सारखी माणसे देखील मुलीचे लग्न करण्यासाठी कर्ज घेतात. त्या शेतक-यांवर मुलीच्या लग्नाच्या कर्जाचा बोजा असेल, शेती कर्जाचा बोजा असेल, शेतीची औजारे घेतली म्हणून बोजा असेल, त्यात त्या शेतक-यांची काय चूक आहे ? प्रत्येक आई-वडिलांची इच्छा असते की, आपल्या मुलीचे लग्न चांगल्या घरी व्हावे. त्या लग्नासाठी चार पैसे आपण खर्च करावे. त्यात शेतक-याची काय चूक आहे ? त्यास तुम्ही डिस्कॉलिफाय करता.....

यानंतर श्री. कानडे....



डॉ. दीपक सावंत ....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

हे शासन शेतकऱ्यांचे तारक आहे की मारक आहे असा प्रश्न निर्माण होतो. सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव यांनी सांगितले की, आमचे नेते द्रष्टे आहेत. आमचे काहीही म्हणणे नाही ते द्रष्टे आहेत. सभापती महोदय, कालच ग्लोबल वॉर्मिंगच्या संदर्भात श्री. सुरेश पचौरी यांचा सत्कार करण्यात आला. ग्लोबल वॉर्मिंगचा विषय भारताच्या आणि सर्व जगाच्या दृष्टीने महत्वाचा विषय आहे. पृथ्वीचे तापमान आज 1.4 दशांश सेंटीग्रेडने वाढत आहे. 26 जुलैचा पाऊस पहा, मागील महिन्यात पडलेली थंडी पहा, त्सुनामी पहा हे सर्व ग्लोबल वॉर्मिगचे परिणाम आहेत. आपले नेते द्रष्टे आहेत तर माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये ग्लोबल वॉर्मिंगचा उल्लेख का आला नाही?हा विषय सर्व लोकांच्या दृष्टीने परिचयाचा आहे. रोज याविषयावर चर्चा होते. ज्यांचा ग्लोबल वॉर्मिंगच्या बाबतीत सत्कार करण्यात आला त्यांचा अभिभाषणात उल्लेख नाही. या ग्लोबल वॉर्मिंगमुळे माणसाचे नैसर्गिक जीवन, पशु-पक्षी यावर परिणाम होत आहे. श्री. सुरेश पचौरी यांचा सत्कार झाला त्यावेळी अमरावतीचे श्री. किशोर दिघे हेही उपस्थित होते. ज्याप्रमाणे डिझास्टर मॅनेजमेंटसाठी वेगळा सेल निर्माण करण्यात आला आहे त्याप्रमाणे ग्लोबल वॉर्मिंगसाठी सुध्दा वेगळा सेल करण्याची आवश्यकता आहे. तहान लागल्यावर आपण विहीर खणणार काय ? गेली 6-7 वर्षे राज्यामध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत आणि आता आपण विहीर खोदत आहात. ग्लोबल वॉर्मिंगबाबत माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये उल्लेख नाही याचे याचे मला फार दु:ख होत आहे. आपण पुढे काय करणार आहोत ? किती तज्ज्ञ बोलाविणार आहोत आणि पर्यावरणवाद्यांशी चर्चा करणार आहोत ? पर्यावरणवाद्यांचा पूल बांधण्यासाठी विरोध आहे. सभापती महोदय, माझ्या माहितीनुसार छत्रपती शिवाजी आंतरराष्ट्रीय विमानतळाचे आधुनिकीकरण सुरु आहे. त्याठिकाणी बसविलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा ज्याचे उद्घाटन तत्कालीन पंतप्रधान श्री. वाजपेयी आणि शिवसेनाप्रमुख श्री. बाळासाहेब ठाकरे यांनी केले होते तो पुतळा हटविला जाणार आहे. अशा प्रकारे जर पुतळा हलविला जाणार असेल तर ती गोष्ट कोणत्याही प्रकारे सहन केली जाणार नाही हा इशारा मी राज्यपालांच्या अभिभाषणाच्या निमित्ताने देत आहे. मुंबई महानगरपालिका आणि मुंबई महानगर विकास प्राधिकरण यांच्यामार्फत मुंबईमध्ये रस्त्यांची कामे सुरु आहेत. एकही रस्ता सरळ ठेवलेला नाही. सगळीकडे खोदून ठेवण्यात आलेले आहे. महानगरपालिका आणि एमएमआरडीए यांच्यामध्ये भांडणे सुरु आहेत. रस्त्यांमध्ये ट्रॅफीकचा प्रश्न निर्माण झालेला आहे.

......2



डॉ. दीपक सावंत ...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

माझी अशी विनंती आहे की, एक तर एमएमआरडीएला काम करु द्यावे किंवा मुंबई महानगरपालिकेला काम करु द्यावे. एमएमआरडीएने जी कामे केली आहेत ती अपूर्ण आहेत. रस्ते खोदून ठेवल्यामुळे आणि लेव्हल नसल्यामुळे पावसाळयामध्ये पाणी साठणार आहे. पुन्हा एकदा मुंबईमध्ये जलप्रलय होणार की काय याची भीती वाटते. यासंबंधात राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये कुठेही उल्लेख करण्यात आलेला नाही.

सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये कुपोषणाचा जो मूलभूत प्रश्न आहे आणि बेरोजगारांची समस्या आहे तसेच लाखो मराठी पदव्युत्तर आणि पदवीधर महाराष्ट्रात बेकार आहेत त्यांच्यासंबंधी एका शब्दाचाही या अभिभाषणात उल्लेख करण्यात आलेला नाही. त्यांच्यासाठी शासन कोणत्या योजना राबविणार आहे ? शासन भूमिपुत्रांना न्याय दिला जाईल असे म्हणते परंतु त्यासंबंधीचा उल्लेख अभिभाषणात नाही. मराठी मुलांना नोकऱ्या देण्याबाबत राज्यपालांच्या अभिभाषणात उल्लेख नाही. याचा सुध्दा उल्लेख होणे आवश्यक आहे.

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत..........

त्याचा उल्लेख अभिभाषणात होणे आवश्यक होते, परंतु दुर्दैवाने उल्लेख झालेला नाही. दुसरी महत्वाची बाब ही कुपोषणाची आहे. मागील अभिभाषणात राजमाता जिजाऊ बालक पोषण मिशन या योजनेचा उल्लेख केलेला होता.

**तालिका सभापती** (श्रीमती ऊषाताई दराडे) : उर्वरित सन्माननीय सदस्यांना आपले विचार व्यक्त करण्यापर्यंत सभागृहाची वेळ वाढविण्यात येत आहे. सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी आपले भाषण सुरु करावे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदया, मागील वर्षीच्या राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणामध्ये राजमाता जिजाऊ बालक पोषण मिशनचा उल्लेख केला होता. यावर्षीच्या अभिभाषणामध्ये या संदर्भात कुठेही उल्लेख झालेला दिसत नाही. कुपोषणाचा विषय पूर्णपणे वगळण्यात आलेला आहे. आज राज्यामध्ये कुपोषणाने बालके मृत्युमुखी पडत असताना राज्य शासन या संदर्भात काय उपाययोजना करीत आहे? नुकताच नाशिक जिल्हयातून अहवाल सादर करण्यात आला त्यामध्ये 2600 बालके कुपोषणाने मृत्युमुखी पडल्याचे नमूद केले आहे. त्या संदर्भात काय करणार आहात? काल प्रश्नोत्तराच्या तासाला आरोग्य राज्यमंत्री श्री.रणजित कांबळे यांनी सांगितले की, आमच्याकडे डॉक्टर्स उपलब्ध नाहीत. डॉक्टर नाहीत असे सांगून शासन हात झटकून मोकळे होत आहे. या संदर्भात शासन काय करीत आहे याचा उल्लेख अभिभाषणामध्ये होणे आवश्यक होते.

सभापती महोदया, मुद्दा क्रमांक-49 मध्ये आगामी वर्षामध्ये एड्सग्रस्त रुग्णांसाठी नवीन 15 ॲन्टी रेट्रोव्हायरल उपचार केंद्रे सुरु करण्यात येणार आहेत असा उल्लेख झालेला आहे. मागील वर्षीच्या अभिभाषणामध्ये देखील अशा प्रकारची 13 एआरटी उपचार केंद्रे सुरु करण्यात येतील असे म्हटले होते. म्हणजे मागील वर्षाची 13 आणि यावर्षीची 15 अशी एकूण 28 केंद्रे सुरु झाली का? 28 केंद्रे सुरु झाली नसतील तर मागील वर्षी सांगितलेली 13 एआरटी उपचार केंद्रे सुरु झाली का? आज एड्सचा प्रश्न जागतिक पातळीवर उग्र स्वरुप धारण करु लागला आहे. या एआरटी उपचार केंद्राबाबत मागील वर्षीच्या अभिभाषणात केलेली वाक्यरचना जशीच्या तशी यावर्षीच्या अभिभाषणात नमूद केलेली दिसून येते. फक्त केंद्रांची संख्या मागील वर्षी 13 नमूद केली होती व यावर्षीच्या अभिभाषणात ही संख्या 15 इतकी नमूद केली आहे. मागील वर्षीच्या अभिभाषणामध्ये

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत..........

म्हटले होते की, "माझ्या शासनाने एड्सला प्रतिबंध करण्यासाठी 683 समुपदेशन व चाचणी उपचार केंद्रे आणि अंदाजे 11 हजार एड्सग्रस्त रुग्णांसाठी 13 अँटी रेट्रोव्हायरल-एआरटी उपचार केंद्रे सुरु करण्याचे ठरविले आहे." या अभिभाषणाकडे कोणी लक्ष देतो की नाही? गेल्या वर्षीचे अभिभाषण आणि या वर्षीचे अभिभाषण यामध्ये काय फरक आहे हे कोणी पाहतो की नाही? मघाशी कर्करोग रुग्णालय सुरु करण्यात येत असल्याचा उल्लेख झाला. ही अत्यंत चांगली गोष्ट आहे. परंतु आज मुंबईच्या जे.जे.रुग्णालयात जाऊन पहा. नवनवीन कल्पना राबविल्या जात आहेत. परंतु ज्या सुविधा अस्तित्वात आहे त्यांचा वापर होत नाही. आज जे.जे.रुग्णालयातील एम.आर.आय. व सी.टी.स्कॅन मशिन बंद अवस्थेत आहे. जे.जे.रुग्णालयात एका ऑर्थोपेडिक सर्जनच्या मार्गदर्शनाखाली 40 लाख रुपये खर्च करुन ऑर्थोपेडिक ऑपरेशन थिएटर उभारण्यात आले. परंतु ऑपरेशन करण्यासाठी जो वर दिवा बसविलेला आहे तो दिवा जो डॉक्टर ऑपरेशन करण्यासाठी उभा राहणार आहे त्याच्या डोक्याला लागतो. त्यामुळे दोन वर्षापासून ऑपरेशन थिएटर तयार होऊनही बंद अवस्थेत आहे. हीच परिस्थिती या एआरटी उपचार केंद्राबाबतची आहे. मी जबाबदारीने सांगू इच्छितो. आपण स्वत: जाऊन पाहणी करावी. किती रुग्ण येतात, किती रुग्णांना औषधोपचार मिळतो, किती लोकांना सी.टी.स्कॅन वा एम.आर.आय.मशिनचा लाभ होतो? शेजारी असलेल्या खाजगी उपचार केंद्रात लोकप्रतिनिधींकडून पत्र दिल्यानंतर एम.आर.आय. किंवा सी.टी.स्कॅन करुन मिळते.

सभापती महोदया, शासनाने पुणे येथील बी.जे.वैद्यकीय महाविद्यालयामधील आणि ससून सर्वोपचार रुग्णालयामधील सुविधांचा दर्जा वाढविण्याचे ठरविले आहे. पुण्याला सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल खाजगी क्षेत्राच्या सहभागाने उभारण्यात आले. ते दोन वर्षापूर्वी तयार झाले. परंतु अद्याप त्याचे उद्‌घाटन झाले नाही किंवा निधी उपलब्ध असतानाही योग्य ती यंत्रसामुग्री देखील पुरविण्यात आलेली नाही. सर्वसामान्य लोकांच्या दृष्टीने आरोग्य आणि शिक्षण या महत्वाच्या बाबी असताना शासन या गोष्टी प्राधान्याने का करु इच्छित नाही?

सभापती महोदया, शासनाने हे वर्ष इ-गव्हर्नन्स वर्ष म्हणून घोषित केले.

(नंतर श्री.खर्चे.....

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत........

सध्या संगणकाचे युग आहे. ज्याप्रमाणे आपण जैविक कचरा किंवा घनकचऱ्याची विल्हेवाट लावण्याचे ठरवले आहे त्याप्रमाणे संगणकापासून निर्माण होणाऱ्या कचऱ्याबाबत काय विचार केला आहे. ज्याला आपण फॉरेन लँग्वेजमध्ये ई-वेस्ट म्हणतो त्याबाबत कोणत्याही प्रकारचे रेग्युलेशन आपल्याकडे नाहीत. येत्या दहा वर्षात लाखो कॉम्प्युटर्स वेस्ट होणार आहेत त्याची विल्हेवाट लावण्यासाठी आजपासूनच तयारी करणे आवश्यक आहे. ज्यावेळेस आपण मोठमोठे शब्द वापरतो, मोठमोठया टर्मिनॉलॉजीसारख्या शब्दांचा वापर करतो पण केंद्रात सुध्दा या ई-वेस्टसंबंधी कुठलाही कायदा अस्तित्वात नाही. हा कायदा आपल्या राज्यात देखील होणे आवश्यक आहे. एवढे बोलून मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभर व्यक्त करतो आणि खेद व्यक्त करुन माझे भाषण पूर्ण करतो.

---------------

........2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली (विधानसभेने निवडलेले) : अध्यक्ष महाराज.....

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदया, एक वेगळा खेद मला येथे व्यक्त करावाचा आहे तो म्हणजे सभागृहात अधिकाऱ्यांची गॅलरी ज्याला आपण अदृश्य गॅलरी म्हणतो ती गॅलरी कायमचीच अदृश्य करुन टाकावी. कारण एकही अधिकारी नोंद घेण्यासाठी बसलेला दिसत नाही. तसेच हे जे चालले आहे ते इतके भयानक आहे की, आज सकाळी माननीय सभापतींनी सुध्दा त्याबद्दल खेद व्यक्त केला. कारण अधिकारी गॅलरीमध्ये एकही अधिकारी कामकाजातील मुद्यांची नोंद घेण्यासाठी बसलेला नाही. याची दखल घेणे आवश्यक आहे.

श्री. मधुकर चव्हाण : महोदया, आम्ही या ठिकाणी चावडीवरच्या गप्पा करण्यासाठी आलेलो नाहीत तर आमचे विचार व्यक्त करीत आहोत आणि त्याची नोंद घेणारे कोणीच अधिकारी नसतील तर ते योग्य नाही. माननीय मंत्री महोदय जरी एकटे असले तरी ते क्लार्क नाहीत.

**तालिका सभापती (श्रीमती उषाताई दराडे)** : ही बाब सभागृहाच्या लक्षात आणून दिलेली आहे. माननीय मंत्री महोदयांना सुध्दा तशा सूचना दिलेल्या अहोत. अधिकारी प्रेक्षक गॅलरीमध्ये बसलेले असून ते नोंद घेत आहेत. तसेच ही बाब कामकाज सल्लागार समितीमध्ये लक्षात आणून दिली जाईल, अशी दक्षता माननीय मंत्री महोदयांनी घ्यावी. आपण कामकाज सुरु करावे.

श्री. अनिल देशमुख : होय, यासंबंधीची नोंद घेण्यात येत आहे.

श्री. अरविंद सावंत : महोदया, प्रेक्षक गॅलरीत बसलेले अधिकारी मुद्यांची नोंद घेतीलच याची शाश्वती नाही.

**तालिका सभापती (श्रीमती उषाताई दराडे)** : ठीक आहे, आपण कामकाज सुरु करु. सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली यांनी आपले भाषण सुरु करावे.

.....3

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली : महोदया, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाचा प्रस्ताव मांडणारे सन्माननीय सदस्य तसेच अनुमोदन देणाऱ्या सभासदांचे मी सुरुवातीला अभिनंदन करणार आहे व माझे याबाबतीतील विचार मांडणार आहे.

महोदया, सन 2008-09 च्या अंदाजपत्रकात केंद्रशासनाने 60 हजार कोटीची कर्जे माफ करण्याचा ऐतिहासिक व क्रांतिकारी निर्णय घेतला त्याबद्दल मी केंद्रशासनाचे अभिनंदन करतो. त्याचबरोबर मी अशीही सूचना करतो की, ज्यांनी कर्ज भरलेले आहे, त्यांच्या बाबतीत शासन कोणता निर्णय घेणार आहे, याचा उहापोह होणे आवश्यक आहे. कारण आज बँकांसमोर देखील हा प्रश्न निर्माण झालेला आहे. प्रामाणिकपणे जे कर्ज भरतात त्यांच्यामध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झालेली आहे. म्हणून याबाबत काय करता येईल याचाही विचार होणे आवश्यक आहे. जलसंचय करणारी जी बांधकामे आहेत ती फार मोठया प्रमाणात शासनाने हाती घेतली आहेत पण त्याचबरोबर जे 900 डॅम झालेले आहेत, 2842 छोटी छोटी धरणे बांधलेली आहेत, 3000 च्या वर शेततळी बांधलेली आहेत आणि 233 लहान पाटबंधारे झालेले आहेत..........

यानंतर श्री. जुन्नरे ......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली ...

या सगळयांमुळे 45,860 हेक्टर जमीन ओलिताखाली आलेली आहे. त्यामुळे माझी शासनाला विनंती आहे की, कोकणामध्ये जर छोटे छोटे बंधारे झाले तर त्यांचा कोकणातील शेतक-यांना चांगला उपयोग होऊ शकेल. कोकणामध्ये मोठया प्रमाणात पाऊस पडत असतो त्यामुळे इतर भागाचेच मापदंड कोकणातील बंधा-यासाठी लावले तर त्याचा उपयोग होणार नाही, तरी कोकणासाठी वेगळे मापदंड लावण्याची आवश्यकता आहे. सभापती महोदया, शेतक-यांना त्यांच्या उत्पन्नाचा चांगला मोबदला मिळण्यासाठी, आंबा, मोसंबी, द्राक्षे, डाळींबे, केळी, संत्री व भाजीपाला इत्यांदीसाठी निर्यात सुविधा केंद्रे सुरु करण्यात येत आहे या योजनेसाठी 50 कोटी रुपयांची तरतूद शासनाने केलेली आहे.असे या अभिभाषणात सांगण्यात आले आहे आघाडी शासनाच्या या योजनेमुळे आता शेतक-यांना त्यांच्या मालाला चांगला मोबदला मिळणार आहे. त्यामुळे मी शासनाचे अभिनंदन करतो. पहिल्यांदाच कोकणातील आंबा निर्यात करण्याची सोय रत्नागिरी आणि सिंधुदूर्ग या जिल्हयासाठी लोकशाही आघाडी सरकारने केल्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. त्याच बरोबर कोकणात कोकम,काजू, जांभळाचे मोठया प्रमाणात उत्पादन होत असते त्याचाही समावेश या योजनेमध्ये झाला तर कोकणातील शेतक-यांच्या दृष्टिने ते सोईचे होईल. गेल्या 3 वर्षात आघाडी सरकारने सिंचनासाठी 1100 कोटी रुपये खर्च केलेले आहेत. त्यामुळे जवळपास 4 लक्ष हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आलेले आहे. कोकणातील 4 जिल्हयातील 96 सिंचनाचे प्रकल्प अर्धवट अवस्थेत आहेत ते पूर्ण करण्याचा उल्लेख माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात झाला असता तर चांगले झाले असते. कोकणातील काळंबा प्रकल्प हा एकमेव मोठा प्रकल्प आहे तो जर पूर्ण झाला तर फार मोठया जमिनी सिंचनाखाली येऊ शकतील.

सभापती महोदया, नवी मुंबई येथे आंतरराष्ट्रीय विमानतळ होणार आहे परंतु सन 199-2000 मध्ये कोकणातील सिंधुदूर्ग जिल्हयाचे मुख्यालय असलेल्या ओरोस येथे दोन वर्षापूर्वी या कामासाठी निविदाही काढण्यात आली परंतु पुढे काहीही प्रगती झाली नाही. तसेच या प्रकल्पाचे काय झाले याची काहीही माहिती मिळत नाही. सिंधुदूर्ग जिल्हा पर्यटन जिल्हा म्हणून घोषित करण्यात आलेला आहे त्यामुळे या जिल्हयाला महत्व प्राप्त झालेले आहे म्हणून या ठिकाणी विमानतळ होण्याची आवश्यकता आहे त्या दृष्टीने शासनाने लद्या द्यावे अशी विनंती आहे.

....2....

श्री.राजन तेली.....

सभापती महोदया, 462 कि.मी. चे 2 नवीन रेल्वे मार्ग शासनाने जाहीर केलेले आहे त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. कोकण रेल्वे ही कोकणातून जाते परंतु या कोकण रेल्वेचा फायदा जास्त करुन कोकणाला होत नाही. कोकण रेल्वे गोवा आणि केरळ पर्यंत जाते. त्यामुळे कोकण रेल्वेचा उपयोग कोकणातील जनतेला होण्यासाठी केंद्रसरकार आणि राज्य सरकारने वाटा उचलून सावंतवाडी येथे एक टर्मिनल केले तर कोकणवासीयांना चांगले होईल. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाघव यांनी कोल्हापूर ते कोकण असा रेल्वे मार्ग झाला पाहिजे अशी मागणी केली आहे परंतु कोल्हापूर ते वैभववाडी या मार्गाचा सर्व्हे झालेला आहे. त्यामुळे कोल्हापूर ते वैभववाडी रेल्वेमार्गाचा भविष्यात तरी विचार व्हावा अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्र शासनाने तमाशा, लावण्या तसेच कोकणातील दशावतार इत्यादी लोक कंलाचे संवर्धन करण्यासाठी व त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी नवीन धोरण जाहीर केलेले आहे. त्यामुळे माझी यासंदर्भात विनंती आहे की, कोकणातील कळसुत्र बाहुल्या, जाखडी अशा कोकणातील 54 कलांचा समावेश या योजनेमध्ये झाला तर कोकणातील कलावंताना न्याय मिळेल.

सभापती महोदय, महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्नाच्या संदर्भात कित्येक वर्षापासून आंदोलने सुरु आहेत. परंतु यासंदर्भात शासनाने चांगली भूमिका घेतली असल्यामुळे मी शासनाचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय,मुंबई शहरातील पर्यटन विकास आणि ऐतिहासिक वास्तूंच्या जतन व संवर्धनाकरिता विशेष कार्यक्रम राबविण्यात येत आहे. यामध्ये गेटवे ऑफ इंडिया, बाणगंगा या परिसरांचा आणि मुंबईतील वरळी, वांद्रे, घोडबंदर, शिवडी व वसई येथील किल्ल्यांचा समावेश करण्यात आलेला आहे. महाराष्ट्रात अनेक गड व किल्ले आहेत.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजन तेली ...

मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदूर्ग इत्यादी ठिकाणी 107 गड आणि किल्ले आहेत. सिंधुदूर्ग हा किल्ला समुद्रात आहे आणि तेथे छत्रपती शिवाजी महाराजांचे एक मंदीर आहे. सिंधुदूर्ग आणि विजयदूर्ग या किल्यांना 800 वर्षाची परंपरा लाभलेली आहे तो एक ऐतिहासिक ठेवा आहे तेव्हा या किल्ल्याचे जतन आणि संवर्धन करण्यासाठी शासनाने लक्ष द्यावे अशी मी या निमित्ताने विनंती करतो. तसेच सभापती महोदय, मला या अभिभाषणावरील चर्चेत भाग घेण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार मानून मी माझे भाषण संपवितो.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे (औरंगाबाद विभाग पदवीधर) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणावरील चर्चेत भाग घेण्यासाठी मी येथे उभा आहे. सभापती महोदय, चांगल्याला चांगले म्हणावे अशी आपली संस्कृती आहे. देशाचे कृषी मंत्री माननीय श्री. शरद पवार यांना शेती कळते. ज्यांना शेती कळते त्यांनी शेतीबद्दल बोलावे. जे नेहमी शेतात जातात, ज्यांना शेती विषयी कळते त्यांनी शेतीबददल बोलले तर ते मी समजू शकतो परंतु ज्यांना शेती विषयी काहीही माहित नाही ते सुध्दा येथे बोलले आहेत. तुम्ही कधी नांगरट पाहिलेली आहे काय ? ढेकूळ पाहिलेले आहे काय ? नांगरट आणि ढेकूळ हे शेतकऱ्यांचे शब्द आहेत. आपण कधी नांगरटीतून गेला आहात काय ? आपल्याला औत काय असते हे माहीत आहे काय ? शिवार शेती आपल्याला माहीत आहे काय ? केवळ मुंबईत राहणाऱ्यांना शेतीचे प्रश्न कसे काय समजणार? मुंबईतील समुद्राच्या लाटा पाहून शेतकऱ्यांचे प्रश्न समजणार नाहीत. त्याकरता प्रत्यक्षात शेतामध्ये जावे लागते. केन्द्रीय कृषी मंत्री माननीय श्री. शरद पवार हे जरी दिल्लीत असले तरी शेतावर जातात आणि शेतकऱ्यांचे प्रश्न जाणून घेण्याचे काम करतात. दिनांक 25 जानेवारी 2006 रोजी अकोला येथील सभेत त्यांनी शेतकऱ्यांवरील कर्ज माफीच्या संदर्भात सुतोवाच केले. त्यानंतर मात्र आपणास खडबडून जाग आली. आता लवकरच निवडणूका होणार आहेत तेव्हा आपल्याकडे काही तरी मुद्दा पाहिजे म्हणून आपण खडबडून जागे होऊन कामाला लागला आहात आणि आम्ही देखील आपणास हे काम करु दिले.तुम्ही राज्यामध्ये शेतकऱ्यांचे मेळावे घेण्याचा प्रयत्न केला आणि केविलवाणी गर्दी जमविण्याचा प्रयत्न केला. आपण जरी शेतकऱ्याचे मेळावे घेतलेले असले तरी शेतकऱ्यांना हे माहीत आहे की, कर्ज माफ नक्की कोण करणार आहे ? 29 फेब्रुवारी 2008 रोजी शेतकऱ्यांवरील कर्ज माफीचा निर्णय केन्द्र शासनाने घेतला असून तो एक क्रांतिकारक आणि ऐतिहासिक असा निर्णय आहे. त्या दिवशी आनंदउत्सव साजरा करण्यास सुरुवात झाली होती. परंतु आमच्या पक्षाच्या कोणत्याही कार्यकर्त्याने या निर्णयाबद्दल आनंदोत्सव साजरा करुन साखर वाटली नाही. प्रत्येक शेतकऱ्याने या निर्णयाचे स्वागत केले आणि साखर वाटली तसेच फटाके वाजविले. ज्या दिवशी शेतक-यांवरील कर्ज माफीचा निर्णय जाहीर झाला त्या दिवशी त्यांनी दिवाळी साजरी केली होती देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर अशा प्रकारचा एक क्रांतिकारक आणि ऐतिहासिक निर्णय घेण्याचे काम केन्द्रीय कृषी मंत्री माननीय श्री. शरद पवार यांनी केलेले आहे



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे .....

त्यासाठी त्यांनी वर्षभर कष्ट घेतले होते. ते शेतकऱ्यांचे खरे कैवारी होते म्हणूनच हा निर्णय घेतला आहे . आपल्याला जर खरोखर शेतक-यांचा कळवळा असता तर आपण या आंनंदोत्सवात सहभागी झाला असता . शेतकऱ्यावरील कर्ज माफ करण्यासाठी तुम्ही आंदोलन केले होते . "देता की जाता "असे आंदोलन देखील आपण केले होते परंतु शेतकऱ्यांवरील कर्ज जेव्हा माफ करण्यात आले होते तेव्हा तुम्ही आंनंदोत्सव साजरा करावयास पाहिजे होता परंतु तो तुम्ही केलेला नाही.

नंतर श्री. सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे .....

कारण तुम्हाला शेतकऱ्यांचा कळवळा नाही. तुम्ही येत्या निवडणुका समोर ठेवून, मते समोर ठेवून आंदोलन केले. त्यात तुम्ही घोषणा काय केली ? 'देता का जाता'. आमचा जाण्याचा प्रश्नच नाही. आम्हीच देणार आणि आम्हीच येथे येणार व राहणार हेही लोकांना आता पटले आहे. आता या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.रावते उपस्थित नाहीत. त्यांचे मी जरूर अभिनंदन करीन. त्यांना शेतातील थोडे थोडे तरी कळते कारण ते शिवारामध्ये जातात. सन्माननीय सदस्य श्री.रावते यांनी बीडमध्ये जाऊन पाहिले आहे. परवा जो आमचा शेवटचा मेळावा झाला तेव्हा संपूर्ण बीडमध्ये जागाच नव्हती एवढ्या प्रचंड प्रमाणात गर्दी जमली होती. वाहनांतून आणल्याने लोक येत नसतात. त्यावेळेस जेथे गाड्या जात नाहीत तेथूनही मोठ्या संख्येने लोक आले होते. अगदी वर्गणी जमा करून लोक आले होते. कारण त्यांना नामदार पवार साहेबांचे आभार मानायचे होते. अन्यथा भर दुपारी 2-3 वाजता उन्हामध्ये लोक तेथे चालत आलेच नसते. तुम्ही तेव्हा उघड्या डोळ्यांनी पाहिले असते तर तुम्हालाही पटले असते की, तेथे आलेला प्रत्येक शेतकरी हा आपणहून मोठ्या संख्येने पवार साहेबांचे आभार मानण्यासाठी आला होता. सभापती महोदया, आमच्या समोरच्या मित्रांनी देखील मेळावे घेतले, पण त्यांनी आमचा परवाचा मेळावा पाहिला असता तर त्यांना समजले असते की, शेतकरी मेळावा म्हणजे काय आणि शेतकरी आभार मानण्यासाठी कसा येतो. तेव्हा आपल्यासाठी कोणी काय केले हे शेतकऱ्याला बरोबर माहीत आहे. त्यामुळेच जे काही केले गेले आहे त्याचे श्रेय दुसरा कोणीच घेऊ शकत नाही. तुम्ही तर नाहीच नाही. अजून निवडणुका लांब आहेत. पण शेतकऱ्यांच्या मनामध्ये निश्चितपणे ठसले आहे की, हा एक क्रांतिकारक निर्णय आहे आणि शेतकऱ्यांच्या बाबतीत इतका चांगला निर्णय यापुढे तरी कोणी घेणार नाही आणि घेणार असेल तर ते केवळ श्री. शरदचंद्र पवारच घेऊ शकतात. अर्थात तरीही तुम्ही टीका करण्याची एकही संधी सोडणार नाही याची आम्हालाही जाणीव आहे. आमचा हा नेता क्रिकेटमध्ये गेला तरी तुम्ही त्याच्यावर टीका करतो. पण आमचा हा नेता जेथे जेथे जातो तेथे संधीचे सोने करतो. मग ते क्षेत्र कोणतेही असो. कबड्डी असो, खो खो असो वा क्रिकेट असो. जेथे जाईल तेथे गोरगरीब खेळाडूंना मानाचे स्थान देण्याचे काम त्यांनी केलेले आहे. म्हणूनच तुमचा पोटशूळ उठला आहे. आता क्रिकेटमध्ये गेल्यानंतर आपल्या संघाने ऑस्ट्रेलियाला किती वर्षांनी हरवले आहे हेही तुमच्या

...... 4इ 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे ....

ध्यानी आले नसेल. कारण आपल्याला केवळ टीका करणे एवढेच माहिती आहे. आताही शेतकऱ्यांसाठी जवळपास 60 हजार कोटी रूपयांची कर्जमाफी केली आहे. एवढेच नव्हे तर माननीय उपमुख्यमंत्र्यांनी मेळाव्यामध्ये सांगितले आहे की, अजूनही कमी पडले तर आमचे सरकार, राज्य सरकार, त्याचा भार उचलेल परंतु शेतकऱ्याला मदत केल्याशिवाय आम्ही राहणार नाही. हे अभिवचन त्यांनी शेतकऱ्यांना दिलले आहे. आपल्या राज्याचा अर्थसंकल्प दोन दिवसात येतो आहे. त्यामध्ये आपल्याला आमचे सरकार शेतकऱ्यांसाठी, गोरगरीब जनतेसाठी काय करणार आहे हे आपल्याला दिसून येईलच. म्हणूनच मी या ठिकाणी या सरकारचे मन:पूर्वक अभिनंदन करतो. शेतीविषयक प्रश्नांमध्ये, कर्जमाफी करण्यासाठी, विदर्भातील सात जिल्हद्दयातील शेतीविषयक समस्या दूर करण्यासाठी आतापर्यंत आमच्या सरकारने 867 कोटी रूपयांचे व्याज देखील माफ केले आहे. इतकेच नव्हे तर भूविकास बँकेचे कर्ज होते त्यात सवलत देऊन त्या कर्जाचा बोजा कमी केला. ...

( यानंतर श्री.सरफरे ....4एफ 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे...

एवढेच नव्हेतर राज्यामध्ये दूग्धोत्पादन वाढले पाहिजे आणि शेतकऱ्यांना जोडधंदा मिळाला पाहिजे यासाठी सरकारने पाऊले उचलली. केंद्र सरकारने 7989 दूभती जनावरे देण्याचे काम केले. आणि राज्य सरकारने त्यापुढे पाऊल टाकून 9264 दूभती जनावरे वाटण्याचे काम केले आहे. त्याचप्रमाणे 4589 शेळया व मेंढया वाटप करण्याचे काम या शासनाने प्रामाणिकपणे केले आहे.

सभापती महोदय, वीजनिर्मिती करणे ही जादूची कांडी फिरविण्याइतकी सोपी गोष्ट नाही. आपण सत्तेवर आल्यानंतर एन्रॉन प्रकल्प समुद्रामध्ये बुडविण्याची घोषणा केली. आम्ही सत्तेवर आल्यानंतर समुद्रामध्ये बुडविलेला हा प्रकल्प बाहेर काढून तो चालू करण्याचे काम केले आहे. आणि त्या प्रकल्पामधून वीज निर्मिती करण्याचे काम केले आहे. इतकेच नव्हेतर साखर कारखान्यातील चिपाडापासून वीज निर्मिती करण्यासंबधीची योजना तयार केली असून त्याकरिता साखर कारखान्यांना अंशदान देण्याचे धोरण शासनाने स्वीकारले आहे. अशाप्रकारे साखर कारखान्याच्या माध्यमातून भविष्यामध्ये 1 हजार मेगावॅट वीज निर्मितीचे काम होणार आहे.

सभापती महोदया, राज्य सरकारने रोजगार हमी योजनेची व्याप्ती वाढविण्याचा निर्णय घेतला आहे. 50 टक्क्यापर्यंत कामे ग्रामपंचायतीला करण्याची मुभा राज्य सरकारने दिली आहे. त्यामुळे मोठया प्रमाणात कामे सुरु होऊन खेडापाडयातील लोकांना त्याचा जास्तीत जास्त लाभ मिळेल. गोरगरीब माणसाच्या हाताला काम मिळणार आहे. त्यादृष्टीने शासनाने धोरणात्मक निर्णय घेतला आहे. त्याचप्रमाणे विदर्भ आणि मराठवाडयातील जलसिंचन सुविधेमध्ये वाढ करण्यात आली आहे. आणि 17500 शेततळयांची कामे करण्यासाठी 80 कोटी रुपये खर्चाचा भार उचलला आहे. एवढया मोठया प्रमाणावर शेततळी निर्माण झाल्यानंतर त्याचा फायदा निश्चितपणे गोरगरीब शेतकऱ्याला होईल. सभापती महोदय, प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेंतर्गत 6079 किलोमीटर लांबीच्या रस्त्यांचे काम हाती घेण्यात आले आहे. या रस्त्यामुळे 2471 वस्त्या जोडण्याचे काम होणार आहे.

सभापती महोदया, जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निमाण अभियान सुरु करण्यात आले असून या अभियानांतर्गत झोपडपट्टया विकसित करण्यासाठी 750 कोटी रुपयांची कामे हाती घेण्यात आली आहेत. अशाप्रकारे नागरी क्षेत्रामध्ये 1 लाख 35 हजार 190 घरे बांधण्याचा मोठा प्रकल्प हाती घेण्यात येणार आहे. सभापती महोदय, या राज्यामध्ये माननीय उप मुख्यमंत्री व

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KTG/ MMP/ SBT/

श्री. विक्रम काळे...

माननीय ग्राम विकास मंत्र्यांनी सामान्य माणसाच्या लक्षात राहतील असे महत्वाचे निर्णय घेतले आहेत. अशाप्रकारच्या अनेक बाबी त्यांच्या मनामध्ये घर करुन राहतील. या सरकारने जनतेला दिलेल्या आश्वासनांप्रमाणे कामे केली असल्यामुळे ही कामे कायम त्यांच्या स्मरणात राहतील. युती सरकारच्या काळामध्ये फक्त ओरपण्याचे काम करण्यात आले. परंतु आमच्या सरकारने राज्यामध्ये संत गाडगे महाराज ग्राम स्वच्छता अभियान कार्यक्रम राबविला आणि गावांमध्ये स्वच्छता आणली. गावे हागणदारीमुक्त केली.त्याचप्रमाणे माननीय उपमुख्यमंत्र्यांनी "महात्मा गांधी तंटा मुक्त गाव मोहीम " ही योजना राबवून गावातील छोटे-मोठे तंटे मिटविण्याचे काम केले आहे. यामुळे गावातील हजारोंच्या संख्येने तंटे मिटविण्याचा ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला आहे याबद्दल मी या शासनाचे अभिनंदन करतो. .

सभापती महोदया, वीजेच्या बाबतीत बोलावयाचे झालेतर पारस, परळी, खापरखेडा व भुसावळ येथे नवीन वीजनिर्मिती प्रकल्प उभारणीचे काम हाती घेतले आहे. या प्रकल्पामधून वर्षअखेरीस 2000 मेगावॅट वीजनिर्मिती होणार आहे. त्यामुळे राज्यातील ग्रामीण भागामधील लोकांना त्याचा दिलासा मिळणार आहे याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. त्याचप्रमाणे हेल्थ इज वेल्थ या तत्वानुसार आरोग्याची काळजी घेण्याकरिता शासनाने ठोस पावले उचलली आहेत.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे . . . .

यासाठी शासनाने पावले उचललेली आहेत म्हणून कर्करोगाचे निदान आणि उपचार करण्याकरिता सुविधा पुरविण्यासाठी औरंगाबाद येथे एक नवीन रुग्णालय स्थापन करण्याचे काम हे शासन करीत आहे. त्या भागातील जी गोरगरीब जनता या रोगामुळे मृत्यूमुखी पडत होती, त्यांना या हॉस्पिटलच्या माध्यमातून मदत होणार आहे. अशा प्रकारे आमचे शासन चांगल्या पध्दतीने काम करीत आहे. गोरगरीबांच्या कल्याणासाठी काम करीत आहे, शेतकऱ्यांसाठी काम करीत आहे. त्यामुळे चांगल्याला चांगले म्हटले पाहिजे आणि तसे ते कधीतरी म्हणा. म्हणून मी या चर्चेच्या निमित्ताने शासनाचे अभिनंदन करतो आणि महामहीम राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाला पाठिंबा देऊन माझे भाषण संपवितो.

-----

. . . .4 जी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदया, याठिकाणी मी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबाबत खेद व्यक्त करण्यासाठी उभा आहे.

सभापती महोदया, याठिकाणी मघापासून माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबाबत अभिनंदनाची भाषणे झाली. काही राजकीय स्वरुपाची भाषणे झाली. मला असे वाटले की, मी एखाद्या जाहीर सभेमध्ये जाऊन बसलेलो आहे की काय ? तसेच तेथे निवडणुकीच्या अनुषंगाने भाषणे सुरु आहेत की काय ? अशा प्रकारचीही भाषणे झाली.

**तालिका सभापती (श्रीमती उषाताई दराडे)** : जाहीर सभांमध्ये जी भाषणे होतात, त्यामध्ये सुध्दा चांगले मुद्दे मांडले जातात.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, पण याठिकाणी मुद्देच नव्हते. परंतु मी फक्त मुद्देच मांडणार आहे. याठिकाणी शेतकऱ्यांना 60 हजार कोटी रुपयांची कर्ज माफीच्या संबंधात जी घोषणा करण्यात आलेली आहे त्याचा अनेक वक्त्यांनी उल्लेख केला. या 60 हजार कोटी रुपयांच्या कर्जमाफीच्या संदर्भात गावा-गावामध्ये आणि इतर ठिकाणी देखील अनेक फ्लेक्स पोस्टर्स् लावल्याचे पहावयास मिळते. आज यासंबंधात बऱ्याच जणांकडे अशी मशिनरी उपलब्ध आहे. त्यामुळे कुठे हात आहे, कोणी फोनवर बोलत आहे, कुठे "दादा", कुठे "साहेब" असे लिहीलेले आहे. पण सर्वसामान्य माणसांना ही पोस्टर्स् पाहून भीती वाटते. ही पोस्टर्स् जवळ जाऊन पहावयाची की लांबून पहावयाची असा त्यांना प्रश्न पडलेला आहे. काही पोस्टर्स्वर लिहीले आहे की, "आम्ही शब्द पाळला" तर काही ठिकाणी "वचनपूर्ती" असेही म्हटलेले आहे. परंतु पुढच्या काळामध्ये हे सर्व कशाप्रकारे बुमरँग होणार आहे ते संबंधितांना कळणार आहे. मी स्वत: टॅक्स कन्सल्टंन्ट आहे. गेली 25 वर्षे हा व्यवसाय करीत आहे आणि तो अजूनही सुरु आहे. ज्यावेळी तरतूद केलेली नसते, तेव्हा कोणते प्रश्न निर्माण होतात हे नंतरच्या काळामध्ये राज्यतील शेतकऱ्यांना कळणार आहे.शासनातील लोकांना ते आताच कळलेले आहे. कारण 60 हजार कोटी रुपयांची तरतूद नसताना माननीय वित्तमंत्री महोदयांनी कर्जमाफीची घोषणा केलेली आहे. याबाबतीत असे सांगण्यात आले की, हा एक ऐतिहासिक आणि क्रांतीकारक निर्णय आहे. केंद्र शासनाने फार मोठे पाऊल उचललेले आहे, एक पाऊल पुढे टाकलेले आहे. यापूर्वी माजी माननीय मुख्यमंत्री श्री.ए.आर.अंतुले साहेबांनी देखील 10 हजाराच्या कर्जमुक्तीची घोषणा केली होती आणि नंतर शासनाला खुलासा करावा लागला होता. त्या काळामध्ये 10 हजार रुपयांची रक्कम ही आताच्या एक लाखाएवढी .....

. . . .4 जी-2





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

होती. पण त्या काळामध्ये बँकेच्या संबंधातील केसेस अजूनही कोर्टामध्ये सुरु आहेत. तसेच आताही शासनाला याबाबतीत खुलासा करावा लागेल. कारण 60 हजार कोटी रुपयांच्या कर्जमाफीची घोषणा ऐकल्यानंतर जनतेच्या मनामध्ये गोळा आला आहे. कारण यासाठी कोणतीही तरतूद नसताना आता या घोषणेचे पुढे काय होणार ? असे लोकांसमोर प्रश्न निर्माण झाले आहेत. लोक संभ्रमावस्थेत आहेत.

सभापती महोदया, दुसरी बाब म्हणजे मच्छिमार हा देखील शेतकरीच आहे. पण त्याबाबतीत माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये कुठेही उल्लेख नाही. दिवसेंदिवस मासळीचा दुष्काळ पडत आहे. त्यामुळे शासनाने मासळीचा दुष्काळ जाहीर केला पाहिजे आणि मच्छिमारांना दिलासा दिला पाहिजे. याबाबतीत शासनाने विचार करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये मुद्दा क्र.5 मध्ये असे म्हटलेले आहे की, "जलसंचय करणारी बांधकामे मोठया प्रमाणावर हाती घेण्यात आली आहेत." परंतु त्या साठी लागणाऱ्या जमिनी वन खात्याकडून मिळविण्यासाठी शासनाने कोणत्याही प्रकारचा पाठपुरावा केलेला नाही. राज्यामध्ये अनेक प्रकल्प हातामध्ये घेतले आहेत, पण या जमिनी वन खात्याकडून सोडविण्यासाठी शासनाने पाठपुरावा न केल्यामुळे या प्रकल्पांचे बजेट वाढलेले आहे.

**<u>सभापतीस्थानी - तालिका सभापती (श्री.उल्हास पवार)</u>**

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर ......

800 कोटीचे बजेट असेल तर ते तीनपट वाढून अडीच हजार कोटी पर्यंत गेले. अशी दुर्दशा झ ालेली आहे. त्यामध्ये यामध्ये सुधारणा झाली पाहिजे तरच हे जे प्रकल्प किंवा जलसंचयाची कामे घेतलेली आहेत ती होऊ शकणार आहेत.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणातील परिच्छेद क्रमांक 7 मध्ये शेतकऱ्यांना पूरक उद्योग म्हणून दुभत्या जनावरांचे वाटप करण्याबाबतचा उल्लेख केलेला आहे. एका बाजूला त्यांना उपजीविकेचे साधन उपलब्ध करुन द्यावयाचे आणि दुसऱ्या बाजूला त्यांना ते साधन उपलब्ध करुन देत असताना भाकड आणि दूध उत्पादनाच्या दृष्टीने निरुपयोगी अशी जनावरे देण्याची भूमिका सरकारने घ्यावयाची असे काम चाललेले आहे. एकीकडे दिल्यासारखे दाखवावायचे आणि प्रत्यक्षात त्यांच्या हातामध्ये काही पडणार नाही अशी व्यवस्था करावयाची हा जो भ्रष्टाचार चाललेला आहे त्याची देखील चौकशी या निमित्ताने झाली पाहिजे.

सभापती महोदय, राष्ट्रीय कृषी विकास योजनेअंतर्गत कुक्कुटपालन, दुग्धव्यवसाय, मधुमक्षिका पालन, रेशीम उत्पादन या सारख्या पिकेतर योजनांसाठी केंद्र सरकारने राज्य सरकारला जी मदत मंजूर केली आहे त्याबाबतचा उल्लेख आहे. त्याचा लाभ गरजू आणि योग्य लाभार्थ्यांना मिळावा याबाबतचे कोणतेही नियोजन नाही. त्यामुळे ते योग्य लाभार्थ्यांना मिळाले नाही. ज्यांना मिळावयास पाहिजे त्यांना ते मिळत नाही. ती मदत दुसरीकडेच जाते आणि त्याची गळती तिसरीकडेच होते. यामध्ये सुधारणा झाली पाहिजे अशी मी या ठिकाणी मागणी करीत आहे.

सभापती महोदय, आंबा, मोसंबी, द्राक्षे, डाळिंबे, केळी, संत्री व भाजीपाला इत्यादींसाठी निर्यात सुविधा केंद्रे सुरु करण्यात येणार आहेत अशा प्रकारचा उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये केलेला आहे. ठाणे जिल्ह्यामध्ये चिकूचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर होते. येथील चिकू एक्स्पोर्ट होतात तसेच भारतभर चिकूची विक्री केली जाते. परंतु यामध्ये ठाणे जिल्ह्याचा अंतर्भाव केलेला नाही. त्या जिल्ह्याचा अंतर्भाव यामध्ये केला जावा. कारण या जिल्ह्यामध्ये फार मोठ्या प्रमाणावर चिकूचे उत्पादन होते. म्हणून या जिल्ह्यामध्ये देखील निर्यात सुविधा केंद्र उभारले गेले पाहिजे. कोकणात हापूस आंब्याचे उत्पादन होते. त्यावर कोकणातील औष्णिक प्रकल्पांचा

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MMP/

श्री. संजय केळकर ......

परिणाम होऊन त्याची प्रत बिघडण्याचा घोका लक्षात घेऊन जपान सारख्या देशाने भारतीय हापूस आंबा घेण्यास नकार दिलेला आहे. जपानने सांगितले की, आम्हाला हापूस आंबा नको. हापूस आंबा हा फळांचा राजा आहे. परदेशी मार्केटमध्ये हापूस आंबा पारखा होता कामा नये. हापूस आंब्याचा टिकाऊपणा तसेच परदेशी मार्केटमधील पत कमी होणार नाही याबाबत सरकारने गांभीर्याने दखल घेतली पाहिजे. कारण ज्या कोकणामध्ये हापूस आंब्याचे उत्पादन होते त्याच ठिकाणी हे मोठे औष्णिक प्रकल्प उभारले जात आहेत. त्यामुळे यासंदर्भात विचार झाला पाहिजे.

सभापती महोदय, दिनांक 1 एप्रिल, 2008 पासून महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेची व्याप्ती वाढवण्यात येणार असून ती सर्व जिल्ह्यांमध्ये कार्यान्वित करण्यात येणार आहे परंतु या योजनेचे निकष जोपर्यंत बदलले जाणार नाहीत, जोपर्यंत योजना लालफितीतून मुक्त होणार नाही तोपर्यंत योजना यशस्वी होणार नाही. मजुरीसाठी ठाणे जिल्ह्यातील गरीब, आदिवासी मजूर स्थलांतर करीत आहेत. त्यामुळे उद्या मजूर नाहीत म्हणून योजना कागदावरच राहील. असे होऊ नये यासाठी योग्य ती उपाययोजना केली पाहिजे.

सभापती महोदय, अभिभाषणातील परिच्छेद क्रमांक 21 च्या संदर्भात सांगू इच्छितो. जुलै, 2005 मध्ये अतिवृष्टीने बाधित झालेली घरे, शाळा, मंदिरे यांच्या बाबतीत सर्व पुरावे देऊन आर्थिक मदतीचा प्रस्ताव शासनाकडे दिलेला आहे. तीन वर्षामध्ये मी अनेक गावांना आणि शाळांना भेटी दिलेल्या आहेत. अतिवृष्टीमुळे ज्या शाळा कोसळलेल्या आहेत त्या शाळांना मदत करण्याचे विचार सरकारने केलेला नाही. त्यामुळे त्यामध्ये सुधारणा झली पाहिजे आणि त्यांना अशा प्रकारची मदत केली पाहिजे अशी मी या निमित्ताने मागणी करीत आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर....

या अभिभाषणात कलम 60 मध्ये एमएमआरडीएचा उल्लेख केला आहे. या प्राधिकरणाच्या माध्यमातून मुंबई आणि मुंबईलगतच्या प्रदेशामध्ये क्रांतिकारक कामे सुरु आहेत. पण दुर्दैवाने ठाणे जिल्हयाच्या दृष्टीने गंभीर गोष्ट झाल्या आहेत. 1983 मध्ये या प्राधिकरणाची स्थापना झाली. परंतु ठाणे जिल्हयाला या प्राधिकरणाच्या माध्यमातून एकही पैसा मिळालेला नाही. ठाणे जिल्हयाचा 1 लाख रुपयांचा अनुशेष बाकी आहे. त्यामुळे मुंबईला श्रमशक्ती पुरविणा-या ठाणे जिल्हयाकडे या प्राधिकरणाने दुर्लक्ष केलेले आहे. हा अनुशेष भरुन काढण्यात आला पाहिजे. मुंबईमधील मिठी नदीच्या विकासासाठी प्राधिकरणाची स्थापना झाली आहे. ठाणे जिल्हयात सुध्दा वाल्धुनी नदी आहे, त्या नदीच्या विकासासाठी प्राधिकरण झाले पाहिजे अशी मी मागणी करतो.

कलम 31 मध्ये राज्याच्या गृहनिर्माण धोरणाचा उल्लेख केलेला आहे. सरकारने यापूर्वी गृहनिर्माण धोरण जाहीर केले होते. त्यामध्ये विशेष नगर वसाहतींचे बांधकाम, जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींचा पुनर्विकास करणे, या अनुषंगाने कोणतीही ठोस योजना यामध्ये आलेली नाही. ती योजना आली पाहिजे अशी मी मागणी करतो.

कलम 37 मध्ये शासकीय इमारतींच्या बांधकामांचा उल्लेख केलेला आहे. आदिवासी भागातील आश्रमशाळा आहेत त्यांना मी भेटी दिल्या आहेत. या आश्रमशाळांसाठी सरकारने सा.बां.विभागाला निधी उपलब्ध केला आहे. परंतु गेल्या दोन वर्षामध्ये निधीचे वाटप केलेले नाही. त्या आश्रमशाळांची दुरावस्था न पाहण्यासारखी आहे. ती दुरावस्था तातडीने दूर झाली पाहिजे. तरच या आदिवासी भागाला न्याय मिळणार आहे.

कलम 48 मध्ये राज्यातील आरोग्य सेवांमध्ये सुधारणा घडविण्याचा मनोदय व्यक्त करण्यात आला आहे. परंतु आरोग्य खात्यासंबंधी बोलावे तेवढे कमीच आहे, शिवाय या विषयावर अनेक माननीय सदस्यांनी आपले मत व्यक्त केलेले आहे. त्यामुळे त्यावर बोलून मी सभागृहाचा वेळ घेणार नाही.

कलम 62 मध्ये राज्याच्या ग्रामीण भागातील रेल्वे वाहतूक वाढविण्यावर भर देण्यात आला आहे. ठाणे जिल्हयाच्या विकासासाठी ठाणे-डहाणू रेल्वे मार्गाची मागणी अनेक वर्षापासून केली

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ MMP/

श्री.संजय केळकर....

जात आहे. या मार्गामुळे आदिवासी भागाचा विकास होणार आहे. त्याचप्रमाणे कल्याण-मुरबाड-माळशेज-नगर हा मार्ग झाला पाहिजे. शासनाने बाकीच्या मार्गांसाठी तरतूद केलेली आहे तसे या रेल्वे मार्गासाठी तरतूद करावी. त्यामुळे त्या सबंध भागाचा विकास होऊ शकतो. या दोन्ही रेल्वे मार्गांचा अंतर्भाव होणे अत्यंत गरजेचे आहे. शासनाने काही व्यावसायिकभिमुख कोर्सेस सुरु केलेले आहेत. शासनाने विद्यार्थ्यांना महामंडळाच्या बसेससाठी सवलत देण्याचे धोरण आहे. त्यानुसार ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना एस.टी.बसेसमध्ये सवलत दिली जाते. शासनाने 810 नवीन कोर्सेस सुरु केलेले आहेत. या कोर्सेसचे शिक्षण घेणा-या ग्रामीण भागातील मुलामुलींना पासेसमध्ये सवलत दिली जात नाही. एस.टी.च्या पासेसमध्ये सवलत न दिल्यामुळे त्याचे विपरित परिणाम दिसत आहेत. या धोरणात बदल होणे आवश्यक आहे. कारण गेल्या 20-25 वर्षापासून हे धोरण बदलेले नाही.

कलम 68 मध्ये असे नमूद केले आहे की, 'माझ्या शासनाने तमाशा, लावणी, दशावतार व खडीगंमत इत्यादी लोककलांचे संवर्धन करण्यासाठी व त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी नवीन धोरण जाहीर केले आहे,' पण दुर्दैवाने मला सांगावेसे वाटते की, या कलावंतांना 4-4 महिने मानधन मिळत नाही. ते वेळेवर मिळण्यासाठी मी देखील पत्रव्यवहार केलेला आहे. हे मानधन वेळेवर मिळण्याची व्यवस्था झाली पाहिजे. शालेय स्तरावर तबला, ढोलकीसाठी स्वतंत्र शिक्षक नेमण्याची तरतूद केली पाहिजे. तरच ख-या अर्थाने लोककलांचे संवर्धन केल्यासारखे होईल.

नंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. संजय केळकर....)

मुद्दा क्रमांक 72 मध्ये न्यायदानाची प्रक्रिया गतिशील व्हावी म्हणून माझे शासन कटिबध्द आहे असा उल्लेख करण्यात आलेला आहे. परंतु गेल्या 10-15 वर्षामध्ये नवनिर्मित तालुक्यांच्या ठिकाणी न्यायालयीन व अन्य सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी निधी उपलब्ध करुन दिलेला नाही. त्यामुळे न्यायालयाअभावी तेथील जनतेची फरफट होत आहे. तेव्हा नवनिर्मित तालुक्यांच्या ठिकाणी न्यायालयासाठी तरतूद करावी अशी मी या निमित्ताने मागणी करतो. भारनियमानाच्या संदर्भात उद्या देखील चर्चा होणार आहे आणि आज देखील त्यावर चर्चा झालेली आहे. परंतु ज्या मुद्यांचा समावेश अभिभाषणामध्ये व्हावयास पाहिजे होता तो झालेला नाही. या अभिभाषणामध्ये संपूर्ण महाराष्ट्र हा कुपोषणमुक्त करण्यात येईल अशा प्रकारचा उल्लेख असावयास पाहिजे होता तो नाही. आज महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील, आदिवासी भागातील असंख्य बालके कुपोषणाने मरत आहेत. परंतु त्याबाबतीत हे सरकार संवेदनशील नाही असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही.

सभापती महोदय, राज्यामध्ये बेरोजगारीचा प्रश्न दिवसेंदिवस भीषण होत चाललेला आहे. तेव्हा पदवीधर आणि विनापदवीधर यांच्या बेरोजगारीचा, तसेच वीज, पाणी, कुपोषण अशा महत्वाच्या प्रश्नांच्या बाबतीत उपाययोजना करण्यासंबंधीचा उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये नाही. एमपीएससीच्या संदर्भात फार मोठी चर्चा होते. एमपीएससीचे निश्चित असे धोरण नसल्यामुळे, त्यांच्या कार्यपध्दतीमध्ये अनिश्चितता आणि साशंकता असल्यामुळे लाखो विद्यार्थ्यांना त्यांचे भवितव्य ठरविता येत नाही. तेव्हा त्याही बाबतीत धोरण जाहीर होण्याची आवश्यकता आहे. राज्यपालांचे अभिभाषण हे राज्याला कोणतीही दिशा देणारे नसल्यामुळे मी या अभिभाषणाबद्दल खेद व्यक्त करतो आणि माझे भाषण संपवितो.

------

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल अभिनंदनाचा प्रस्ताव सत्ताधारी पक्षाकडून मांडण्यात आला. अभिभाषणावरील चर्चेमध्ये भाग घेताना विरोधी पक्षाकडूनही काही मते व्यक्त करण्यात आली. अनेक विषयांच्या माध्यमातून बरीचशी राजकीय भाषणेही झाली. व्यक्तिगत विधानेही करण्यात आली. भाले व भात्यांचा उल्लेख झाला. भाले आणि भाते लागून रक्तही व्हायला लागले. हे सर्व ऐकल्यानंतर मी एवढेच सांगू इच्छितो की, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणातील पहिला मुद्दा हा शेतक-यांच्या कर्जमुक्तीच्या संदर्भात आहे. सर्व सन्माननीय सदस्य 60 हजार कोटीबद्दल बोलले आणि ते बोलणारच. कारण गेली चार-पाच वर्षे या राज्यामध्ये कोणता महत्वाचा प्रश्न निर्माण झालेला असेल तर तो आहे शेतक-यांच्या मृत्यूचा, त्यांच्या आत्महत्येचा, त्यांच्या कर्जबाजारीपणाचा. केन्द्र सरकारने घेतलेल्या निर्णयाचे आम्ही स्वागत केले नाही असे समजू नका. सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव यांनी सांगितले की, शिवसेनेने होर्डिंग्ज लावली. शिवसेने होर्डिंग्ज लावली त्याचे दु:ख, त्याच्या वेदना तुम्हाला का होत आहेत ? तुम्ही जर इतके संवेदनशील होता तर मग तुम्ही तात्काळ निर्णय घेतला असता. आंध्रप्रदेश सरकारने केन्द्र सरकारची वाट पाहिली नाही. तामिळनाडू सरकारने केन्द्र सरकारची वाट पाहिली नाही. औरंगजेब ज्याप्रमाणे माना आणि मुंडकी मोजायचा त्याप्रमाणे हे सरकार शेतक-यांच्या आत्महत्येची संख्या मोजत बसले होते. त्यावेळी सरकारला वेदना झाली नाही. होय, हे आम्हीच करायला भाग पाडले. पण आम्हाला त्याचे श्रेय नको हेही मी तितकेच ठासून सांगत आहे. शेतक-यांची वीज माफ करु, कर्ज माफ करु ही घोषणा वंदनीय शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी संभाजीनगरच्या शिवसेनच्या अधिवेशनात केली. याबाबतीत अर्थतज्ज्ञ श्री. नरेंद्र जाधव यांचे मार्गदर्शन घेतले. निवडणुकीच्या वेळी पहिली घोषणा आम्ही केली. यूपीए अध्यक्षा माननीय श्रीमती सोनिया गांधी ह्या परदेशी असल्यामुळे त्यांना पंतप्रधानपदी घेऊ नये असे पहिल्यांदा वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांनी सांगितले.

**तालिका सभापती** : श्रीमती सोनिया गांधी ह्या या सदनाच्या सदस्या नसल्यामुळे त्यांचा उल्लेख रेकॉर्डवरुन काढून टाकण्यात येईल.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, मी कोणावर टीका करीत नाही. याच मुद्याला धरुन केन्द्रीय कृषी मंत्री श्री. शरद पवार यांनी काँग्रेस सोडली. माझे सांगण्याचे तात्पर्य एवढेच आहे की, वीजबिल माफी आणि कर्जमाफी याबाबतीत शिवसेना प्रमुखांनी पहिल्यांदा घोषणा केली.

...नंतर श्री. गिते...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत....

माननीय शिवसेना प्रमुखांनी पहिले मार्गदर्शन केले. "जय महाराष्ट्र" हा मंत्र देखील माननीय शिवसेना प्रमुखांनी दिला. तो "जय हिंद" हा मंत्र न विसरता दिला. तो "जय महाराष्ट्र" मंत्र सुध्दा माननीय श्री. शरद पवार म्हणावयास लागले हे विसरु नका. संभाजीनगर येथे ती घोषणा केल्यानंतर सत्ताधारी पक्षातील मोठया नेत्यांनी निवडणुकीच्या जाहीरनाम्यासाठी घोषणा केली. तुम्ही जाहिर भाषणात सांगावयास लागलात की, आता शेतक-यांना बील येणार नाही. झिरो बील येईल. निवडणुका झाल्या, त्यानंतर तुम्ही सत्त्वेर आलात आणि दुस-या दिवशीच शेतक-यांना वीज बिले मोठया प्रमाणात दिली गेली. नुसती वीज बिले आली नाहीत तर वाढीव वीज बिले येऊ लागली. शेतक-यांवरील वीज माफी तर तुम्ही विसरुनच गेला आहात. पण सगळयात दु:खाची गोष्ट अशी आहे की, किंबहुना शेतक-यांची तुम्ही जर कोणती चेष्ठा केली असेल तर ती म्हणजे तुम्ही सांगितले की, ही आमच्या जाहीरनाम्यातील प्रिंटींग मिस्टेक आहे. सन्माननीय श्री.सुशीलकुमार शिंदेसाहेब त्यावेळी मुख्यमंत्री होती. त्यांनी सुध्दा त्यावेळी सांगितले होते की, ही प्रिंटीग मिस्टेक होती. त्यामुळे शेतकरी तसाच भरडला गेला. त्यामुळे शेतक-यावर आत्महत्येची पाळी आली. शेतकरी आत्महत्या करीत असताना पहिल्यांदा कोण धाऊन गेला असेल तर शिवसैनिक धाऊन गेला. सांगलीत तुम्ही गेला नाहीत. माननीय श्री.उध्दवजींच्या मार्गदर्शनाखाली आम्ही सांगलीत गेलो. कोपरगावला पूर आला. मुंबई वाहून गेली होती. तरी सुध्दा पुण्यातून अन्नधान्य जमा करुन आम्ही दिग्रसला गेलो. दिग्रस हे शहर बेटासारखे झाले होते. सांगलीत सत्ताधारी तुमच्या पक्षाचे आहेत, आमच्या पक्षाचे नाहीत.

श्रीमती उषा दराडे : सांगलीत पूर आला त्यावेळी आम्ही देखील गेलो होतो. तुम्ही नाही गेलात असे म्हणण्यापेक्षा तुम्ही गेलात एवढेच सांगा.

श्री. अरविंद सावंत : दिग्रस बेटासारखे झाले होते. दिग्रस येथील महापुरात माननीय मुख्यमंत्री पाण्यात उतरले नाहीत. महापुरात त्या गावात मी उडी घेऊन गेलो आणि अन्नधान्याचे वाटप केले. परत येताना संपूर्ण दिग्रस गाव मला सोडावयास आले होते. महिलांच्या डोळयात अश्रू होते. त्यांनी पाहिले की, शिवसेना प्रमुखांचे शिवसैनिक कसे आहेत. आमची सत्ता गेली. शिवसेना संपली असा आरडा ओरडा आपण केला. "हृदयात बाण ज्याच्या त्यालाच दु:ख ठावे" आम्ही





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत...

शिवसैनिक म्हणजे "शूर आम्ही सरदार आम्हाला काय कुणाची भीती, देव देश अन् धर्मासाठी प्राण घेतल हाती." सत्तेसाठी, खूर्चीसाठी, पदांसाठी आणि तिकिटांसाठी धडपडणारे आम्ही शिवसैनिक नाही. शिवसेना प्रमुखांनी आमच्यावर तशा प्रकारची शिकवण केली आहे.

"जिंकावं वा कटून मरावं हेच आम्हाला ठावं
लढून मरावं,मरुन जगावं, हेच आम्हाला ठाव.
देशापायी सारी विसरु माया ममता नाती,
देव देश अन् धर्मासाठी प्राण घेतलं हाती."

असली अवलदा शिवसेना प्रमुखांनी निर्माण केली आहे. सत्ता येवो अथवा न येवो आम्ही त्यासाठी तरफडत नाही. मरत नाही. तरी सुध्दा तुम्ही केलेल्याला चांगले म्हणा. परंतु आजही सांगतो की, सा-या शेतक-यांच्या डोक्यावरील कर्ज गेले असते तर तुमचे मी जाहीर अभिनंदन केले असते. जाहीर अभिनंदनाचा ठराव मांडू. मी तो ठराव व्यक्तीशः मांडेन व त्यावर भाष्य करीन. तुम्ही चांगले काम केले असे सांगेन. शासनाने कर्ज मुक्ती जाहीर केल्यानंतर सुध्दा 27 शेतक-यांनी आत्महत्या केल्या आहेत. तरी सुध्दा तुम्ही कर्ज मुक्तीचा डांगोरा पीटत आहात. आत्ताच एका सन्माननीय सदस्याने उल्लेख केला की, माननीय अंतुले साहेबांनी दिलेल्या कर्जमुक्तीचे काय झाले. तुम्ही अर्थसंकल्पात तरतूद केली नाही. म्हणून एक बॅंक कोर्टात जात आहे. केंद्र शासनाला सदस्यांनी प्रश्न विचारला की, कर्जमुक्तीसाठी अर्थसंकल्पात तरतूद कुठे आहे ? आता शासन डिसइन्व्हेसमेंट करणार आहे आतापर्यंत 10 हजार कोटी रुपये जमा झाले. 5 एकर पर्यंत कर्जमुक्तीमुळे काही शेतक-यांना दिलासा मिळाला. आम्हाला त्याचा आनंद आहे. आता साखर वाटली. सगळयांना कर्जमुक्त होऊ द्या. मी पेढे वाटेने, लाडू वाटेन, काय सांगाल ते वाटेल. शेतक-यांबद्दल आंदोलन आम्ही सुरु केले. कापूस दिंडी दिवाकर रावते यांनी काढली. कापसाला 2700 रुपये भाव देऊ म्हणून कोणी सांगितले. माननीय उप मुख्यमंत्री आता सभागृहात उपस्थित नाहीत. तर मी त्यांना सांगितले असते की, आबा आणि श्री. दिलीप वळसे-पाटील आमचे सरकार असताना 2700 रुपये भाव द्यावा अशी मागणी करीत होते. तुम्हाला सत्तेत येऊन आठ वर्षे झाली. तुम्हाला 2700 काय पण 1900 रुपये सुध्दा भाव देता आला नाही. आम्ही तर शेतक-यांना 2100

3...



ABG/ MMP/ SBT/ प्रथम श्री. शिगम 19:50

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत....

रुपये रोख देत होतो. तुम्ही दांभिक आहात. शेतक-यांना फसविण्याचे काम तुम्ही आयुष्यभर करीत आला आहात. कर्जमुक्ती दिंडी राजकीय पक्षाची नव्हती. श्री. मोहन धारिया कोणत्या पक्षाचे आहेत....

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत .....

प्राचार्य राम शेवाळकर कोणत्या पक्षाचे आहेत ? निवृत्त न्यायमूर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी कोणत्या पक्षाचे आहेत ? अनेक साहित्यिक या दिंडीमध्ये सामील झाले होते आणि ते म्हणाले की, तुम्हांला खरोखरच शेतकऱ्यांना वाचविण्याची गरज आहे. शेतकऱ्यांचे कर्ज माफ करा हा मुद्दा साऱ्यांनीच उचलून धरला. श्री. शरद पवार त्यावेळी स्टेटमेंट करीत होते की कर्जमाफी अव्यवहार्य आहे, ती करता येणार नाही. शेतकऱ्यांनी जोडधंदा केलापाहिजे. 60 हजार कोटी रुपयांचे शेतकऱ्यांचे कर्जमाफ करण्याचे धाडस कधी केले ? सरकारच्या पाठीवर आसूड पडल्यावर केले. सरकारच्या पायाखालची वाळू सरकू लागली आणि सरकारने हा निर्णय जाहीर केला. तामिळनाडू आणि आंध्र प्रदेशसारखे तुम्ही केले असते तर आम्ही तुमचे कौतुक केले असते. आम्ही सगळे शेतकरी आहोत. सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांची पावले शेतीमध्ये पडली नाहीत. त्यांचे वडील आमदार होते. आम्ही गरीब मुले आहोत. आमचे आई-वडील कोणी आमदार-खासदार नाही. आमच्या कोकणामध्ये कोरडवाहू शेती होत नाही. भात पिकते त्यानंतर काही नाही. राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये याचाउल्लेख आहे त्या उल्लेखाला धरुनच मी माझे मत मांडतो आहे. तुम्हांला शेतीतले काय कळते असे विचारले जाते. डॉक्टरला पेशंट तपासण्यासाठी पेशंट व्हावे लागत नाही त्याप्रमाणे शेतकऱ्यांच्या व्यथा कळायला तो शेतकरीच असावा लागतो असे नाही पण तुम्हांला त्याच्या व्यथा समजव्या लागतात. शेतकऱ्यांचे दु:ख कळले पाहिजे. शेतकऱ्यांचे दु:ख पाहिले की, वेदना होतात. माझ्यासारखा शिवसैनिक शेतकऱ्याच्या घरी गेला होता. ती विधवा भगिनी आणि तिची ती कच्ची-बच्ची मुले पाहिल्यावर माझ्या डोळयातील अश्रू सुध्दा आवरले नाहीत आणि सरकार मात्र कर्जमुक्तीचे श्रेय घेण्याचा डांगोरा पिटत आहे. शासनाने दोन वर्षापूर्वीच कर्ज माफ का केले नाही ? निवडणुका आल्या म्हणूनच कर्जमाफी जाहीर केली. The bell is ringing.

सभापती महोदय, मला एवढेच सांगावयाचे आहे की, शेतकऱ्यांच्या संदर्भात जी काही आश्वासने दिलेली आहेत ती पूर्ण करा. माननीय मुख्यमंत्र्यांनी मान्य केले की 5 एकरापेक्षा जास्त जमीन पण कर्ज 50 हजारापेक्षा कमी. जमीन जास्त असल्यामुळे कर्ज माफ होत नाही. ते शासनाने केले पाहिजे अशी माझी मागणी आहे. कर्जमुक्तीचा डांगोरा पिटण्याऐवजी तुम्हाला आसूड मारावे लागले. या राज्यामध्ये 584 शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. त्यातील फक्त 162 शेतकऱ्यांना शासनाने मदतीसाठी पात्र ठरविले आहे. अतिशय क्रूरपणाने शासन वागत आहे. 162

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ SBT/ MMP/ 19:55

श्री. अरविंद सावंत ...

शेतकऱ्यांचे कर्जमाफ केले उद्या आणखी मरुन पडतील. अशा परिस्थितीत राज्यपालांच्या अभिभाषणाचे कौतुक करावयाचे काय ? खेदच व्यक्त करावासा वाटतो. अभिभाषणामध्ये उल्लेख करण्यात आला आहे की, जलसंचय करणारी बांधकामे मोठया प्रमाणावर हाती घेण्यात आली आहेत. कच्च्या बंधाऱ्यांचे बांधकाम मोठया प्रमाणात हाती घेण्यात आले आहे. सिंधुदूर्ग जिल्हयात सर्वात जास्त पाऊस पडतो. कोकणातील रत्नागिरी जिल्हयात वासिष्ठी नदी वाहते. वर्षाला 12 महिने वाहते. सावित्री नदी वर्षाला 12 महिने वाहते. तरीसुध्दा कोकणात दुष्काळ असतो. हे शासन टँकरमुक्त महाराष्ट्र करण्यासाठी निघाले असले तरी खेडयात पुन्हा टँकरनेच पाणीपुरवठा करावा लागत आहे. यासंदर्भात शासन निश्चितपणाने काही करील असे मला वाटत नाही. राज्यातील साखर कारखान्यांच्या संदर्भात सुध्दा मी खूप बोलू शकेन. एका साखर कारखान्याने एसएमपी (स्टॅन्डर्ड मिनिमम प्राईज) दिली नाही. 850 रुपये एसएमपी ठरलेली असता 500 रुपये दिले. नाबार्डने गडबड केली. एसएमपी दिली नाही म्हणून नाबार्ड कर्जातील परतावा देणार नाही.

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत...........

म्हणजे त्या साखर कारखान्यांचीही वाट लावली. दोन्ही बाजूनी मरण होत आहे. साखर कारखाने तुमचेच आहेत, आमचे काय आहे तेथे? परंतु आम्हाला समजत नाही असे समजू नका. म्हणून मी उदाहरण दिले की, डॉक्टरला पेशंट व्हावे लागत नाही, त्याला पेशंटच्या वेदना कळल्या पाहिजेत.

सभापती महोदय, 'उद्योजक व सेवा उद्योग हे कायमच राज्याच्या प्रगतीशील धोरणावर आणि कार्यपोषक वातावरणावर विश्वास दर्शवित आले आहेत. सन 2007 मध्ये राज्यात सुमारे 62,600 कोटी रुपयांची गुंतवणूक असणारे आणि 2.10 लाख व्यक्तींना रोजगार मिळू शकेल इतक्या क्षमतेचे 454 प्रकल्प कार्यान्वित करण्याचे प्रस्ताव अंतर्भूत असलेली औद्योगिक आवेदन पत्रे व इरादापत्रे सादर करण्यात आलेली आहेत' असे अभिभाषणात नमूद केले आहे. मला अत्यंत खेद होतो. किमान राज्यपाल महोदयांची फसवणूक करु नका. बेरोजगारांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. रोजगार हमी योजनेची कामे पूर्ण होत नाहीत. रोजगार हमी योजनेचा निधी खर्च होत नसताना सरकारने रोजगार हमी योजना निधीचा कायदाच बरखास्त केला आहे. कायदा चिकित्सक समितीकडे पाठविला असताना समितीचा अहवाल येण्यापूर्वीच सरकारने नवीन अध्यादेश काढला. रोजगार हमी योजना निधीलाच सरकारने हात घातला आहे. ग्रामीण भागातील बेरोजगार गरीब माणसांच्या हाताला काम मिळत होते, त्या कायद्याच्या निधीलाच हात घातला आहे. त्याबद्दल या अभिभाषणात कुठेही उल्लेख झालेला नाही.

सभापती महोदय, आपल्याला कल्पना आहेच, 1972 साली, 1975 साली प्रचंड दुष्काळ पडला होता. त्या दुष्काळाच्या काळात कै.वि.स.पागे सभापती असताना त्यांच्या कारकिर्दीत रोजगार हमी योजनेचा कायदा अस्तित्वात आला. 'आहे रे' लोकांनी 'नाही रे' लोकांसाठी काहीतरी केले पाहिजे या स्तुत्य हेतूने हा कायदा केला गेला. पैसा उभा करण्यासाठी लोकांवर व्यवसाय कर लावण्याची संकल्पना मांडली गेली. या संकल्पनेला सर्वपक्षीय मंडळींनी, विरोधी पक्षाने देखील गरिबांचे अश्रू पुसण्याचे काम करणार असल्यामुळे एकमुखी पाठिंबा दिला. नोकरदार वर्गाकडून व्यवसाय कर गोळा करुन तो पैसा रोजगार हमी योजनेसाठी वापरला जात होता. परंतु आता सरकारने हा पैसा एकत्रित निधीमध्ये जमा करण्याचे ठरविले आहे. त्याबद्दल कुठेही अभिभाषणामध्ये उल्लेख केलेला नाही. त्यावेळी दुष्काळी परिस्थिती होती. अकुशल



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत...........

माणसांची संख्या अधिक होती. आज सुशिक्षित बेरोजगारांची संख्या वाढत आहे. रोजगार हमी योजनेचा स्कोप वाढवून सुशिक्षित बेकारांचा समावेश या योजनेमध्ये झाला पाहिजे. त्याबद्दल अभिभाषणामध्ये उल्लेख असणे अपेक्षित होते. या योजनेमध्ये शहरांचा सुध्दा समावेश झाला पाहिजे.

सभापती महोदय, 13 मार्च, 2006 रोजी राज्यपाल महोदयांनी केलेल्या अभिभाषणामध्ये 'मुंबई हे शहर जागतिक दर्जाचे शहर बनविण्यासाठी, मुंबईच्या विकास प्रकल्पांसाठी जागतिक बँक आणि जपान सरकार यांनी आर्थिक सहाय्य देण्याची तयारी दर्शविली आहे' असा उल्लेख होता. आजतागायत जपान सरकारकडून किती मदत मिळाली हे आम्हाला कळलेले नाही. राज्यपाल महोदय मागील वर्षाचे अभिभाषण वाचतात की नाही? वास्तविक ही कंटीन्यूअस प्रोसेस आहे. 'राज्यात खाजगी क्षेत्रात 12,500 मे.वॅट विद्युत निर्मिती प्रकल्प प्रस्तावित केले असून 7 कंपन्यांचे अहवाल प्राप्त झाले आहेत. 2006-07 मध्ये परळी, पारस आणि घाटघर प्रकल्पामध्ये प्रत्येकी 250 मे.वॅट क्षमतेचे तीन प्रकल्प पूर्ण होतील' असे राज्यपाल महोदयांनी मार्च, 2006 च्या अभिभाषणात सांगितले होते. त्यातील एकच प्रकल्प पूर्ण झाल्याचे चित्र आपल्यासमोर आहे. आज सकाळी लक्षवेधी सूचनेवरील चर्चेच्या वेळी विद्यार्थ्यांच्या परीक्षा सुरु असताना सुध्दा शाळांमध्ये वीज नाही, पंखे सुरु नाहीत ही स्थिती आहे. म्हणून राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणाचे स्वागत न करता खेद व्यक्त करतो आणि आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार मानून माझे भाषण संपवितो. जय हिंद, जय महाराष्ट्र!

-------------

(नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, या सभागृहात सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांनी आपल्या भाषणात एक विधान केले की विरोधी पक्षाच्या लोकांना ढेकळांच्या संदर्भात काय माहिती आहे ? मी त्यांना नम्रपणे सांगू इच्छितो की, ढेकळं आणि शेती फक्त सत्ताधारी बाकावरील लोकांनाच माहिती आहे असे नाही. तसेच मी त्यांना असेही सांगू इच्छितो की, शेतीच्या बाबतीत आम्हाला फक्त ढेकळंच माहीत नाही तर प्रत्यक्ष ढेकळं फोडण्याचे काम आम्ही केले आहे, बारे धरण्याचे काम सुध्दा केलेले आहे. टी.वाय. बी.ए. ला असताना लोकाच्या शेतात आम्ही पाभरी धरण्याचे, कोळपणी करण्याचे आणि बारे धरण्याचे काम त्याही वेळेस केले आणि आजही करीत आहोत. म्हणूनआपण कृपया असे समजू नये की, आम्हाला काहीच माहीत नाही. मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, शेतकऱ्यांचा विषय फार महत्वाचा आहे. सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी आपले विचार व्यक्त केलेले आहेत. मी देखील एक सर्वसामान्य शेतकऱ्याचाच मुलगा असून माझे आई-वडिल आजही गावाला शेती करीत आहेत आणि मला त्यांच्याकडून दोन-तीन गावकऱ्यांच्या माध्यमातून फोन आला होता. ते माझ्या वडिलांना म्हणाले की, तुमचा मुलगा तेथे आमदार म्हणून काम करीत आहे, त्यांना विचारा की, शासनाने कर्जमाफीचा जो निर्णय घेतला आहे त्याचा फायदा आम्हाला होणार की नाही ? त्यांनी सांगितले की, आम्ही तीन भाऊ असून आमची 7 एकर शेती आहे आणि आमच्यावरती कर्ज आहे, ते माफ होणार काय ? काही लोकांनी तर आपल्या भावना व्यक्त करतांना असेही सांगितले की, आम्ही प्रामाणिकपणे दरवर्षी कर्जाची परतफेड करतो आणि यावर्षी सुध्दा ते फेडण्याचा प्रयत्न केला. त्यामागे कारण असेही आहे की, कर्जबाजारी आहे म्हणून समाजात बेईज्जती होऊ नये, अवमानकारक वागणूक मिळू नये म्हणून आम्ही बाकीची सर्व महत्वाची कामे बाजूला ठेवून प्रामाणिकपणे कर्ज फेडण्याचा प्रयत्न करतो. परंतु आता शासनाने हे कर्ज माफ केले म्हणून आम्हाला त्याचा फज्ञयदा होणार की नाही ? अशा अनेक शंका लोकांच्या मनात आहेत, याबाबत गांभीर्याने विचार होण्याची गरज आहे.

महोदय, मुद्दा क्र. 13 मध्ये ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या संदर्भात उल्लेख केलेला आहे. या योजनेत जरी सुधारणा करण्यात आली असली तरी खऱ्या अर्थाने ही योजना प्रभावीपणे अंमलात

.....2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते ..........

आणण्याची गरज आहे. आजही आझाद मैदानामध्ये काही लोक उपोषणासाठी बसलेले आहेत. ठाणे जिल्ह्यातील 33 गावांमध्ये रोजगार हमी योजनेची जी कामे झालेली आहेत त्यावर 56 लाखाचा खर्च दाखविण्यात आला. परंतु प्रत्यक्ष 10 लाखाचेच हे काम झाले असून 46 लाख रुपये हडप करण्यात आले. कारण ज्या ज्या गावात ही कामे घेण्यात आल्याचे सांगितले त्या गावातील लोकांनी, सरपंच व पोलीस पाटलांनी सुध्दा लेखी लिहून दिलेले आहे की, आमच्या गावात रोजगार हमी योजनेची कामे झालेली नाहीत तसेच ज्यांच्या खोटया सह्या मस्टरवर घेण्यात आल्या ते लोक सुध्दा आमच्या गावात राहत नाहीत. अशा प्रकारे खोटे प्रकार करुन पैसे हडप करण्याचे काम केलेले आहे. म्हणून योजना फक्त कागदावरच राहतात आणि त्याची खऱ्या अर्थाने अंमलबजावणी होत नाही, यादृष्टीने विचार करण्याची गरज आहे.

महोदय, मुद्दा क्र. 55 ते 57 वर ग्रामीण भागातील आदिवासी विद्यार्थ्यांना काही सवलती देण्याच्या संदर्भातील योजनेचा उल्लेख करण्यात आला आहे. आजही ग्रामीण व आदिवासी भागातील अनेक विद्यार्थी शिक्षणापासून वंचित आहेत. त्यांना शिक्षणाचा प्रवाहात आणण्याचे प्रयत्न शासनाच्या माध्यमातून वेगवेगळया योजना राबवून करण्याची गरज आहे. शासनाने आदिवासी मुलांना, पाडे तसेच वाडया-वस्त्यावरील मुलांना माध्यमिक शाळेत जाण्यासाठी तसेच त्यांच्या उच्च शिक्षणाची सोय व्हावी म्हणून एस.टी. पासची जी सवलत मिळत होती ती योजना बंद केलेली आहे. त्याचा परिणाम म्हणून अक्षरश: त्या शाळांतील शिक्षकांना हा खर्च स्वत:च्या खिशातून आणि या विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी वर्गणी काढून करावा लागत आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते....

त्यामुळे ग्रामीण भागातील, आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना व विद्यार्थिनींना शिक्षणाची सोय व्हावी म्हणून किमान माध्यमिक शाळेचे शिक्षण पूर्ण होई पर्यंत तरी मोफत बस सवलतीची योजना सुरु करण्याची नितांत आवश्यकता आहे.

सभापती महोदय, मुद्दा क्रमांक 63 मध्ये सर्व शिक्षा अभियान योजनेअंतर्गत मध्यान्ह भोजनाचा विषय घेण्यात आलेला आहे. मध्यान्ह भोजनाची योजना आम्ही प्रभावीपणे राबवित आहोत असे अभिभाषणात म्हटले आहे. परंतु ही योजना शासन कोठे राबवित आहे? आज शहरी भागातील अनेक शाळेत मध्यान्ह भोजनाची योजना राबवली जात आहे परंतु ज्या शहरी शाळांना मध्यान्ह भोजनाच्या योजनेची गरज नाही, ज्या ठिकाणी श्रीमंताची मुळे शिक्षण घेतात त्या शाळांना मध्यान्ह भोजनाच्या योजनेची गरज नाही, ज्या शाळा या योजनेचा लाभ घेत नाही त्या ठिकाणी ही योजना न राबविता ख-या अर्थाने मध्यान्ह भोजनाची गरज ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना म्हणजे विशेषत: ज्या शाळा आदिवासी भागात आहेत, ज्या शाळा विनाअनुदानित आहेत त्यांना मध्यान्ह भोजनाच्या योजनेची गरज आहे. आज या योजनेचा चा फायदा कायम विनाअनुदानित शाळांना मिळत नाही. ज्या शाळांमध्ये गोरगरिबांची मुळे शिक्षण घेत आहेत अशा शाळांना मध्यान्ह भोजनाच्या योजनेचा फायदा मिळाला पाहिजे. त्यामुळे विनाअनुदानित शाळांना सुध्दा मध्यान्ह भोजन योजनेचा फायदा मिळाला पाहिजे.

सभापती महोदय, माननीय राज्यपाल महोदयांचे अभिभाषणात क्रीडा विषयक धोरणाचा कोठेही उल्लेख करण्यात आलेला नाही. क्रीडा हा विषय अत्यंत महत्वाचा आहे. त्यामुळे स्पोर्टच्या संदर्भात शासनाचे काही तरी धोरण आखण्याची गरज आहे. आज राज्यामध्ये मैदानांवर अतिक्रमणे होत आहेत. आज मैदाने गायब केली जात असतात. दादागिरी करुन मैदानावर बांधकाम केले जात आहे. आज सगळी मैदाने नष्ट व्हावयास लागली आहेत. जी जागा मैदाने म्हणून राखून ठवेली आहेत ती पुढेही राखीव राहिली पाहिजेत. मैदाने वाचविण्याच्या संदर्भात विद्यार्थ्यांना क्रीडांगणाची सोय होण्याबाबत शासनाचे नक्की धोरण काय आहे याबाबत माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात कोठेही उल्लेख करण्यात आलेला नाही. शासनाचे नेमके शैक्षणिक धोरण काय आहे? गेल्या दोन वर्षापासून शासनाने कोणत्याही शाळांना मान्यता दिलेली नाही.. सुप्रिम कोर्टाचा देखील आता निकाल लागलेला आहे. शासन शाळांना मान्यता देणार आहे की,

....2

श्री. रामनाथ मोते....

नाही ? देणार असेल तर कोणत्या तत्त्वानुसार देणार आहे ? पूर्वी प्रमाणेच विनाअनुदान तत्त्वावर मान्यता देऊन टप्प्या टप्प्याने शासन अनुदान देणार आहे काय ? एकाच वर्षामध्ये 1000-1000 शाळांना मान्यता देण्यापेक्षा 200 प्राथमिक शाळा, 300 माध्यमिक शाळा अशा प्रकारचे नियोजन शासन करणार आहे काय ? शाळांना अनुदान देणार आहे काय ? यासंदर्भातील मास्टर प्लॅन तयार करुन, बृहत आराखडा तयार करुन शाळांच्या बाबतीतील शैक्षणिक धोरण ठरविण्याची नितांत आवश्यकता आहे. आज राज्यामध्ये मराठी माध्यमांच्या शाळा बंद पडत आहेत. मराठीला प्राधान्य देण्याच्या संदर्भात माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात उल्लेख आहे. परंतु आज मराठी माध्यमाच्या शाळा बंद पडत आहेत. मोठ मोठया मराठी शाळा बंद पडत आहेत. नामांकित शाळा बंद पडत आहेत. ज्या शाळांमध्ये 1000-1200 विद्यार्थी शिक्षण घेत होते त्या आज त्या ठिकाणी 700-750 विद्यार्थ्यांची संख्या झालेली आहे. नजीकच्या भविष्यकाळामध्ये ही संख्या अजून कमी होण्याची शक्यता आहे. डोंबिवलीमध्ये मागील काही काळामध्ये मराठी शाळेमध्ये शेकडो विद्यार्थ्यांना प्रवेश नाकारला जात असे परंतु आज त्या मराठी माध्यमांच्या शाळांच्या तुकड्या बंद पडण्याच्या मार्गावर आलेल्या आहेत. आपल्या मराठी शाळेच्या तुकड्या बंद होऊ नये म्हणून शिक्षकांना घरोघरी फिरावे लागत आहे, शिक्षकांना दुस-या शाळेमध्ये जाऊन तुमचे चार-पाच तरी विद्यार्थी आम्हाला द्या नाही तर आमची तुकडी बंद पडेल म्हणून विनंती करावी लागत आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील मराठी माध्यमांच्या शाळा वाचविण्यासाठी शासनाने धोरण ठरविण्याची आवश्यकता आहे परंतु यासंदर्भातील उल्लेख माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात नाही.

सभापती महोदय, ज्येष्ठ नागरिकांच्या संदर्भात माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात कोठल्याही प्रकारचा उल्लेख करण्यात आलेला नाही. शिक्षण विभागातील अनेक पदे रिक्त आहेत. बेरोजगारी कमी करण्याचा उल्लेख अभिभाषणात कोठेही करण्यात आलेला नाही. काही ठिकाणी पदे भरण्यात येतील असा उल्लेख करण्यात आलेला आहे. परंतु ख-या अर्थाने बेकारीचा, बेरोजगारीचा प्रश्न सोडविण्यासाठी शासनाने निश्चित प्रकारे धोरण आखण्याची गरज आहे. परंतु अशा प्रकारचे धोरण आम्हाला माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात आम्हाला कोठेही पहावयास मिळाले नाही.

यानंतर श्री. गायकवाड....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते....

रोजगार उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात उलेख करण्यात आलेला नाही. शिक्षण क्षेत्रात अनेक जागा रिक्त आहेत तेव्हा याबाबतीत शासनाचे नेमके कोणते धोरण आहे हे मला कळत नाही. या राज्याला शिक्षण संचालक नाहीत. गेल्या दोन वर्षामध्ये आम्हाला पूर्णवेळ शिक्षण संचालक मिळालेले नाहीत. श्री. कदम नावाचे शिक्षण संचालक आहेत त्यांना मी विचारले की," आपल्याकडे किती पदांचा कार्यभार देण्यात आलेला आहे ? " तेव्हा त्यांनी मला असे सांगितले, "कोल्हापूर एस.एस.सी. बोर्डाचे अध्यक्ष पद, लातूरच्या एस.एस.सी. बोर्डाचे अध्यक्ष पद आणि बालचित्रवाणीचे संचालक तसेच महाराष्ट्र सारख्या राज्याचे शिक्षण संचालक पदाचा कार्यभार माझ्याकडे आहे. " अशा प्रकारे एका एका व्यक्तीकडे पाच पाच पदाची जबाबदारी देण्यात आलेली आहे. श्री. कंठे हे मुंबई विभागाचे अध्यच आहेत. त्यांना मी विचारले की," तुमच्याकडे आणखी किती पदांचा कार्यभार देण्यात आलेला आहे ? तेव्हा त्यांनी मला असे सांगितले की," माझ्याकडे नाशिक विभागाच्या अध्यक्षपदाचा कार्यभारसुध्दा देण्यात आलेला आहे आणि आमच्याकडे पुरेशी माणासे नाहीत." एका एका व्यक्तीकडे जर पाच पाच पदांचा कार्यभार देण्यात आला असेल तर कामकाजाची गुणवत्ता कशी वाढेल.? स्टाफिग पॅटर्न बदलण्यात आलेला नाही तसेच अनेक ठिकाणी पदे रिक्त आहेत ती भरण्यात आलेली नाहीत. रिक्त असलेली पदे भरण्याचे काम शासन करीत नाही तेव्हा असा प्रकार आणखी किती दिवस असे चालणार आहे.? पदे भरण्याच्या बाबतीत शासनाचे धोरण काय आहे ? लोकसेवा आयोगाकडून जर नियुक्ती केली जात नसेल तर शासन स्तरावर ही पदे भरण्यात आली पाहिजेत. शासनाने मध्यंतरी पदे भरण्याच्या बाबतीत दोन जी.आर काढले होते. त्या संदर्भात काय कार्यवाही करण्यात आली आहे ? अनुभव नसलेली व्यक्ती मिळत नसेल तर ही अट शिथिल करण्यात आली पाहिजे. जी अट घालण्यात आलेली आहे त्यामध्ये सवलत दिली पाहिजे व ही अट क्षमापित करण्यात आली पाहिजे , उच्च पदावर काम करणाऱ्या अधिकाऱ्याकडे पाच पाच पदांचा कार्यभार न देता पूर्णवेळ एकच पदाचा कार्यभार देण्यात आला पाहिजे. तसेच रिक्त असलेली पदे त्वरित भरण्यात आली पाहिजेत परंतु या संबंधी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात कोणताही उल्लेख करण्यात आला नाही.

सभापती महोदय, यानंतर दुसरा एक महत्वाची बाब मला येथे मांडावयाची आहृ केन्द्र शासनाने शिक्षणाच्या बाबतीत अनेक योजना जाहीर केल्या आहेत व त्या योजना या राज्यामध्ये

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री रामनाथ मोते ....

येत आहेत. केन्द्र सरकाने त्यासाठी मोठया प्रमाणावर तरतुदी केल्या आहेत जवळजवळ 47 हजार कोटी रुपये वेगवेगळया योजनासाठी केन्द्र सरकारने देऊ केलेले आहेत. तेव्हा या संदर्भात राज्य शासनाने काही नियोजन केलेले आहे काय ? माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात यासंबंधी काहीही उल्लेख करण्यात आलेला नाही. 6 हजार मॉडेल स्कुल्स असून त्यासाठी 12 हजार 750 कोटी रुपये केन्द्र शासानाने देऊ केलेले आहेत परंतु त्यासाठी आपण काही योजना तयार केली आहे काय ? या पैकी किती शाळा आपण घेणार आहोत ? कोणत्या ठिकाणी घेणार आहोत आणि त्यासाठी आपण काय नियोजन केलेले आहे ? यासबंधी काहीही उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात करण्यात आलेला नाही. सभापती महोदय, ज्या प्रमाणे प्राथमिक शाळांमध्ये सर्व शिक्षा अभियान सुरु करण्यात आलेले आहे त्याप्रमाणे माध्यमिक शाळासाठी सुध्दा सर्व शिक्षा अभियान अधिक प्रबळ करण्याचे आणि अधिक सक्षम करण्याचे काम केन्द्र सरकारने अकराव्या पंचवार्षिक योजनेत घेतलेले आहे . त्यासाठी केन्द्र सरकारकडून राज्याला हजारो कोटी रुपये देण्यात येणार आहेत. 15 हजार शाळांचे अपग्रेडेशन करण्यासाठी जवळजवळ 7 हजार 650 कोटी रुपये उपलब्ध होणार आहेत. परंतु त्यासाठी राज्य शासनाने काही नियोजन केलेले आहे काय ? राज्य शासनाकडे पैसे नाहीत त्यामुळे राज्य शासनाने व्यवस्थितपणे नियोजन केले तर या सगळया योजनांमधून राज्यातील ज्या कायम विना अनुदानित शाळा आहेत त्यां अनुदानावर येऊ शकतील. अनेक शाळांमध्ये अन्य सवलती उपलब्ध करुन देता येऊ शकतील. 47 हजार कोटी रुपयापैकी किती तरी रक्कम या राज्याला मिळू शकेल परंतु त्यासाठी नियोजन करण्याची आवश्यकता आहे.तेव्हा यासाठी नियोजन त्वरित करण्यात येणार आहे काय ? या संदर्भात दिनांक 1 ऑक्टोबर 2007 रोजी केन्द्र शासनाने एक पत्र पाठविले होते परंतु शिक्षण विभागाला त्याबाबतीत काहीही माहिती नाही .त्यामुळे या बाबतीत राज्य शासनाकडे कोणतीही योजना तयार करण्यात आलेली नाही. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात शिक्षण क्षेत्राबाबत काहीही उल्लेख करण्यात आला नाही. त्यामुळे ते क्षेत्र दुर्लक्षित ठरलेले आहे. इतर बाबीचा तरी थोडा फार उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात करण्यात आला आहे परतु शिक्षणाच्या बाबतीत मात्र काहीही उल्लेख केलेला नाही. शिक्षणा सारख्या अत्यंत महत्वाच्या विषयाचा राज्यपालांच्या अभिभाषणात उल्लेख नसणे ही अत्यंत खेदजनक बाब आहे म्हणून यासर्व बाबींचा विचार होणे आवश्यक आहे एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर (विधानसभेने निवडलेले) :सभापती महोदय, माननीय राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाबद्दल खेद व्यक्त करण्यासाठी मी येथे उभा आहे. महाराष्ट्रामध्ये कोकण येत असतांना सुध्दा माननीय राज्यपालांनी कोकणातील पर्यटन, तसेच आंबा बागायतदारांच्या, व मच्छिमारांच्या नुकसानी बाबत कोणताही उल्लेख केलेला नाही. त्यामुळे मी खेद व्यक्त करतो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी त्यांच्या भाषणात असे विचारले की, आम्हाला ढेकूळ व फाळ माहीत आहे काय ? महाराष्ट्राच्या 720 किलोमिटर्स लांबीच्या समुद्रकिनाऱ्यावरील मच्छिमार कशा प्रकारे जीवन जगतात हे अनेकांना माहीत नाही. सर्वजण मासे खातात परंतु मच्छिमार मासे कसे मारतात व त्यासाठी त्यांना किती कष्ट घ्यावे लागतात याची माहिती शासन कर्त्याला नाही याबदद्दल मला खेद वाटतो.

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

KBS/ श्री. गायकवाड नंतर --- 20:20

श्री.उपरकर ....

या ठिकाणी मच्छिमारीचा दुष्काळ जाहीर केला जावा म्हणून मच्छिमार वणवण रस्त्यावर येत आहेत, मोर्चे काढताहेत. मोर्चे काढल्यानंतर शासनाचा प्रतिनिधी म्हणून एक मंत्री मोर्चाला समोर जातो आणि सांगतो की, मी या मच्छिमारांचा प्रश्न सोडविण्यासाठी बैठक घेण्याचे कबूल करतो. त्यानंतर आठ दिवसांनी तशी बैठक घेता आली नाही म्हणून खेद व्यक्त करतो. सभापती महोदय, महाराष्ट्र राज्याचा महसूल मंत्री या ठिकाणी खेद व्यक्त करतो की, शासन मच्छिमारीचा दुष्काळ जाहीर करण्यास असमर्थ ठरले आहे असे वृत्तपत्रातून सांगतो. आज किनारपट्टीवर असलेले मच्छिमार मच्छिमारीचा दुष्काळ सरकार जाहीर करीत नाही म्हणून अत्यंत नाराज झालेले आहेत, निराश झालेले आहेत. पण त्यांच्या बाबतीत या अभिभाषणामध्ये माननीय राज्यपालांनी काहीही उल्लेख्या केलेला नाही किंवा त्यातून मच्छिमारांना देखील कर्जमुक्ती मिळणार आहे किंवा नाही या संबंधीची कोणतीही घोषणा केलेली नाही. सभापती महोदया, 1981 च्या शासन निर्णयानुसार मच्छिमारांकडून जी मासेमारी केली जाते त्यात बदल यकरण्याची गरज असताना त्याबद्दलचा कोणताही उल्लेख या भाषणात आलेला नाही.

सभापती महोदया, रानटी हत्तींच्या प्रश्नाबद्दल कोणत्याही प्रकारे राज्यपालांच्या भाषणातून उल्लेख आलेला नाही. आज सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये दोडामार्ग तालुक्यापासून सावंतवाडी, तेथून कुडाळ, मालवण आणि वेंगुर्ल्यापर्यंत हे रानटी हत्ती जाऊन पोहोचले आहेत. या हत्तींमुळे बागायतीचे नुकसान तर होतच आहे पण मनुष्यहानी देखील होते आहे. मला सांगण्यास खेद वाटतो की, त्या भागामध्ये रानटी हत्तींच्या हल्ल्यामध्ये माझ्या एका चुलत भावाला आपला जीव गमवावा लागला आहे. सभापती महोदय, या रानटी हत्तींच्या आक्रमणामुळे मनुष्यहानी होत असताना त्याबाबत कोणतीही उपाय योजना करण्याच्या बाबतीत राज्य शासनाने कोणतीही योजना आखलेली नाही वा केंद्र शासनाच्या मदतीने देखील योजना आखलेली नाही. त्याबाबत कोणताही उल्लेख राज्यपालांच्या या भाषणात आलेला नाही त्याबद्दल मी येथे खेद व्यक्त करतो.

सभापती महोदया, त्याचप्रमाणे आपला ग्राहक संरक्षण कायदा आहे, त्या कायद्यांतर्गत राज्य ग्राहक संरक्षण मंच मुंबईत तयार झालेला आहे. परंतु हा मंच झाल्यानंतरही त्यासाठी कोणीही न्यायाधीशाची नेमणूक केलेली नसल्याने 1998 सालापासूनच्या केसेस आज देखील चालल्या आहेत. दहा वर्षापूर्वीच्या केसेस आजही चालत असल्यामुळे आज ग्राहकांनाही संरक्षण देण्याबाबत,

..... 4क्यू 2 ...

श्री. उपरकर ...

ग्राहकांच्या अपिलांच्याबाबतीत लवकर निर्णय लागण्यासाठी न्यायाधीश नेमण्याबाबतीत कोणत्याही प्रकारचा उल्लेख राज्यपालांच्या भाषणात आलेला नाही. त्याबद्दल मला येथे खेद व्यक्त करावासा वाटतो.

सभापती महोदया, सिंधुदुर्ग जिल्हा हा पर्यटन जिल्हा म्हणून घोषित झालेला देशातील पहिला जिल्हा आहे. परंतु या जिल्ह्यात पर्यटनाच्या माध्यमातून वेगवेगळ्या आवश्यक सुविधा देण्याबाबत कोणतीही घोषणा या भाषणातून माननीय राज्यपालांनी केलेली नाही. उलट हा पर्यटन जिल्हा असताना त्या ठिकाणी प्रदूषण करणारे औष्णिक प्रकल्प होत आहेत, मायनिंग सारखे प्रकल्प होत आहेत आणि पर्यावरण बिघडविण्याचा प्रयत्न केला जातो आहे. परिणामी पर्यटक या जिल्ह्याकडे पाठ फिरवतील आणि मग या जिल्ह्यात पर्यटनाच्या माध्यमातून केलेला सारा खर्च वाया जाईल. पण याबाबत कोठलाही उल्लेख राज्यपालांनी त्यांच्या भाषणात केलेला नाही त्याबद्दल देखील मला येथे खेद प्रकट करावासा वाटतो. सभापती महोदय, कोकणातील आंबा नुकसान भरपाईसाठी कोकणातील सर्व आमदारांनी भांडून 15 हजारापर्यंत नुकसान भरपाई देण्यास सरकारला भाग पाडले आहे. परंतु ही 15 हजार रूपयांची भरपाई जाहीर केल्यानंतर महसूल यंत्रणेच्या तलाट्याने कोणत्याही आंबा बागायतदारांचे पिकपाणी न लावल्यामुळे आज त्या आंबा बागायतदारांना नुकसान भरपाई मिळत नाही आणि त्यासाठी तरतूद केलेले पैसे तसेच ट्रेझरीमध्ये पडून आहे त्यामुळे भविष्यात यासाठी आलेले अनुदान परत जाण्याची शक्यता निर्माण झालेली आहे. पण याबाबतीत देखील कोणताही उल्लेख राज्यपालांनी त्यांच्या भाषणात केलेला नाही.

सभापती महोदया, महाराष्ट्रामध्ये वन संरक्षण कायदा आला. त्या कायद्याखाली महाराष्ट्रातील 62 हजार हेक्टर जमीन आलेली आहे. त्यातील 42 हजार हेक्टर जमीन ही एकट्या सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये असल्याचे प्रशासनाच्या चुकीच्या नोंदीमुळे नोंद झाली आणि याबाबत अनेकदा सभागृहात प्रश्न उपस्थित केले असता महसूल मंत्र्यांनी याबाबत दोन महिन्यात प्रतिज्ञापत्र विभागाच्या सचिवांच्या माध्यमातून सर्वोच्च न्यायालयात दाखल करतो असे वचन देऊनही अद्याप वन कायद्याखालील प्रश्न न सुटल्यामुळे तेथील शेतकरी त्रस्त झालेले आहेत. या ठिकाणी निवडणुका आल्या की, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आणि रत्नागिरी जिल्ह्यातील कुबडतदार गावकर आकारपडित जमिनीतल्या शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविणार अशा प्रकारच्या घोषणा शासनकर्ते करतात. पण आजही या आकारपड जमिनीतील गावकऱ्यांचे प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने कोणत्याही प्रकारची

...... 4क्यू 3 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उपरकर ...

ठोस उपाय योजना शासनाने केलेली नाही आणि माननीय राज्यपालांनी देखील त्या संदर्भात कोठलाही उल्लेख केलेला नाही. ....

( यानंतर श्री. सरफरे ....4आर 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर...

याबाबतीत माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये कोणताही उल्लेख केलेला नाही. त्याचप्रमाणे सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये तलाठयापासून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या, राज्य विद्युत मंडळाच्या कार्यकारी अभियंत्यांपर्यंतच्या अधिकाऱ्यांना लाच घेतांना पकडून सुध्दा त्यांच्यावर कोणतीही कारवाई करण्यात येत नाही. अधिकाऱ्यांकडून होत असलेल्या भ्रष्टाचाराचे निर्मूलन करण्यासाठी कोणतीही ठोस उपाय योजना माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये करण्यात आली नाही. सभापती महोदय, संपूर्ण महाराष्ट्रामध्ये महागाईचे प्रमाण वाढले आहे. गोरगरीब जनता रेशनच्या दुकानावर धान्य खरेदी करण्याकरिता सकाळी 5 वाजता रांग लावते तरीसुध्दा त्यांना धान्य न मिळाल्यामुळे रिकाम्या हाताने परत यावे लागते. गोरगरीबांना पुरेसे धान्य पुरविण्याबाबत कोणत्याही प्रकारचा उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये करण्यात आलेला नाही. सभापती महोदय, कृषी विभागामध्ये मोठया प्रमाणावर भ्रष्टाचार होतो. भ्रष्टाचार करणाऱ्या अधिकाऱ्यांकडून रकमेच्या वसूलीची कारवाई होते. परंतु भ्रष्टाचार थांबविण्यकरिता शासनाचा या अधिकाऱ्यांवर कोणत्याही प्रकारचा वचक बसलेला नाही. कृष विभागातील अधिकारी, कर्मचारी सातत्याने भ्रष्टाचार करीत असतात आणि सही सलामत सुटतात. त्यामुळे कृषी विभागाकरिता तरतूद करण्यात आलेला निधी त्या कामावर खर्च न होता भ्रष्टाचारामध्ये लुटून नेला जातो. त्यामुळे शेतकऱ्यांना खऱ्या अर्थाने कृषी विभागाचा फायदा मिळाला पाहिजे तो मिळत नाही. याठिकाणी कुंपनच शेत खात असल्यामुळे ते रोखण्यासाठी कोणतीही ठोस उपाय योजना माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये करण्यात आलेली नाही.

सभापती महोदय, कुक्कुटपालनाचा व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांच्या कोंबडयांवर बर्ड फ्लूचा प्रादुर्भाव होऊन त्या मरण पावल्यातर त्यांना 100 टक्के अनुदान देण्याची घोषणा केली. आज सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये 40 कुक्कुटपालनाचा व्यवसाय करणारे लोक आहेत त्यांना शासनाकडून 70 टक्के अनुदान मिळाले आहे. परंतु 30 टक्के अनुदान अजून मिळाले नाही. अनुदान वाटपामध्ये मोठया प्रमाणामध्ये भ्रष्टाचार होत असतांना त्याबाबत कारवाई करण्यास हे शासन असमर्थ ठरले आहे. त्यासंबंधी देखील माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये उल्लेख नाही. सभापती महोदय, कोकणामध्ये कोकण विकास महामंडळामार्फत 1 हजार हेक्टर जमिनीवर तेलताड प्रकल्पांतर्गत झ ाडांची लागवड करण्यात आली. या प्रकल्पाकरिता शेतकऱ्यांनी आपल्या जमिनी महामंडळाला लिजवर दिल्या. या प्रकल्पावर महामंडळाने कोटयावधी रुपये खर्च केले आणि



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर...

तेलगिरण्या निर्माण केल्या. परंतु त्या निर्माण केल्यानंतर दोन दिवसात बंद पडल्या. त्यामुळे महामंडळाकडून या झाडांकरिता देण्यात आलेले खत वाया गेले आहे. कोकणामध्ये हा एक धाडशी प्रकल्प होणार होता, या प्रकल्पाला उभारी देण्यासाठी कोकण विकास महामंडळाकडून कोणतेही प्रयत्न करण्यात आले नाहीत. त्यासंबंधी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये कोणताही उल्लेख करण्यात आला नाही याबद्दल मला खेद होत आहे.

सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये विमानतळ बांधण्यात येणार आहे अशी घोषणा माननीय राज्यमंत्र्यांनी केली. या जिल्हयामध्ये विमानतळाची उभारणी करण्याकरिता दोन वेळा टेंडर काढण्यात आले. त्याकरिता शेतकऱ्यांच्या हजारो एकर जमिनी संपादित करण्यात आल्या. परंतु अद्यापि विमानतळाच्या उभारणीसाठी कोणतेही काम केले नाही. आपल्या जमिनी गेल्यामुळे शेतकरी भयभीत झाले असतांना त्यांना दिलासा देण्यासाठी आणि कोकणामध्ये विमानतळ सुरु करण्यासाठी कोणतीही उपाय योजना माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये करण्यात आली नाही याबद्दल मला खेद होत आहे. सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्हयातील कुडाळ येथील एम.आय.डी.सी. मधील जवळ जवळ 80 टक्के कारखाने बंद पडले आहेत. एम.आय.डी.सी. च्या उभारणीकरिता तेथील शेतकऱ्यांनी आपल्या जमिनी दिल्या परंतु तेथील कारखानदारांनी त्या जमिनींचा वापर निवासी भूखंड उभारण्यासाठी केला आहे. या प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी शेतकरी अनेक वेळा उपोषणाला बसले असतांना त्यांच्या जमिनी त्यांना परत देण्यात आल्या नाहीत. मालवण तालुक्यातील देवळी या गावातील शेतकऱ्यांच्या जमिनींवर आंब्याची बागायत असतांना, घर, गोठे असतांना माननीय राज्यपालांच्या नावाने अध्यादेश काढून त्यांच्या जमिनींच्या 7/12 वर जबरदस्तीने शिक्के मारण्यात आले. त्यांच्या जमिनींवर कोणता प्रकल्प होणार आहे, त्यांच्या 7/12 वर शिक्के कां मारण्यात आले आहेत? याची त्यांना बिलकुल जाणीव करुन न दिल्यामुळे ते भयभीत झाले आहेत. त्यासंबंधी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये कोणतीही उपाय योजना केली नसल्यामुळे मी खेद व्यक्त करतो.

(यानंतर सौ. रणदिवे)

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर . . . .

सभापती महोदय, माननीय राज्यपालांनी याबाबतीत कोणत्याही प्रकारची उपाययोजना सुचविलेली नाही. आता कोकणामध्ये कोकण रेल्वे हे प्रमुख वाहतुकीचे साधन आहे. तेथे मोठया प्रमाणात प्रवासी वाहतूक होत असते. परंतु त्याकडे दुर्लक्ष करुन माल वाहतुकीकडे लक्ष केंद्रीत केले जात आहे. कोकण रेल्वेच्या निर्मितीमध्ये महाराष्ट्र राज्याने देखील आपला हिस्सा दिलेला आहे ही बाब लक्षात घेणे आवश्यक आहे. आज अशी स्थिती आहे की, कोकण रेल्वेची वाहतूक वेळेनुसार होत नाही. त्यामुळे त्या भागातील सन्माननीय सदस्य विविध बैठकीसाठी वेळेवर उपस्थित राहू शकत नाहीत. याकडेही लक्ष दिले पाहिजे. कोकण रेल्वेचे प्रशासन, तेथील अधिकारी यामध्ये सुधारणा करण्याच्या बाबतीत प्रयत्न करीत नाहीत, प्रवाशांच्या संरक्षणाच्या दृष्टीने प्रयत्न करीत नाहीत. त्यामुळे मी या सर्व बाबींच्या संबंधात खेद व्यक्त करण्यासाठी उभा आहे. परंतु माननीय राज्यपालांनी त्यांच्या अभिभाषणामध्ये कोकणाच्या संदर्भात अन्याय केल्याचे दिसत आहे, त्याबद्दल देखील मी खेद व्यक्त करतो आणि आपण मला भाषण करण्याची संधी दिली, त्याबद्दल मी आपले आभार मानतो आणि माझे भाषण संपवितो.

-----

. . . .4 एस-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती (श्री.उल्हास पवार)** : आता माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावावरील चर्चा संपलेली आहे. माननीय उप मुख्यमंत्री उद्या या प्रस्तावावरील चर्चेला उत्तर देतील. तसेच आजच्या कामकाज पत्रिकेवर दाखविण्यात आलेल्या अर्ध्या तासाच्या चर्चा उद्या घेण्यात येतील.

सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या शुक्रवार, दिनांक 14-03-2008 रोजी सकाळी 11.00 वाजता पुन्हा भरेल.

(सभागृहाची बैठक रात्रौ 8 वाजून 31 मिनिटांनी,शुक्रवार, दिनांक 14-03-2008 रोजीच्या सकाळी 11.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

-----

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही